विषय काव्य.
सं. क्र. १६६२



# श्री तुकाराम महाराज

— यांच्या —

## अभंगांची

# छन्दबद्ध गाथा

### भाग १ ला

अभंग संख्या १ ते ९५२

त भाग १०

REFBK-0014829

१०,०००

संत सेवा प्रकाशन, सातारा.

१/७/१९९६

३८५५३
का/व्य
२५।५।९६
१९९२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८५५३ वि: काव्य
[illegible] १९९२ नों दि: २५।५।९६



# श्री तुकाराम महाराज

— यांच्या —

## अभंगांची

# छन्दबद्ध गाथा

REFBK-0014829
REFBK-0014829

भाग [illegible] ला

अभंग संख्या १ ते ९५३

14829

एकूण संकल्पित भाग ([illegible])

अभंग संख्या १०,०००

संत सेवा प्रकाशन, सातारा.

प्रकाशक:—

संतसेवा प्रकाशन,
१८८ प्रतापगंज पेठ,
सातारा शहर.

प्रथमावृत्ती १९ मार्च १९६५
तुकाराम बीज १८८६

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

मूल्य रु. २–२५ पैसे (कागदी कव्हर)
रु. २–४० पैसे (कार्डबोर्ड कव्हर)

मुद्रक:—
म. सं. यादव,
नॅशनल प्रिंटिंग प्रेस,
१०९, शुक्रवार पेठ,
सातारा शहर.

ॐ

अभंगांच्या छन्दशात्राचे प्रणेते आणि ज्यांच्या शतकोटी प्रतिज्ञेचा श्री तुकाराम गाथा हा कळस होय; त्या



भक्तराय श्री नामदेव महाराज यांच्या व श्री तुकाराम महाराज यांच्या कृपेनें

## श्री विठ्ठलार्पणमस्तु

दासानुदास : रामदास कृष्ण धोंगडे

# श्रेयाचें वाटेकरी

आजपावेतो पुढील संस्था आणि सज्जनानीं जुनी हस्तलिखिते दिलीं:—

१) श्री. गंगोत्री विठ्ठल मंदीर, वाई

२) श्री. भीमकुंड आळी विठ्ठल मंदीर वाई.

३) श्री शेटे मारुती मंदीर भोर

४) श्री. विठ्ठल मंदीर रहिमतपूर

५) श्री बोधे विठ्ठल मंदीर सातारा

६) ह. भ. प. वा. ब. रणभोर सातारा

७) श्री. तु. घों. बोधे सातारा

८) श्री. दुधाणे भोर

९) ह. भ. प. वै. एकनाथ केशव चौगुले-वाई द्वारा श्री. बा. ए. चौगुले.

१०) श्री. दिगांबर भाऊशेट मुळे - वाई द्वारा ह. भ. प. शंकरशेट विष्णुशेट बगाडे वाई

११) श्री. जनार्दन रामचंद्रशेट बोधे. सातारा,

१२) श्री. आनंदराव चव्हाण द्वारा ह. भ. प. पांडुरंगराव देशमुख तळिये (वाठार)

१३) श्री. रामचंद्र लक्ष्मणराव रावळ उंब्रज

१४) श्री. शंकरराव जगदाळे, कोलवडी ता. (कोरेगांव)

पुढील सज्जनांनी जुन्या गाथा दिल्या:—

(१) श्री. रघुनाथराव तावरे. वाई,

(२) शंकरशेट मारुतीशेठ बारटक्के सातारा,

(३) श्री. आण्णाराव पवार सातारारोड,

(४) श्री. शंकरराव ठोंबरे पिंपोडे बुद्रुक (कोरेगांव)

पुढील सज्जनांकडून मुखोद्गत पाठ मिळाले:—

(१) श्री. जगतापबुवा मारुती मंदीर उंब्रज

(२) श्री. आण्णाबुवा जाधव उंब्रज

(३) श्री. विष्णुराव नाईक सातारारोड आणखी कांहीं अपरिचित मंडळींची नांवे टिपण्याचें राहिले तो बरीच.

# अभिप्राय

मिळनील तितके श्रीतुकोबांचे अभंग छापावेत या हेतूनें आपण जो प्रयत्न आरंभिला आहे तो स्तुत्य आहे. असा प्रयत्न फार वर्षांपूर्वी श्री. घरत यानीं केला होता.

सांप्रदायिक गाथ्यांत आढळून येणारे अभंग तेवढेंच तुकोबांचें ही समजूत बरोबर नाहीं हेंहि आपले म्हणणें योग्य आहे.

परंतु अभंगांचे पाठ ठरविण्याकरितां जी कसोटी आपण लावूं इच्छितां, त्याचप्रमाणें ज्या अर्थाच्या टीपा आपण देतां, त्या सर्वांना मान्य होतील असें नाहीं.

निवडलेले पाठ देतांना त्याजबरोबर दुसरेहि पाठ दिले असते तर बरें झालें असतें.

आपल्या अंगीकृत कार्यांत यश येवो असें इच्छितों.

पुणे,
का. शु॥ २ शके १८८६

शं. वा. दांडेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८८५३ वि: ......
क्रमांक २५६१ दि. १५ ६ ६५

# आभार प्रदर्शन

आजवर अभंग संशोधनाच्या कामीं बऱ्यांच संस्था चालकानीं आणि भाविक सज्जनानी अत्यंत आस्थेनें लिखिते, गाथे व मुखोदगत पाठ देऊन सहाय्य केले आहे. त्यांचा निर्देश सुरवातीस आहेच.

नोकरी निमित्त फिरलेल्या या थोडयाशा गांवातून गाथेत समाविष्ट केलेले अभंग मला मिळाले. अशाच स्वरूपाचा प्रयत्न देशव्यापी स्वरूपाचा झाला तर हजारो अभंग अजूनही मिळू शकतील. अर्थांत अन्नसंतर्पणांत खरें पुण्य जसें दात्यांचें असते – वाढप्याचे नसतें – तसेंच या संकलनाचें खरे श्रेय त्यांचे होय.

हा भाग कार्तिक महिन्यांत छापून व्हावा अशा अपेक्षेनें कामांस लागलो. परंतु कागद टाईप आदि जुळवाजुळवीमध्यें झालेल्या कालापव्ययामुळें छपाई माघ अखेर संपली म्हणून माघ शुद्ध दशमी ऐवजी श्री तुकाराम बिजेस तो प्रसिद्ध करावा लागला. अर्थांत विद्वान अधिकारी मान्यवर मंडळींचें; आणि वृत्तपत्र संपादकांचें अभिप्राय मिळवून समाविष्ट करण्यांस, अत्यत थोडाच अवधी उरला. म्हणून अगदी थोडयाशाच मान्यवरानां अभिप्रायार्थ विनंती केली. त्यापैकी गुरुवर्य ह. भ. प. मामासाहेब दांडेकर यानीं अत्यंत तत्परतेनें आणि थोडयांच अवधीत आपला अभिप्राय पाठविला; त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

अभिप्राय मागणी मजकडून फारच उशीरा झाल्यामुळें अजूनही कांही मान्यवरांचे अभिप्राय यावयाचें आहेत. तसेंच वृत्तपत्राकडेही गाथा पाठवावयाची आहेच. त्यामळें भावी अभिप्राय दात्यांचेही उपकार मानले पाहिजेत.

गाथेचे मुद्रक श्री. म. सं. यादव हे माझे वर्गमित्र. त्यांच्या मार्गदर्शनानें बऱ्यांच गोष्टी सुकर झाल्या हेंही खरेंच. पण विशेष म्हणजें त्यानीं खास गाथेसाठीं नवा टाईप आणवून काम केले हे होय त्यामुळे ळ ठु सारख्या साध्या पुस्तकांत विशेष प्रचारांत नसलेल्या अक्षरांचें प्रमाणाचा आडाखा बांधणें कठीण झाले म्हणून त्यानां वारंवार अडचणी आल्या. जुळाईचें कामीं न रुळलेली अक्षरें वारंवार बदलावी लागली. अशा विविध अडचणीतून मार्ग काढूनही त्यानीं अति परिश्रमानें काम चोख करण्याची पराकाष्ठा केली आह. त्याबद्दल त्यांचे; व त्यांचे बंधू श्री. गजाननराव आणि कंपाझिटर श्री. मौला बागवान यांचे आभार मानले पाहिजेत.

श्री तुकाराम बीज,
शुक्रवार फाल्गुन वा॥ २
शके १८८६.

सर्वांचा उपकृत,

रा कृ. धोंगडे

# — विषयानुक्रम —

टीप:– प्रकरणांचें वर्गीकरण संपूर्ण समजूं नये. अजून बरीच प्रकरणें पाडावयाची आहेत; आणि सध्यां पाडलेलीही पूर्ण झाली आहेत असे नाहीं; त्यांतही अजून भर पडणारच आहे; आणि संशोधन चालू असल्यामुळें पुढेंही ती पडतच राहील.


| प्रकरण क्रमांक | विषय वैशिष्ठ्य | पृष्ठ क्रमांक | समाविष्ट अभंग संख्या क्रमांक पासून | क्रमांक पर्यंत |
|---|---|---|---|---|
| १ | नमनें | १ | १ | १६ |
| २ | सद्‌गुरुप्राप्ती | ४ | १७ | ११७ |
| ३ | मंत्रबीज | २७ | ११८ | १२१ |
| ४ | ग्रंथप्रामाण्य | २९ | १२२ | १२६ |
| ५ | पूजा | ३० | १२७ | १९७ |
| ६ | हरिपाठ | ४६ | १९८ | २३० |
| ७ | नित्यपाठ | ५४ | २३१ | २४५ |
| ८ | रूप | ५८ | २४६ | २८० |
| ९ | ध्यान | ६५ | २८१ | २९२ |
| १० | मंगलाचरण | ६७ | २९३ | ३१४ |
| ११ | देव आळवण–दर्शनोत्सुकता | ७२ | ३१५ | ३२७ |
| १२ | निष्ठानिर्भयता | ७५ | ३२८ | ३३४ |
| १३ | ब्रह्मानुभती | ७७ | ३ ५ | ३८५ |
| १४ | भुक्तिस्वानंदानुभूती | ८७ | ३८६ | ४१२ |
| १५ | विठ्ठलप्रेम–बाळभाव | ९३ | ४१३ | ४६८ |
| १६ | एकविधभाव | १०५ | ४६९ | ५१७ |
| १७ | मनोबोध | ११६ | ५१८ | ५४४ |
| १८ | निष्ठाविचार | १२२ | ५४५ | ५६० |
| १९ | साधनविवेक | १२६ | ५६१ | ५९४ |
| २० | वारीकर विचार | १३३ | ५९५ | ६२५ |
| २१ | भक्तिमार्ग प्रोत्साहन | १३९ | ६२६ | ६४१ |

| प्रकरण क्रमांक | विषय वैशिष्ठ्य | पृष्ठ क्रमांक | समाविष्ट अभंग संख्या क्रमांक पासून | क्रमांक पर्यंत |
|---|---|---|---|---|
| २२ | भाग्यवंत विचार | १४३ | ६४२ | ६५६ |
| २३ | अनुभव विचार | १४६ | ६५७ | ६८८ |
| २४ | जनोपदेश प्रोत्साहन | १५३ | ६८९ | ७३५ |
| २५ | जनोपदेश जागृती | १६३ | ७३६ | ७५६ |
| २६ | अद्वैत विचार तारतम्य | १६८ | ७५७ | ८०१ |
| २७ | हरिसंवाद गुच्छ १ | १८४ | ८०२ | ८३३ |
| २८ | शिवमहिमा | १९० | ८३४ | ८४० |
| २९ | रामचरित्र | १९२ | ८४१ | ८६२ |
| ३० | रामनाम महिमा | १९७ | ८६३ | ९०२ |
| ३१ | हनुमंत महिमा | २०६ | ९०३ | ९१० |
| ३२ | हरिविजयाचें अभंग कथानक–१ | २०७ | ९११ | ९३० |
| ३३ | प्रल्हादचरित्र | २१२ | ९३१ | ९४४ |
| ३४ | श्वानभाव | २१५ | ९४५ | ९५३ |

...ठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
...क्रम ........................ दि: ......................
क्रमांक ........................ नों दि: ..................

—: ॐ नमो भगवते वासुदेवाय :—



१४८२२

# प्रस्तावना

रसिकांच्या हातीं श्री तुकाराम महाराज यांच्या अभंगाच्या गाथेचा हा पहिला भाग देताना मला माझें मनोगत उकलावयाचें आहे; जेणें करून या गाथेचें वैशिष्ठ्यही दिसेल; आणि शिवाय अभंग संकलनाच्या कार्याला चालनाही मिळेल.

आजवर श्री तुकाराम महाराज यांच्या अभंगांच्या गाथा सुमारे २५।३० जणानीं छापल्या आहेत. या खेरीज छापखानें सुरू झाले त्या काळांत बाळक्रिडा, काल्याचे अभंग, नाटाचे अभंग, द्रौपदी वस्त्रहरणाचें अभंग असे विविध भागही बरेंच प्रसिद्ध झाले. या वेगवेगळ्या पुस्तिकांतून प्रसिद्ध झालेले बरेंच अभंग सध्या प्रसिद्ध असलेल्या गाथांत नाहींत. त्यामुळें गाथा प्रसिद्धिकरण म्हणजे उपलब्ध अभंग घेऊन त्यातले कांहीं गाळावे; कांहीं विविध विषयानुरुप निवडावेत; कांहीं अनुक्रमें छापावेत; किंवा कोठें थोडथोडें पाठभेद पाहून आपल्या इच्छेचें पाठ पुरस्कारावेत, म्हणजेच अभंग संशोधन, अशी रूढी बनली आहे. कांहीं विशिष्ट हस्तलिखितें ग्राह्य मानून चालणाऱ्या सज्जनांची ही संशोधनाची दिशा आहे.

शिळा प्रेसवर छापलेल्या किंवा सुरुवातीच्या काळांत प्रकाशित झालेल्या विविध पुस्तिकांची हस्तलिखितें मिळवून आणि त्यांत मिळतील त्या साऱ्या अन्य लिखितांची भर घालून जास्तीत जास्त संख्येचा समग्र संग्रह छापावा; या भावनेनें या काळांत ह. भ. प. श्री. तुकाराम तात्या घरत यांनींच प्रयत्न केले. त्यानीं श्री तुकाराम महाराज यांचे ८४४१ अभंग दोन भागाच्या गाथेत प्रसिद्ध केले. त्यांच्या नंतर या दिशेनें कोणी प्रयत्न केल्याचें ऐकिवांत नाहीं. मी या दिशेनें चाललों असून आजपर्यंत मला आणखी हजारबाराशे अभंग मिळाले आहेत; आणखी संशोधनही चालू आहे.

विभागश: प्रसिद्ध करूं घातलेल्या या गाथेत प्रत्येक भागांत साधारणत: एक हजार अभंग असतील. त्यांत कांहीं अप्रसिद्ध अभंगांचा समावेश केला जाईल. समग्र गाथा संकलित करून प्रसिद्ध करणें हें काम अशक्य असल्यामुळें महाराजांनीं ज्या ज्या प्रसंगीं ज्या ओघांत रचना केली तो ओघ साधून एकएक समूह हा स्वयंपूर्ण असा जुळविणें आणि तेणेंकरून मूळची शुद्धरचना सिद्ध करणें, हें अशक्य आहे. जसें एखाद्या ढासळलेल्या इमारतीचें अवशेष निवडून पुन: जागच्या जागीं बसविणें, आणि तेणेंकरून पुन: ती मूळची वास्तू जशीच्या तशीच मिळविणें अशक्य आहे; तसेंच हें. तरिही श्रीसंतकृपेनें जेथे जेथें जसजशी स्फूर्ति होईल; तसतसे तेथें हा बिचार कृतीत उतरेल. परंतु संशोधनही चालूंच असल्यामुळें आणि प्रसिद्धिकरण ही विभागश: करणें क्रमप्राप्त असल्यामुळें पहिल्या फेरीत हा क्रम साधण्याचा प्रयत्न पूर्णत: सफल होणार नाहीं; तो शेवटीं पुन: करावा लागेल; हे मुद्दाम नमूद केले पाहिजें.

भाविकांची दुसरी अपेक्षा अशी असतें कीं, रूपपर, नामपर देवपर वगैरे वर्गीकरण करून अभंग छापलेलें असावेत. स्फुट अभगांचें असें वर्गीकरण शक्यतों करतां येईल; पण कांहीं ठिकाणीं अशा प्रकारचा विचारही सोडावाच लागेल. उदाहरणार्थ एखादे वेळेस देवस्तुती करतां करतां प्रेम--प्रेमातिशयाचा रुसवा-वर्दळीवर येणें- पुढें भाडताना संताचें पाठबळ वर्णन करणें किंवा आपले संसाराचें कटू अनुभव सांगून मनोगत निवेदन करणें असा एखादा विविधस्वभावी भाग असेल, तर त्याचें वर्गीकरण करताना वेगवेगळ्या अभंगांचें वर्गीकरण करण्यापेक्षां असें एकसूत्री मालिकामय पाठ तसेच राखण्याची आवश्यकता आहे.

गाथेतील भाषा किंवा शब्दसौष्ठव निवडतानां माझ्या दृष्टीपुढें कांहीं गाथा प्रकाशकाप्रमाणें महाराज " एक अशिक्षित कुणबी, साधी गाणी रचणारा भाविक भक्त " असे नाहींत. त्यानीं श्री ज्ञानेश्वरी भागवत वगैरे ग्रंथांचे आणि अभंग, पुराणें आदीचें प्रतिपाद्य विषयांचें पुरावे मुखोद्गत होतील एवढे दांडगे वाचन व पठण केलेले असल्यामुळें; त्यांच्याच " कांहीं पाठ केली संतांची उत्तरें। विश्वासें आदरें करोनियां " आदि अनेक उद्गारांवर श्रद्धा ठेवून, ही संतवाणी प्रासादिक रसाळ आणि अभंग ( अर्थविकृतीविहीन ) आहे; ही जाणीव ठेवून जेवढें उत्तमोत्तम पाठ निवडतां येतील तेवढें निवडण्याचा प्रयत्न मी करीत आहे; अर्थांत त्या दृष्टीचे शब्दसौष्ठव मी गृहीत धरले आहे. माझ्या दृष्टीपुढें संत हे विद्वान तत्वज्ञानी आणि अधिकारी सत्पुरुष आहेत. ते शीघ्रकवी होते; हे गृहित धरलेंच पाहिजे; असें मी समजतो.

संतांची भाषा ही एक सांच्याची असूं शकत नाही. किंबहुना " अधिकार तैसा करूं उपदेश । साहे ओझें त्यांस तेंचि द्यावें ।। " या दृष्टीनें जसा समाज

तशी भाषा आणि विवेचन पद्धती ते वापरीत हे ध्यानीं घेऊन, यामुळें त्या विविध स्वभावी होत असल्यामुळें; कांहीं अभंगांत साध्या समाजापुढें साधे शब्द आलेले आढळतील, तर कोठे विद्वज्जनापुढें संतभाषा सालंकृत सौष्ठवयुक्त झालेली आढळेल, गीतेवरचें अभंग ( सातशे श्लोकांचें सातशेच अभंग करण्याच्या ) मर्यादा पाळण्याच्या भावनेनें केलेलें असल्यामुळें निवडक उच्च प्रतीचें शब्द वापरून केलेलें आहेत. परंतू हे सौष्ठव दुसऱ्यांच कोणाचें तरी असावें; असे कल्पून त्या रचनेला आजच्या प्रसिद्ध गाथांत स्थान दिलें जात नाहीं. संतांची भाषा कारणपरत्वें अशी विविध स्वभावी होते, म्हणूनच श्री ज्ञानेश्वर माउलींची ग्रंथभाषा असाधारण तर अभंगभाषा साधारण वाटते. पण या भूमिकेचा विचार न करतां कांहीं सज्जन ज्ञानेश्वर महाराज दोन झालें असावेत, असेही म्हणूं लागले आहेत. असो. या उदाहरणावरून मला एवढेंच म्हणावयाचें कीं; कांहीं अभंगांत उत्तम शब्द रचना आणि कांहींत साधी योजना आढळते म्हणून त्यातले कांहीं अभंग बनावट आहेत असे सहजासहजीं मानूं नये, आणि विशेषत: या कारणानें संतांचीं रसाळ कवनें टाकूं नयेत.

या ठिकाणीं दुसरा एक महत्वाचा विचार दुर्लक्षिता उपयोगी नाहीं; आणि तो म्हणजे स्थळ काळाचा. सत सारेंच अभंग कथेंतच रचून म्हणत होते असेही नाहीं आणि सारेच घरीं रचून मग कथेत म्हणत असेही नाहीं. दोन्हीं ठिकाणीं त्याची प्रभावी प्रतिभा सहजस्फूर्त चाले. पण कथेमध्यें झालेलें अभंग हे त्रिविध वृत्ताचे एकत्र आलेले आणि कथारंग पोषणासाठीं म्हणून मुद्दाम सोपे प्रांजळ बोललेलें असे असणें सहज आहे, आणि घरीं निवांत बैठक मारून एखादे प्रकरण, ग्रथन, प्रतिपादन, चरित्ररचना यांवर संपूर्ण अनुसंधानाचें निवडक ओजस्वी शब्दांचे केलेलें अभंग, हे उत्तम अलंकारयुक्त असणें सहज आहे. म्हणजेच संतांची कीर्तनरंगी भाषा थोडीशी साधी असेल, तर बैठकीची ग्रंथलेखकी भाषा ही त्याहून सहजच वरच्या दर्जाची असेल, हा महत्वाचा मुद्दा ध्यानांत ठेवला पाहिजे. ओज भिन्न भासले म्हणून कर्ते भिन्न असलेच पाहिजेत; हा कुतर्क करूं नये, परंपरा श्रेष्ठ मानावी.

सतांचें काव्य भजन कीर्तनांत तालांवर गाईले गेलेले असून त्याच्या मूळच्या चालीही बहुतांशीं अजून उपलब्ध आहेत. त्यांच्या आधारानें एवढें निश्चित म्हणतां येईल कीं संतमुखांतुन आलेलें मूळचें पाठ या चालीत सहज बसलेले तालबद्ध असे असावेत. अर्थात मूळचा पाठ गृहित धरतानां हा छंदबद्धतेचा कस लावणें अवश्य आहे. उपलब्ध लिखितानां आणि श्रुत पाठानां हा कस लावण्याची आवश्यकता कां आहे, याची थोडी कारणपरपरा आहे, ती अशी.—

छंदपरत्वें अभगांच्या बऱ्यांच जाती आहेत. पण हे ध्यानीं न आल्यामुळें

. एका जातीच्या अभंगाला दुसऱ्या जातीची चाल लावताना म्हणणारानें केलेलें पदरचे फेरफार, हे श्रोत्यानें तो पाठ ऐकिवाप्रमाणें उतरल्यामुळे; वदललेला पाठ हाच मूळचा आम्ही गृहीत धरतो. अशावेळीं सूक्ष्म अवलोकनानें पाठाला छंद–शास्त्राची कसोटी लावली पाहिजे. यांचप्रकारें अभंग म्हणताना आयत्यावेळी आठवण नसलेल्या शब्दांच्या जागीं दुसरें शब्द उच्चारून केलेली पूर्तता ही ही ओळखून निवडली पाहिजे.

पूर्वीचें लेखनिक कीर्तनांतून अभंग ऐकत व ते तेथेंच उतरून घेत, व पुढें आपल्या वह्यांतून ते प्रसिद्ध करीत. हे करताना क्वचित नीटसें न ऐकलेल्या शब्दांजागीं नादसादृश्य असलेले शब्द येण्याची शक्यता आहे. त्यांचप्रमाणें इतर कीर्तनकारानीं आपल्या प्रतिपादनासाठीं केलेलें मूळपाठांतलें फरकही लेखनिकांनीं उतरले असावेत. सारेच लेखनिक उच्च दर्जाचे नव्हते; त्यामुळें त्यांतल्या नव–शिक्यांच्या शुद्धलेखनाच्या चुकाही ओळखल्या पाहिजेत, आणि क्वचित त्यानीं कोठे बुद्धिपुरस्सर केलेलें फेरफार आपण वर्ज केले पाहिजेत.

भजन करताना अभंग म्हणण्याची एक विशिष्ठ पद्धत पाळावी लागते. पण कीर्तनांत ही पद्धत विघडूं शकते. उदाहरणार्थ एखाद्या विषयांवर पुष्टी देतांना हरिदासानें एखाद्या अभगाचा दुसरा किंवा तिसरा चरण प्रथम उच्चारून मग नंतर इतर कांहीं चरण म्हणले, आणि लेखनिकानें तो क्रमपालट जसाच्या तसाच उतरला तर अभंगाचा साराच सांचा बदलतो. त्यांचप्रमाणें नकला करतांना एखादा चरण गळला, मागेपुढें झाला तरीही हा सांचा बदलतो. यासाठीं पाठ शोधतांना याही दृष्टीनें शोध घ्यावा लागतो. अभंगाचा हा सांचा पुढीलप्रमाणें आहे.

ज्या मुद्द्यांवर किंवा विषयांवर अभंग स्फुरला तो उपक्रम पहिल्या चरणांत येतो. दुसरा गोडव्याचा, ध्रुपदाचा किंवा पालुपदाचा चरण. त्यांत मुमुक्षू–विचारबोध संत करतात. याखेरीज हा चरण इतर प्रत्येक चरणांनतर ( पुनः पुनः ) म्हणावयाचा असल्यामुळें वाक्यरचना, व्याकरण, विषयउकल इत्यादि सर्व दृष्टीनें तो चरण इतर प्रत्येकाचा पूरक होत असतो. तिसऱ्या चरणांत उपमा, विषयविस्तार, दृष्टान्त वगैरे असतात. अभंगाच्या चरणसंख्येवर मर्यादेचे बंधन नसल्यामुळें कांहीं अभंगांत हा विस्तार नसूंही शकतो, अथवा कांहींत तो अनेक चरणांचाही असूं शकतो. शेवटच्या चरणांत कवी आपला नामोल्लेख करून मत–प्रतिपादन अथवा निष्कर्ष सांगून अभंग संपवतो.

अभंगातील शब्द योजना करताना कवी त्यांत कांहीं शब्दांचें विपरीत विकृत अर्थ होत नाहींत ना; आणि तेणेंकरून कोठें भंग म्हणजे चुकीचें प्रतिपादन तर होत नाहीं ना; हे पाहून अभंगअर्थांचेंच अभंगशब्द वापरतात, आणि मुख्यत्वें–

करून कोणत्याही एका अभंगांत संपूर्ण बोध्यविषय समाविष्ठ करतात, त्यांत खंड पडूं शकेल, अथवा अपूर्णता येईल असे होऊं देत नाहींत. अभंगांच्या या अभंग स्वभावामुळें प्रत्येक अभंग हा जणूं अध्यात्मशास्त्राचें सारें सार एकांच अभंगांत सामावणारा असा असतो. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. " बिंब तरी बचके येवढें। परि प्रकाशा त्रैलोक्य थोकडे ॥ व्याप्ती शब्दाची तेणें पाडे। अनुभवावी ॥ " असाच हा भावार्थ येथें समजावा.

प्रत्यक चरणाचे दोन अथवा चार भाग पाडण्याची पद्धत असून, त्यांत दोन, तीन, अथवा चार शब्दांशेवटीं यमक येईल असे शब्द असतात. बावीस मातृक चरणांत बारा–अठरा, आणि क्वचित सहा–बारा–अठरा मात्राचें ठिकाणीं यमक येते. लहान अभंगांत आठ–बारा अथवा आठ–सोळा या मात्रांचे ठिकाणीं यमक येतें. किंवा चौदा मातृक चरणांत सहा–चौदा मात्रांचें ठिकाणीं ते येते. आणखीही कांहीं चरण प्रकार आणि यमक योजना आहेत.

हे अभंगाचें छंदशास्त्र भक्तराय श्रीनामदेव महाराज म्हणतात, " मला भगवंतानें सांगितले. ॥ येथें आपणांस पहावयाचें ते एवढेंच कीं ते एक स्वतंत्र छंदशास्त्र आहे, त्यांचे विवेचन श्री नामदेवरायानीं आपल्या अभंगांत केलेले होते, आणि त्यापैकीं दोन अभंग अजुनही त्यांच्या गाथेंत उपलब्ध आहेत. या छंद–शास्त्राच्या आधाराने उपलब्ध पाठांचें चौक–मात्रा–यमकें इत्यादि तपासावेत, आणि सांपडतील ते दोष काढून मगच छंदबद्ध पाठ निवडावा, या दिशेने माझें प्रयत्न आहेत. आतां हस्त लिखितांच्या ग्राह्याग्राह्यतेबद्दल पाहूं.

हस्तलिखितें दोन स्वभावी आढळतात. पहिला प्रकार हा धंदेवाईक नकला–कारांचा होय. यांत मागणी तसा पुरवठा अथवा गिऱ्हाईक तसा माल असा प्रकार असल्यामुळें एका चोपडीत बरेचसे श्री तुकाराम महाराजांचे अभंग आणि बाकीचे श्री नामदेवराय श्री ज्ञानेश्वर महाराज वगैरे तीन चार संतांचे अभंग असे एकत्र केलेलें संच मिळतात आणि त्यांतही प्रामुख्यानें कीर्तनोपयोगी, भजनोपयोगी अभंगच आढळतात. अशा लिखितांमध्यें " नामा म्हणें ' चे " तुका म्हणे " केलेले अभग ही सांपडतात. याची कारणें दोन असूं शकतात. पहिले म्हणजे नामदेवांचा अभंग, पण तो तुकाराम महाराजांच्या मुखांतून ऐकून उतरला गेल्याने हे होणें शक्य आहे, तसेच दुसरें म्हणजे तुकाराम महाराजांच्या अभंगाना आलेली लोक–प्रियता पाहून जुने अभंगच असे नूतन करवून विक्रि साधणें. हे ध्यानीं घेऊन कोठें " तुका म्हणे " चा अप्रसिद्ध अभंग सापडला, पण तोच जर नामदेव गाथेत सांपडला, तर तो मी श्री नामदेव रायांचाच समजून त्याचा समावेश त्यांच्या गाथेत करतो.

अशा लिखितांची भाषा बरीच शुद्ध व अभंगक्रमही बराच सुसूत्र असतो. त्या दृष्टीने या लिखित संचांचा फारच मोठा उपयोग होतो. कांहीं अप्रसिद्ध अभंग, अप्रसिद्ध चरणें, शुद्ध पाठ अथवा शुद्ध शब्दयोजना यांत सांपडते. पण अशा लिखितांचा उपयोग कांहीं संशोधक टाळतात, तेव्हां ते म्हणतात "अहो ! ही वही प्रासादिक अस्सल अथवा शिष्यांच्या हातची – तीनशे वर्षापूर्वीची म्हणतां, मग हा ईस्ट इंडिया कंपनीचा म्हणजें दीडशे वर्षापूर्वीचा कागद कसा ? किंवा तिच्या या वेष्टणांत हा इंग्रजी वर्तमानपत्राचा छापलेला अलिकडचा तुकडा कसा ? " मला याबाबत एवढेंच सांगावयाचें कीं एखाद्याचे एखादे मत अतिरंजित वाटले तर ते हवेतर ग्राह्य मानूं नये, पण ते म्हणणें ऐकून त्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करण्याऐवजीं त्या संचालाच बनावट ठरवण्यासारखी चूक करूं नये, अशा विचाराने मी चालतो. कारण मूळच्या तीनशें वर्षापूर्वीच्या लिखिताच्या नकला होत होतच हे संच पुढें प्रकाशित होत गेले असल्यामुळें त्यांत प्रत्येकांत नवनवा कागद आणि नवनवी अक्षरवटिका येणारच, आणि संरक्षणाच्या दृष्टीने त्यांवर चालू कागदांची पुटें चढणारच.

लिखितांचा दुसरा प्रकार हा भजनी भक्तांच्या हातचा आहे. कोठें एखादा अश्रुत नवा अभंग आढळला; कीं तो ते उतरून घेत. अशा वह्या अगदी लहान, प्रत्येक अभंगाचे अक्षर वेगळे, शाई वेगळी आणि लेखकही वेगवेगळे, असें यांत असूं शकतात. यांचे वैशिष्ठच हे को यांत अप्रसिद्ध अभंग कूटें वगैरे भरपूर आढळतांत; पण लेखन मात्र ओवडधोबड असते, ते प्रयत्नपूर्वक विचार करून वाचावें लागते.

श्री तुकाराम महाराज यांनीं श्री नामदेवरायांची बाकी फेडली म्हणजे पांच सव्वापांच कोटी अभग रचले. एकतर संतांच्या घरच्या दैन्यावस्थेमुळें एवढे सारें अभंग त्यांना उतरून ठेवण्याइतका कागदही त्याना मिळणें कठीण, तितका वेळही फावणें अशक्य आणि शिवाय त्यांची प्रसाद म्हणून अभंगदान करण्याची प्रथा होती. यामुळें कर्त्याच्या स्वदस्तुराचे लिखित मिळणें आज अशक्यप्राय तर आहेच, पण एवढा हा सारा संभार साराच्या सारांश लेखकानींही उतरून एकत्र ठेवला असण्याची शक्यता नाही; आणि शिवाय पुढच्या धंदेवाईक लेखकांनीही त्या साऱ्यांच्या नकला प्रसृत करणें अशक्यप्राय होते. अर्थांत कालांतरानें बरेंच अभंग केवळ मुखोद्गतही रहाण्याची शक्यता जमेस धरून चालले पाहिजे. हे मुखोद्गत पाठ मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे, हे जाणून त्यांचाही समावेश मी या गाथेत वरील कस लावून करणार आहे.

संत हे वारकरी सांप्रदायिक जरी आहेत; तरी महाराष्ट्रांत श्री. कवीर मिराबाई वगैरे उत्तर भारतीय संतांच्यामुळें रूढ झालेली एकतारी भजन प्रथा

त्यानां प्रसंगोपात अवलंबणें प्राप्त झालें असावे. उदाहरणार्थ महाराज कीर्तनांस उभे आहेत. पण साथीला बरेच एकतारी पंथाचे भजनीं आहेत. अशावेळीं पदस्वभावी काव्य मुखांतून येणें किंवा अभंगाचेच काव्य पण या किंचित वेगळचा चालीत म्हणण्याचा प्रसंग येणें अशक्यप्राय नव्हते. या कारणामुळें किंवा एकतारी भजनी मंडळींनी आपल्या चाली लावून कांहीं अभंग पाठ करून पुढें पाठांतर चालवले असण्याचाही संभव आहे; म्हणून असें पंथांतर झालेले अभंगही शोधून घेतले पाहिजेत; असें मी मानतो.

**सारांशः**– अनेक कवीनीं आणि शिष्यगणांनीं "तुका म्हणें" घालून अभंग रचले; व ते गोळा होत होत श्री तुकाराम महाराजांचें अलौकिक व्यक्तिमत्व निर्माण केले गेले; असल्यां क्षुद्र विचारानां मनांत थारा न देतां; एकांच कर्त्याच्या एकाच ओघाला असंख्य लहानमोठे फाटे फुटले; त्यांत विविध प्रक्रिया झाल्या हे ध्यानीं धरून मूळ योजना शोधण्याचा यत्न मी करीत आलो आहे; आणि त्याचेंच प्रतिबिंब रसिकानां या गाथेत आढळेल. माझा मनोदय एवढाच कीं उत्तमांत उत्तम रसाळ पाठ मिळविण्याच्या दृष्टीनें भविष्यकाळांतील संशोधकानीं प्रयत्न करावेंत; आणि हा संतमुखांतील "देवाचा प्रसाद" चिरकाल टिकवावा.

या कार्यांचा उपक्रम ज्या निमित्तें झाला; ते सांगून आवरते घेतो. १९५६ साली वाईस असतानां श्री भिडे यानीं लिहिलेले "श्री तुकाराम चरित्र" मी पाहिलें. त्यांत अभंगसंख्येबद्दल वरील स्वरूपाचें कांहीं आक्षेप घेतलेले आढळले. तेव्हां महाराजांचें किती अभंग मिळतांत हे पहावयांस प्रवृत्त झालो. तोंच हरिकृपेनें घरत गाथेचे दोन्ही भाग मिळाले; कांहीं लिखिते मिळाली. तेथून महाराजानां स्मरून त्यानां दोन प्रार्थना केल्या. पहिली ही कीं "महाराज तुमची शुद्धवाणी मजकरवीं वदवा" तिचें फल हा गाथा; आणि दुसरी म्हणजें "तुमचा उत्तम परमार्थ मला दाखवा" त्याचें फल म्हणजें "श्री नामदेव रसास्वादिनी" हा १२००० ओव्यांचा श्री नामदेवरायांच्या कूट अभंगावरचा टीकाग्रंथ होय. अर्थांत मजसारख्यां कोऱ्या पामराची ही प्राज्ञा नव्हे; हे सारें श्रीगुरु तुकाराम महाराजांचें कृपाभांडवल आहे; म्हणून मी येवढेंच म्हणेन कीं:–

किंबहुना तुमचें केलें। धर्मकीर्तन हें सिद्धी नेलें ।। येथ माझें जी उरलें। पाईकपण– किंवा माझ्यांच शब्दांत म्हणावयाचें तर "लेखणी म्हणे मी लिहिते। पै नेणें कोण चालवितें ।। तो भाव नसावा येथें। सत्यसत्ते स्मरोनि ।।" एवढेच मी म्हणेन.

आधींच मी कोरा म्हणजे पूर्वव्यासंगरहित; आणि त्यांतही जो कांहीं

फडांचा संपर्क अवश्य असावा तोही मला विशेषसा साधता आलेला नाहीं–त्यामुळें पाठ निवडतानां अनअवधानानें किंवा चुकीच्या समजुतीमुळें कोठें कांहीं रसहानी–कारक अथवा विपरित अर्थकारक पाठ चुकून निवडला गेला असल्यांस अधिकारी विद्वज्जनांनीं मला योग्य ते मार्गदर्शन करावें. प्रचलित पाठांतील कांहीं विशिष्ठ अर्थखोंचा मजकडून वगळल्या गेल्या असल्या तर त्याही कळवाव्या. पुढच्या आवृत्तींत अवश्य त्या सुधारणा करीन.

तसेंच सर्व वारकरी मंडळीनां माझी एवढीच नम्र विनंती आहे कीं; त्यानीं प्रसिद्ध गाथेत न आढळणारें अभंग जसें आढळतील तसें उतरून पाठवावेत; मग ते ऐकिव पाठ असोत अथवा लिखित असोत. अभंग श्री निवृत्तिनाथांपासून श्री निळोबारायांपर्यंत कोणत्याही संताचें असोत; ते पाठवावेत. संतांच्या या अमोल ठेव्याचा जास्तीत जास्त मोठा असा संग्रह मला करावयाचा आहे; आणि विशेषतः तो लुप्त अथवा क्षीण होऊं द्यावयाचा नाहीं.

श्रीहरी जसजशी कृपा करील तसतसें पुढचें भाग छापणें शक्य होईल. तरी भाविक सज्जनानां एवढीच नम्र विनंती कीं हें पवित्र कार्य आपणां सर्वांचें आहे; हे जाणून या गाथेची ओळख आपल्या मित्र मंडळीनां करून द्यावी आणि पाठवून देतां येतील तेवढचा मागण्या पाठवाव्यांत; आणि पुढच्या भागाच्याही मागण्या नोंदून ठेवाव्या; म्हणजें त्या प्रमाणांत मला छपाई करण्याची व्यवस्था करतां करतां येईल. भांडवला अभावी मी जास्त प्रती छापूं शकत नसल्यामुळें गांवो–गांवच्या पुस्तक–दुकानांतून त्या विक्रीस ठेवतां येणें शक्य नाहीं; ही अडचण ध्यानीं घेऊन मागणी मजकडेच करावी.

१८८, प्रतापगंज पेठ,
सातारा शहर.
कार्तिक शु॥ ११
शके १८८६

आपला दासानुदास,
**रामदास कृष्ण घोंगडे**

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम.......................... दि: ..................
क्रमांक .......................... दि ..................

ॐ नमो भगवते वासुदेवाय

श्री सद्‌गुरवे नमः



प्रकरण १ लें

# नमनें

(१)
करूं प्रथम नमन । वंदूं देव गजानन ॥ १ ॥
सर्व सिद्धींचा जो दाता । नाना विघ्नें निवारिता ॥ २ ॥
गौरीहरांचा कुमर । नांव ज्याचें लंबोदर ॥ ३ ॥
देवगणांचा गणपती । तुका म्हणे राहों चित्तीं ॥ ४ ॥
(२)
धरोनियां फरश करीं । भक्तजनविघ्नें वारी ॥ १ ॥
गजाननमहाराजा- । चरणीं लाहो लागो माझा ॥ २ ॥
शमीशेंदूरप्रियाला । तुरा दूर्वांचा शोभला ॥ ३ ॥
ज्याचें उंदीर वाहन । माथा जडितमुकुटपूर्ण ॥ ४ ॥
नाग यज्ञोपवित गळे । वस्त्रालंकारमेखळे ॥ ५ ॥
भावमोदक अक्षरीं । तुका भावें पूजा करी ॥ ६ ॥

(३)

गणराया लवकर येई । भेटी सकळांसी देई ।। १ ।।
अंगीं सिंदुराची उटी । केशरकस्तुरी लल्लाटीं ।। २ ।।
पायीं घागऱ्या वाजती । नाचत आले गणपती ।। ३ ।।
सवें गणभार दाटी । हातीं मोदकाची वाटी ।। ४ ।।
तुका मनें विठ्ठल ध्याये । गणपती त्या दुजा नोहे ।। ५ ।।

(४)

नमिलें गणपती माऊली सारजा । आतां गुरुराजा दंडवत ।। १ ।।
गुरुरायाचरणीं मस्तक ठेविलें । आपुलिया तुल्य द्यावी मती ।। २ ।।
गुरुराया तुजऐसा नाहीं सखा । कृपा करी रंका धरीं हातीं ।। ३ ।।
तुका म्हणे माता पिता गुरु बंधु । गाऊं कृपासिंधु पांडुरंग ।। ४ ।।

(५)

नमो आदिरुपा ओंकारस्वरुपा । विश्वाचिया बापा पांडुरंगा ।। १ ।।
तुझिया सत्तेनें तुझे गुण गाऊं । तेणें सुखी राहूं सर्वकाळ ।। २ ।।
तूंचि श्रोतावक्ता ज्ञानासी अंजन । सर्व होणे जाण तुझ्या हातीं ।। ३ ।।
तुका म्हणे जेथें नाहीं मीतूंपण । स्तवावें ते कोण ? कवणालागीं ।। ४ ।।

(६)

नमो आदिरुपा अखंडअद्वया । अनघ सखया पांडुरंगा ।। १ ।।
पावनपतिता परब्रह्ममूर्ती । अनंता श्रीपती नारायणा ।। २ ।।
नामरूपरेखा दाविसी अनेका । तुका म्हणे देखा पंढरिये ।। ३ ।।

(७)

गणेश सारजा करिती गायना । आणि देवांगना रंभे ऐशा ।। १ ।।
तेथें मानवानीं विनवावें किती ? । सुरवर वंदिती पाय जेथें ।। २ ।।
ज्याच्या गायनासी तटस्थ शंकर । त्याही परी पार न कळे तुझा ।। ३ ।।
तुका म्हणे आम्ही किंकर ते किती ? । इंद्राचीही मती नागविसी ।। ४ ।।

(८)
आदिनिरंजनरूपा । दत्तमूर्ती स्वस्वरूपा ॥ १ ॥
निर्गुण निराकार एक । तोचि मायेचा चालक ॥ २ ॥
ब्रह्मा।विष्णुत्रिनयन – । रूपत्रयें गुरु जाण ॥ ३ ॥
तुका म्हणे शरण जावें । गुरुपदीं तद्रुप व्हावें ॥ ४ ॥
(९)
निर्गुण स्वरूपी दत्त महाराज । आधीं नमूं अज–चरण त्यांचे ॥ १ ॥
नमूं निर्गुणाची एकाकी चरणें । नासें भ्रम तेणें अवघाचि ॥ २ ॥
तुका म्हणे वीण–त्रिगुण स्वरूप । पहाती अमूप योगीमुनी ॥ ३ ॥
(१०)
नमन माझें गुरुराया । महाराजा दत्तात्रया ॥ १ ॥
तुझी अवधूत मूर्ती । माझ्या जिवींची विश्रांति ॥ २ ॥
माझें मन तुझें पायां । मिठी पडो पंढरिराया ॥ ३ ॥
स्वामी अनुसयासुता । तुका म्हणे यावें आतां ॥ ४ ॥
(११)
नमूं सद्गुरु अनंता । ज्यांची देवावरी सत्ता ॥ १ ॥
त्यांचे होतां अवलोकन । करिती आपणा समान ॥ २ ॥
ते हे सद्गुरु जाणावें । काळ कांपे ज्यांच्या नांवें ॥ ३ ॥
तुका वर्णितो पवाडे । जेणें गुरुभक्ति घडे ॥ ४ ॥
(१२)
वेदव्यास गुरु । तुम्हां माझा नमस्कारु ॥ १ ॥
माझें कल्याण करावें । मज दासपद द्यावें ॥ २ ॥
आनंदनिधाना । कृपामूर्ती नारायणा ॥ ३ ॥
दीना या उद्धरा । तुका म्हणे जी दातारा ॥ ४ ॥
(१३)
तीन शिरें सहा हात । तया माझे दंडवत ॥ १ ॥
काखे झोळी पुढें श्वान । नित्य जान्हवीचें स्नान ॥ २ ॥

माथां शोभे जटाभार । अंगी विभूती सुंदर ॥ ३ ॥
शंख चक्र गदा हातीं । पायीं खडावा गर्जती ॥ ४ ॥
तुका म्हणे दिगंबर । तया माझा नमस्कार ॥ ५ ॥

(१४)
धन्य धन्य दत्तात्रया । गुरु चोवीस वंदाया ॥ १ ॥
गोपिचंद गुरुच्या बोला । राज्यत्यागें योगी झाला ॥ २ ॥
गोरक्षानें मच्छिंद्राला । माये पासुनि सोडविला ॥ ३ ॥
गुरुसेवा ज्यासी आहे । तुका वंदी त्याचें पाये ॥ ४ ॥

(१५)
सद्गुरुचें पायीं । भावें ठेविली मी डोई ॥ १ ॥
माझा केला अंगिकार । माथां ठेवियेला कर ॥ २ ॥
संतांचें संगती । कृपा केली या श्रीपती ॥ ३ ॥
केलें नामपाठ । तुका म्हणे जालों धीट ॥ ४ ॥

(१६)
मथुरेच्या राया । माझें दंडवत पायां ॥ १ ॥
तुमचें कृपेचें पोसणें । माझा समाचार घेणें ॥ २ ॥
नाम धरिलें कंठीं । असें आर्तभूत पोटीं ॥ ३ ॥
जीवींचें ते जाणा । तुका म्हणे नारायणा ॥ ४ ॥

टीप:– इतर नमनें आहेत, ती अन्यत्र उचित स्थानीं येतील.

*प्रकरण २ रें*

# सद्गुरु प्राप्ती

(१७)
ओस जाल्या दिशा मी भिंगुळवाणें । जीवलग नेणें मज कोणी ॥ १ ॥
भय वाटे देखें श्वापदांचे भार । नव्हे मज धीर पांडुरंगीं ॥ २ ॥
अंध:कारापुढें न चलवे वाट । लागती हे खुंट–कांटे अंगा ॥ ३ ॥

एकला निस्संग फांकती मारग । भितों नव्हे लाग चालावया ॥ ४ ॥
तुका म्हणे वाट दावुनि सद्गुरु । राहिला हा दुरु पांडुरंग ॥ ५ ॥

(१८)

श्रीसद्गुरुरायें कृपा मज केली । नाहीं पैं घडली सेवा कांहीं ॥ १ ॥
सांपडली वाट जातां गंगास्नाना । मस्तकीं तो जाणा ठेविला कर ॥ २
भोजना मागती तूप पावशेर । पडिला विसर स्वप्नामाजी ॥ ३ ॥
कांही उपजेल काळें अंतराय । म्हणोनियां काय त्वरा केली ? ॥ ४
राघवचैतन्य केशवचैतन्य । सांगोनियां खूण माळिकेची ॥ ५ ॥
बाबाजी आपुलें सांगितलें नाम । मंत्र दिला रामकृष्णहरी ॥ ६ ॥
माघ शुद्ध दशमी पाहुनि गुरुवार । केला अंगिकार तुका म्हणे ॥ ७ ॥

(१९)

धन्य धन्य सद्गुरुराज । ज्योत दाखविली मज ॥ १ ॥
काळे पिवळे ढवळे । रूप गोजिरें सावळें ॥ २ ॥
जैसें रंग उमटति । तैसी पाहे आत्मज्योति ॥ ३ ॥
पट्चक्रें उमटति । मध्यें हिरे झळकती ॥ ४ ॥
अनुहताचा गजर । सोहंनादाचा प्राकार ॥ ५ ॥
तुका म्हणे ऐसें दावी । त्याचें पाय माझें जीवीं ॥ ६ ॥

(२०)

सद्गुरुचें चरणीं ठेविलें मस्तक । देऊनि हस्तक उठविलें ॥ १ ॥
उठविलें मज देऊनियां प्रेम । भावार्थे सप्रेम नमस्कारी ॥ २ ॥
नमस्कारी त्याला सद्गुरुरायाला । तुका म्हणे बोला नाम वाचें ॥ ३

(२१)

सद्गुरुनें मज आशिर्वाद दिला । हृदयीं भरला हर्ष माझें ॥ १ ॥
हृदयींचा भाव कळला गुरुसी । आनंदउल्हासीं बोले मज ॥ २ ॥
बोले मज गुरु कृपा तो करूनि । तुका म्हणे मनीं आनंदलो ॥ ३ ॥

(२२)
अनंतजन्मींचा शीण उतरला । सद्‌गुरु भेटला सदानंद ॥ १ ॥
सदानंद माझा पांडुरंग पूर्ण । मायादिकारण विश्वबीज ॥ २ ॥
देऊनियां हातीं निजबोधरत्न । तोडिला प्रयत्न संसारीचा ॥ ३ ॥
तुका म्हणे गुरु–उपकारासी पाही । न मिळेचि कांहीं ब्रह्मांडांत ॥ ४
(२३)
मज अनाथासी घेऊनि पदरीं । काढिलें बाहेरी गुरुराजें ॥ १ ॥
आकाराचें माथां देववुनि पाय । ठेविलें अभयनिजपदीं ॥ २ ॥
काय वानूं माझी वाचा हें निमाली । सद्‌गुरुमाउली दयाळू जे ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें मरोनि जन्मलों । आपुलें पावलों निजस्थान ॥ ४ ॥
(२४)
सद्‌गुरुनें कानीं महावाक्यध्वनी । कुंडले श्रवणीं लेवविली ॥ १ ॥
अध्यात्मकावडी दिधली कुबडी । धारणेचि बुडी सोहंरूपीं ॥ २ ॥
धर्माधर्मधुणी सहज जागवी । शांती अंगीं लावी विभूति हें ॥ ३ ॥
राहिलों निवांत दृढ या आसनीं । सहजसाधनीं स्थिर जालो ॥ ४ ॥
धैर्याचा कुतका हृदय तो कुंडा । बोधभांग पुढां घोटियली ॥ ५ ॥
घोटोनियां घोटा मिश्रित त्या भांग । नेमनिष्ठदंग तन्मयता ॥ ६ ॥
तुका म्हणे गुरू कृपेचा आधार । नामीं निरंतर डुल्लतसों । ७ ।
(२५)
नाहीं म्यां वंचिला मंत्र कोणपाशीं । राहिलों जीवेसी धरूनी तो ॥ १ ॥
विटेवरी भावें ठेवियेलें मन । पाउलें समान चिंतितसें ॥ २ ॥
पावविलों पार धरिला विश्वास । घालोनियां कांस बळकट ॥ ३ ॥
तुका म्हणे मागे पावले उद्धार । तिहीं हा आधार ठेविलासे ॥ ४ ॥
(२६)
माझिये मनींचा जाणोनियां भाव । तो करी उपाव गुरूराजा ॥ १ ॥
आवडीचा मंत्र सांगितला सोपा । जेणें नव्हे गुंपा कांहीं कोठें ॥ २ ॥
जातां पुढें एकें उतरले पार । हा भवसागर साधुसंत ॥ ३ ॥

जाणत्या नेणत्या जैसी ज्या आवडी। उतार सांगडी तापे पेटे॥ ४॥
तुका म्हणे मज दावियेला तारू। कृपेचा सागरू पांडुरंग॥ ५॥

(२७)

घालुनियां भार राहिलों निश्चिती। निरविलें संतीं विठोबासी॥ १
ठेउनियां पायीं कुरवाळिला माथा। सांगितलें चिंता न करावी॥ २
कटीं कर सम–चरण साजिरे। राहिले भीवरे–तीरीं उभे॥ ३॥
खुंटले सायास आणिक या जीवा। धरिले केशवा पाय तुझें॥ ४॥
तुज वाटे आतां तें करी अनंता। तुका म्हणे आतां लाज तुज॥ ५॥

(२८)

माझिये मनींचा जाण हा निर्धार। जीवासी उदार जालों आतां॥ १
तुजविण दुज्या न धरीं आणिका। भय–लज्जा–शंका टाकियेली॥ २
ठायींचा संबंध तुम मज होता। निःशेष तो आतां केला संतीं॥ ३॥
जीवभाव तुझें ठेवियेला पायीं। याची असों कांहीं लाज तुज॥ ४॥
तुका म्हणे संतीं घातलो हावाला। न सोडीं विठ्ठला पाय तुझे॥ ५॥

(२९)

न होय तें जालें देखिलें हें पाय। आतां फिरूं काय मागें देवा?॥ १
बहुदिस होतो करीत हें आस। तें आलें सायास–फळ आजि॥ २॥
कोठवरि जिणें संसारीं या आशा?। उगवी हा फांसा येथुनियां॥ ३
बुडालीं तयांचे मूळ ना मारग। लागले हा लाग सांडूनियां॥ ४॥
पुढें उल्लंघितां दुःखाचे डोंगर। नाहीं अंतपार गर्भवासां॥ ५॥
तुका म्हणे कांस धरूं पितांबरीं। तूं भवसागरीं तारूं देवा॥ ६॥

टीपः– २७ ते २९ हे अभंग देवांस उद्देशून आहेत. पण ते गुरुप्राप्तीशीं सूत्रबद्ध आहेत, म्हणून येथें समाविष्ट केलें आहेत. निःशेष म्हणजें शून्य नव्हे; समतुल्य अथवा संपूर्ण.

(३०)

गुरूपाय ध्याई। गुरूपरते सार नाहीं॥ १॥
गुरूसेवेचा संकल्प। हेंचि माझें पूर्णतप॥ २॥

गुरूचरणधुळी । सर्वतीर्थांची अंघोळी ।। ३ ।।
तुका म्हणे वर्म । गुरू तोचि परब्रह्म ।। ४ ।।

(३१)
माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव ! । आपणचि देव होय गुरु ।। १ ।।
पढियंतेभाव पुरवी वासना । अंतीं तें आपणापाशीं न्यावें ।। २ ।।
मागेंपुढें उभा राहे सांभाळीत । आलियेआघात निवारुनि ।। ३ ।।
योगक्षेम दासां जाणे जडभारी । वाट दावी करीं धरुनियां ।। ४ ।।
तुका म्हणे नाहीं विश्वास ज्या मनीं । पाहावें पुराणीं विचारुनि ।। ५

(३२)
साधकाची दशा उदास असावी । उपाधी नसावी अंतर्बाह्य ।। १ ।।
कायालोलुप्यते निद्रेते जिंकावें । भोजन करावें परिमित ।। २ ।।
एकांतीं लोकाचें स्त्रियेसी वचन । प्राणांतींही जाण बोलों नये ।। ३ ।।
संग सज्जनांचा उच्चार नामाचा । घोष कीर्तनाचा अहर्निशीं ।। ४ ।।
तुका म्हणें ऐशा साधनीं जो राहे । तोचि ज्ञान लाहे गुरुकृपा ।। ५ ।।

(३३)
गुरु केला घरवासी । माझ्या चुकल्या दोन्ही म्हैसी ।। १ ।।
गुरुपुटपुट घ्यावी । ऐसा प्रताप ते दावी ।। २ ।।
गुरुमंत्र घेतां कानीं । माझ्या पेवीं शिरलें पाणी ।। ३ ।।
गुरु भाग्यासाठीं केला । कांहीं फळा नाहीं आला ।। ४ ।।
गुरुमंत्र नव्हे बरा । माझा बैल चुकला मोरा ।। ५ ।।
तुका म्हणे ऐशा नरा । काय परीस खापरा ? ।। ६ ।।

(३४)
गुरुच्या सेवेसी ज्यासी हो कंटाळा । पाहूं नये डोळां पतीत तो ।। १
हत्यादिक दोष प्रायश्चित्तें जाती । न जाये निश्चिती गुरुद्रोह ।। २ ।।
तुका म्हणे जरी होय गुरुदया । तेणें जाय वांया दोष त्याचा ।। ३ ।।

(३५)
आधीं मन घेई हातीं । तोचि राजा–गणपती ॥ १ ॥
मन इंद्रियांचा राजा । त्याची सर्वभावें पुजा ॥ २ ॥
मन जिवाचा प्रधान । मन माझा नारायण ॥ ३ ॥
तुका म्हणे मन चंचल । हातीं गुरुबळें येईल ॥ ४ ॥
(३६)
पांडुरंगें सत्य केला अनुग्रह । निरसोनि संदेहदेहबुद्धि ॥ १ ॥
जीवशीवसेज रचिली आनंदीं । औटपीठपदीं आरोहणें ॥ २ ॥
निजींनिजरूपीं निजविला तुका । हल्लरु बाळका अनुहतीं ॥ ३ ॥
(३७)
निरंजनीं आम्हीं बांधियेलें घर । ब्रह्मीं निरंतर राहिलोंसे ॥ १ ॥
निराभासी पूर्ण जालों समरस । अखंड ऐक्यास पावविलों ॥ २ ॥
तुका म्हणे आतां नाही अहंकार । जालों तदाकारनित्यशुद्ध ॥ ३ ॥
(३८)
चरणीं नमन सद्‌गुरुच्या पूर्ण । नित्य हरिगुण गाऊं सदा ॥ १ ॥
गोवर्धन जेणें नखाग्री धरिला । काळिया नाथिला महाबळी ॥ २ ॥
ऐसें हरिगुण गातां वाचे परी । पतितासी तारी जनार्दन ॥ ३ ॥
तुका म्हणे संत–सज्जना जीवन । जिव्हेसी स्मरण गोविंदाचें ॥ ४ ॥
(३९)
सद्‌गुरुवांचोनि प्रेतरूपवाणी । बोलती पुराणी व्यासऋषी ॥ १ ॥
म्हणोनि तयाचें पाहूं नये तोंड । निर्गुरु अखंडसुतकी तो ॥ २ ॥
कोणेपरी तया नव्हेचि सुटका । जन्म तो लटिका जाणा तुम्ही ॥ ३
तुका म्हणे ऐसी बोलती पुराणें । संतांची वचनें मागिलही ॥ ४ ॥
(४०)
सद्‌गुरुवांचोनी सांपडेना सोय । धरावें ते पाय दृढ आधी ॥ १ ॥
आपणांसारिखे करिती तात्काळ । नाही काळवेळ तयालागी ॥ २ ॥

लोह–परिसाची न साहे उपमा । सद्‌गुरुमहिमा अगाधचि ॥ ३ ॥
तुका म्हणे कैसें आंधळे हे जन! । गेलें विसरोन खऱ्या देवा ॥ ४ ॥

(४१)

अशाश्वत घेती शाश्वतासी देती । पूर्णानंदमूर्ती गुरुराय ॥ १ ॥
डोळां जें दिसेना कानी ऐकवेना । ध्यानी सांपडेना ऐसें देती ॥ २ ॥
वाचे वर्णवेना हातीं धरवेना । मना मनवेना ऐसें देती ॥ ३ ॥
तुका म्हणे मुख्य सद्‌गुरु तो देव । जाणतां ती ठेव ऐती देती ॥ ४ ॥

(४२)

निढळीं अक्षर चुकवील मात्र । दावील पवित्र पांडुरंग ॥ १ ॥
ऐसा कोण वैद्य भेटेल जी दाता । मनांतील व्यथा दूर करी ? ॥ २
डोळा तान्हियला पाजूं तरी कांई ? । फोडूं कोठें डोयी ऐसें जालें ॥३
तुका म्हणे ज्यातें उजळतां माथा । भेटी द्यावी सतां सर्वकाळ ॥ ४ ॥

(४३)

देव तो सगुण सद्‌गुरु निर्गुण । तयांचें चरण प्राप्त व्हावे ॥ १ ॥
सर्वाठायीं भेद सद्‌गुरु अभेद । नित्यब्रह्मानंद पायीं ज्यांचे ॥ २ ॥
ऐसें ठसे तरी मुक्ति दासी घरी । तुका म्हणे चारी न मागतां ॥ ३ ॥

(४४)

भाळले लोचन । रूपीं पायांपासी मन ॥ १ ॥
धरविला सर्व ठाव । जेथें पाहे तेथें देव ॥ २ ॥
रुचे जीवा नाम । रुजु जालें सेवाकाम ॥ ३ ॥
तुका म्हणे तारू । मज भेटला सद्‌गुरु ॥ ४ ॥

(४५)

रसना हे धाली । शुद्ध रंगली विठ्ठलीं ॥ १ ॥
राहे आठव अंतरा । वेळोवेळा जी दातारा ॥ २ ॥
रीघ नाही दोषा । रवि जेंवी तमनाशा ॥ ३ ॥
रोगा कैंची उरी ? । तुका देखे धन्वंतरी ॥ ४ ॥

(४६)

आपुलें मरण पाहिलें म्या डोळां । तो जाला सोहळा अनुपम्य ॥ १ ॥
आनंद दाटला तिहीं त्रिभुवनीं । सर्वात्मकपणीं भोग जाला ॥ २ ॥
एकदेशी होतो अहंकाराथिला । त्याच्या त्यागें जाला सुकाळ हा ॥ ३
फिटलें सुतक जन्ममरणाचें । मीमाझ्यासंकोचे–दुरी जालों ॥ ४ ॥
नारायणें दिला वसतीस ठाव । ठेवूनियां भाव ठेलों पायीं ॥ ५ ॥
तुका म्हणे दिल्हे उमटोनि जगीं । घेतलें तें अंगीं लावूनियां ॥ ६ ॥

(४७)

जाला प्रेतरूप शरीराचा भाव । लक्षियेला ठाव स्मशानींचा ॥ १ ॥
रडती विवश कामक्रोधमाया । म्हणे हायहाया यमधर्म ॥ २ ॥
वैराग्याच्या शेणी लागल्या शरीरा । ज्ञानाग्नि भरभरां जीवित्वेंसी ॥ ३
फिरविला घट फोडिला चरणीं । महावाक्यध्वनी बोंब जाली ॥ ४ ॥
दिली तिळांजुळी कुळनामरूपा । शरीर त्या बापा समर्पिलें ॥ ५ ॥
तुका म्हणे रक्षा जाली आपेआप । उजळला दीप–गुरुकृपा ॥ ६ ॥

(४८)

बोळविला देह आपुलेनि हातें । हुताशिली भूतें ब्रह्माग्नीसीं ॥ १ ॥
एकवेळे जाले सकळकारण । आतां नारायण–पारायणें ॥ २ ॥
अमृतजीवनीं निववली खाई । अंगें तये ठायीं हारपलीं ॥ ३ ॥
एकादशीजागरणउपवास । बरवा दिवस भोजनाचा ॥ ४ ॥
सर्व कर्मे जालीं घटस्फोटापाशीं । संबंध एकेसी उरला नामीं ॥ ५ ॥
तुका म्हणे आतां आनंदीं आनंदु । गोविंदीं गोविंदु विस्तारला ॥ ६ ॥

**टीपः**– भोजन म्हणजें अन्नसेवन नव्हे. संत सेवेच्या आनंद भोगाला भोजन म्हणतात. पहा भोजन ते पा शांतीचे–तुमचें जालिया भोजन–वगैरे.

(४९)

पिंडदान पिंडें ठेविलें करून । तिळीं तिळवण मूळमंत्र ॥ १ ॥
सारिले संकल्प एकाचि वचनें । ब्रह्मी ब्रह्मार्पणें सेवटींच्या ॥ २ ॥

सव्यअपसव्य बुडाली ही कर्मे। एकाएकी वर्मे एकोविष्णु ॥ ३ ॥
पितापुत्रत्वाचें जालें अवसान। जनीं जनार्दन अभेदेंसी ॥ ४ ॥
अ–हेतोसी पूजा पावली सकळ। सहज तो काळ साधियला ॥ ५ ॥
तुका म्हणे केला सकळां उद्धार। आतां नमस्कार सेवटींचा ॥ ६ ॥

टीप– मूळमंत्रतिळीं–एकोविष्णुवर्मे; हे एक शब्द. अ–हेतोसी–निर्हेतुकपणें–निष्कामबुद्धीनें.

(५०)
स्थिरावली वृत्ति पांगुळला प्राण। अंतरींची खूण पावूनियां ॥ १ ॥
पुंजाळले नेत्र अर्धउन्मिलीत। कंठ सद्गदित रोमांचित ॥ २ ॥
चित्त चाकाटलें स्वरूपा माझारी। न निघे बाहेरी सुखावलो ॥ ३ ॥
सुनीळ प्रकाश उदैजला दिन। अमृताचें पान–संजीवनें ॥ ४ ॥
शशिसूर्या जाली जीवें ओंवाळणी। आनंददाटणी आनंदें या ॥ ५ ॥
तुका म्हणे सुखें प्रेमेंसी डुल्लत। विरालों निश्चित निश्चितीनें ॥ ६ ॥

(५१)
शोधुनि अन्वय वंशवंशावळी–। परस्परकुळीउच्चारणें ॥ १ ॥
म्हणविलें मागेंपुढें चाले कैसें ?। केला सामरस्यें अभिषेक ॥ २ ॥
छत्र तें झळके उन्मनीनिशाणी। अनुहतध्वनी नभ गर्जे ॥ ३ ॥
तुकास्वामी स्थापी निजपदीं दासा। करूनि उल्हासा सप्रेमता ॥ ४ ॥

(५२)
प्रवृत्तिनिवृत्ती आटूनि विभाग। उतरिलें चांग रसायन ॥ १ ॥
ज्ञानाग्नीहुताशीं कडसिले वोजा। आत्मसिद्धिकाजा लागूनियां ॥ २ ॥
ब्रह्मीं ब्रह्मरस सिद्ध जाला पाक। घेतला रुचक प्रीतिमुखें ॥ ३ ॥
स्वानुभवें आंगें जाला समरस। योगें निजध्यास–ग्रासोग्रासीं ॥ ४ ॥
आरोग्यता तुका पावला अष्टांगी। निजआत्मरंगीं मिरविला ॥ ५ ॥

(५३)
निवृत्तिचें तटीं राहिलों जों उभा। आनंदाचा गाभा देखियला ॥ १
पंचभूतमेळ मायेचा गोंधळ। दिसतें सकळ दृश्यजात ॥ २ ॥

काय बोलूं वाणी? सुखाची जे खाणी । उघड नयनीं दिसताहे ॥ ३ ॥
तुका म्हणे खूण जाणती वैष्णव । जया गुरुराव कृपावंत ॥ ४ ॥

(५४)
अचिंत्यचिंतनें राहिलों निश्चळ । तेंचि किती काळ वाढवावें? ॥ १ ॥
अबोल्याचा काळ आतां ऐशावरी । वचनाची उरी उरली नाहीं ॥ २ ॥
करूं आला तों तों केला लवलाहो । उरोंच संदेहो दिला नाहीं ॥ ३ ॥
तुका म्हणे मोह परतेना मागें । म्हणउनि त्यागें त्याग जाला ॥ ४ ॥

(५५)
गंधर्वनगरीं क्षणैक रहावें । तेंचि पैं करावें मूळक्षेत्र ॥ १ ॥
खपुष्पांची पूजा बांधोनि निर्गुणा । लक्ष्मीनारायणा तोषवावें ॥ २ ॥
वंध्यापुत्रजांच्या लग्नाचा सोहळा । आपुलिया डोळां पाहों वेगीं ॥ ३
मृगजळपोयी घालुनी सज्ञाना । तापलिया जना निववावें ॥ ४ ॥
तुका म्हणे मिथ्या देहेंद्रियकर्म । ब्रह्मार्पणें ब्रह्म होय बापा ॥ ५ ॥

(५६)
ब्रह्मरूप जीव सकळ आहेती । देवा नोळखती देहभावें ॥ १ ॥
पूर्वपुण्य नाहीं विसरलें हरी । पडलें अघोरीं मायाचक्रीं ॥ २ ॥
प्रत्यक्ष आरिसां दिसताहे मुख । पाहाती ते मूर्ख दुजेपणें ॥ ३ ॥
तुका म्हणे जाला अनर्थ सगळा । पडली शृंखला अविद्येची ॥ ४ ॥

(५७)
आठवितां होय नाठवाची हानी । दिसे चक्रपाणी मागेंपुढें ॥ १ ॥
आठवाचें आदि–अंती हा विठ्ठल । बोलवितो बोल निजसत्ते ॥ २ ॥
दयावंत मोठा दासासी कृपाळ । जाऊं नेदी पळ एक वांयां ॥ ३ ॥
तुका म्हणे ज्याचा तोचि आठवितो । कौतुक दावितो भक्तसखा ॥ ४ ॥

(५८)
अनंत ब्रह्मांडें जयाचे उदरीं । तो माझ्या अंतरीं आत्माराम ॥ १ ॥
देउळांत देव देवांत देउळ । शोधुनी पा मूळ कैसें आहे ?॥ २ ॥

मूळ पाहूं जातां मुळींच आपण । ऐसी आहे खूण अनुभवाची ॥ ३ ॥
नाहीं मूळडाळ नाहीं याती कूळ । असे ते अढळ सदोदीत ॥ ४ ॥
देव ना देउळ नाहीं ते राउळ । काळ वा अकाळ नाहीं तेथें ॥ ५ ॥
भाव नाहीं भक्ति मोक्ष नाहीं मुक्ति । दिस आणि राती मावळली ॥६
तुका म्हणे ऐसें बाबाजींनें केलें । अढळ स्थापिलें निजपदीं ॥ ७ ॥

(५९)

संकल्प विकल्प मावळले जेव्हां । केलें कर्म तेव्हां शुद्ध होतें ॥ १ ॥
आशा तृष्णा माया मोहकामक्रोध । महदादी मद अहंकार ॥ २ ॥
दंभ लोभ रजोगुण हा तामस । यांचा केला नाश समूळेसीं ॥ ३ ॥
मी देह म्हणतां मिथ्या तुझें माझें । सांडियलें ओझें मळबुद्धि ॥ ४ ॥
तुका म्हणे जेव्हां सांडिली अहंता । तेव्हां ते शुद्धता जाली असे ॥५

(६०)

ओंकाराचें पूर्वी निघालें जें फळ । ओतले सकळ मात्रारूप ॥ १ ॥
ओंविलें वो मणी सूत्रमणिगणी । ओंकाररूपिणी माया होय ॥ २ ॥
वारेल हे माया वाक्य वाचे वदा । ध्यातां या गोंविदा एकाभावें ॥३
वेदांचे हे बीज ओंकाराचे निज । तुका म्हणे मज आतुडलें ॥ ४ ॥

(६१)

वृक्षाचिये अग्रीं पहा फूल डोले । जाणा तैसें चळे कर्मब्रह्म ॥ १ ॥
फळमाथां फूल शेखी जैसें दिसे । ब्रह्म ते प्रकाशे सर्वगत ॥ २ ॥
तुका म्हणे ऐसे जाणे एकवर्म । जाला परब्रह्म स्वयें तोचि ॥ ३ ॥

(६२)

केलें ब्रह्मार्पण सर्व क्रियाकर्म । खलविदं ब्रह्म सर्वात्मक ॥ १ ॥
सेवटीचें कर्म केला ब्रह्मयज्ञ । आनंदीं निमग्न जीव ठेला ॥ २ ॥
सव्यअपसव्य बुडाला हा नेम । तिळांजुळी कर्म ओपियलें ॥ ३ ॥
पितापुत्रत्वाचें फिटलें सुतक । नामें हे त्रिलोक मुक्त जाले ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां उगविली गुंती । शेवटी विनंतीं पांडुरंगें ॥ ५ ॥

(६३)
सर्व हा पदार्थ केला एक ठायीं । चवी रुची नाहीं ऐसें केलें ।। १ ।।
भाकड हें पोसी देहाचें बंधनें । याचे हातीं घेणें काम आहे ।। २ ।।
दोहीं हातीं याचा केला असे काला । सम मेळविला भक्तिभावो ।।३
पात्र आणि द्रोण चुरियलें त्यांतें । भक्षी दोहीं हातें आवडीनें ।। ४ ।।
तुका म्हणे याची चवीरुची नेणें । नारायण जाणें अंतरींचें ।। ५ ।।

(६४)
वेगळा पदार्थ खावा कशासाठीं ?। करी देहकष्टी उगलाची ।। १ ।।
एके ठायीं जातें ऐसें हें प्रमाण । माये तूं श्रमण करूं नकों ।। २ ।।
तुका म्हणे कांहीं आम्हां चवी नाहीं । जिव्हा गोडी कांई याची नेणें ३

(६५)
कोण घर आम्हां ठावें नाहीं कधीं । मोकळचा ह्या बिदी दाही दिशा १
यावें जावें नीट नाहीं संकोचित । मना अनुचित आवडेना ।। २ ।।
अंधारीं बैसावें पीठाची चावटी । हे तो जन्मीं गोष्टी ठावी नाहीं ।।३
आमुच्या गृहाचा पुसाल वृत्तांत । उष्ण वायु तेथ नित्य राहे ।। ४ ।।
तुका म्हणें आम्हा कृष्णही चांदणें । गण तारांगणे मोजूं येती ।। ५ ।।

(६६)
नव्हते मेरु आणि मांदार ही जाण । तेव्हां ब्रह्म पूर्ण आत्मज्योती ।।१
आकाश नव्हते नव्हती धरित्री । तेव्हां तो श्रीहरी निर्गुणसा ।। २ ।।
नव्हता द्रुमाकार स्थूल–आत्मलिंग । तेव्हां पांडुरंग विटेवरी ।। ३ ।।
तुका म्हणें होते जेव्हां निराकार । तेव्हां अवतार सगुण हे ।। ४ ।।

(६७)
अंडज चारज पुढें जाले जाण । केलेसे उत्पन्न कासयानें ? ।। १ ।।
मायेनें बालकें केली ती निर्माण। ब्रह्मा।विष्णु ज्ञानज्योतीरूप ।। २ ।।
ज्योतीचा प्रकाश अहं ब्रह्मजाण । तेथुनी निर्माण जाली माया ।। ३ ।।
तुका म्हणे जें कां अहं ब्रह्म जाण । तो हा नारायण विटेवरी ।। ४ ।।

(६८)

ब्रह्मी माया जे कां असे कांही जाण । तिची रूपखूण न पाहवे ।।१
न पाहवे डोळां अगम्यता तिची । नेणें तो विरंची पार जिचा ।। २ ।।
ऐसी माया ती ही वेदां अगोचर । जिनें विश्वाकार दाखविला ।।३
तुका म्हणे माया अलिकडे जाण । अहंब्रह्मपूर्ण पुढें असे ।। ४ ।।

(६९)

मायेसी पाहुनी लुब्धले हे प्राणी । नेणतीच कोणी हरिलागी ।। १ ।।
मायेचा व्यापार जालासे बहुत । तेथें आत्मज्योत कोण जाणें ?।। २ ।।
मायेनें वेष्टिलें अवघें जगत्र । तेथें तो विचार काय सुचे ? ।। ३ ।।
तुका म्हणे आम्ही मायेसी पाहून । परब्रह्म जाण ओळखिलें ।। ४ ।।

(७०)

मग मायारूप आच्छादन गेलें । निखळ ठाकलें ब्रह्म पुढें ।। १ ।।
हालेना चालेना अहं ब्रम्ह जाण । नाहीं रूपगुण त्या स्वरूपा ।। २ ।।
लक्षवेना दृष्टी न पाहवे डोळां । अगम्य ते लीळा स्वरूपाची ।। ३ ।।
तुका म्हणे ज्ञानचक्षुनें पहावें । गुरुकृपें घ्यावें ओळखुनी ।। ४ ।।

(७१)

जैं नव्हती पृथ्वी आणि तारांगण । तैं मूर्ती निर्गुण नारायण ।। १ ।।
जैं नव्हतें आप तेज आणि अग्नी । तेव्हां निरंजनीं नारायण ।। २ ।।
जैं नव्हता वायु चंद्र आणि सूर्य । तेव्हां निरामय नारायण ।। ३ ।।
तुका म्हणे तेथें ज्योत मिळविली । बाबाजीनें केली कृपा मज ।। ४ ।।

(७२)

अनुहतध्वनी वाइयला शंख । होउनी निःशंक सर्वकाळ ।। १ ।।
ओंकाराचें नादें उठला गजर । सोहं हंसावर अखंडित ।। २ ।।
विसेकसहस्त्र साशत निर्धारी । चतुर्दशवरी सदां चाले ।। ३ ।।
त्रिकुटशिखरीं आम्ही मठ केला । द्वैतभाव गेला हरीहर ।। ४ ।।

उन्मनीचें नीर वाहे गंगाजळ । आनंदकल्लोळ दिली बुडी ॥ ५ ॥
तुका म्हणे एक हरिहरनामीं । घंटाघोळ आम्ही वाजवीतो ॥ ६ ॥
(७३)
देहभाव आम्ही संसार थोरला । समूळ भाजिला आत्मतत्वीं ॥ १ ॥
जन्ममरणाचें बीज भाजियेलें । नुगवेसें केलें मागुतालें ॥ २ ॥
समूळेसी केली प्रपंचाची लाही । आतां पुढें नाहीं बीजा चाली ॥ ३ ॥
आमुच्या हिताचे जाणतों उपाय । म्हणोनियां सोय सांपडली ॥ ४ ॥
तुका म्हणे आली प्रचीत शरीरा । तयाचा विकरा करीतसें ॥ ५ ॥
(७४)
दिठी माजी दिठी दशमद्वार आहे । आलाड हा देहे टाकुनियां ॥ १ ॥
तें द्वार वेटीजे मूर्ती ओळखीजे । खूण ही जाणीजे गुरुहस्ते ॥ २ ॥
बुभ्दुद हे सर्व लया गेले तेथ । पूर्ण दीनानाथ उभा असे ॥ ३ ॥
हातेंविण तुका करी चरणसेवा । अभावनिभावातीत जाला ॥ ४ ॥
(७५)
सहस्रदळावरी शिखरीं गोमटी । स्वरूपाची भेटी ब्रह्मरंध्रीं ॥ १ ॥
कोटीसूर्यकोटी शीतळमयंक । स्वरूप ते एक अखंडित ॥ २ ॥
निश्चळ चंचळ नाहीं आकारिलें । रूप विस्तारलें मायादेवी ॥ ३ ॥
असे पुष्प ऐसी सुनीळ चंदनी । तुकयाचे मनीं आरूढली ॥ ४ ॥
(७६)
काया हे पंढरी प्रेम पुंडलीक । सत्रावी सन्मुख चंद्रभागा ॥ १ ॥
परा तेचि वीट आत्मा पंढरीनाथ । जेथ पाहे तेथ ठसावला ॥ २ ॥
शांति क्षमा दोन्ही राही रुकमिणी । दोहीं भागीं दोन्ही विराजती ॥३
विवेक वैराग्य गरुड हनुमंत । जोडोनियां हात तिष्ठताती ॥ ४ ॥
तुका म्हणे आम्ही पंढरी देखिली । गांठी हे सुटली चौदेहांची ॥ ५ ॥
(७७)
देह ही पंढरी आत्मा पांडुरंग । करी अंगसंग अहर्निशी ॥ १ ॥
मन पुंडलीक आवरूनी धरा । तें होय सोयरा आत्माराम ॥ २ ॥

मेरूचें शिखरीं सत्रावी सुंदरी । देव या पंढरीं नांदतसे ॥ ३ ॥
चहू या देहाची करूनीयां वीट । विटेवरी नीट उभा असे ॥ ४ ॥
तुका म्हणे लक्ष लक्षूनी अंतरीं । तोचि वारकरी पंढरीचा ॥ ५ ॥
(७८)
अनंत समुद्र कंठा येवढें पाणी । आप नारायणीं मीनलेया ॥ १ ॥
नेराव्या मण्याची माळ होती हातीं । ती आली अवचिती मेरूपासी ॥ २
मनाचा हा जप फिरला माघारा । आलें मूळ घरा सत्रावीच्या ॥ ३ ॥
सोहं होता दोरा तुटानियां गेला । ओंकार भंगला वाचे सिद्ध ॥ ४ ॥
वित्त हें चैतन्यसमरस जालें । देखिली पाउलें विठोबाचीं ॥ ५ ॥
(७९)
चिन्मयाचा डेरा अमृतें भरिला । प्रेमें घुसळीला सत्रावीनें ॥ १ ॥
अहं सोहं दोन्ही बिरडीं लाविली । तेथें रवी केली चैतन्याची ॥ २ ॥
काढिलें मंथुनी निजबोधलोणीं । चिद्रत्नाची खाणी उघडली ॥ ३ ॥
तुका म्हणें सोय सांपडली निज । नाहीं नीस बीज सद्गुरुचें ॥ ४ ॥
टीपः– नीस = निवडणें; वेगळे करणें
(८०)
चौदेहाचे माथां ठेउनियां हात । उन्मनी साक्षात दाखविली ॥ १ ॥
उन्मनीची मुद्रा चेपुनियां दिली । परब्रह्म जाली चहुंकडे ॥ २ ॥
अर्क श्वेत शाम नीळ आणि पीत । रंग उमटत नानापरी ॥ ३ ॥
रंग आटोनियां अरंगांत गेले । निर्मळ राहिलें निजतेज ॥ ४ ॥
तया तेजा कांहीं दृष्टान्त साजेना । आसपास जाणा चहुंकडे ॥ ५ ॥
कुणिकडे जावें ? कुणिकडे यावें ? । तेथेंचि असावें निरंतर ॥ ६ ॥
निरंतर म्हणतां अंतरींच वाहीं । सर्वांमधी पाही तेंच आहे ॥ ७ ॥
आहे तें म्हणतां द्वैत लागे पाठी । उद्दिजनासाठीं शब्दबोध ॥ ८ ॥
तुका म्हणे तेही वाचे बोलवेना । योगियाची खुणा योगी जाणे ॥९

(८१)

सोहं हंस ऐसा बोध तत्वमसी । तें ब्रह्म आहेसी तूंची स्वयें ।। १ ।।
प्रथम ते पाहे नील निजज्योती । दुसरी प्रभातीं कृष्णवर्ण ।। २ ।।
तिसरा उजाळा दिसे धुंधुंकारू । अणूरेणु कीरु दिसतसे ।। ३ ।।
चतुर्थ तो शाम शांतीची वसती । उन्मनी निश्चिती पीतवर्ण ।। ४ ।।
चंद्रज्योतीप्राय उजाळा सहावा । तुका म्हणे घ्यावा निवडोनि ।। ५ ।।

(८२)

तया पलीकडे सहस्त्रदळ कीर्ण । तेथें भ्रमे मन भ्रांतिरूप ।। १ ।।
कोटी सूर्यप्रभा तयाचें रूपडें । तयामाजी दडे जीवदशा ।। २ ।।
निर्गुणावयव दिसें तें निर्वाण । अव्यक्त निरंजन निर्विकल्प ।। ३ ।।
तुका म्हणे आम्ही केली तेथें वस्ती । सांगू तुज किती नारायणा ।।४

(८३)

चैतन्याची मुस ओतिली सगळी । तियेची बुबुळीं दिप्तीप्रभा ।। १ ।।
पहावया खूण सांगे नारायणा । अंतरींच्या खुणा अंतर्निष्ठ ।। २ ।।
पलिकडे परब्रह्म ते निघोट । पाहे घनदाट भरले ते ।। २ ।।
पाहों नयनाचें कपाट लावून । वरी बोटें दोन ठेवूनियां ।। ४ ।।
डोळियां बैसलें चिन्मय घननीळ । पहातां सुनिळ तुका म्हणे ।। ५ ।।

(८४)

प्रथम स्थूलदेह म्हणती रक्तवर्ण । पाहे नेत्रस्थान वस्ती ज्याची ।।१
दुसरा तो सुक्ष्म श्रीहाट अंगुष्ठ । वस्ती ज्याची कंठस्थान आहे ।।२
तिसरा कारण गोल्हाट निवृत्ति । कृष्णवर्ण गती ओळखावी ।। ३ ।।
महाकारण देह मसुरे प्रमाण । अर्धमात्रा जाण नीळवर्ण ।। ४ ।।
तुका म्हणे तया शून्याचा शेवट । चैतन्य निघोट ओतियेलें ।। ५ ।।

(८५)

अधउर्ध्व शून्य माजि निरशून्य । पांचवें उन्मन उन्मनीसी ।। १ ।।
सहावें षड्दळ महाशून्य भृकुटीं । आत्मयाची रहाटी ज्ञानप्रभा ।।८

सातवें सहस्त्रदळ निरशून्याचा खेळ। तेची पूर्वस्थळ गुरुपुत्रा ।। ३ ।।
सन्मुख साधुनी पहा विलोकुनी। तुका म्हणे जनीं धन्य होसी ।। ४ ।।

(८६)

अंतरीं निश्चय कैवल्य सत्य तें । जाण त्या वरुतें सद्‌गुरु डोळां ।।१
सत्यावरी ज्ञान मनपवन चाकें। ओढिताती निकें अहं– सोहं ।। २ ।।
डोळियाचा डोळा तो लक्ष उठिला। त्यांतून लक्षिला सद्‌गुरुराव ।।३
तुका म्हणे बीज सांपडलें एथ। मावळला हेत निरंजनीं ।। ४ ।।

(८७)

मकाराच्या माथां झळकती चांदणी। पश्यंती नयनीं तटस्थली ।। १ ।।
अर्धमात्रास्थान महा तें कारण। त्या वरतें जाण ज्योतीरूप ।। २ ।।
तें सुख आपुलें आपणची घ्यावें। न कळतां पुसावें सद्‌गुरुसी ।। ३ ।।
निजरंग खूण तुका ही बोलिला। ब्रह्मरूप जाला सर्वकाळ ।। ४ ।।

(८८)

षडचक्रावरी त्रिकुटा अंतरीं। त्रिवेणी सुंदरी गंगा वाहे ।। १ ।।
तेथें स्नानसंध्या करिताती नित्य। रजतमद्वैत संहारूनी ।। २ ।।
त्रिवेणी शेजारी अनुहत गर्जे। ध्वनि तो विराजे सोहं शब्द ।। ३ ।।
लक्ष भेदुनियां वरी जाय तुका। पांडुरंग सखा देखावया ।। ४ ।।

(८९)

जन्मासी आलिया विठो पाहे डोळां। सुखाचा सोहळा मायबाप ।।१
आंत ती पांढरी वरी असे काळी। प्रभा वनमाळी अनुपम्य ।। २ ।।
सुनीळ ते ब्रह्म निर्मळ ते ब्रह्म। सोज्वळ तें ब्रह्म परात्पर ।। ३ ।।
अर्धचंद्रवीट दिसते साजिरी। विठ्ठल त्या वरी उभा असे ।। ४ ।।
तुका म्हणे ऐसी पंढरी उमगा। ना तरी शिमगा अखंडीत ।। ५ ।।

(९०)

अलक्ष निर्गुण दिव्य लावी ज्योत। प्रकाश फांकत चैतन्य ते ।। १ ।।
चैतन्यापासोनी मुळमाया जाली। ओंकाराची भली जननी ते ।। २ ।।

ओंकारापासोनी महारुद्र जाला । विष्णु प्रकाशला रुद्रतेजें ।। ३ ।।
आकारासी आले चंद्रसूर्यतारा । घातला पसारा सगुणाचा ।। ४ ।।
पंचभूतें जाली त्रिगुणविदाण । अष्टधा ते जाण प्रकृति हे ।। ५ ।।
मुळापासोनियां फांकावला वेल । धन्य जाणतील मूळ एक ।। ६ ।।
तुका म्हणे खूण जाणती हे संत । घेताती प्रचित गुरुकृपें ।। ७ ।।

(९१)

चैतन्याचे मुळीं केला ब्रह्मघोंट । पहातां घनदाट भरले ते ।। १ ।।
पहायाचीं खूण सांगे नारायण । अंतरींची खूण अंतर्निष्ट ।। २ ।।
पहा नयनाचें लाउनी कपाट । वरी दोना बोट ठेऊनियां ।। ३ ।।
ज्योतिच्या प्रकाशें पाहियेले पाय । स्थूलामाजि काय आहे माझा ।।४
सूक्ष्माच्या शेजारीं कारण तें असे । नील बिंदू वसे शामवर्ण ।। ५ ।।
मसूरे प्रमाण मोतियाचे परीं । आहे दहावेद्वारीं निजरूप ।।। ६ ।।
हातें धरवेना डोळां पहावेना । हेचि खूण जाणा संतांमाजि ।। ७ ।।
तुका म्हणे माझें तोडिलें बंधन । बाबाजी चैतन्य सद्गुरुनें ।। ८ ।।

**टीप**-चरण २ व ३ हे चैतन्याची मुस (८३) अभंगांपैकीं असण्याची शक्यता आहे.

(९२)

धन्य ते गोल्हाट चाले मंत्रपाठ । गणीत बारा बोट कळों आलें ।।१
ढवळियाचे वरी काळीया शेजारीं । त्याचे टोंकावरी श्रुती गेली ।।२
श्रुती गेली परी मिळाली अंतरी । नयेचि माघारीं सांगू आतां ।।३
सांगावें तें काय सांगताचि नये । उघडयासी काय सांगू आतां ? ।।४
उघडचि आहे खोलचि तें नव्हे । परी खोल पाहे सांचलें तें ।। ५ ।।
सांचलें तें रूप दिसे तें स्वरूपें । जाऊनी संतापें पुसा वेगीं ।। ६ ।।
साधुसंतजनी बरवा केला शोध । राहिले सावध निरंजनीं ।। ७ ।।
तुका म्हणे त्यानीं थोर केली जोडी । उतरले थडी भवसिंधू ।। ८ ।।

(९३)

आकार पाहातां नकारचि जाला । नकार संचला नकारांत ।। १ ।।
अवघा तो नकार तोचि पें ओंकार । नकारअंकुर उद्भवला ।। २ ।।

सर्वांमाजि एक पाहातां नकार। तयाचा व्यापार सर्वां ठायीं ॥ ३ ॥
अंकुर पाहातां अंकुर दिसेना । तुका सांगे खुणा योगियांच्या ॥ ४ ॥

(९४)

योगियाचा देव कोठें तो दिसेना । पहातां असेना जवळींच ॥ १ ॥
सर्वांठायीं आहे आहे तो दिसेना। योगियाच्या खुणा देखतांचि ॥२
देखतांचि देख देखणें आणिक । आणिकांचे एक जालें पहातां ॥ ३ ॥
पहातांचि दोन दोन तेंचि आहे। सर्वांठायीं पाहे कांहीं नाहीं ॥ ४ ॥
तुका म्हणे पाहूं येथेंतेथें किती ?। थकलों म्हणती पहाते त्या ॥ ५ ॥

(९५)

कोणापाशीं आहे ? कोणाचें देखणें ?। देखणे आपणें गुप्त जालें ॥ १ ॥
अलिकडे पहातां दिसतचि नाहीं । ओळखुनि नाहीं तेंचि घ्यावें ॥२
नाहीं नाहीं म्हणतां जाला तोचि प्रती । पहातां ते दिप्ती तुका म्हणे ॥३

(९६)

आंधाराचे अंगीं प्रकाशला रवी। फोडोनि पहावी डोळे प्रभा ॥ १ ॥
न दिसे पहातां सूर्यप्रभातेज । जिवीं जीव निज पाहों नल्हे ॥ २ ॥
स्वरूप-प्रकाश तुका म्हणे दोन्ही। दिसे जनीं वनीं एकप्रभा ॥ ३ ॥

टीपः– नल्हे = शकत नाहीं.

(९७)

जीव शिव दोन्ही बोलती पुराणीं। अमंगळ वाणी बोलूं नका ॥ १ ॥
तेथें कैंचा जीव ? तेथें कैंचा शिव ?। शून्यापाशीं ठाव निरसिला ॥२
शून्याचिया पोटीं सर्वमय श्रेष्ठी। शून्याचे शेवटीं ठाव नाहीं ॥ ३ ॥
घटामध्यें पाणी पाण्यामध्यें घट। शेंडा-मुळें-देंठ तेथें कैंचे ? ॥ ४ ॥
उफराटे झाड थंड कां पाझर । दृष्टीचे आगर फिरूं नल्हे ॥ ५ ॥
तुका म्हणे देहीं पंढरी ओळगा। ना तरी शिमगा अखंडित ॥ ६ ॥

(९८)

कोणां त्याचा पार फावला धुंडितां । पुढें विचारितां विश्वंभरा? ॥१
अणुरेणुसूक्ष्मस्थूळा पार नाहीं। श्रुती नेति त्याही खुंटलिया ॥ २ ॥

फळांत कीटका एवढें आकाश । ऐसी त्या तरूस फळें किती ? ॥ ३ ॥
दाविलें अनंतें अर्जुनासि पोटीं । आणीक त्या सृष्टि कृष्णलोक ॥४
तुका म्हणे लागा संतांचिये कासे । ठाव घेतां कैसे वांचा जीवें ॥ ५ ॥
(९९)
माया तेंचि ब्रह्म ब्रह्म तेंचि माया । अंग आणि छाया तयापरी ॥ १ ॥
तोडितां न तुटे सारितां निराळी । लोटांगणातळीं हारपते ॥ २ ॥
दुजें नाहीं तेथें बळ कोणासाठीं । आणीक ते आटी विचाराची ? ॥३
तुका म्हणे उंच वाढे उंचपणें । ठेंगणी लवणें जैसीतैसी ॥ ४ ॥
(१००)
मृगजळा काय करावा उतार । पावावया पार पैलथडी ? ॥ १ ॥
स्वप्नींचें जें सुखदुःख जालें कांही । जागृती तों नाही साचभावें ॥२
खापराचें होन खेळती लेंकुरें । काय त्या वेव्हारें लाभहानी ? ॥ ३ ॥
मंगळदायकें करिती कुमारी । काय त्यांची खरी सोयरीक ? ॥ ४ ॥
सारीं जालीं मेलीं लटिकें वचन । बद्धमुक्त शीण तुका म्हणे ॥ ५ ॥
(१०१)
अभ्राची साउली उपेगासी नये । क्षणामाजी जायें वितळोनी ॥ १ ॥
चित्रींची बाहुली सजीव ती जाली । पाहिली ऐकिली नाहीं कोठे ॥२
तयेपरी देह आणि हे विषय । नाशवंत जाय विलयासी ॥ ३ ॥
तुका म्हणे याचा विचार पाहती । तेचि धन्य होती हरिभक्त ॥ ४ ॥
(१०२)
जड शोधोनिया चैतन्य काढिलें । जड काय जालें सांगा मज ? ॥ १ ॥
पटांतील तंतू वेगळा काढिला । पट काय जाला सांगा मज ? ॥ २ ॥
गारेंतील पाण्यावेगळीं काढिली । गार काय जाली सांगा मज ? ॥३
तुका म्हणे ब्रह्मावेगळें काढिलें । विश्व काय जालें सांगा मज ? ॥४
(१०३)
सांडा रे चावटी व्यर्थ कां रे गोष्टी ? । पहा ब्रह्म पोटीं कोंदाटलें ॥ १ ॥
जीवनीं हा मीन मीनांत जीवन । तैसें ब्रह्मीं जन कोंदाटलें ॥ २ ॥

सोनें परी नांव आनेंही न मोडें । ब्रह्म तेणें पाडे उतूं आलें ॥ ३ ॥
बोट लावोनियां दाखवावें जेव्हां । तुका म्हणे तेव्हां हारपावें ॥ ४ ॥

(१०४)

परोक्ष तें ज्ञान तोंडानें बोलावें । अपरोक्ष सांगावें ऐसें नाहीं ॥ १ ॥
गुळ खाउनियां सांगतसे गोड । अनुभव गूढ बोलवेना ॥ २ ॥
अनुभव बोलतां तोंडा मिठी पडे । सांगेल रोकडें ऐसें नाहीं ॥ ३ ॥
तुका म्हणे लाडू आरोगूं मुगाचे । ऐसें प्रचितीचें वर्म आहे ॥ ४ ॥

(१०५)

जाणीव ही कळा हारपोनि गेली । दृष्टी मावळली तयामाजि ॥१
पाहतापाहणें हारपोनि गेलें । "मी माझें" मारिले तयामाजि ॥२
रूपातीत दृष्टी पाहतां अगोचर । पहा पां सादर जवळी असे ॥३
तुका म्हणे अणु मसुरे एवढें । त्रैलोक्य थोकडे दिसे पुढें ॥ ४ ॥

(१०६)

निजबोध जाला माझिये हृदयीं । मारूनी विजयी गुरु केला ॥ १ ॥
लक्षचौऱ्याशींचा अहंकार होता । वधोनियां आतां निर्वाळिला ॥ २ ॥
लागलें जे घाय मनाचे बुजिले । रसायन दिलें निजरूप ॥ ३ ॥
तुका म्हणे केली निरोगी हे काया । काय गुरुराया देऊं आतां? ॥ ४ ॥

(१०७)

जमाखर्च भारी चौऱ्याशींचा बंद । नेणे हा गोविंद; माया जाणे ॥१
अपार हे सेना तया घांस दाणा । वेतन ही जाणा माया देत ॥ २ ॥
हुजुरात चौकी पलंगाची देती । तयाची गणती हरीकडे ॥ ३ ॥
तुका म्हणे मज चाकरी हे गोड । पादुकांचा जोड वागवितों ॥ ४ ॥

(१०८)

हरीच्या पादुका घेतल्या मस्तकीं । घडीपळ चौकी पायापासीं ॥ १ ॥
बरी हे चाकरी न पुसेचि कोणी । हिशेबाचें धनी वेगळाले ॥ २ ॥

मज अनाथासी न कळे लिहिणें । भांडार हा कोणें सांभाळावा? ॥३
तुका म्हणे मज बुद्धी नाहीं दिलें । कामगार केलें पादुकेचें ॥ ४ ॥
(१०९)
लटिका प्रपंच वांझेची संतति । तत्वज्ञा हे भ्रांति बाधूं नल्हे ॥ १ ॥
सूर्यबिंबीं काय अंधार रिघेल ? । नभ कां तिंबेल मृगजळें ? ॥ २ ॥
तैसा दृश्याभास नाडळेचि डोळा । प्रकाशसोहळा भोगिनता ॥ ३ ॥
भोग–भोग्य–भोक्ता नाढळेचि कांहीं । चैतन्यविग्रहीं पूर्णकाम ॥ ४ ॥
तुका ब्रह्मानंदीं अहेतुकब्रह्म । प्रपंचाचें वर्म देखे डोळां ॥ ५ ॥
(११०)
सहजलीळा मी साक्षी या सर्वांचा । नये वेंचूं वाचा ऐसें जालें ॥१
उपक्रमें वदे निःशब्दींची वाणी । जें कोठें बंधनीं गुंपों नल्हे ॥ २ ॥
तम नासी परी वेव्हारा वेगळा । रवि प्रभाकळा वर्ते जन ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें गेला अतिशयो । आतां पुन्हा नयो तोंड दावूं ॥ ४ ॥
(१११)
अवघ्या भूतांचें केलें संतर्पण । अवघीच दान दिली भूमि ॥ १ ॥
अवघाचि काळ दिनरात्रशुद्धी । साधियेला विधि पर्वकाळ ॥ २ ॥
अवघींच तीर्थें–व्रतें केले याग । अवघेंचि सांग जालें कर्म ॥ ३ ॥
अवघेंचि फळ आलें आम्हां हातां । अवघें अनंता समर्पिलें ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां बोलों अबोलणें । कायावाचामनें उरलों नाहीं ॥५
(११२)
बोलों अबोलणें मरोनियां जिणें । असोनि नसणें जनीं आम्हां ॥ १ ॥
भोगीं त्याग जाला संगींच असंग । तोडियेले लागमाग दोन्ही ॥ २ ॥
तुका म्हणे नव्हे दिसतो मी तैसा । पुसणें तें पुसा पांडुरंगा ॥ ३ ॥
(११३)
आतां येणेंविण नाहीं आम्हां चाड । कोण बडबड करीं वांयां ? ॥ १ ॥
सुख तेंचि दुःख पुण्य पाप खरें । हें तों आम्हां बरें कळों आलें ॥ २ ॥
तुका म्हणे वाचा वाहिली अनंता । बोलायाचें आतां काम नाहीं ॥३

(११४)

आता नव्हे गोड करिता संसार । विठ्ठलसंचार जाला माजि ।। १ ।।
ब्रह्मरसें गेलें भरूनिया अंग । आधील तो रंग पालटला ।। २ ।।
रसनेचिये रूची कंठीं नारायण । बैसोनियां मन निवविलें ।। ३ ।।
तुका म्हणे आतां बैसलों ठाकणीं । इच्छेची ते धणी पुरविली ।। ४ ।।

(११५)

याजसाठीं होतां केला अट्टाहास । सेवटीचा दिस गोड व्हावा ।। १ ।।
आतां निश्चितीनें पावलों विसांवा । खुंटल्या त्या धांवा तृष्णेचिया ।।२
कवतुक वाटे जालिया वेचाचें । नाम मंगळाचें येणेंगुणें ।। ३ ।।
तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आतां दिसों चारीं खेळीमेळीं ।।४

(११६)

शुभ जाल्या दिशा अवघा देशकाळ । अशुभ मंगळ मंगळानें ।। १ ।।
हातींचिया दीपें दुराविली निशी । न देखिजों कैसी आहे तेही ।। २ ।।
सुखदु:खघात नाहीं विपरीत । देतील आघात हितफळें ।। ३ ।।
तुका म्हणे आतां आम्हांसी हें भलें। अवघेचि जालें जीवजंत ।। ४ ।।

(११७)

नाहीं आम्हां शत्रु सोयरे पिशुन । दाटलें हें घन माहियेर ।। १ ।।
पाहें तेथें पांडूरंग रखुमाई । सत्यभामा राही जननिया ।। २ ।।
लज्जा भय कांहीं आम्हां चिंता नाहीं । सर्व सुखें पायीं वोळगती ।।३
तुका म्हणे आम्ही सदैवाचीं बाळें । जालों लडिवाळें सकळांचीं ।।४

---

या प्रकरणांतील ७८ व्या अभंगाचा शेवटचा चरण राहिला तो पुढीलप्रमाणें–

तुका म्हणे माळ ठेविली पायांपासीं । आतां गर्भवासीं येणें नाहीं ।। ६ ।।

अनुक्रम ३८८५ दि: ...
आ. ... नों दि ...

प्रकरण ३ रें

# मंत्रबीज

(११८)

ओमित्येकाक्षरं ब्रह्म । ऐसें प्रणव जें उत्तम ।।
हें कोठोन द्विजोत्तम । सांग स्मरता जाहला ? ।। १ ।।
याचें मूळस्थान ते काये (काय)? । कोठें सामावोनि राहे ? ।।
मात्रा मिरवत आहे । किती ? सांग विवंचना ।। २ ।।
अगा हा वैखरी उच्चार । कैसा झाला हा ओंकार ? ।।
अकार उकार मकार । अर्धमात्रा म्हणावा ? ।। ३ ।।
प्रणवाचें विवरण । नेणतां कैंचा रे ब्राह्मण ? ।।
अहं ब्रह्म म्हणोन । नेणपण मिरविसी ।। ४ ।।
ययापरते ते काये ? । जेथ शब्द निःशब्दीं ये ।।
याजपासी † पाविजे सोये । त्या नाम ब्रह्मबीज ।। ५ ।।
बीजीं उगवला तरू । तरी दिसें भिन्नाकारु ।।
शाखापत्रफळभारू । अवघा फुलासहित ।। ६ ।।
उर्ध्वमूळ अधःशाखा । ऐसा बोले यादवसखा ।।
तुका मृत्युंजय देखा । अर्धमात्रा म्हणावी ।। ७ ।।

† टीपः– या जपासी आणि याज पासी आणि याज पा असी (अशी) असे विविध अर्थ समजावेत.

(११९)

मन मानस सद्गुरु । अविनाश दिगंबरु ।।
मंत्र सांगे बीजाकारू । जो का सारु सर्वांचा ।। १ ।।
द्वादश अक्षरांचा मंत्र । परमपावक पवित्र ।।
सोय लावी हरिहर । त्रिलोकांही या जना ।। २ ।।
बोलों प्रासादिक वाणी । जयजयकार गर्जो ज्ञानीं ।।
ही सद्गुरुची पाहाणी । मूळवाणी उघड ।। ३ ।।

इसी न बोलतां होटीं । अर्थ येई श्रोत्यापोटीं ॥
परोपकारासाठीं । देव पाठीं फिरवित ॥ ४ ॥
तुका बडबडितो भाट । धरा शुद्धपंथ वाट ॥
पुढें कांटवण दाट । अहंतावाट फुटतां ॥ ५ ॥

(१२०)

ॐ नमो भगवते वासुदेवाय । द्वादश अक्षरें ही पाहे ॥
या जपाची पावतां सोये । भक्तिपंथा लागलें ॥ १ ॥
ॐ नमो भगवते अक्षरें सात । हेतों बाळमुकुंद देत ॥
त्याचें श्लोक करोनि सात । गीता अर्थ निवडिला ॥ २ ॥
विभागिला एकमेकांश । आवडत्यानें घेतला रस ॥
तेणेंकरुनि घोष । जाळिलें दोष गोहत्या ॥ ३ ॥
एकादशशत पारायण । नित्यनेम देवार्चन ॥
तुका म्हणे भावाविण । पढतपाषाण धगधगी ॥ ४ ॥

(१२१)

सात अक्षर श्लोक सात । त्याचें जालें सातशत ॥
पुढें दहासहस्त्र ग्रंथ । केलें कृत्य ज्ञानेशा ॥ १ ॥
तें ही महादेवी गीता । आदिमाया वेदमाता ॥
इच्या जाणेल जो अर्था । धन्य मातापितर ॥ २ ॥
अहं ब्रह्म बोलती ज्ञानी । कोठें उमटली ध्वनी ? ॥
कोणी आयकिली कानीं ? । कोणी ध्यानीं धरियेली ? ॥ ३ ॥
वाद्याविण नोहे नादु । वाचेविण नोहे शब्दु ॥
आहे सद्गुरुचा बोधु । पाहे शोधु वहिला ॥ ४ ॥
कराविण न वाये चुटकी । आंगोळींविण न वाये फटकी ॥
अवघें व्यापिलें घटमठ कीं । उगा भटकी हिंडती ॥ ५ ॥
निग्रधपंचम जें निर्मिलें । तें उदकांवरी डळमळे ॥
वटपत्रीं आनंदें खेळे । बाळमुकुंद या नांवे ॥ ६ ॥

ऐसें गुप्त हें निधान। प्राप्त करा संतजन ॥
श्रीगुरुमुखें करून। तुका म्हणे तरणोपाय ॥ ७ ॥

*प्रकरण ४ थे*

# ग्रंथ प्रामाण्य

(१२२)

एक भागवत प्रमाण। काय येर तें साधन ? ॥ १ ॥
देव भावासाठीं जाण। करी आपणासमान ॥ २ ॥
तीर्थव्रतें तप दान। नाहीं नाहीं भावाविण ॥ ३ ॥
तुका म्हणे सत्यसत्य। भावमात्रें होती मुक्त ॥ ४ ॥

(१२३)

गुंतूं नये कोठें हरिपायांविण। करावी मनन ज्ञानेश्वरी ॥ १ ॥
बहु शास्त्रें बहु ऋषीमतवाद। त्यांचा एक शब्द कामा नये ॥ २ ॥
बाळां-अबळांसी राजमार्ग बरा। भागवत धरा दृढभाव ॥ ३ ॥
तुका म्हणे भोळ्या भाविकांचें धन। शास्त्रें हींच दोन अंगिकारा ॥४

(१२४)

मागोनियां माधुकरी। नित्य वाचें ज्ञानेश्वरी ॥ १ ॥
ऐसें घडेल केधवां ?। गीता येईल अनुभवा ॥ २ ॥
येर शास्त्रार्थ टाकावें। गीता सत्शास्त्र पाहावें ॥ ३ ॥
तुकयादासाचें जीवन। गीता भागवत धन ॥ ४ ॥

(१२५)

प्रथम श्लोकी गीता विष्णुमुखें जाली। जें उपदेशिली ब्रह्मदेवा ॥ १ ॥
तेणें त्या श्लोकाचें अर्थ केलें चारी। नारदा श्रवणरंध्रीं सांगितलें ॥२
त्यानें त्या चतुचें करोनि सप्तक। व्यासालागीं देख निरुपलें ॥ ३ ॥
त्यानें सप्तकाचें केलें सातशत। तुका म्हणे मात पुराणींची ॥ ४ ॥

(१२६)

धन्य धन्य देवी गीता । आदिमाया वेदमाता ।।
जाणेल जो अर्था । धन्य मातापितर ।। १ ।।
एका चरणाचा अर्थ । मुनी जमदग्नी जाणत ।।
शांतीसदनांत । सुखशयनीं पहुडला ।। २ ।।
एका चरणाचा अर्थ । राजा जनक जाणत ।।
विदेहाची मात । मग अंगीं ठसावें ।। ३ ।।
एका चरणाचा अर्थ । ऋषी वसिष्ठ जाणत ।।
करोनि शाश्वत । ब्रह्मतत्व पावला ।। ४ ।।
एका चरणाचा अर्थ । धर्म पांडव जाणत ।।
करोनि निःक्षत । शत्रुमित्रसमवेत ।। ५ ।।
अर्जुन नर नारायण । सिद्ध साधक हें जन ।।
दुष्टनिर्दळण । तुका म्हणे अवतरले ।। ६ ।।

*प्रकरण ५ वें*

# पूजा

(१२७)

बोलावें म्हणोनी बोलतो उपाय । प्रवाहें हें जाय गंगाजळ ।। १ ।।
भाग्ययोगें कोणां घडेल सेवन । कैंचे येथें जन अधिकारी ? ।। २ ।।
मुखीं देतां घांस लपविती तोंड । अंगींचे ते भांड असुखानें ।। ३ ।।
तुका म्हणे पूजा करितों देवाची । आपुलिया रुची मनोमय ।। ४ ।।

(१२८)

आम्हां घरीं धन शब्दाचींच रत्नें । शब्दाचें प्रयत्नें शास्त्र करूं ।। १ ।।
शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन । शब्दें वांटूं धन जनलोकां ।। २ ।।
तुका म्हणे पाहों शब्दचि हा देव । शब्देंचि गौरव-पूजा करूं ।। ३ ।।

(१२९)
कासयानें पूजा करूं केशीराजा। संदेह हा माझा फेडीं आतां ॥ १ ॥
उदकें न्हाणिजें तें तें रूप तुझें। तेथे काय माझे वेचे देवा? ॥ २ ॥
गंधीं तूं सुगंध पुष्पीं परिमळ। तेथें मी दुर्बळ काय वाहूं? ॥ ३ ॥
तूंचि फळदाता–तांबूलअक्षता। तरी काय आतां वाहूं तुज? ॥ ४ ॥
दक्षिणा–दर्पण धातु नारायण। अन्न ब्रह्मपूर्ण दुजें कांई? ॥ ५ ॥
गातां तूं ओंकार टाळी नादेश्वर। नाचावया थार नाहीं कोठें ॥६
तुका म्हणे आतां अवघें तुझें नाम। धूपदीप रामकृष्णहरि ॥ ७ ॥
(१३०)
अनंत जन्मींचें पाप दूर व्हाया। करूं देवराया पूजा तुझी ॥ १ ॥
लक्षुमीचा पती वैकुंठीचा राजा। तुझी पूजा कोणा सांग घडे?॥ २ ॥
द्रव्यहीन आम्ही तेजें शक्तिहीत। मंत्रतंत्रज्ञान कांहीं नाहीं ॥ ३ ॥
तुका म्हणे तरी पूजा इच्छी जीव। आतां मी यास्तव कल्पीं सारें ॥४
(१३१)
त्रैलोक्यजननी देवि विष्णुपत्नी। माझिया आसनीं कृपा करीं ॥ १ ॥
जीं भूतें पूजेला करितील विघ्नें। त्यांजला न देणें ठाव येथें ॥ २ ॥
व्हावें मन स्थीर कल्पना नसावी। ऐसी त्वां करावी बुद्धी माझी ॥३
तुका म्हणे ऐसें तुज म्यां प्रार्थिलें। व्हावें त्वां वहिले साह्य मातें ॥४
(१३२)
उर्ध्वमूलदेवी जगाचे पालके। तुझिया सारिखें दुजें कोण? ॥ १ ॥
मांसशोणिताचा आहार तूं घेशी। शुद्धबुद्धी देसी जीवालागीं ॥ २ ॥
माते तुज ग्रंथीं देतों मी सोज्वळ। करावें निर्मूळ त्या भूतांचें ॥ ३ ॥
तुका म्हणे व्योमीं जीं भूतें विघ्नाची। माते पीडा त्यांची दूर करी ॥४
(१३३)
त्रैलोक्यव्यापिनी देवाचें विभूती। तुज पशुपती चर्ची सदा ॥ १ ॥
तुझिया स्पर्शानें अनंत जन्मींचीं। जाती एकदांची पापें सारीं ॥ २ ॥

ललाटीं कंठासी शिरीं सर्व अंगीं । स्पर्शोनियां भंगी दुर्वासना ।। ३ ।।
तुका म्हणे रुद्र वंदितो हरिला । माझा तुला त्याला नमस्कार ।। ४ ।।

(१३४)

मना आतां स्थिर होई क्षणभरी । दुष्कल्पनासारी सोडी बापा ।।१।।
ध्यान करी त्याचें जो जगपालक । वैकुंठनायक मुक्तीदाता ।। २ ।।
ज्याचें ध्यानें जाले योगीमुनी सुखी । जो कां पाठी राखी दीसाचीये ।।३
तुका म्हणे दीना त्यासी आठवावें । इहपर घ्यावें पूर्ण सुख ।। ४ ।।

(१३५)

नेणें जपतप योगयुक्ति ध्यान । करितो चिंतन रात्रंदिस ।। १ ।।
नेणों कांई देवा जालों उतरायी?। मातेलागी पाही बाळ जैसा ।। २ ।।
आणोनियां शुद्ध गंगोदक पाहे । प्रक्षाळिले पाये विटेवरीं ।। ३ ।।
जन्मली जान्हवी ज्याठायीं उत्तम । हरावया श्रम भाविकांचें ।। ४ ।।
तुका म्हणे आम्ही जालों पुण्यवंत । सेविलें अमृत चरणतीर्थ ।। ५ ।।

(१३६)

सुवर्णकलश भरिला उदकें । तेथें राहती निकें सर्व तीर्थे ।। १ ।।
गंगा गोदावरी यमुना नर्मदा । कृष्णा सिंधु सदां राहों यांत ।। २ ।।
सरस्वती नदी कावेरी गोमती । तैसी भीमरथी चंद्रभागा ।। ३ ।।
तुका म्हणे ऐशा प्रार्थियेल्या ध्यानीं । त्या साऱ्या येउनी सिद्ध जाल्या ४

(१३७)

राहि रखुमाई सवें सत्यभामा । सर्व मेघःशामा जवळीक ।। १ ।।
जयविजय हातीं घेवोनि यष्टिका । वाचें जाब निका गर्जताती ।। २ ।।
ब्रह्मांड कोंदलें जयजयशब्द जाला । पार्श्वस्थ वहिला सुरभार ।। ३ ।।
तुका म्हणे ऐसी मूर्ती येतां ध्यानीं । जीव मन दोन्ही कुर्वंडिली ।।४

(१३८)

चौरंग मांडिला जो रत्नखचित । ज्यावरी उदित चंद्रसूर्य ।। १ ।।
देव बैसविला ऐशिया आसनीं । जो कां वरदानी त्रैलोक्याचा ।। २ ।।

प्रसन्नवदन मंदहास्य शोभे । दृष्टी भक्तलोभें शांत ज्याची ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें आसन घेतलें । तेणें माझें जालें समाधान ॥ ४ ॥

(१३९)

गंगायमुनाकृष्णा–नर्मदाकावेरी–। भागिरथीनीरीं भरिले कुंभ ॥ १ ॥
तें तप्त–जीवन सुगंध घालोन । आणिलें चरण–सन्निधानीं ॥ २ ॥
सुवर्णकलशें ओतुनियां पाणी । घातलें चरणीं स्वामीयाच्या ॥ ३ ॥
तुका म्हणे केलें पादप्रक्षालन । तेणें समाधान जालें माझें ॥ ४ ॥

(१४०)

समस्त तीर्थींचें आणियेलें जळ । तें उष्ण सोज्वळ–हस्तावरी ॥ १ ॥
ओतितां क्षाळितो हस्त देवराणा । ज्याजला करुणा स्वभक्तांची ॥२
सुळींचा निर्मळ करें काढी मळ । हस्ताचा सोज्वळ रगडोनी ॥ ३ ॥
तुका म्हणे गंध–अक्षतासंयुक्त । संतोषानें घेत अर्घ्य करीं ॥ ४ ॥

(१४१)

जडितपंचपात्र त्यांत दिव्यपळी । आणिली जवळी देवाजीच्या ॥ १ ॥
राजोपचाराचें जैसें आचमन । तैसें जळ जाण सिद्ध केलें ॥ २ ॥
हस्तपूट देवें गोकर्णकृतीनें । करुनी आचमनें स्वीकारिलीं ॥ ३ ॥
तुका म्हणे माझें जीवींचा सोहळा । पुरवी वेळोवेळां देव ऐसा ॥ ४ ॥

(१४२)

दधि दुग्ध घृत शर्करा ही मधू । निर्मित कामधू तयेकाळीं ॥ १ ॥
आणोनियां वाटी जी रत्नखचित । मधुपर्क तींत सिद्ध केला ॥ २ ॥
दीनानाथा केली प्रार्थना म्यां तेव्हां । मधुपर्क घ्यावा म्हणोनियां ॥३
तुका म्हणे माझ्या दीनाच्या प्रार्थनें । मधुपर्क तेणें स्वीकारिला ॥४

(१४३)

परिमळमिश्रित करोनि उटणें । नारायण तेणें चर्चियेला ॥ १ ॥
घृत दधि मधु क्षीर ते शर्करा । गऊशृंगधारा अखंडित ॥ २ ॥

करोनि संयुक्त ओपियेले वरी । पंचामृतधारीं पंचविध ।। ३ ।।
तुका म्हणे तीर्थ-गंगे जन्म जाला । प्रसाद लाधला आम्हालागीं ।।४

(१४४)
स्नानासी प्रार्थोनी आणिलें पंचामृत । पय दधि घृत मधु ज्यांत ।। १ ।।
पृथकपृथकें नाहाणिला देव । वारंवार नव-वस्त्रावरी ।। २ ।।
शुद्धोदक मग घालितां म्यां प्रेमें । केली मेघःशामें काया शुद्ध ।। ३ ।।
तुका म्हणे शुद्धा शुद्ध कोण करी ?। चालवीत हरी लाड माझा ।।४

(१४५)
"आपुली सुकाया क्लेशें कष्टे तरी ।" आणुनी घागरी गंगाजळ ।। १ ।।
करुनी विनंती विनवितों तुम्हां । "स्नान सर्वोत्तमा सारों द्यावे ।। २ ।।
नूतन वस्त्रानें पुसों द्या जी अंग । करूनी अभ्यंग सर्वांगासी ।। ३ ।।
वस्त्र परिधान सह पितांबरे । तेणें हें साजिरें ठाण दिसे ।। ४ ।।
तुका म्हणे नेत्र पाहतां निवाले । ध्यान संचरलें हृदयांत ।। ५ ।।

(१४६)
मुक्तामणि पाच वैडुर्यही नील । आणिले पुष्कळ पुष्कराज ।। १ ।।
तैसीं नाना रत्नें सुवर्णासहित । आणिलीं म्यां येथ अभिषेका ।। २ ।।
मस्तकापासोनी अंगुष्टपर्यंत । आभिषिंचे स्वस्थ-पणें देवा ।। ३ ।।
तुका म्हणे सर्वाधार सर्वलोकीं । त्यांतें अभिषेकीं सर्वमंत्रें ।। ४ ।।

(१४७)
मृदु रेशिमाचें कोमल जें वस्त्र । आणिलें पवित्र लागवेगीं ।। १ ।।
माझें स्वामियाचा मस्तक पुशिला । स्वहस्तें झाडिला केशभार ।।२
पुशियेलें अंग उदविलें चांग । उठविला श्रीरंग धरूनी हातीं ।। ३ ।।
तुका म्हणे जो कां सर्वांचा आधार । घेतो उपचार माझें हस्तें ।।४

(१४८)
पिवळा पितांबर दोरंगी नेटका । जरीकांठी देखा धवधवीत ।। १ ।।
रुईफुलें चित्र-विचित्र करवती । चुरुनियां हातीं दिला देवा ।। २ ।।

नेसला प्रीतीनें पतितपावन । निरिया घालोन मागेंपुढें ॥ ३ ॥
तुका म्हणे प्रभू सर्वांचा अंबर । वस्त्रउपचार घेत माझा ॥ ४ ॥

(१४९)

जरीची उत्तरी दिव्य शालजोडी । अर्पिता पवाडी स्वीकारिली ॥ १
रत्नाचा मुगुट वरी मोरपिच्छ । घेवोनियां स्वच्छ शिरीं ठेवी ॥ २ ॥
सुवर्णाचें यज्ञोपवीत आणिलें । देतां स्वीकारिलें दीनानाथें ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसीं वस्त्रें सर्व दिलीं । देवें स्वीकारिली भक्तियोगें ॥ ४

(१५०)

रत्नांचीं कुंडलें मोतीयांचा तुरा । शिरपेंच वरा कलगीवरी ॥ १ ॥
पाच रत्नें मोती माणीकें हीरक । अर्पिले सुरेख हार यांचें ॥ २ ॥
कंठी भुजबंद पौंची कमरबंद । मुद्रिका स्वच्छंद नानापरी ॥ ३ ॥
तुका म्हणे माझें इच्छेचे कारणें । ऐसीं ही भूषणें ल्याला देव ॥ ४ ॥

(१५१)

रत्नसिंहासना–वरी प्रभावळ । त्यावरी सोज्वळ वस्त्र मृदू ॥ १ ॥
पताका चामरें छत्र सूर्यपानें । तैसी या विंझणें कांती मुखा ॥ २ ॥
लोड उशा मागें टेंकाया वाजूला । आसनीं बैसला स्वामी माझा ॥ ३
तुका म्हणे तेव्हां केलें निंबलोण । न लागों म्हणोन दृष्टी माझी ॥ ४

(१५२)

सुरभीचें केशर मर्दोनी बारीक । सांखळीनें देख पुंड्र केला ॥ १ ॥
रगडोनी कस्तुरी त्यावरी तिलक । करोनि सुरेख आदर्श तो ॥ २ ॥
दावियेला दिली चंदनाची उटी । अगरु बरवंटी मलयादिक ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें गंध समर्पिलें । तेंही स्वीकारिलें जगन्नाथें ॥ ४ ॥

(१५३)

जाईजुई तैसी गुलाब सेवंती । तगर मालती शतपत्रें ॥ १ ॥
चंपक मोगरा तो पारिजातक । ऐसी पुष्पें देख नानाविध ॥ २ ॥

तुळसीसमवेत हारतुरेगजरे । समर्पिलें सारे अधोक्षजा ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसा देव पुष्पाक्षतें । मियां भाग्यवंतें पूजियेला ॥ ४ ॥
(१५४)
आणुनियां शुद्ध तुळसीच्या माळा । सुमना–सकळा–नानायुक्ता ॥ १ ॥
अबीर चंदन नाना अरगजा । उटी देवराजा लावियेली ॥ २ ॥
सुगंधउदक तांबूल दक्षणा । देउनियां राणा तोषविला ॥ ३ ॥
नानाउपचार पादप्रक्षालन । आरंभीं पूजन याचिनांव ॥ ४ ॥
तुका म्हणे माझीं भक्ति असे भोळी । न कळतां आळीं पुरविली ॥५
(१५५)
दशांग–गुग्गूळ–गंधित चंदनीं । उदबत्या आणोनी लावियेल्या ॥ १ ॥
माझा देवराय गंधाचा सुगंध । परि–मकरंद घेत त्यांचा ॥ २ ॥
चंदनाचें चूर अगरबत्या धूप । करूनी साक्षेप अर्चियेलें ॥ ३ ॥
तुका म्हणे माझा पतितपावन । करी अवघ्राण संतोषानें ॥ ४ ॥
(१५६)
समया जडित शुभ्रवाती ज्यांत । कर्पूरासहित पाजळिल्या ॥ १ ॥
मेणवाती तैशा फुलवाती ज्योती । कर्पूरआरती प्रज्वळिल्या ॥ २ ॥
ऐसें दीप देव–राया सन्निधानीं । उजळिले त्यानीं जळे पाप ॥ ३ ॥
तुका म्हणे सर्व तेजाचा जो दाता । माझें दीप पहातां संतोषला ॥ ४ ॥
(१५७)
संचित आइतें सारीं स्वयंपाक । प्रकार अनेक आवडीचें ॥ १ ॥
वेला जिरें मिरें हळदी कर्पूर । सुगंध प्रकार नानापरी ॥ २ ॥
खिचडी साजूक तूप लोणकढें । मेळवुनी पुढें ठेवियेलें ॥ ३ ॥
दध्योदन क्षीर दुध नवनीत । आनंदभरित देव जेणें ॥ ४ ॥
तुका म्हणे तृप्ती जाली या विठ्ठला । ययानांव दिला बाळभोग ॥५
(१५८)
पृष्ठभागीं वेद अग्नीं सरस्वती । मध्यें भागिरथी वरुणादिक ॥ १ ॥
श्रीगंध तुळसी केल्या समर्पण । करोनि प्रोक्षण शंखोदकें ॥ २ ॥

ीतिपूर्वक हें केलेसें पूजन। भावशुद्धमन समर्पिलें ॥ ३ ॥
ुका म्हणे आतां करूं नमस्कार। न्यून तेथें फार घ्यावें देवा ॥ ४ ॥

(१५९)

ाद्वरत्नें देवा करूनि अर्पण। सर्व निवेदन केलें पायीं ॥ १ ॥
कांहीं कर्मधर्म उचितानुचित। सांभाळा बहुत अपराध ॥ २ ॥
देहाच्या स्वभावें मनाचा जो हेत। आवडीची प्रीत तें तें करी ॥ ३ ॥
क्षमा करा स्वामी बहुत अन्याय। करूनियां पाय साक्ष अम्ही ॥ ४ ॥
तुका म्हणे करा वाटेल ती दया। ठेवियेली पायां–वरी डोई ॥ ५ ॥

(१६०)

तुम्हां आळवाया मज कैंची बुद्धी। ओळंगती सिद्धि पायीं जेथें ॥१
करिती प्रार्थना तुझी नारायणा। ब्रह्मादिक जाणा वेद चारी ॥ २ ॥
नाम गावें तरी शेष नेणें पार। तेथें मी किंकर कोणीकडे ॥ ३ ॥
तुका म्हणे गाऊं आपुलिये टांकीं। मशक ते शेखीं उडूं नेणें ॥ ४ ॥

(१६१)

जडिताचे ताटीं भरिला नैवेद्य। अन्न पंचखाद्यसमवेत ॥ १ ॥
घीवर जिलेबी करंजी गुर्वळी। दळी मुगदळी मांडे फेण्या ॥ २ ॥
कढी क्षीर तैशा आमट्या वरण। दूध घृत पूर्ण दधि मधु ॥ ३ ॥
तुका म्हणे सर्व शाका आणि पाक। सीतागुडादिक समर्पिले ॥ ४ ॥

टीपाः– सीता = खडीसाखर

(१६२)

ताट विस्तारी रुक्मिणी। जेवा म्हणे चक्रपाणी ॥ १ ॥
नानापरीची पक्वान्नें। मांडे–पोळ्या–परिपूर्णें ॥ २ ॥
पत्रशाखांचा तो थाट। फळशाखा घनदाट ॥ ३ ॥
नानापरीच्या त्या क्षिरी। आणि साठ कोशिंबिरी ॥ ४ ॥
शुद्ध साळीचा तो भात। वरी वरण शोभत ॥ ५ ॥
मद्यस्राप्त असें तूप। शुद्ध साजूक अमूप ॥ ६ ॥

तुळसीसमवेत हारतुरेगजरे । समर्पिलें सारे अधोक्षजा ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसा देव पुष्पाक्षतें । मियां भाग्यवंते पूजियेला ॥ ४ ॥
(१५४)
आणुनियां शुद्ध तुळसीच्या माळा । सुमना–सकळा–नानायुक्ता ॥ १ ॥
अबीर चंदन नाना अरगजा । उटी देवराजा लावियेली ॥ २ ॥
सुगंधउदक तांबूल दक्षणा । देऊनियां राणा तोपविला ॥ ३ ॥
नानाउपचार पादप्रक्षालन । आरंभीं पूजन याचिनांव ॥ ४ ॥
तुका म्हणे माझीं भक्ति असे भोळी । न कळतां आळीं पुरविली ॥५
(१५५)
दशांग–गुग्गूळ–गंधित चंदनीं । उदबत्या आणोनी लावियेल्या ॥ १ ॥
माझा देवराय गंधाचा सुगंध । परि–मकरंद घेत त्यांचा ॥ २ ॥
चंदनाचें चूर अगरबत्या धूप । करूनी साक्षेप अर्चियेलें ॥ ३ ॥
तुका म्हणे माझा पतितपावन । करी अवघ्राण संतोषानें ॥ ४ ॥
(१५६)
समया जडित शुभ्रवाती ज्यांत । कर्पूरासहित पाजळिल्या ॥ १ ॥
मेणवाती तैशा फुलवाती ज्योती । कर्पूरआरती प्रज्वळिल्या ॥ २ ॥
ऐसें दीप देव–राया सन्निधानीं । उजळिले त्यानीं जळे पाप ॥ ३ ॥
तुका म्हणे सर्व तेजाचा जो दाता । माझें दीप पहातां संतोषला ॥ ४ ॥
(१५७)
संचित आइतें सारीं स्वयंपाक । प्रकार अनेक आवडीचें ॥ १ ॥
वेला जिरें मिरें हळदी कर्पूर । सुगंध प्रकार नानापरी ॥ २ ॥
खिचडी साजूक तूप लोणकढें । मेळवुनी पुढें ठेवियेलें ॥ ३ ॥
दध्योदन क्षीर दुध नवनीत । आनंदभरित देव जेणें ॥ ४ ॥
तुका म्हणे तृप्ती जाली या विठ्ठला । ययानांव दिला बाळभोग ॥५
(१५८)
पृष्ठभागीं वेद अग्रीं सरस्वती । मध्यें भागिरथी वरुणादिक ॥ १ ॥
श्रीगंध तुळसी केल्या समर्पण । करोनि प्रोक्षण शंखोदकें ॥ २ ॥

प्रीतिपूर्वक हें केलेसें पूजन। भावशुद्धमन समर्पिलें ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां करू नमस्कार। न्यून तेथें फार घ्यावें देवा ॥ ४ ॥
(१५९)
शद्धरत्नें देवा करूनि अर्पण। सर्व निवेदन केलें पायीं ॥ १ ॥
कांहीं कर्मधर्म उचितानुचित। सांभाळा बहुत अपराध ॥ २ ॥
देहाच्या स्वभावें मनाचा जो हेत। आवडीची प्रीत तें तें करी ॥ ३ ॥
क्षमा करा स्वामी बहुत अन्याय। करूनियां पाय साक्ष अम्हे ॥ ४ ॥
तुका म्हणे करा वाटेल ती दया। ठेवियेली पायां–वरी डोई ॥ ५ ॥
(१६०)
तुम्हां आळवाया मज कैंची वुद्धी। ओळंगती सिद्धि पायीं जेथें ॥ १
करिती प्रार्थना तुझी नारायणा। ब्रह्मादिक जाणा वेद चारी ॥ २ ॥
नाम गावें तरी शेष नेणें पार। तेथें मी किंकर कोणीकडे ॥ ३ ॥
तुका म्हणे गाऊं आपुलिये टांकीं। मशक ते शेखीं उडूं नेणें ॥ ४ ॥
(१६१)
जडिताचे ताटीं भरिला नैवेद्य। अन्न पंचखाद्यसमवेत ॥ १ ॥
घीवर जिलेबी करंजी गुर्वळी। दळी मुगदळी मांडे फेण्या ॥ २ ॥
कढी क्षीर तैशा आमटचा वरण। दूध घृत पूर्ण दधि मधु ॥ ३ ॥
तुका म्हणे सर्व शाका आणि पाक। सीतागुडादिक समर्पिले ॥ ४ ॥

**टीपाः– सीता = खडीसाखर**

(१६२)
ताट विस्तारी रुक्मिणी। जेवा म्हणे चक्रपाणी ॥ १ ॥
नानापरीची पक्वान्नें। मांडे–पोळ्या–परिपूर्णें ॥ २ ॥
पत्रशाखांचा तो थाट। फळशाखा घनदाट ॥ ३ ॥
नानापरीच्या त्या क्षिरी। आणि साठ कोशिंबिरी ॥ ४ ॥
शुद्ध साळीचा तो भात। वरी वरण शोभत ॥ ५ ॥
मद्यसप्त असें तूप। शुद्ध साजूक अमूप ॥ ६ ॥

देवा सावकाश जेवावें । विनवी विश्वमाता भावें ॥ ७ ॥
भोजन करोनि उठलें । मग देवें आंचवले ॥ ८ ॥
तेथें टोकतसे तुका । पावे प्रसाद तो निका ॥ ९ ॥

(१६३)

जगा तृप्तीकर्ता जेवोनियां धाला । हस्त प्रक्षाळिला उष्णोदकें ॥१
भरियेली चूळ पुशियेलें मुख । पाहातां सर्व दु:ख विसरलो ॥ २ ॥
करोद्वर्तनाला चंदन दिधलें । तेही स्विकारिलें दीनानाथें ॥ ३ ॥
तुका म्हणे भक्त–वत्सल श्रीपती । जैसी ज्याची भक्ति तैसा होय ॥८

(१६४)

नागवल्लीदळें जीं स्वच्छ पांढरी । सुपारी कापुरीं घोळियेली ॥ १ ॥
वेला लवंगा चुना कातगोळ्या जाण । बरवें हें सामान घवघवीत ॥२
जायफळ पत्री केशर कस्तुरी । सुवासिक चारी पदार्थ हे ॥ ३ ॥
तुका म्हणे माझा ऐसा विडा चांग । घेवोनि श्रीरंग संतोषला ॥ ४ ॥

(१६५)

आरत्या कुर्वंडी आणिल्या तबकीं । ओवाळाया एकीं–एकटा जो ॥१
ओंवाळोनी त्यासी प्रार्थियेलें देवा । जन्मोंजन्मीं सेवा घेई माझी ॥२
मंत्रपुष्पें बहु प्रार्थिला लौकिक । न्यूना पूर्णा देख दक्षिणा ही ॥ ३ ॥
तुका म्हणे माझा देह समर्पिला । कनवाळू जाला सद्‌गदीत ॥ ४ ॥

(१६६)

समाधान चित्त चरणआलिंगनें । पायांवरी मनें स्थिरावलों ॥ १ ॥
आतां घडे तैसें घालूं लोटांगणा । करूं प्रदक्षिणा नमस्कारूं ॥ २ ॥
प्रार्थितो मी तुज राहे माझें ओंठीं । हृदयसंपुटीं देवराया ॥ ३ ॥
क्षेम आलिंगनें दिली पायीं मिठी । सांपडली लुटी अमूप हे ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां आनंदी आनंद । गाऊं परमानंद परमानंदें ॥ ५ ॥

(१६७)

मन हा मोगरा अर्पुनी ईश्वरा । पुनरश्च संसारा येणें नाहीं ॥ १ ॥
मन हें सेवंती अर्पुनि अच्युतीं । पुनश्च संसृती येणें नाहीं ॥ २ ॥

मन हे तुळसी अर्पूं हृषीकेशी । पुनः या जन्मासी येणें नाहीं ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें मन दिलें जेणें । तया वास होणे वैकुंठासी ॥ ४ ॥

(१६८)

देवा देह पाट हृदय संपुष्ट । मूर्ती सुप्रतिष्ठ मध्यें केली ॥ १ ॥
भाव केलें गंध भक्तिची अक्षता । लाविली अनंता निढळासी ॥ २ ॥
मन हे मोगरा चित्त हे शेवंती । गळां हार प्रीतीं समर्पिलें ॥ ३ ॥
जाळूं क्रोध धूप उजळूं ज्ञानदीप । ओवाळूं स्वरूप आम्ही त्याचें ॥४
तुका म्हणे भावें पूजा केली एका । पंचप्राणें सखा ओंवाळुनी ॥ ५ ॥

(१६९)

त्रिगुण अडणीं सत्व ताट मांडीं । विधी परवडी विस्तारोनि ॥ १ ॥
नवविधा शुद्ध प्रकार बहुत । भोजनासी स्वस्थ बैसलेती ॥ २ ॥
देहाचें आसन विटेवरी शुद्ध । तेथें हा गोविंद बैसलासें ॥ ३ ॥
मनाचे आवडी शुद्धसत्व दोन्ही । तेणें चक्रपाणी पुजियेला ॥ ४ ॥
भावाचिया हातें उपचार केला । तेणें जेवविला विठ्ठल हा ॥ ५ ॥
संसाराचें हातीं दिले आंचवण । तेणें नारायण तृप्त झाला ॥ ६ ॥
धीर तो दक्षिणा नामनिष्ठा फळ । निश्चयाचें बळ समर्पिलें ॥ ७ ॥
तांबुल दिधला त्रयोदशगुणी । इंद्रियें सुपाणी रंगविलें ॥ ८ ॥
जोडोनियां हात प्रीतीगडिभर । केला नमस्कार दीर्घदंडी ॥ ९ ॥
नाम उच्चारणीं प्रदक्षिणा करी । सबाह्याभ्यंतरीं देव जाला ॥१०॥
मौन्यपणहेत करितों प्रार्थना । जायें नारायणा लोटांगणीं ॥११॥
धूप दीप अर्ध्य षोडशउपचार । वाहियलें कर जोडुनियां ॥१२॥
तुका म्हणे देह वाहियेला वरी । मंत्रपुष्प शिरीं ठेवियेलें ॥१३॥

(१७०)

भावाचें उदकें प्रक्षाळिलें मुख । भक्तिभावें देख पुजियेलें ॥ १ ॥
नाना परिमळ कपाळीं रेखिला । चंदन तो टिळा कस्तुरिचा ॥ २ ॥

भावें समर्पिलें तुळसीदळ पायीं । ठेवियेली डोयी हेंचि पुण्य ।। ३ ।।
तुका म्हणे मन समर्पिलें देवा । तेव्हां जाली जीवा सोडवण ।। ४ ।।

(१७१)

शद्वाच्या सुमनें केला अलंकार । पुजिला श्रीधर तेणेंगुणें ।। १ ।।
शद्वाचिया भावें केला उपचार । नेणें सर्वेश्वर संतोषला ।। २ ।।
शद्वाचिया करें करविलें भोजन । धाला नारायण तेणें सुखें ।। ३ ।।
शद्वाचिया करें करविलें आचमन । तांबूल अर्पण फळें पुष्पें ।। ४ ।।
तुका म्हणे अन्न आदि धूपदीप । उपचार स्वल्प समर्पिलें ।। ५ ।।

(१७२)

शद्वाचें सुमनें पूजा नारायण । मंत्रपुष्पार्पण तेणें केलें ।। १ ।।
भावाचें पैं हातें जोडोनि अंजुळ । समर्पिलें जळ शुद्धभावें ।। २ ।।
मुखशुद्धि विडा दिलें तुळसीदळ । आनंद सकळ वोसंडला ।। ३ ।।
तुका म्हणे आतां उरलें तें नाहीं । नामेविण कांहीं बोलावया ।। ४ ।।

(१७३)

नाम पुष्प शुद्ध गळां घालूं हार । तुरा सारासार विवेकाचा ।। १ ।।
बोध भाळीं बुका क्षमा तुळसीदळ । वाहातां गोपाळ संतोषतो ।।२
संतोषे हा गुण–संतामृतपानें । करितां कीर्तनें आल्हादे हा ।। ३ ।।
आल्हादे हा देव कीर्ति वाखाणितां । पवाडे सांगतां याचें यांस ।।४
याचें यांस करूं सर्व निवेदन । वारील हा शीण संसारिचा ।। ५ ।।
संसाराचा वारा लागों नेदी अंगा । भावें पांडुरंगा आळवितों ।। ६ ।।
तुका म्हणे आतां उजळूं आरती । भावें तो श्रीपती ओवाळूं या ।।७

(१७४)

काय उपचार करूं पांडुरंगा ?। ऐसें मज सांगा विचारोनि ।। १ ।।
कोणता पदार्थ उणा तुजपाशीं ?। बोलाया वाचेसी मौन्य पडे ।। २ ।।
शंकरशेषादि करिती स्मरण । तेथें माझें मन गाऊं शके ?।। ३ ।।
इंद्रसुरवर वाहाती सुमनें । तेथें म्यां वाहाणें कांई एक ? ।। ४ ।।

परी आवडीनें जोडुनि अंजुळा । वाहु बुका माळा तुळशीची ॥ ५ ॥
उणें पुरें तुम्हीं करोनियां सांग । जीवालागीं मग सुख तेव्हां ॥ ६ ॥
तुका म्हणे माझी ऐकावी प्रार्थना । तुम्ही नारायणा सेवकाची ॥७

(१७५)

मजलागीं नाहीं ज्ञानाची ते चाड । वाटे घेतां गोड नाम तुझें ॥ १ ॥
नेणतें लेंकरूं आवडीचें नातें । वचन बोले तें आवडीनें ॥ २ ॥
भक्ति नेणें कांहीं वैराग्य ते नाहीं । घातला विठाई भार तुज ॥ ३ ॥
तुका म्हणे नांचूं निर्ल्लज्ज होऊनी । नाहीं माझें मनीं दुजाभाव ॥४

(१७६)

स्तुती करूं तरी कोण माझी मती ? । वेदां पडे भ्रांति आश्चर्य हें ॥१
परी हा जिव्हाग्रीं रामकृष्णहरी । बैसला तो करी यातिगुण ॥ २ ॥
रूप गुण कीर्ति कृपाळु उदार । वर्णावया पार ब्रह्मा नेणें ॥ ३ ॥
रूपीं नामीं शिव होऊनियां वेडा । वर्णिला पवाडा रामनामीं ॥ ४ ॥
तुका म्हणे कोणा नेणवेची सीमा । नाहीं वाचा आम्हां बोलावया ॥५

(१७७)

नामाचा प्रताप न वर्णवे मज । संगीं गरुडध्वज राहे जेणें ॥ १ ॥
मज वाचा किती ? परतल्या श्रुती । वेदमुखस्मृती मौन ठेले ॥ २ ॥
वर्णूं नेणे शेष नामाचा पवाडा । चिरलिया रांडा जिव्हा त्याच्या ॥३
अनुसरली रमा वर्णिला श्रीहरी । पायांची किंकरी पायीं ठेली ॥ ४ ॥
तुका म्हणे आम्ही मानव किंकर । वर्णावया पार नेणों तुझा ॥ ५ ॥

(१७८)

अगा महाविष्णु अनंत भुजांच्या । आम्हां अनाथांच्या सोयरिया ॥ १
नकळे महिमा वेद मौनावती । तेथें माझी मति कोणीकडें ? ॥ २ ॥
काय म्यां वर्णावें तुझ्या थोरपणा । सहस्त्रवदना शक्ति नव्हे ॥ ३ ॥
रवि चंद्र जेथें तेजें सामावती । तेथें माझी मति कोणीकडें ? ॥ ४ ॥
तुका म्हणे आम्हीं बाळ तूं माऊली । करावी साऊली करुणेची ॥५

(१७९)

गुणांची आवडी वाचेचा पैसारु। पडिला विसरू ब्रह्मरसें ॥ १ ॥

आदिमध्यअंतीं नाहीं अवसान। जीवनीं जीवन सम्मीलितां ॥ २ ॥

रामकृष्णनामभाळा हीं साजिरी। ओंविली गोजिरी कर्णीं मनीं ॥३

तुका म्हणे तनू जाहाली शीतळ। आवडी सकळ ब्रह्मानंदीं ॥ ४ ॥

(१८०)

होतें तैसें केलें पायीं निवेदन। अंतरलों दिन बहु होतो ॥ १ ॥

संबोखुनी केलें समाधान चित्तें। वोगरुनि भातें प्रेमरस ॥ २ ॥

नामरत्नमणी अलंकारलेणी। भूषणमंडणीं माळा दिली ॥ ३ ॥

तुका म्हणे सुखें जालों निरामय। नामीं नामसोयनिमग्नता ॥ ४ ॥

(१८१)

ओंवाळिला देह पायांवरूनियां। सांडिली हे काया-कुरवंडी ॥ १ ॥

उतरिलें जीवें-भावें निंबलोण। करोनियां नेण वासनेचा ॥ २ ॥

कल्पना पापीण दवडिली दुरी। चित्त पायांवरी समर्पिलें ॥ ३ ॥

तुका म्हणे दीप उन्मनींचा करीं। ओवाळिलें हरी विटेवरी ॥ ४ ॥

(१८२)

नेत्रीं पाहोनियां ध्यान। समाधान जीवाचें ॥ १ ॥

भाळीं लावोनियां बुका। त्या व्यापका पूजिलें ॥ २ ॥

गळां घालोनियां माळ। पायीं भाळ ठेविलें ॥ ३ ॥

पायीं समर्पिलें मन। आलिंगन दिधलें ॥ ४ ॥

तुका म्हणे प्रेमभरे। नमस्कारे विठ्ठला ॥ ५ ॥

(१८३)

रामकृष्णहरी। मंत्रपुष्पें देवावरी ॥ १ ॥

हरिनामीं वाहूं मंत्र। गाऊं नाचों ध्याऊं स्तोत्र ॥ २ ॥

नेम [illegible] पूजन। करूं आतां हेंचि ध्यान ॥ ३ ॥

नाम [illegible]चार। तुका म्हणे हा निर्धार ॥ ४ ॥

(१८४)
कर्पूर आरती । ओंवाळिला लक्ष्मीपती ।। १ ।।
भावाभाव हारपलें । मनोहेत पारूषलें ।। २ ।।
जिवासी विश्रांति । स्थिरावली चित्तवृत्ति ।। ३ ।।
तुका म्हणे भक्ती । नाहीं जीवदशा चित्तीं ।। ४ ।।

(१८५)
जोडोनियां कर । आतां करूं नमस्कार ।। १ ।।
देवा पाहे कृपादृष्टी । भावें दिली पायीं मिठी ।। २ ।।
मनींचा जो हेवा । तुम्ही जाणा वासुदेवा ।। ३ ।।
तुका म्हणे आतां । नये करूं जीवापरता ।। ४ ।।

(१८६)
जोडोनियां कर । उभा राहिलों समोर ।। १ ।।
हेंचि माझें भांडवल । जाणे कारण विठ्ठल ।। २ ।।
भाकितों करुणा । आतां नुपेक्षावें दीना ।। ३ ।।
तुका म्हणे डोयी । ठेवीं वेळोवेळीं पायीं ।। ४ ।।

(१८७)
कांहीं नेणें देवा । कैसी भक्ति करूं सेवा ? ।। १ ।।
आतां जोडोनियां हात । उभा राहिलों निवांत ।। २ ।।
करावें तें काय ? । नेणें अवलोकितों पाय ।। ३ ।।
तुका म्हणे दान । केलें पदरीं घेईन ।। ४ ।।

(१८८)
पंढरिच्या राया । तुझ्या दंडवत पायां ।। १ ।।
तुझ्या कृपेचें पोषणें । माझा समाचार घेणें ।। २ ।।
आर्त माझे पोटीं । नाम धरियेलें कंठीं ।। ३ ।।
धरितों वासना । तुका म्हणे नारायणा ।। ४ ।।

(१८९)

मनोमय पूजा । पढीयंती केशीराजा ॥ १ ॥
घेतो कल्पनेचा भोग । न मनी ते बाह्यरंग ॥ २ ॥
अंतरींचें जाणे । आदिवर्तमानखुणे ॥ ३ ॥
तुका म्हणे कुडे । कोठें सरे त्याच्या पुढें ? ॥ ४ ॥

(१९०)

वंदीन मी भूतें । आतां अवघीं ही समस्ते ॥ १ ॥
तुमची करीन भावना । पदोपदीं नारायणा ॥ २ ॥
गाळूनियां भेद । यासी प्रमाण तो वेद ॥ ३ ॥
तुका म्हणे मग । नव्हे दुजियाचा संग ॥ ४ ॥

(१९१)

पूजों पूज्यमान । कथे उभे हरिजन ॥ १ ॥
ज्याची कीर्ती वाखाणिती । त्याची ओतिली ते मूर्ती ॥२॥
देहाचा विसर । जाला आनंदसंचार ॥ ३ ॥
गेला अभिमान । लाज बोळविले मान ॥ ४ ॥
शोकमोहचिंता । याची नेणती ते वार्ता ॥ ५ ॥
तुका म्हणे सखे । मज विठोबा सारिखें ॥ ६ ॥

(१९२)

हेचि तुझी पूजा । आतां करूं केशीराजा ॥ १ ॥
अवघीं तुझीच ही पदें । नमस्कारीन अभेदें ॥ २ ॥
न वर्जितां दिशा । जाये तेथें तूं सरिसा ॥ ३ ॥
नव्हे एकदेशी । तुका म्हणे गुणदोषी ॥ ४ ॥

(१९३)

पूजा आवडे ती जीवा । वासुदेवा जिवित्वें ॥ १ ॥
येणें होय सर्व सांग । ते अष्टांगपूजन ॥ २ ॥

करूं सर्व पंचभूतें । हीं मिश्रितें एकत्वीं ॥ ३ ॥
तुका समवेत रुची । हे मनाची धारणा ॥ ४ ॥
(१९४)
ठेविल्याचा धनी । तुम्ही व्यवसायी जनीं ॥ १ ॥
कोण पडे ये लिगाडीं ? । केली तैसी उगवा कोडीं ॥ २ ॥
सांगितलें काम । केलें पाळूनियां धर्म ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां । असों तुमचें तुम्हामाथां ॥ ४ ॥
(१९५)
समर्पिली वाणी । पांडुरंगीं घेते धणी ॥ १ ॥
पूजा होते मुक्ताफळीं । रस–ओविया–मंगळीं ॥ २ ॥
धार अखंडित । ओघ चालियेला नित्य ॥ ३ ॥
पूर्णाहुति जीवें । तुका देऊनि ठेला भावें ॥ ४ ॥
(१९६)
न लगति देशकाळ । मंत्रविधानें सकळ ॥
मन हें निश्चळ । करुनि करुणा भाकावी ॥ १ ॥
येतो बैसलिया ठाया । सर्वव्यापी देवराया ॥
निर्मळ ते काया । अधिष्ठान तयाचें ॥ २ ॥
भक्तकल्पनेचा साक्षी । तया आदरेंचि लक्षी ॥
आवडीनें भक्षी । कोरडें धान्य मटमटां ॥ ३ ॥
घेणें तरी घेई भाव । लक्षी दासांचा उपाव ॥
तुका म्हणे जीव । जीवीं मिळवी अनंत ॥ ४ ॥
(१९७)
काय शरीरापें काम ? । कृपा साधावया प्रेम ॥
उचित हा धर्म । भागा आला तो करूं ॥ १ ॥
देऊं हाक नारायणा । आतां नातळों बंधना ॥
पंढरीचा राणा । आइकोन धांवेल ॥ २ ॥

सातांपांचांचें गोठलें । प्रारब्ध हें आकारलें ।।
आतां हें संचलें । असो भोगा सांभाळा ।। ३ ।।
फावली ते बरवी संधि । सावधान करूं बुद्धी ।।
तुका म्हणे मधीं । कोठें नेघों विसावा ।। ४ ।।

*प्रकरण ६ वे*

# हरिपाठ

(१९८)
पहाटेच्या प्रहरीं म्हणा हरिहरि । तया सुखा सरी नाहीं दुजी ।। १ ।।
केशव वामन नारायण विष्णु । कृष्ण संकर्षणु रामनाम ।। २ ।।
माधवा वामना श्रीधरा गोविंदा । अच्युता मुकुंदा पुरुषोत्तमा ।। ३ ।।
नरहरि भार्गवा गोपाळा वासुदेवा । हृषीकेशा पावा स्मरणमात्रें ।।४
तुका म्हणे एका नामीं भाव राहे । तेव्हां साह्य होये पांडुरंग ।। ५ ।।
(१९९)
अयोध्या मथुरा काशी अवंतिका । कांची हे द्वारका मायामोक्ष ।।१
मोक्षपुऱ्या ऐशा नित्य वाचें स्मरे । प्राणि तो उद्धरे स्मरणमात्रें ।।२
नित्य नित्य मनीं हरि आठवावा । तेणेंचि तरावा भवसिंधु ।। ३ ।।
तुका म्हणे ऐसा नामाचा महिमा । गाईल जो नेमा तोचि धन्य ।।४
(२००)
यमुना कावेरी गंगा भागिरथी । कृष्णा सरस्वती तुंगभद्रा ।। १ ।।
नर्मदा आठवी वेळोवेळा वाचें । नाहीं भय साचें प्राणियांसीं ।। २ ।।
तयाचें संगतीं पापीं उद्धरती । दर्शनेंचि होती मुक्तिप्राप्त ।। ३ ।।
तुका म्हणे नामीं एकनिष्ठभाव । तेथें वासुदेव सर्वकाळ ।। ४ ।।
(२०१)
प्रात:काळीं नाम पवित्रचि घ्यावें । तेणें विसरावें जन्ममृत्यु ।। १ ।।
नळ युधिष्ठिर जनकजनार्दन । स्मरणेंचि धन्य होती प्राणि ।। २ ।।

न करा आळस नाम घेतां वाचें । नाहीं भय साचें प्राणियासी ।।३
तुका म्हणे वाचे गाईल गोविंद । होय परमानंद नामें एकें ।। ४ ।।

(२०२)

कश्यप गौतम भारद्वाज अत्री । नामविश्वामित्रीं वाचाशुद्धि ।। १ ।।
जमदग्निमुनी वशिष्ठ वर्णिला । तिन्हीं लोकीं झाला वंद्य एक।। २ ।।
नाम घेतां नुरे पापतापदैन्य । होय थोर पुण्य उच्चारितां ।। ३ ।।
तुका म्हणे ऐसी उच्चारितां वाणी । तेणें अंतःकरणीं सुख होय ।।४

(२०३)

अहिल्या द्रौपदी सीता तारा चारी। मुख्य मंदोदरी पतिव्रता ।। १ ।।
नाम घेतां यांचे पापिया पवित्र । होय कुळगोत्र–उद्धरण ।। २ ।।
संकल्पविकल्प सांडोनियां दुरी । वाचें निरंतरी उच्चारावें ।। ३ ।।
नाहीं बद्धकता तया संसाराची । जाचणी यमाची मग कैंची ? ।।४
तुका म्हणे नाम पवित्रांचें वाचें । तेणें होय साचें जन्मफळ ।। ५ ।।

(२०४)

व्यास अंबऋषी वशिष्ठ नारद । शौनक प्रल्हाद भागवत ।। १ ।।
नित्यस्मरण करी यांचे जरी प्राणी । पुन्हा नाहीं खाणी चौऱ्यांशींची ।।२
शुक पराशर मुनी पुंडलीक । अर्जुन वाल्मिक नामें गाती ।। ३ ।।
बळी बिभीषण भीष्म रुक्मांगद । बगदालभ्य सिद्ध महाऋषी ।। ४ ।।
तुका म्हणे यांची नामें घेतां वाणीं । प्रत्यक्ष तो प्राणी देवा ऐसा ।।५

(२०५)

गीता भागवत वेद उच्चारितां । पापाची ते वार्ता कोठें राहे ? ।।१
सकळ वासना नामीं जे रंगली । साधनें राहिलीं मग कैंची ?।। २ ।।
म्हणोनियां नेम ऐसा तारी जीवा । होय तोचि देवा आवडता ।।३
उगवला दिस जाय तो क्षणांत । विचारूनि हित वेगीं करा ।। ४ ।।
तुका म्हणे स्मरा वेगीं विठोबासी । न धरा मानसीं दुजें कांहीं ।।५

(२०६)
तीर्थाचें जें मूळ व्रतांचें जें फळ। ब्रह्म तें केवळ पंढरीये ॥ १ ॥
तें आम्ही देखिलें आपुले नयनीं । फिटलीं पारणीं लोचनांचीं ॥ २ ॥
जीवींचा जिव्हाळा मुखाचें शेजार। उभे कटीं कर ठेवूनियां ॥ ३ ॥
जगाचें जनिते कृपेचें सागर। दीनां लोभापर दुष्टां काळ ॥ ४ ॥
सुरवरां चिंतनीं मुनीवरां ध्यानीं । आकार निर्गुणीं तेंचि असे ॥ ५ ॥
तुका म्हणे नाहीं श्रुती आतुडलें। आम्हां सांपडलें गीतीं गातां ॥६

(२०७)
न सरे लुटितां मागें बहुतानीं । जुनाट हे खाणी उघडिली ॥ १ ॥
सिद्ध–महामुनी साधक संपन्न । तिहीं हें जतन केलें होतें ॥ २ ॥
पायाळाच्या गुणें पडिलें ठाऊके। जगा पुंडलिकें दाखविलें ॥ ३ ॥
तुका म्हणे तेथें होतो मी दुबळा। आलें या कपाळा थोडेबहु ॥ ४ ॥

(२०८)
काशियात्रे पांच * द्वारकेसी तीन। पंढरीसी जाण एकमात्र ॥ १ ॥
काशिये मुंडणे द्वारके क्षाळणें। पंढरीसी होणें ब्रह्मरूप ॥ २ ॥
अठराही याती सकळ वैष्णव। दर्शनें–श्रीराव मोक्ष पाती ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें आहे साक्षात्कार। जीवन्मुक्त–नर–तीर्थक्षेत्र ॥ ४ ॥

*** टीप:– अर्थभेद पांच भौतिक शरीर म्हणून पाञ्च असा उच्चार घ्यावा.**

(२०९)
दुःखाचिये साठीं येथें मिळे सुख। अनाथाची भूक दैन्य जाय ॥ १ ॥
उदारांचा राणा पंढरीसी आहे। उभारोनि बाहे पालवितो ॥ २ ॥
जाणतियाहुनी नेणत्यांची गोडी। आलिंगी आवडी करुनियां ॥ ३ ॥
शीण घेऊनियां प्रेम देतो सांठी। न विचारी तुटी–लाभ कांही ॥४
तुका म्हणे असों अनाथ दुबळी। आम्हासी तो पाळी पांडुरंग॥ ५ ॥

(२१०)
शंख चक्र गदा गळे वैजयंती। कानीं तळपती कुंडलें ती ॥ १ ॥
मस्तकीं मुकुट नवरत्नहार। वरी पितांबर पांघुरला ॥ २ ॥

रत्नहिरेजडित कटीं कडदोरा । रम्य शोभे हिरा बेंबीपाशीं ॥ ३ ॥
जडित कंकणें शोभती मुद्रिका । लांचावला तुका भेटीसाठीं ॥ ४ ॥

(२११)

कैसें करूं ध्यान ? कैसा पाहूं तुज ? । वर्म दावी मज याचकासी ॥१
कैसी करूं सांग तुझी भक्तिसेवा ?। कोण्याभावें देवा आतुडसी? ॥२
कैसी कीर्ति वानूं ? कैसा लक्षा आणूं ?। जाणूं हा कवणूं ऐसा तुज ॥३
कैसा गाऊं गीतीं ? कैसा ध्याऊं चित्तीं । कैसी स्थिती मति दावी मज ॥४
तुका म्हणे तुझा दास केलों देवा। ऐसें अनुभवा आणीं मज ॥ ५ ॥

(२१२)

काय तुज कैसें जाणावें गा देवा ?। आणावें अनुभवा कैशापरी ? ॥१
सगुण निर्गुण स्थूळ कीं लहान ?। नव्हे अनुमान मज तुझें ॥ २ ॥
कोणता निर्धार करूं हा विचार। भवसिंधु पार तरावया ॥ ३ ॥
तुका म्हणे कैसे पाय आतुडती । न पडे श्रीपती वर्म ठावें ॥ ४ ॥

(२१३)

ऐकें पांडुरंगा वचन हें एक । जालों मी सेवक दास तुझा ॥ १ ॥
कळे तैसा आतां करावा उद्धार । खुंटला विचार माझा पुढें ॥ २ ॥
दंभ मान माझा करूं पाहे घात। जालिया हे थीत कारण ते ॥ ३ ॥
हीनबुद्धी माझी अधम हे याती । अहंकार चित्तीं वसों पाहे ॥ ४ ॥
तुका म्हणे मज बिघडतां क्षण। न लगे जतन करी देवा ॥ ५ ॥

(२१४)

भेटी वांचोनियां दुजें नाहीं चित्तीं । येतो काकुलती याजसाठीं ॥ १ ॥
भेटोनियां बोले आवडीचें गुज । आनंदाचे भोज जेऊं संगें ॥ २ ॥
मायलेंकरासी नाहीं दुजी परी । जेऊं बरोबरी बैसोनियां ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें अंतरीचें आर्त । यावें जी त्वरित नारायणा ॥४॥

(२०६)
तीर्थाचें जें मूळ व्रतांचें जें फळ। ब्रह्म तें केवळ पंढरीये ।। १ ।।
तें आम्ही देखिलें आपुले नयनीं। फिटलीं पारणीं लोचनांचीं ।। २ ।।
जीवींचा जिव्हाळा मुखाचें शेजार। उभे कटीं कर ठेवूनियां ।। ३ ।।
जगाचें जनिते कृपेचें सागर। दीनां लोभापर दुष्टां काळ ।। ४ ।।
सुरवरां चिंतनीं मुनीवरां ध्यानीं। आकार निर्गुणीं तेंचि असे ।। ५ ।।
तुका म्हणे नाहीं श्रुती आतुडलें। आम्हां सांपडलें गीतीं गातां ।।६

(२०७)
न सरे लुटितां मागें बहुतानीं। जुनाट हे खाणी उघडिली ।। १ ।।
सिद्ध–महामुनी साधक संपन्न। तिहीं हें जतन केलें होतें ।। २ ।।
पायाळाच्या गुणें पडिलें ठाऊकें। जगा पुंडलिकें दाखविलें ।। ३ ।।
तुका म्हणे तेथें होतो मी दुबळा। आलें या कपाळा थोडेबहु ।। ४ ।।

(२०८)
काशियात्रे पांच * द्वारकेसी तीन। पंढरीसी जाण एकमात्र ।। १ ।।
काशिये मुंडणे द्वारके क्षाळणें। पंढरीसी होणें ब्रह्मरूप ।। २ ।।
अठराही याती सकळ वैष्णव। दर्शनें–श्रीराव मोक्ष पाती ।। ३ ।।
तुका म्हणे येथें आहे साक्षात्कार। जीवन्मुक्त–नर–तीर्थक्षेत्र ।। ४ ।।

* टीपः– अर्थभेद पांच भौतिक शरीर म्हणून पाञ्च असा उच्चार घ्यावा.

(२०९)
दुःखाचिये साठीं येथें मिळे सुख। अनाथाची भूक दैन्य जाय ।। १ ।।
उदारांचा राणा पंढरीसी आहे। उभारोनि बाहे पालवितो ।। २ ।।
जाणतियाहुनी नेणत्यांची गोडी। आलिंगी आवडी करुनियां ।। ३ ।।
शीण घेऊनियां प्रेम देतो सांठी। न विचारी तुटी–लाभ कांही ।।४
तुका म्हणे असों अनाथ दुबळी। आम्हासी तो पाळी पांडुरंग।। ५ ।।

(२१०)
शंख चक्र गदा गळे वैजयंती। कानीं तळपती कुंडलें ती ।। १ ।।
मस्तकीं मुकुट नवरत्नहार। वरी पितांबर पांघुरला ।। २ ।।

रत्नहिरेजडित कटीं कडदोरा । रम्य शोभे हिरा बेंबीपाशीं ।। ३ ।।
जडित कंकणें शोभती मुद्रिका । लांचावला तुका भेटीसाठीं ।। ४ ।।
(२११)
कैसें करूं ध्यान ? कैसा पाहूं तुज ? । वर्म दावी मज याचकासी ।।१
कैसी करूं सांग तुझी भक्तिसेवा ?। कोण्याभावें देवा आतुडसी? ।।२
कैसी कीर्ति वानूं ? कैसा लक्षा आणूं ?। जाणूं हा कवणूं ऐसा तुज ।।३
कैसा गाऊं गीतीं ? कैसा ध्याऊं चित्तीं । कैसी स्थिती मति दावी मज ।।४
तुका म्हणे तुझा दास केलों देवा। ऐसें अनुभवा आणीं मज ।। ५ ।।
(२१२)
काय तुज कैसें जाणावें गा देवा ?। आणावें अनुभवा कैशापरी ? ।।१
सगुण निर्गुण स्थूळ कीं लहान ?। नव्हे अनुमान मज तुझें ।। २ ।।
कोणता निर्धार करूं हा विचार। भवसिंधु पार तरावया ।। ३ ।।
तुका म्हणे कैसे पाय आतुडती । न पडे श्रीपती वर्म ठावें ।। ४ ।।
(२१३)
ऐकें पांडुरंगा वचन हें एक । जालों मी सेवक दास तुझा ।। १ ।।
कळे तैसा आतां करावा उद्धार । खुंटला विचार माझा पुढें ।। २ ।।
दंभ मान माझा करूं पाहे घात। जालिया हे थीत कारण ते ।। ३ ।।
हीनबुद्धी माझी अधम हे याती । अहंकार चित्तीं वसों पाहे ।। ४ ।।
तुका म्हणे मज बिघडतां क्षण। न लगे जतन करी देवा ।। ५ ।।
(२१४)
भेटी वांचोनियां दुजें नाहीं चित्तीं। येतो काकुलती याजसाठीं ।। १ ।।
भेटोनियां बोले आवडीचें गुज । आनंदाचे भोज जेऊं संगें ।। २ ।।
मायलेंकरासी नाहीं दुजी परी । जेऊं बरोबरी बैसोनियां ।। ३ ।।
तुका म्हणे ऐसें अंतरीचें आर्त । यावें जी त्वरित नारायणा ।।४।।

(२१५)
येई गा उदारा अगा विश्वंभरा । रखुमाईच्या वरा पांडुरंगा ॥ १ ॥
अगा सर्वोत्तमा अगा कृष्णारामा । अगा मेघःशामा विश्वपाळा ॥२
अगा दीनानाथा जीवदानदाता । अगा सर्वसत्ताधारिता तूं ॥ ३ ॥
अगा ये सज्जना अगा नारायणा । करुणवचना चित्त द्यावें ॥ ४ ॥
तुका म्हणे नाहीं अधिकार तैसी । सरती पायांपासी केली देवें ॥ ५ ॥

(२१६)
तुझें स्तुतीयोग्य कैंची मज मती ?। जेथे पडे भ्रांती निगमासी ॥ १ ॥
नेणें भक्तिभाव नेणें श्रुतीमूळ । जोडोनि अंजूळ उभा पुढें ॥ २ ॥
सहस्रमुखेंसी करी शेष घोष । तेथें मी विशेष काय बोलूं ? ॥ ३ ॥
पार्वती शंकर ध्याती सर्वकाळ । जोडितो अंजुळ काय तेथें ? ॥ ४ ॥
भांडारी कुबेर इंद्र बद्धकर । तेथें मी पामर काय आलों ? ॥ ५ ॥
कल्पतरुदाता इच्छापुरविता । तेथें मी मागता कां न लाहे ? ॥ ६ ॥
तुका म्हणे आलो शरण चरणा । करितो प्रार्थना साधना ही ॥ ७ ॥

(२१७)
नमो विश्वरूपा विष्णु मायबापा । अपारा अमूपा पांडुरंगा ॥ १ ॥
विनवितों रंक दास मी सेवक । वचन तें एक आइकावें ॥ २ ॥
तुझी स्तुती वेद करितां भागला । निवांतचि ठेला नेती नेती ॥ ३ ॥
ऋषि मुनी सिद्ध बहु कविजन । न सरती गुण वर्णावया ॥ ४ ॥
तुका म्हणे तेथें काय माझी वाणीं । जें तुझीं वाखाणीं कीर्ती देवा ? ॥५

(२१८)
विनविजे ऐसें भाग्य नाहीं देवा । पायासीं केशवा सलगी केली ॥ १ ॥
धीटपणें पत्र लिहिलें आवडी । पार नेणें थोडी मति माझी ॥ २ ॥
जेथें वेदां तुझा न कळेचि पार । तेथें मी पामर काय वानूं ? ॥ ३ ॥
जैसें तैसें माझें बोल अंगिकारीं । बोबड्या उत्तरीं गौरवितो ॥ ४ ॥
तुका म्हणे विटे–वरी जी पाऊलें । तेथें मी ठेविलें मस्तक हे ॥ ५ ॥

(२१९)

इतुकें करीं देवा ऐकें हें वचन । समूळ अभिमान जाळी माझा ॥ १ ॥
इतुकें करीं देवा आइकें हे गोष्टी । सर्वां समदृष्टी देखें तुज ॥ २ ॥
इतुकें करीं देवा विनवितों तुज । संतचरणरज देई माथां ॥ ३ ॥
इतुकें करीं देवा आईका हे मात । वसा हृदयांत दिसरात्रीं ॥ ४ ॥
भलतिया भावें तारी पंढरिनाथा । तुका म्हणे ताता शरण आलो ॥५

**टीपः–** पंचरत्न हरिपाठ आणि घरत गाथेतील हरिपाठ या दोन्हींत कांहीं मानसपूजेतील अभंग आढळलें; आणि एकांत काकडयांपैकीं आढळले. ही दोन्ही वेगळी प्रकरणें घेतली असल्यामुळे पुढचें कांहीं अभंग इतर ठिकाणचें घेतले आहेत. हेतू एवढांच कीं पाठांत (९ × ३=२७ किंवा ११×३ = ३३) अभंग व्हावेत.

(२२०)

दर्शनाची आस । आतां न साहे उदास ॥ १ ॥
जीव आला पायांपासीं । येथें असें कळकळेसी ॥ २ ॥
कांहींच नाठवे । ठायीं बैसलें नुठे ॥ ३ ॥
जीव सांता पाहीं । तुका टकावला ठायीं ॥ ४ ॥

दा. क्र. १४८२९

(२२१)

ऋणपरिहारा जालों ओळंगणा । द्यावी ना[illegible]ता ॥ १ ॥
जालों उतराई शरीरसंकल्पें । चुकों द्यावीं पापें सकळही ॥ २ ॥
आजिवरी होतो धरूनि जीवेंसी । व्याजें कासाविसी केलें बहु ॥३
तुका म्हणे मना आणिला म्यां भाव । देवा आलों ठाव तुमचिया ॥४

(२२२)

माझिया जीवासी हेंचि पैं विश्रांति । तुझे पाय चिंती पांडुरंगा ॥१
भांडवल गांठीं आलें सपुरतें । समाधान चित्तें मानियेलें ॥ २ ॥
उदंड उच्चारें घातला पसरू । रूपावरी भरू आवडीचा ॥ ३ ॥
तुका म्हणे मज भक्तीची आवडी । अभेदीं तांतडी नाहीं तेणें ॥ ४ ॥

(२२३)
धरूनियां सोई परतलें मन । अनुलक्षीं चरण म्हणोनियां ।। १ ।।
येई पांडुरंगे नेई सांभाळुनी । करुणावचनीं आळवितों ।। २ ।।
बुद्धि जाली साह्य परी नाहीं बळ । अवलोकितां जळ वाहे नेत्रीं ।। ३
न चलती पाय गळित व्हे काया । म्हणऊनी दया येऊं द्यावी ।। ४ ।।
दिशेच्या करितो वारियासीं मात । जोडोनियां हात वास पाहे ।। ५ ।।
तुका म्हणे वेग करावा सत्वर । पाववी हा पार भवसिंधु ।। ६ ।।
(२२४)
तुझा शरणागत जालों मी अंकित । करी माझें हित पांडुरंगा ।। १ ।।
पतितपावन तुझी ब्रीदावळी । आतां ते सांभाळीं मायबापा ।। २ ।।
अनाथाचा नाथ बोलती हें संत । ऐकोनियां मात विश्वासलों ।। ३ ।।
न करी निरास न धरी उदास । देई याचकास कृपादान ।। ४ ।।
तुका म्हणे मी तों पातकांची रासी । देई पायापासीं थार देवा ।। ५ ।।
(२२५)
नरस्तुति आणि कथेचा विकरा । हें नकों दातारा घडों देऊं ।। १ ।।
ऐसिये कृपेची भाकितों करुणा । आहेसि तूं राणा उदारांचा ।। २ ।।
भूतांचा मत्सर आणि संतनिंदा । हें नको गोविंदा घडों देऊं ।। ३
पराविया नारी आणि परधना । नको देऊं मनावरी येऊं ।। ४ ।।
देहअभिमान नको या शरीरीं । चढों कांहीपरी-एक देऊं ।। ५ ।।
तुका म्हणे तुझ्या पायांचा विसर । नको क्षणभर पडों देऊं ।। ६ ।।
(२२६)
सकळ हरिजन आले मिळोन राऊळा । उभे कर जोडून विनविती गोपाळा ।। १ ।। उठा पांडुरंगा आधीं भक्तां सांभाळीं । पाहूं द्या वदन वंदूं पायाची धुळी ।। २ ।। उगवला दिन जाल्या निवळ त्या दिशा । कोठवरी निद्रा आतां उठा परेशा ।। ३ ।। तुका म्हणे आम्ही उभे तिष्ठों द्वारासी । दर्शनासी कर बद्ध अवघी सरसीं ।। ४ ।।

(२२७)

उद्धव अक्रुरव्यास शुक सनक आदिक। नारद तुंबरगरुड शेष पुंडलिक ॥ १ ॥ उठी पांडुरंगा देवा वदन प्रक्षाळी। जोडोनियां कर सकळ उभें वनमाळी ॥ २ ॥ अवघें सावधान आले सेवेविभागीं। कृपादृष्टी पाहे तया निववी सर्वांगी ॥ ३ ॥ वारंवार विनवी तुका पंढरीनाथा। कायावाचामनें चरणीं लागोनि आतां ॥ ४ ॥

(२२८)

उठाउठी तेव्हां उठलें हो गोपाळ। उधडिलें द्वार आनंदलें सकळ ॥ १ ॥ केला जयजयकार रामनामगजर। श्रुतिशास्त्रपाठ गीत वाद्यें अपार ॥ २ ॥ जोडियेले कर रुक्मादेवी आपण। पायांवरी शिर ठेवूं उठा म्हणोन ॥ ३ ॥ आलेउभेभक्त देवा दिठी अवलोका। कृपादृष्टी साह्य म्हणे होऊनि तुका ॥ ४ ॥

(२२९)

पहावया मुख उतावीळ हें मन। निवालें लोचन भूक हरली तहान ॥ १ ॥ वंदूनियां उभे दृष्टी लावूनि पायीं। कुर्वाळुनि माथा स्नेहें पाचारी आई ॥ २ ॥ पुरले मनोरथ इच्छा–केलि पुरविली। न मागतां देसी माझी माय माऊली ॥ ३ ॥ तुका म्हणे सेवा सांग नाम सुखाचें। नव बोध होय सुख सर्वां जीवांचें ॥ ४ ॥

(२३०)

गाऊं वानूं विठो तुझा करूं अनुवाद। पाहें जेथेंतेथें सर्वमयगोविंद ॥ १ ॥ आनंदु रे विठोबा जाला माझियेमनीं। देखिली लोचनीं विठेवरिल पाऊले ॥ २ ॥ न करूं साधनें तपें मुक्तिची आस। हाचि जन्मोजन्मीं गोड भक्तिचा रस ॥ ३ ॥ तुका म्हणे उणें आम्हां प्रेमातें कांई ?। पंढरिचा राणा सांठविला हृदयीं ॥ ४ ॥

## प्रकरण ७ वे

# नित्यपाठ

(२३१)

जन्माचें ते मूळ पाहिलें शोधून । दुःखासी कारण जन्म घ्यावा ॥ १ ॥
पापपुण्यगुणीं जन्मा येतो प्राणि । नरदेहीं हानी थोर केली ॥ २ ॥
रजतमसत्व आहे ज्याचे अंगीं । यांच गुणें जगीं वांयां गेला ॥ ३ ॥
तम तरी काय नर्कचि केवळ । रज तों सबळ मायाजाळ ॥ ४ ॥
तुका म्हणे येथें सत्याचें सामर्थ्य । करावा परमार्थ अहर्निशी ॥ ५ ॥

(२३२)

अहर्निशी सदा परमार्थ करावा । पाय न ठेवावा आडमार्गीं ॥ १ ॥
आडमार्गीं कोणी जन तें जातील । त्यांतून काढील तोचि ज्ञानी ॥२
तोचि ज्ञानी खरा तारी दुजीयासी । वेळोवेळां त्यासी शरण जावें ॥३
आपण तरेल नव्हे ते नवल । कुळें उद्धरील सर्वांची तो ॥ ४ ॥
शरण गेलिया काय होते फळ । तुका म्हणे कुळ उद्धरिलें ॥ ५ ॥

(२३३)

उद्धरिलें कुळ आपण तरला । तोचि एक जाला त्रैलोक्यांत ॥ १ ॥
त्रैलोक्यांत झाला द्वैतचि निमालें । साधन साधिलें बरवें तेणें ॥ २ ॥
बरवें साधन सुखशांती मना । क्रोध नाहीं जाणा तींळभरीं ॥ ३ ॥
तींळभरीं नाहीं चित्तासि तो मळ । तुका म्हणे जळ गंगेचें तें ॥ ४ ॥

(२३४)

जैसी गंगा वाहे तैसें ज्याचें मन । भगवंत जाण त्याजवळी ॥ १ ॥
त्याजवळी देव भक्तिभावें उभा । आनंदाचा गाभा तया दिसे ॥ २ ॥
तया दिसे रूप अंगुष्ठप्रमाण । अनुभवी खूण जाणती हे ॥ ३ ॥
जाणती हे खूण स्वात्मअनुभवी । तुका म्हणे पदवी ज्याची त्याला ॥४

(२३५)
ज्याची त्याला पदवी इतरां न साजे । संताला उपजे आत्मसुख ॥१
आत्मसुख घ्या रे उघडा ज्ञानदृष्टी । यावीण चावटी करूं नकां ॥२
करूं नकां कांहीं संतसंग धरा । पूर्वीचा जो दोरा उगवला ॥ ३ ॥
उगवे प्रारब्ध संतसगगुणीं । प्रत्यक्ष पुराणी वर्णियेलें ॥ ४ ॥
वर्णियेलें एकें–गुणनामघोषें । तुका म्हणे कैसें दोष जाती ॥ ५ ॥

(२३६)
दोष ते जातील अनंतजन्मींचें । पाय त्या देवाचें न सोडावें ॥ १ ॥
न सोडावें पाय निश्चय तो करा । आळवा श्रीधरा भावबळें ॥ २ ॥
भावबळें आणा धरूनि केशव । पापियां तो देव न कळेचि ॥ ३ ॥
न कळे तो देव सत्संगावांचुनी । वासना जाळुनी शुद्ध करा ॥ ४ ॥
शुद्ध करा मन देहातीतभावीं । वस्तू ओळखावी तुका म्हणे ॥ ५ ॥

(२३७)
ओळखा रे वस्तू सांडोनि कल्पना । नका आडराना जाऊं झणीं ॥१
झणीं जाल कोठें बुडवाल हित । विचारा मनांत आपुलिया ॥ २ ॥
आपुलिया जीवें शिवासीं पहावें । वेळोवेळां घ्यावें आत्मसुख ॥ ३ ॥
घ्यावें आत्मसुख स्वरूपीं मिळावें । भूतीं लीन व्हावें तुका म्हणे ॥४

(२३८)
भूतीं लीन व्हावें सांगावें नलगेचि । आतां अहंकाराची शांती करा ॥१
शांती करा तुम्ही ममता नसावी । अंतरीं असावी भूतदया ॥ २ ॥
भूतदया ठेवा मग काय उणें । प्रथम साधणें साधन हें ॥ ३ ॥
असो हें साधन ज्याचें चित्तीं वसे । मायाजाळ नासे तुका म्हणे ॥४

(२३९)
मायाजाळ नासे या नामें करूनि । प्रीती चक्रपाणि असों द्यावी ॥१
असों द्यावी प्रीती साधुच्या पायांसी । कदा कीर्तनासी सोडूं नये ॥२

सोडूं नयें पुराण–श्रवण कीर्तन । निजध्यासमनन साक्षात्कार ।। १ ।।
साक्षात्कार झाल्या सहज समाधी । तुका म्हणे उपाधी गेली त्याची ।।२

(२४०)

गेली त्याची जाणा तोचि ब्रह्म झाला । अंतरीं निवाला पूर्णपणें ।।१
पूर्णपणें धाला राहे कैशा रीती । त्याची आतां स्थिती सांगतो मी ।।२
सांगतों मी तुम्हां ऐका मनोगत । भासे मूर्खवत जगामाजी ।। ३ ।।
जगांत पिशाच्च अंतरीं शहाणा । सदा ब्रह्मी जाणा निमग्न तो ।।४
निमग्न तो सदा जैसा मकरंद । अंतर्बाह्यभेद वेगळाले ।। ५ ।।
वेगळाले भेद किती त्या असती । हृद्गताची गती नेणें कोणी ।। ६ ।।
न कळे कोणाला त्याचें हेंचि वर्म । योगी जाणे वर्म–खूण त्याची ।।७
खूण त्याची जाणे जो तैसा असे ती । तुका म्हणे भ्रान्ती दुजियाला ।।८

(२४१)

दुजियाला भ्रान्ती भाविकाला शान्ती । साधुचिये वृत्ती लीन झाली ।।१
लीन झाली वृत्ती ब्रह्मातें मिळाली । जळांत आटली लवणकणी ।।२
लवणकणी पुन्हां जळाचें बाहेरीं । येत नाहीं खरी त्यासारिखी ।।३
त्यासारिखी तुम्ही जाणा साधुवृत्ती । पुन्हां न मिळती मायाजाळीं ।।४
मायाजाळ त्याला पुन्हां रे बांधीना । सत्य सत्य जाणा तुका म्हणे ।।५

(२४२)

सत्य सत्य जाणा त्रिवाचा नेम हा । अनुभव पाहा पदोपदीं ।। १ ।।
पदोपदीं पाहा श्रीमुख चांगलें । प्रत्यक्ष पाऊलें विठोबाची ।। २ ।।
विठोबाची भेटी घडेल वाचितां । तुम्हालागीं आतां सांगितलें ।। ३ ।।
सांगितलें खरें विश्वाचिया हिता । अभंग वाचितां जे कां नर ।। ४ ।।
तें नर पठणीं जीवन्मुक्त झाले । पुन्हां नाहीं आलें संसारासी ।। ५ ।।
संसार उडाला संदेह फिटला । पूर्ण तोचि झाला तुका म्हणे ।। ६ ।।

(२४३)

पांच कोटी एक लक्षाचा शेवट। चौतीससहस्त्र स्पष्ट सांगितलें ।। १ ।।
सांगितलें हें तुका कथुनीया गेला। बारा अभंगाला सोडूं नका ।।२
सोडूं नकां तुम्ही सांगितलीवर्मे। भवपाशकर्मे चुकतील ।। ३ ।।
चुकती यातायाती विठोबाची आण। करा हें पठण जीवेंभावें ।। ४ ।।
जीवेंभावें करितां होईल दर्शन। प्रत्यक्ष सगुण तुका म्हणे ।। ५ ।।

(२४४)

स्वर्गलोकींहुनी धाडिलें अभंग। तुम्हालागीं सांग–नित्यनेमा ।। १ ।।
नित्यनेमें यासी पठतां प्रतापें। जळतील पापे जन्मांतरींचीं ।। २ ।।
तया मागेंपुढें रक्षी नारायण। मांडिल्या निर्वाण उडी घाली ।। ३ ।।
बुद्धिचा पालट नासेल कुमती। होईल सद्‌गती येणें पंथें ।। ४ ।।
सद्भक्ति जालीया सहज साक्षात्कार। होईल उद्धार पूर्वजांचा ।। ५ ।।
साधतील येणें इहपरलोक। सत्यसत्यभाक माझी तुम्हां ।। ६ ।।
परोपकारार्थ सांगितला हेवा। प्रासादिक मेवा ग्रहण करा ।। ७ ।।
येणें भवव्यथा जाईल तुमची। सख्या विठ्ठलाची आण मज ।। ८ ।।
टाळ आणि कंथा धाडिली निशाणी। घ्या रे ओळखोनी सज्जन हो ।।९
माझें दंडवत तुम्हां सर्व लोकां। देहासह तुका वैकुंठासी ।।१०।।

(२४५)

वेदाचें अभंग केले श्रुतिपर। द्वादशसहस्त्र संहितेचे ।। १ ।।
निरुक्त निघंट आणि ब्रह्मसूत्र। अन्य ते सहस्त्र उपग्रंथ ।। २ ।।
अभंग ते कोटी भक्तिपर केलें। ज्ञानपर केलें तितुकेंचि ।। ३ ।।
पंचाहत्तरलक्ष वैराग्य वर्णिलें। नाम ही गाईलें तितुकेंचि ।। ४ ।।
साठीलक्ष केलें बोधक जनांसी। वर्णिलें रूपासी तितुकेंचि ।। ५ ।।
द्वादशसहस्त्र आत्मबोध केला। अनुभवबोला बोलों सर्वी ।। ६ ।।
चौतीस सहस्त्र लक्ष कोटी पांच। सांगितलें साच तुका म्हणे ।। ७ ।।

## प्रकरण ८ वे

# रूप

(२४६)

सुंदर ते ध्यान उभे विठेंवरी । कर कटावरी ठेवूनियां ।। १ ।।
गळां तुळसीहार कांसे पितांबर । आवडे निरंतर तेंचि रूप ।। २ ।।
मकरकुंडलें तळपती श्रवणीं । आणि कंठीं मणि–कौस्तुभ तो ।। ३ ।।
तुका म्हणे माझें हेंचि सर्वसुख । पाहावें श्रीमुख आवडीनें ।। ४ ।।

(२४७)

दृष्टी विटेवरी चरणें साजिरी । तेथें माझी हरी वृत्ति राहों ।। १ ।।
आणिक न लगे मायिक पदार्थ । तेथें मज आर्त नसों देवा ।। २ ।।
ब्रह्मादिक पदें दुःखाची शिराणी । तेथें चित्त झणीं जडों देसी ।। ३ ।।
तुका म्हणे मज कळलें हे वर्म । येर कर्मधर्म नाशिवंत ।। ४ ।।

(२४८)

राजसु कोंवळा लावण्य पुतळा । रविशशीकळा लोपती या ।। १ ।।
कस्तुरी मळवटी चंदनाची उटी । रुळे माळ कंठीं वैजयंती ।। २ ।।
मुकुटकुंडलें श्रीमुख शोभलें । सुखाचें ओतिलें सकळही ।। ३ ।।
कांसे सोनसळा पांघरे पाटोळा । सुंदर सांवळा घननीळ ।। ४ ।।
तुका म्हणे देवा द्यावी एक सेवा । तेणेंविण जीवा धीर दाहीं ।। ५ ।।

(२४९)

सदा माझें डोळां जडों तुझी मूर्ती । रखुमाईच्या पती सोयरिया ।। १ ।।
गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देई मज प्रेम सर्वकाळ ।। २ ।।
विठोमाउलिये हाचि वर देई । संचरोनि राही हृदयीं माझ्या ।। ३ ।।
तुका म्हणे कांहीं न मागें आणिक । तुझें पायीं सुख सर्व आहे ।। ४ ।।

(२५०)

मुकुट कुंडलें शोभे गळां माळा । तिलक रेखिला उर्ध्वपुंड्र ।। १ ।।
एकावळी हार झळकती दिव्य । नवरत्नें भव्य तेज फांके ।। २ ।।

कासे सोनसळा रुळे वनमाळा । देखतांचि डोळां भुले ब्रह्मा ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें अवतार वर्णू । रामकृष्णविष्णुनारायण ॥ ४ ॥

(२५१)

विश्वाच्या मोहना कपाळटिळका । पंढरीनायका पांडुरंगा ॥ १ ॥
दाही अवतार होसी तूं निमित्य । बुडविसी दैत्यखाणी सर्व ॥ २ ॥
गोपिकांचें घरीं कामासी लंपट । करिसील धीट गवळयांसी ॥ ३ ॥
भावाअभावाचा न करी कंटाळा । तुका म्हणे डोळां पाहूं चला ॥ ४ ॥

(२५२)

कर कटावरी तुळसीच्या माळा । ऐसें रूप डोळां दावी हरी ॥ १ ॥
ठेविले चरण दोन्ही विटेवरी । ऐसें रूप हरि दावी डोळां ॥ २ ॥
कटीं पीतांबर कांस मिरविली । दाखवी वहिली ऐसी मूर्ती ॥ ३ ॥
गरुडपारावरी उभा राहिलासी । आठवूं मानसीं तेंचि रूप ॥ ४ ॥
झुरोनि पांजिरा होऊं पाहे आतां । येई पंढरिनाथा भेटावया ॥ ५ ॥
तुका म्हणे माझी पुरवावी आस । विनंती उदास करूं नये ॥ ६ ॥

(२५३)

गरुडाचें वारिकें कांसे पीतांबर । रूप मनोहर सांवळे जें ॥ १ ॥
वरवयाबरवंट घनमेघ सांवळा । वैजयंतीमाळा गळां शोभे ॥ २ ॥
मुकुटमाथां कोटी–सूर्याचा झळाळ । कौस्तुभ निर्मळ शोभे कंठीं ॥३
श्रवणीं कुंडलें नक्षत्रे शोभती । सूर्यप्रभादीप्ती दंतावळी ॥ ४ ॥
ओतीव श्रीमुख सुखाचें सकळ । वामांगीं वेल्हाळ रखुमादेवी ॥ ५ ॥
उद्धव अक्रूर उभे दोहींकडे । वर्णिती पवाडे सनकादिक ॥ ६ ॥
तुका म्हणे नव्हे आणिकासारिखा । परब्रह्मसखा पांडुरंग ॥ ७ ॥

(२५४)

आवडे हें रूप गोजिरे सगुण । पाहातां लोचन सुखावलें ॥ १ ॥
आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहे । जें मी तुज पाहे पांडुरंगा ॥ २ ॥

लाचावलें मन लागलीसे गोडी । जीवें तें न सोडी ऐसें जाले ॥ ३ ॥
तुका म्हणे केली आम्ही लडिवाळीं । पुरवावी आळी मायबापें ॥ ४ ॥

(२५५)
अच्युता अनंता केशवा गोविंदा । माधवा मुकुंदा नारायणा ॥ १ ॥
देवकीतनया गोपिकारमणा । भक्तउद्धरणा पांडुरंगा ॥ २ ॥
मकरकुंडलें श्रवणीं शोभती । एकावळीदीप्ती तुका म्हणे ॥ ३ ॥

(२५६)
सांवळें सुंदर रूप मनोहर । राहों निरंतर हृदयामाजी ॥ १ ॥
आन कांहीं आम्हां नाहीं इच्छाचाड । तुझें नाम गोड पांडुरंगे ॥२
जन्मोंजन्मीं ऐसें मागितलें तुज । आम्हांसी सहज द्यावें आतां ॥ ३ ॥
तुका म्हणे तुज–ऐसा जी दयाळ । धुंडितां सकळ नाहीं आम्हां ॥४

(२५७)
सांवळें रूपडें चोरटें चित्ताचें । उभें पंढरीचें विटेवरी ॥ १ ॥
डोळियांची धणी पाहातां न पुरे । तयालागीं झुरे मन माझें ॥ २ ॥
आन गोड कांहीं नलगे संसारीं । राहिलें अंतरीं पाय त्याचें ॥ ३ ॥
प्राण रिघों पाहे कुडी हे सांडोनी । श्रीमुख नयनीं न देखतां ॥ ४ ॥
चित्त मोहियेलें नंदाच्यानंदनें । तुका म्हणे येणें गरुडध्वजें ॥ ५ ॥

(२५८)
डोळियांचें दैव आजि उभें ठेलें । निधान देखिलें पंढरीये ॥ १ ॥
काय तें वानावें वाचेचे पालवें ? । वेदां न बोलवे रूप ज्याचें ॥ २ ॥
आनंदाच्या रसें ओतीव चांगलें । देखतां रंगलें चित्त माझें ॥ ३ ॥
तुका म्हणे मी तों सगळा विरालों । विठ्ठलचि जालों दर्शनानें ॥ ४ ॥

(२५९)
तुझें रूप पाहतां देवा । सुख जालें माझ्या जीवा ॥ १ ॥
हें तों वाचे बोलवेना । काय सांगों नारायणा ! ॥ २ ॥
जन्मोजन्मींचें सुकृत । तुझें पायीं रमे चित्त ॥ ३ ॥

जरी योगाचा अभ्यास । तेव्हां तुझा निजध्यास ॥ ४ ॥
तुका म्हणे हरिभक्त । गोड गाऊं तुझें गीत ॥ ५ ॥
(२६०)
जिकडें पाहें तिकडे उभा । अवघा गगनाचा गाभा ॥ १ ॥
डोळां बैसलें बैसलें । रूप राहोनि संचलें ॥ २ ॥
न वर्जितां दाही दिशा । जिकडे तिकडे सरिसा ॥ ३ ॥
तुका म्हणे समपदीं । उभा दिठीचिये आधीं ॥ ४ ॥
(२६१)
शंख चक्र गदा रुळे वैजयंती । कुंडलें तळपती दोन्ही कानीं ॥ १ ॥
मस्तकी मुगुट नवरत्नहार । वरी पितांबर पांघुरला ॥ २ ॥
जडित् रत्नहार कटीं कडदोरा । रम्य शोभें हिरा बेंबीपाशीं ॥ ३ ॥
जडितकंकणें कर्णी त्या मुद्रिका । लांचावला तुका भेटीसाठीं ॥ ४ ॥
(२६२)
लावण्य ओतिलें । तैसें श्रीमुख चांगलें ॥ १ ॥
माझें भुकेलें लोचन । विसरलें निमेषण ॥ २ ॥
रम्य हनुवटी । गंडस्थळ शोभें दिठीं ॥ ३ ॥
तुका म्हणे दृष्टी । लागें तुझ्या मुखवटी ॥ ४ ॥
(६६३)
दिसें मनोहर । रूप साजिरें सुंदर ॥ १ ॥
तेथें मन जालें लुब्ध । नामीं लागलासे छंद ॥ २ ॥
स्थिरावली वृत्ती । चित्त उठेना मागुतीं ॥ ३ ॥
आवडें तें ध्यान । तेथें गुंतलेसें मन ॥ ४ ॥
तुका म्हणे वैजयंती । शोभे आपाद श्रीपती ॥ ५ ॥
(२६४)
मदनाचा पुतळा । लोपलिया रविकळा ॥ १ ॥
कस्तुरीची मळवटी । आंगीं चंदनाची उटी ॥ २ ॥

लाचावलें मन लागलीसे गोडी । जीवें तें न सोडी ऐसें जाले ।। ३ ।।
तुका म्हणे केली आम्ही लडिवाळीं । पुरवावी आळी मायबापें ।। ४ ।।

(२५५)
अच्युता अनंता केशवा गोविंदा । माधवा मुकुंदा नारायणा ।। १ ।।
देवकीतनया गोपिकारमणा । भक्तउद्धरणा पांडुरंगा ।। २ ।।
मकरकुंडलें श्रवणीं शोभती । एकावळीदीप्ती तुका म्हणे ।। ३ ।।

(२५६)
सांवळें सुंदर रूप मनोहर । राहो निरंतर हृदयामाजी ।। १ ।।
आन कांहीं आम्हां नाहीं इच्छाचाड । तुझें नाम गोड पांडुरंगे ।।२
जन्मोंजन्मीं ऐसें मागितलें तुज । आम्हांसी सहज द्यावें आतां ।। ३ ।।
तुका म्हणे तुज–ऐसा जी दयाळ । धुंडितां सकळ नाहीं आम्हां ।।४

(२५७)
सांवळें रूपडें चोरटें चित्ताचें । उभें पंढरीचें विटेवरी ।। १ ।।
डोळियांची धणी पाहातां न पुरे । तयालागीं झुरे मन माझें ।। २ ।।
आन गोड कांहीं नलगे संसारीं । राहिलें अंतरीं पाय त्याचें ।। ३ ।।
प्राण रिघों पाहे कुडी हे सांडोनी । श्रीमुख नयनीं न देखतां ।। ४ ।।
चित्त मोहियेलें नंदाच्यानंदनें । तुका म्हणे येणें गरुडध्वजें ।। ५ ।।

(२५८)
डोळियांचें दैव आजि उभें ठेलें । निधान देखिलें पंढरीये ।। १ ।।
काय तें वानावें वाचेचे पालवें ? । वेदां न बोलवे रूप ज्याचें ।। २ ।।
आनंदाच्या रसें ओतीव चांगलें । देखतां रंगलें चित्त माझें ।। ३ ।।
तुका म्हणे मी तों सगळा विरालों । विठ्ठलचि जालों दर्शनानें ।। ४ ।।

(२५९)
तुझें रूप पाहतां देवा । सुख जालें माझ्या जीवा ।। १ ।।
हें तों वाचें बोलवेना । काय सांगों नारायणा ! ।। २ ।।
जन्मोजन्मींचें सुकृत । तुझें पायीं रमे चित्त ।। ३ ।।

जरी योगाचा अभ्यास । तेव्हां तुझा निजध्यास ॥ ४ ॥
तुका म्हणे हरिभक्त । गोड गाऊं तुझें गीत ॥ ५ ॥

(२६०)
जिकडें पाहें तिकडे उभा । अवघा गगनाचा गाभा ॥ १ ॥
डोळां बैसलें बैसलें । रूप राहोनि संचलें ॥ २ ॥
न वर्जितां दाही दिशा । जिकडे तिकडे सरिसा ॥ ३ ॥
तुका म्हणे समपदीं । उभा दिठीचिये आधीं ॥ ४ ॥

(२६१)
शंख चक्र गदा रुळे वैजयंती । कुंडलें तळपती दोन्ही कानीं ॥ १ ॥
मस्तकी मुगुट नवरत्नहार । वरी पितांबर पांघुरला ॥ २ ॥
जडित् रत्नहार कटीं कडदोरा । रम्य शोभे हिरा बेंबीपाशीं ॥ ३ ॥
जडितकंकणें कर्णी त्या मुद्रिका । लांचावला तुका भेटीसाठीं ॥ ४ ॥

(२६२)
लावण्य ओतिलें । तैसें श्रीमुख चांगलें ॥ १ ॥
माझें भुकेलें लोचन । विसरलें निमेषण ॥ २ ॥
रम्य हनुवटी । गंडस्थळ शोभें दिठीं ॥ ३ ॥
तुका म्हणे दृष्टी । लागें तुझ्या मुखवटी ॥ ४ ॥

(६६३)
दिसें मनोहर । रूप साजिरें सुंदर ॥ १ ॥
तेथें मन जालें लुब्ध । नामीं लागलासे छंद ॥ २ ॥
स्थिरावली वृत्ती । चित्त उठेना मागुतीं ॥ ३ ॥
आवडे तें ध्यान । तेथें गुंतलेसें मन ॥ ४ ॥
तुका म्हणे वैजयंती । शोभे आपाद श्रीपती ॥ ५ ॥

(२६४)
मदनाचा पुतळा । लोपलिया रविकळा ॥ १ ॥
कस्तुरीची मळवटी । आंगीं चंदनाची उटी ॥ २ ॥

पाहतां लोचन । ठेलें तटस्थचि मन ॥ ३ ॥
तुका म्हणें चित्त । तेणें पावलें विश्रांत ॥ ४ ॥

(२६५)
मदनाचा पुतळा । लोपलिया रविकळा ॥ १ ॥
ध्यान मानसीं बैसलें । चित्त पायीं स्थिरावलें ॥ २ ॥
कस्तुरी मळवटी । अंगीं चंदनाची उटी ॥ ३ ॥
घननीळ सांवळा । तुका म्हणे पाहे डोळां ॥ ४ ॥

(२६६)
शोभले सुरेख । रम्य साजिरें नासिक ॥ १ ॥
डोळां बैसलें स्वरूप । मनीं न उठे संकल्प ॥ २ ॥
मनाची आवडी । पाय पाहे घडीघडी ॥ ३ ॥
तुका म्हणे मन । नुठे चरणांवरून ॥ ४ ॥

(२६७)
रूपें गोवियलें चित्त । पायीं राहिलें निश्चित ॥ १ ॥
देव श्रीमुख गोमटे । दुःख दर्शनें न भेटे ॥ २ ॥
जालीं इंद्रियां विश्रांति । भ्रमें पीडीत ती होती ॥ ३ ।
तुका म्हणे देवभेटी । सुटे भवबंधाची गांठी ॥ ४ ॥

(२६८)
रूपीं जडले लोचन । चरणीं स्थिरावलें मन ॥ १ ॥
देहभाव हारपला । तुज पाहातां विठ्ठला ॥ २ ॥
कळों नये सुखदुःख । तान हारपली–भूक ॥ ३ ॥
तुका म्हणे नव्हे परती । तुझ्या दर्शनें मागुती ॥ ४ ॥

(२६९)
सुखाचें ओतिलें । दिसें श्रीमुख चांगलें ॥ १ ॥
मनें धरिला अभिलाष । मिठी घातली पायांस ॥ २ ॥
होता दृष्टादृष्टी । ताप गेला उठाउठी ॥ ३ ॥
तुका म्हणे जाला । लाभ लाभें दुणावला ॥ ४ ॥

...ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों. दि. ...


(२७०)
तुझें रूपीं डोळें । निवती सकळ सोहळे ॥ १ ॥
ठाण साजिरें गोजिरें । कुंडलें या मकराकारें ॥ २ ॥
ध्यानाची आवडी । अवलोकितों घडोघडी ॥ ३ ॥
तुका म्हणे चित्ता । वाटे न व्हावा परता ॥ ४ ॥

(२७१)
साजिरे गोजिरे रूप मनोहर । आवडे निरंतर ध्यान मनीं ॥ १ ॥
बळिया शिरोमणी उदारांचा राणा । आवडला मना जीवीं जीवा ॥२
रविकोटीकळा सांडा ओवाळुनि । कंठआभरणीं शोभा दिसें ॥ ३ ॥
तुका म्हणे जालें नेत्रासी पारणे । मनाहरें येणें रूपनामें ॥ ४ ॥

(२७२)
आतां डोळां तुम्ही पाहा दृष्टीभरी । दिसतो श्रीहरी उभा विठे ॥१
श्रीमुख चांगलें सुखाचें निघोंट । कुंडलेंमुकुटविराजित ॥ २ ॥
कुरळिया केशा तयातळीं दाटी । व्यंकटाभृकुटी शोभा दिसें ॥ ३ ॥
तेथें माझी दृष्टी कैसी धाऊं पाहें । कोटीसूर्या होये ओवाळणी ॥ ४ ॥
तुका म्हणे देव कृपेचीं माउली । वस्ती मज दिली पायांसवें ॥ ५ ॥

(२७३)
विश्वीं हा विश्वात्मा क्षरलासें आत्मा । अहंबाधा आम्हां दूर करी ॥१
भाव धरा जनीं विचरे सज्जनीं । नामसंकीर्तनीं सुख भोगी ॥ २ ॥
जेथुनि हें सर्व आकारलें भाव । रोहिणीची माव ऐसी आहे ॥ ३ ॥
तुका म्हणे अंतीं सेवी पांडुरंग । येणेंजाणें धिग जाण रया ॥ ४ ॥

(२७४)
नाहीं छायामाया प्रकृतीच्या आया । मनाच्या उपाया न चले ती ॥१
तेंचि तें हें रूप प्रत्यक्ष अमूप । यशोदेसमीप खेळतुसे ॥ २ ॥
विश्वाचा विश्वास विश्वरूपाधीश । सर्वत्र महेश एकरूप ॥ ३ ॥
तुका म्हणे सर्व नाममंत्रयज्ञ । सर्वकाळ कृष्णरामहरी ॥ ४ ॥

(२७५)

आदिमूळरूप प्रकृतीचें नेम । वैकुंठ उत्तम सर्वसुख ॥ १ ॥
तें रूप संपूर्ण ओळलें निधान । सर्व नारायण एकरूप ॥ २ ॥
आधारा धरित स्वयंनिर्धारित । सर्वत्र पुरत संतसंगीं ॥ ३ ॥
तुका म्हणे काय नव्हे एक सत्य । प्रगट ना गुप्त नेणों किंवा ॥ ४ ॥

(२७६)

विस्तार विश्वाचा विवेक पैं साचा । बोलतांचि वाचा हारपली ॥ १ ॥
जें रूप श्रीधर श्रीकृष्ण आकार । सर्वनिर्विकार एकरूप ॥ २ ॥
नसतेन जीव असतेन शिव । तदाकारभाव मावळली ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें पाहिलें स्वरूप । पंढरी अमूप लुटी घेई ॥ ४ ॥

(२७७)

प्रतिपाळशमप्रतिज्ञेचा नेम । सर्वज्ञता तम गिळितुसें ॥ १ ॥
त्रिपुरउदार पांडुरंगसूत्र । नाम तें पवित्र भक्तांलागीं ॥ २ ॥
रूप सकुमार गोपवेषधर । षड्गुणें तिमिर गिळितुसें ॥ ३ ॥
तुका म्हणें आतां सर्वदा गोविंदा । सूत्रमणी सदा गांठीं बांधा ॥ ४ ॥

(२७८)

निकट वेल्हाळ नेणों मायाजाळ । विठ्ठल पाल्हाळ नेणों कांहीं ॥ १ ॥
रूप तें सुंदर सगुण साकार । विठेवरी कर तिष्ठतुसें ॥ २ ॥
कुटुंब आचार कुवंडी साचार । तेथें निरंतर एक जाणे ॥ ३ ॥
तुका म्हणे तुम्हां पाहिल्यावांचुनि । उगा चक्रपाणी काय काज ? ॥४

(२७९)

ज्ञानेसी विज्ञान रूपेसी सज्ञान । ध्यानेसी धारण हारपलें ॥ १ ॥
स्वरूप संपूर्ण वोळली हें खूण । नंदासी चिद्घन वोळली जें ॥ २ ॥
अरूपस्वरूप लक्षतां अमाप । नंदा दिव्यदीप पंढरिये ॥ ३ ॥
तुका म्हणे सदासद्भावनिर्मळ । प्रत्यक्ष केवळ ब्रह्मरूप ॥ ४ ॥

(२८०)
निरशून्यनभीं अर्क उगवला । सवेंचि बिंबला कृष्णरूपें ॥ १ ॥
पंढरीसी उभा गौळियाचें घरीं । नंदाचें खिल्लारीं खेळतसे ॥ २ ॥
रजतमा गिळी दृष्याकारहोळी । तदाकार पाळी संहारेसी ॥ ३ ॥
तुका म्हणे सार कैसें तें पहासीं । शरण संतासीं गेल्याविण ! ॥ ४ ॥

*प्रकरण ९ वे*

# ध्यान

(२८१)
राहो आतां हेंचि ध्यान । डोळां मनलंपट ॥ १ ॥
कोंडकोंडुनि तें जीवें । देहभावें पूजीन ॥ २ ॥
येणें होयें कळासिलें । स्थिरावलें अंतरीं ॥ ३ ॥
तुका म्हणे गोजिरिया । विठो पायां पडों द्या ॥ ४ ॥

(२८२)
पदोपदीं पायां पडोन । करुणा जाण भाकों ही ॥ १ ॥
ये गा ये गा विसांवया । करुणादयासागरा ॥ २ ॥
जोडूं आम्ही करकमळ । नेत्रीं जळ भरोनि ॥ ३ ॥
तुका दानपात्र दारी । आर्त हरि पुरवावें ॥ ४ ॥

(२८३)
दर्शनाचें आर्त जीवा । बहु देवा राहिलें ॥ १ ॥
आतां जाणसी ते करीं । विश्वंभरीसत्तेनें ॥ २ ॥
येथें जरी उरे चिंता । कोण दाता याहुनि ? ॥ ३ ॥
तुका म्हणे जाणवलें । आम्हीं भलें एवढें ॥ ४ ॥

(२८४)
माझें आतां सत्ते काय ? । तुझें पाय धरितो ॥ १ ॥
एकाविण नेणें दुजें । पंढरिराजें सर्वांगें ॥ २ ॥

पुरवावी केली आळी । जें जे काळीं मागेन ॥ ३ ॥
तुका म्हणे सुटसी कैसा ? । भरुनि दिशा राहिला ॥ ४ ॥

(२८५)
आम्ही आर्तभूत जीवीं । तूं गोसावी उदास ॥ १ ॥
वादावाद समर्थासी । काशानसीं करावा ? ॥ २ ॥
आम्ही मरों येरझारीं । स्वामी घरीं बैसिलें ॥ ३ ॥
तुका म्हणे करितां वाद । कांहीं भेद कळेना ॥ ४ ॥

(२८६)
पसरूनि राहों बाहो । सोयीं अहो तुमच्या ॥ १ ॥
आतां यावें लागवेगें । पांडुरंगें धांवत ॥ २ ॥
वैसायाची इच्छा कडे । पायीं खडे रूपती ॥ ३ ॥
तुका म्हणे कृपाळुवा । करूं सेवा लागलो ॥ ४ ॥

(२८७)
आम्ही जालों एकविधें । सुद्या सुदें असावें ॥ १ ॥
ययावरी तुमचा मोळा । तो गोपाळा अकळ ॥ २ ॥
उसणें घेतलें तें द्यावें । काय भावें विशेष ! ॥ ३ ॥
तुका म्हणे क्रियानष्ट– । परी* कष्ट घेतसां ॥ ४ ॥

* टीपः– क्रियानष्टपरी असा एक शब्द. सुदें = सरळ–शुद्ध.

(२८८)
फावलें तें तुम्हां मागें । पाय लागें पावलों ॥ १ ॥
आलों आतां उभा ठाये । जवळी राहें सन्मुख ॥ २ ॥
घरीं होती गोवी जाली । कामें बोली न घडे ॥ ३ ॥
तुका म्हणे धडफुडा । जालों झाडा द्यावया ॥ ४ ॥

(२८९)
भयाची तों आम्हां चित्तीं । राहो खंती शकेना ॥ १ ॥
समर्पिलों जीवेंभावें । काशा भ्यावें कारणें ? ॥ २ ॥

करीन तें कवतुकें । अवघें निकें शोभेल ॥ ३ ॥
तुका म्हणे माप भरूं । दिस सारूं कौतुकें ॥ ४ ॥
(२९०)
म्हणे मी पवितें । माप धनी ठेवी रितें ॥ १ ॥
देवा अभिमान नकों । माझें ठायीं देऊं शकों ॥ २ ॥
देशीं चाले शिक्का । रित्या कोण लेखी लेखा ॥ ३ ॥
हातीं सूत्रदोरी । तुका म्हणे त्याची थोरी ॥ ४ ॥
(२९१)
ध्यानीं ध्यातां पंढरिराया । मन पालटली काया ॥ १ ॥
तेथें बोला कैंची उरी ? । माझें मी–पण श्रीहरी ॥ २ ॥
चित्त–चैतन्यासी मिठी । अवघीं हरिरूप सृष्टी ॥ ३ ॥
तुका म्हणे सांगों काय ? । वृत्ति एकी हरिमय ॥ ४ ॥
(२९२)
निश्चळ बैसोनि करूं त्याचें ध्यान । देईल तो अन्न–वस्त्र दाता ॥ १ ॥
न लगे सांगणें मागणें तयासी । इच्छा ज्याची तैसी पुरवितो ॥ २ ॥
आम्हीं कां करावा अधिक संचय । ऋणी देवराय पुरविता ॥ ३ ॥
दयाळु मायाळु जाणे सर्व कळा । शरणागतलळा पाळूं जाणें ॥ ४ ॥
तुका म्हणे आम्ही सदैवाचें दास । करणें न लगे आस आणिकांची ॥५

*प्रकरण १० वें*

# मंगलाचरण

(२९३)
आधीं चित्त समर्पून । करूं मंगलाचरण ॥ १ ॥
स्थिर जाली हें भावना । तुमचें कृपें नारायणा ॥ २ ॥
सर्वभूतीं वसे देव । विठ्ठल हा वासुदेव ॥ ३ ॥
ऐसा सांडोनी सोहळा । कोण बैसे झांकोन डोळा ! ॥ ४ ॥

शुक नारद आदिक । आले कथेसी ग्राहक ।। ५ ।।
प्रेम सगुणनिर्गुण । तुका आरंभी कीर्तन ।। ६ ।।

(२९४)

गाये नाचे रंगीं । शक्ति अद्‌भुत ये अंगीं ।। १ ।।
हें तों देणें तुमचें देवा । घ्यावी अखंडित सेवा ।। २ ।।
प्रेमाचें भरतें । नेघे उतार चढते ।। ३ ।।
तुका म्हणे वाणी । नामअमृताची खाणी ।। ४ ।।

(२९५)

करोनि उचित । प्रेम घालीं हृदयांत ।। १ ।।
थोर करूनियां आस । आलों दान मागायांस ।। २ ।।
कीर्तनसमयीं । सेवा आपुलीच देईं ।। ३ ।।
तुका म्हणे भावें । मज निरवावें देवें ।। ४ ।।

(२९६)

हेंचि वारंवार । पडताळुनी घे उत्तर ।। १ ।।
करितों पायांसीं विनंती । नुपेक्षावें कमळापती ।। २ ।।
गंगोदकें गंगें । अर्घ्य द्यावें पांडुरंगे ।। ३ ।।
जोडोनियां हात । तुका करी प्रणिपात ।। ४ ।।

(२९७)

केली स्तुतिनिंदा । तुम्ही जाणां हे गोविंदा ।। १ ।।
आम्हां लडिवाळांचें बोल । करा कौतुकनवल ।। २ ।।
बोबड्या उत्तरीं । तुम्हां रंजवितो हरी ।। ३ ।।
मागतों भातुकें । तुका म्हणे कवतुकें ।। ४ ।।

(२९८)

जाळी महादोष । पुढें नाहीं गर्भवास ।। १ ।।
पुराणप्रसिद्ध हे सीमा । नाम-तारक महिमा ।। २ ।।
निंदिलें जें शास्त्रें । वंद्य केलें नाममात्रें ।। ३ ।।
तुका म्हणे ऐसा । त्रिभुवनीं नामठसा ।। ४ ।।

(२९९)
आपुला हा लाहो करूं । केणें भरूं विठ्ठल ।। १ ।।
भाग्यें पावलों या ठाया । करूं कायाकुर्वंडी ।। २ ।।
पुढती कोठें घडे ऐसें ? । बहुता दिसें फावलें ।। ३ ।।
तुका म्हणे चरणजोडी । क्षणी घडी विसंभों ।। ४ ।।
(३००)
आळी सलगी पायांपासीं । होइल तैसी करीन ।। १ ।।
आणीक आम्हीं कोठें जावें ? । येथें जीवें वेचलों ।। २ ।।
अवघ्या निरूपणा भाव । हाचि ठाव उरला ।। ३ ।।
तुका म्हणे पाळीं ळळे । श्रीकृपाळेविठ्ठले ।। ४ ।।
(३०१)
अवघ्या उपचारा । एक मनचि दातारा ।। १ ।।
घ्यावी घ्यावी माझी सेवा । दीनदुर्बळाची देवा ।। २ ।।
अवघियाठाव § । पायांवरी जीवभाव ।। ३ ।।
चित्ताचें आसन । तुका करितो कीर्तन ।। ४ ।।

§ टीपः– अवघियाठाव = सर्वार्थे सर्वतोपरीनें
(३०२)
अंतरींचें ध्यान । मुख्य यानांवें पूजन ।। १ ।।
उपाधि ते अवघें पाप । गोड निरसावें संकल्प ।। २ ।।
जाणतो हे वर्म । आज्ञा पाळावी हा धर्म ।। ३ ।।
तुका म्हणे वृत्ति । अवीट हे सहजस्थिती ।। ४ ।।
(३०३)
नेणे देवा कोणी । आम्हां भाविका वांचुनी ।। १ ।।
रूप आवडे आम्हांसी । तैसा होसी हृषीकेशी ।। २ ।।
भावें बळिवंत । तुज घालूं हृदयांत ।। ३ ।।
तुका म्हणे हाक । देतां पावसी जवळिक ।। ४ ।।

## भजनवृत्ति निर्माण करण्यासाठीं इंद्रियानां प्रेरणा

(३०४)
वेई माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ।। १ ।।
मना तेथें धांव घेईं । राहें विठोबाचें पायीं ।। २ ।।
घ्या रे डोळे–सुख । पाहा विठोबाचें मुख ।। ३ ।।
आइका रे कान । माझ्या विठोबाचें गुण ।। ४ ।।
तुका म्हणे जीवा । नको सोडूं या केशवा ।। ५ ।।

(३०५)
न पुरे वर्णितां । धणी दृष्टी न्याहाळितां ।। १ ।।
बरवा बरवा पांडुरंग । कांति सांवळी सुरंग ।। २ ।।
मंगळाचें सार । सुखसिद्धीचें भांडार ।। ३ ।।
तुका म्हणे सुखा । नाहीं अंतपारलेखा ।। ४ ।।

(३०६)
एक भाव चित्तीं । तरी न लगती युक्ती ।। १ ।।
ऐसें कळों आलें जीवें । मज माझियाची भावें ।। २ ।।
आठवचि पुरे । सुख अवघें मोहरें† ।। ३ ।।
तुका म्हणे मन । पूजा इच्छी नारायण– ।। ४ ।।

† टीपः– मोहरे = मोहोराप्रमाणें फुलून उठणें–भरभरून अनंत उर्मीनें होणें

(३०७)
तुझें वर्म ठावें । माझ्या पाडियेलें भावें ।। १ ।।
रूप कासवीचें परी । पाहे धरूनि अंतरीं ।। २ ।।
नेदी होऊं तुटी । दृष्टा मेळवीन दृष्टी ।। ३ ।।
तुका म्हणे देवा । तुझें चिंतन ते सेवा ।। ४ ।।

(३०८)
आइत्या या राशी । आलों सिद्धपाकां–पाशीं ।। १ ।।
आतां सांडोनि भोजन । भिके जावें वेडेपण ।। २ ।।

उसंतिली वाट। मागें परतावें फुकट ॥ ३ ॥
तुका म्हणे वाणी। वेचों बैसोनि ठाकणी ॥ ४ ॥
(३०९)
बोलणेंच्नि नाहीं। आतां देवाविण कांहीं ॥ १ ॥
एकसरें केला नेम। देवा दिले क्रोधकाम ॥ २ ॥
पाहेन ते पाय। दृष्टी जोंवरी हे धाय ॥ ३ ॥
तुका म्हणे मनें। हाचि संकल्प वाहाणें ॥ ४ ॥
(३१०)
दाता नारायण। स्वयें भोक्ता ही आपण ॥ १ ॥
आतां काय उरलें वाचे–। पुढें शद्व बोलायाचें ? ॥ २ ॥
देखती सोहोळे। रूप आपुलेंचि डोळे ॥ ३ ॥
तुका म्हणे नाद। जाला अवघा गोविंद ॥ ४ ॥
(३११)
करावें कीर्तन। मुखें गावे हरिगुण ॥ १ ॥
मग कांहीं नव्हे बाधा। काम–दुर्जनाची क्रोधा ॥ २ ॥
शांतिखड्ग हातीं। काळसत्ता नागविती ॥ ३ ॥
तुका म्हणे सखा। दाता अनंतासारिखा ॥ ४ ॥
(३१२)
आवडीच्या कोडें। गाऊं कीर्तनीं पवाडे ॥ १ ॥
हरि गोविंद गोपाळ। गातां आनंदकल्लोळ ॥ २ ॥
ताल नृत्य छंदें। टाळी आवडी विनोदें ॥ ३ ॥
तुका म्हणे भेद। गेला अवघा गोविंद ॥ ४ ॥
(३१३)
रंग मांडिला रंगणीं। उभा ठाकलों किर्तनीं ॥ १ ॥
हातीं घेऊनियां विणा। कंठीं राहे नारायणा ॥ २ ॥
तुझी देखियली मूर्ती। माझे जीवाची विश्रांती ॥ ३ ॥
तुका म्हणे द्यावा देवा। मज कीर्तनाचा हेवा ॥ ४ ॥

(३१४)
आतां राहो हेंचि ध्यान । समाधान चित्तासी ।। १ ।।
भाळीं लावोनियां बुका । जगव्यापका पुजिलें ।। २ ।।
गळां घालोनियां माळा । चरणीं भाळा ठेविलें ।। ३ ।।
तुका म्हणे प्रेमभरें । नमस्कारे विठ्ठला ।। ४ ।।

*प्रकरण ११ वे*

# देव आळवण

## दर्शनोत्सुकता

(३१५)
नेत्रासी वासना । तुज पाहों नारायणा ।। १ ।।
करी यांचें समाधान । काय ऐसा अनमान ? ।। २ ।।
भेटों देवराया । हेंचि इच्छिताती बाह्या ।। ३ ।।
जावें पंढरिसीं । हेंचि ध्यान या मानसीं ।। ४ ।।
चित्त म्हणे पायीं । तुझें राहीन निश्चयीं ।। ५ ।।
तुका म्हणे यांचा । भाव पुरवी तूं साचा ।। ६ ।।
(३१६)
मन उताविळ । जालें न राहे निश्चळ ।। १ ।।
दे रे भेटी देवराया । उभारोनि चारी बाह्या ।। २ ।।
सर्वांग तळमळी । हातपाय रोमावळी ।। ३ ।।
तुका म्हणे कान्हा । भूक लागली नयना ।। ४ ।।
(३१७)
होऊनि साकार । रूप दाखवी सुंदर ।। १ ।।
दावी म्हणसी अवस्था ? । तैसें नको गा अनंता ।। २ ।।
मृगजळापरी । आतां तैसें तूं न करी ।। ३ ।।
तुका म्हणे हरी । कामा नये बाह्यात्कारी ।। ४ ।।

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ...

अनुक्रम........................ दि: ..................
क्रमांक........................ नों दि ..........

(३१८)

अझुनि विठ्ठला काय पाहातोसी ? । सत्वर धांवसी पांडवासी ।। १ ।।
आतां तरी कृपा करा पांडुरंगा । नकों देऊं भंगा दर्शनासी ।। २ ।।
तुका म्हणे ऐसें करूं नकों देवा । नाहीं केली सेवा म्हणोनियां ।। ३ ।।

(३१९)

आतां काशासाठीं दुरी– । अंतर उरी राखिली ? ।। १ ।।
करी लवकरी मुळ । लाहाणें तळमळीच्या ।। २ ।।
दोहींठायीं उद्वेगणें । दरूषणें निश्चिती ।। ३ ।।
तुका म्हणे वेग व्हावा । ऐसी जीवा उत्कंठा ।। ४ ।।

(३२०)

अंबरीष अक्रुरासी । रुक्मांगद प्रल्हादासी ।। उद्धवव्यासासी । दाविलेसी रूपडे ।। १ ।। तें मी पाहीन पाहीन । तुझे श्रीमुख चरण ।। उताविळ मन । त्याकारण वेधलें ।। २ ।। जळीं वसुदेवा करीं । कैसा शोभला मुरारी ।। विदुराच्या करीं । कण्या धरी कौतुकें ।। ३ ।। स्मरतां पांडवीं आकांती । तेथें धांवसी श्रीपति ।। बिरडे द्रौपदी । यागीं बांधी चोळीचें ।। ४ ।। करी गोपीचें कौतुक । गाईगोपाळासी सुख ।। दावी ते सन्मुख । मज मुख आपुलें ।। ५ ।। तूं तों अनाथांचा दाता । मागतियां शरणागतां ।। तुका म्हणे आतां । पुरवी आर्त मनींच्या ।। ६ ।।

(३२१)

जाळोनि संसार बैसलों अंगणीं । तुझें नाहीं मनींमानसींही ।। १ ।।
न लगे हे मज तुझें ब्रह्मज्ञान । गोजिरे सगुण पढिये रूप ।। २ ।।
लागला उशीर पतितपावना । विसरोनि वचना गेलासि मा ।। ३ ।।
तुका म्हणे नकों रागेजों विठ्ठला । उठी देई मला भेटी आतां ।। ४ ।।

(३२२)

लोकमान देहसुख । भोगसंपत्ति अनेक ।। विटंबणा दुःख । तुझें भेटीवांचुनि ।। १ ।। तरी त्वरें मज भेट । काय ठाकलासी नीट ? ।। थोरपुण्ये वीट । तुझी दैवें लाधली ।। २ ।। ज्ञान काय ते कोरडे ? । रितें मावेचें मापाडें ।। भेटीविण कुडे । तुझें घडे मजसी ।। ३ ।। आत्मस्थितीचा विचार । कैंवी करूं हा निर्धार ? ।। न देखतां धीर । न धरवें कंहींच ।।४।। रिद्धिसिद्धि काय करूं ? । काय आगमीं विचारु ? ।। भेटीविण भारु । मज वाटे तयांचा ।। ५ ।। तुजविण कांहीं व्हावें । ऐसें नको माझें जीवें ।। तुका म्हणे द्यावें । दरूषण पायांचें ।। ६ ।।

(३२३)

दीनाचें धांवणें । कंई कृपा करिसी नेणें ? ।। १ ।।
भेटीलागीं पंढरिनाथा । जीवीं तळमळव्यथा ।। ३ ।।
सिणलें हें मन । वाट पाहातां लोचन ।। ३ ।।
तुका म्हणे भूक । तुझें पाहावें श्रीमुख ।। ४ ।।

(३२४)

क्षेम दे ! या लाहो । पाहे स्फुरताती बाहो ।। १ ।।
आतां झडझडा चाले । येई उचलोनि पाउलें ।। २ ।।
सांडी हंसगती । बहु उत्कंठा हे चित्तीं ।। ३ ।।
तुका म्हणे आई । पांडुरंगे विठाबाई ।। ४ ।।

(३२५)

धांव घाली आई ! । आतां पाहातेसी कांई ? ।। १ ।।
धीर नाहीं माझें पोटीं । जालों वियोगें हिंपुटी ।। २ ।।
करावें सीतळ । बहु जाली हळहळ ।। ३ ।।
तुका म्हणे डोयी । कधीं ठेवीन मी पायीं ।। ४ ।।

(३२६)

दर्शनाची आस । आतां न साहे उदास ॥ १ ॥
जीव आला पायांपाशीं । येथें असें कलेवरेंसीं ॥ २ ॥
कांहींच नाठवे । ठायीं बैसलें नुठवे ॥ ३ ॥
जीव सत्ता पाहीं । तुका टकावला ठायीं ॥ ४ ॥

(३२७)

पाचारितां पावे । ऐसी ठायींची हे सवे ॥ १ ॥
बोले करुणावचनीं । करी कृपा लावी स्तनीं ॥ २ ॥
जाणे कळवळा । भावसिद्धिचा जिव्हाळा ॥ ३ ॥
तुका म्हणे नाम । मागें मागें धांवे प्रेम ॥ ४ ॥

प्रकरण १२ वे

# निष्ठा निर्भयता

(३२८)

आतां मी न धरीं धाक । कोणी एक जीवाचा ॥ १ ॥
विठ्ठल एक माझा धनी । कोण मानी कळिकाळ ? ॥ २ ॥
पडों जीवासी आघात । पायीं चित्त ठेविलें ॥ ३ ॥
तोंचि एक वरिला स्वामी । दृढ आम्ही निश्चयें ॥ ४ ॥
तुका म्हणे नसे चिंता । धाक आतां कोणाचा ॥ ५ ॥

(३२९)

आम्ही आतां निर्भय जालों । जिंकुनि आलों कळिकाळ ॥ १ ॥
नामें एका विठोबाच्या । यश आमुच्या पाठिशीं ॥ २ ॥
मागेंपुढें सांभाळिलें । सफळ जालें कर्तव्य ॥ ३ ॥
तुका म्हणे सत्ता शिरीं । निर्भय करी सेवका ॥ ४ ॥

(३३०)
नकां धरूं भय धाक । हरि एक चिंतावा ॥ १ ॥
काय करील कळिकाळ ? । अंगीं बळ तयाचें ॥ २ ॥
केणे तरी हेंचि खरें। नाम बरें हरिचें ॥ ३ ॥
तुका म्हणे सरिसें* सरिसे । विठ्ठल ऐसे सांगतों† ॥ ४ ॥

*टीप:– सरिसें=बरोबर, सह. स+रीस म्हणजें उबग, वैराग्य–आणि †सांगतो = सांगतो व स + अंग तो असे द्विविध अर्थ करणें आवश्यक आहे.

(३३१)
बंध तुटे मायाजाळ । होती सकळ सोपारी ॥ १ ॥
नाम एक विठोबाचें । घेतां वाचे मन निवे ॥ २ ॥
दास्य करी कळिकाळ । होय सफळ व्यापार ॥ ३ ॥
रिद्धिसिद्धि म्हणियारी । सदा दारीं तिष्ठती ॥ ४ ॥
तुका म्हणे नाहीं फार । हा विचार पुराणीं ॥ ५ ॥

(३३२)
सत्ता समर्थ जगदानी । चक्रपाणी एक जो ॥ १ ॥
तया विसरुं नकां कोणी । जें पुराणीं वर्णिती ॥ २ ॥
तारीमारी सृष्टीक्रम । पुरुषोत्तम एकला ॥ ३ ॥
तुका म्हणे काळ पाहे । धाक वाहे जयाचा ॥ ४ ॥

(३३३)
धरावें तों भय । जाती अंतरोनि पाय ॥ १ ॥
जाल्या तुटी देवासवें । काय वांचोनि करावें ? ॥ २ ॥
कोणासी पारिखें । लेखूं आपणासारिखें ? ॥ ३ ॥
तुका म्हणे असों । दुजा भाव आतां नसों ॥ ४ ॥

(३३४)
निर्भर ते हरिदास । चिंता आस वेगळें ॥ १ ॥
अवघियांचा एकीं ठाव । सर्व भाव विठ्ठलीं ॥ २ ॥

निरविलें तेव्हां त्यांस । जाला वास त्यामाजी ॥ ३ ॥
तुका म्हणे रूप ध्यावें । नाहीं ठावें दुर्गुण ॥ ४ ॥

प्रकरण १३ वें

# ब्रह्मानुभूति

(३३५)
पाहातां ठायाठाव । जातो अंतरोनि देव ॥ १ ॥
नये वाटों गुणदोषीं । मन जतन येविशीं ॥ २ ॥
देह परिचारा । जनीं जनार्दन खरा ॥ ३ ॥
तुका म्हणे धीरें– । विण कैसें होते बरें ? ॥ ४ ॥

(३३६)
नाहीं रूप नाहीं नांव । नाहीं ठाव धराया ॥ १ ॥
जेथें जावें तेथें आहे । विठ्ठल मायेबहिण ॥ २ ॥
नाहीं आकारविकार । चराचर भरलें ॥ ३ ॥
नव्हे निर्गुणसगुण । जाणे कोण तयासी ? ॥ ४ ॥
तुका म्हणे भावाविण । त्याचें मन बोळेना ॥ ५ ॥

(३३७)
आहे सकळांवेगळा । खेळे कळा चोरोनि ॥ १ ॥
कळसूत्र्याचिये परी । देव दोरी हालवी ॥ २ ॥
स्वयें राहोनि निराळा । कैसी कळा नाचवी ॥ ३ ॥
जेव्हां आसुडितो दोरी । भूमीवरी नाचवी ॥ ४ ॥
तुका म्हणे तो जाणावा । सखा सावा आपुल्या ॥ ५ ॥

(३३८)
अभिमानी पांडुरंग । गोवा मग काशाचा ? ॥ १ ॥
अनुसरा लवलाहीं । नका कांहीं विचारूं ॥ २ ॥

कोठें राहातील पापें । अनुतापें न्हालिया ।। ३ ।।
तुका म्हणे येचि घडी । उभा थडी पाववी ।। ४ ।।

(३३९)

पातां ठाव एक दिसें । ऐसा असें व्यापक ।। १ ।।
ज्याचात्यासी मिळणीं मिळे । तरी खेळे भोरपी ।। २ ।।
जाणिवेंचें नेदी अंग । दिसों रंगविहीन ।। ३ ।।
तुका म्हणें येंचिठायीं । हे तों नाहीं अन्यत्र ।। ४ ।।

(३४०)

दृष्ट कान्ति निवती डोळे । हे सोहळे श्रीरंगीं ।। १ ।।
अंतर्बाह्यविलेपन । हें भूषण मिरविणें ।। २ ।।
इच्छेऐसी धणी पुरे । विश्वंभरेजवळीं ।। ३ ।।
तुका करी नारायणा । या सेवन नामाचें ।। ४ ।।

(३४१)

सुकाळ हा निशीदिनीं । नित्य धणी नवीच ।। १ ।।
करूनि सेवूं नानापरी । राहे उरी गोडीनें ।। २ ।।
सरे ऐसा नाहीं झरा । पंक्ति करा समेत ।। ३ ।।
तुका म्हणे वरवा पान्हा । माय कान्हाबाईचा ।। ४ ।।

(३४२)

ब्रह्मरसीं लीनचित्त । अखंडित आनंदु ।। १ ।।
गीतपंक्ती विश्वंभरीं । जाला हरि सोयरा ।। २ ।।
वोळखी ते एकानांवें । अन्यभावें खंडणा ।। ३ ।।
तुका म्हणे नामरूपें । गेली पापें दुसरीं ।। ४ ।।

(३४३)

मी हें ऐसी काय जाती । आहे कीर्ति पहातां ? ।। १ ।।
नाहीं होत उल्लंघन । नसतां भिन्न दुसरें ।। २ ।।

अंतरानें तेज नेलें । दृष्टीखालें अंधार ॥ ३ ॥
तुका म्हणे सर्वे देव । घेतां ठाव दाविल ॥ ४ ॥
(३४४)
जीविता तो माझा पिता । तो उखता उखत्यांचा ॥ १ ॥
जनार्दनीं सरतीं कर्मे । बाधा भ्रमे अन्यथा ॥ २ ॥
अपसव्यसव्यामधीं । ऐसी शुद्धी धरितां ॥ ३ ॥
तुका म्हणे खांद्यापानें । कोरडी भिन्ने सिंचता ॥ ४ ॥
(३४५)
वदे साक्षित्वेसी वाणी । नारायणीं मिश्रित ॥ १ ॥
न लगे कांहीं चाचपावें । जातों भावें पेरीत ॥ २ ॥
भांडार त्या दातियाचें । मी ते कैंचें ये ठायीं ? ॥ ३ ॥
सादावित गेला तुका । येथें एकाएंकित्वें ॥ ४ ॥
(३४६)
पाहा दैवत हें कैसें । भक्तिपिसें भाविक ॥ १ ॥
पाचारिल्यासरिसें पावे । ऐसें सेवें बराडी ॥ २ ॥
शुष्ककाष्टीं गुरगुरी । लाज हरी धरीना ॥ ३ ॥
तुका म्हणे अर्धनारी । ऐसी धरीं रूपडीं ॥ ४ ॥
(३४७)
एकल्या नव्हे खेळ सांग । धरिला संग म्हणोनि ॥ १ ॥
उमटे तेव्हां कळे नाद । भेदाभेदनिवाडे ॥ २ ॥
अदुसरा एकऐसा । न वजें रिसा निकुरें ॥ ३ ॥
तुका म्हणे कळत्या कळे । खेळ खेळे येर तो ॥ ४ ॥
(३४८)
नव्हतियाचा सोस होता । झाडों आतां पदर ॥ १ ॥
देखणें तें देखियेलें । आतां भलें साक्षित्वें ॥ २ ॥
कळों आली लाभहानी । राहों दोन्ही निराळीं ॥ ३ ॥
तुका म्हणे एकाएकीं । या लौकिकीं पसारा ॥ ४ ॥

(३४९)
व्यापक हा विश्वंभर । चराचर याचेनि ॥ १ ॥
पंढरीराव विठेवरी । त्याची धरी पाउलें ॥ २ ॥
अवघियासी हाचि ठाव । देवीदेव सकळां ॥ ३ ॥
तुका म्हणे न करी सोस । भेदें दोष उफराटे ॥ ४ ॥
(३५०)
गुणा आला विटेवरी । सूत्रधारी सुंदर ॥ १ ॥
डोळे कान त्याच्या ठायीं । मन पायीं राहों हें ॥ २ ॥
निवारोनि जाय माया । ऐसी छाया जयाची ॥ ३ ॥
तुका म्हणे समाधान । ते हे चरणसुकुमार ॥ ४ ॥
(३५१)
बारा गांव पाणी जाळी । समुद्रांत ज्वाळमाळी ॥ १ ॥
राहे उदधिउदरीं । हरीआज्ञा पाळीं शिरीं ॥ २ ॥
नुलंघवे ते मर्यादा । सागरासी काळीं–कदा ॥ ३ ॥
वाउगी हे पृथ्वी शिरीं । वागवीत निरंतरीं ॥ ४ ॥
तुका म्हणे सर्वसत्ता । एक हरी जगत्राता ॥ ५ ॥
(३५२)
चंद्रसूर्य फिरताती । वायुचक्रीं राहाटती ॥ १ ॥
नाहीं आकाशा टेंकण । कोठें समीरासी स्थान ॥ २ ॥
सर्वचाळक श्रीहरी । सर्वा सर्वसत्ता धरीं ॥ ३ ॥
तो हा विठ्ठल सांवळा । तुका म्हणे विश्वडोळा ॥ ४ ॥
(३५३)
डोळियांत डोळा कोण ? । मूढ न जाणती–जन ॥ १ ॥
वाचा वदविता कोण ? । चळे वळे कैसा प्राण ? ॥ २ ॥
मन इंद्रियें सकळ । कोण्या वर्तताती बळ ? ॥ ३ ॥
अन्नउदकपचन । केंवि होय तें क्षाळण ? ॥ ४ ॥
तुका म्हणे हरीसत्ता । प्रतिपाळी सर्वभूतां ॥ ५ ॥

(३५४)
आठवणे नाटवणे । होते हरीचें कृपेनें ॥ १ ॥
जीवजंतु आचरती । तया कैंची आपमती ? ॥ २ ॥
भुंगी आदि ब्रह्मादिक । सत्ता विठ्ठल चालक ॥ ३ ॥
तुका म्हणे सत्ता जाणे । तोचि नर नारायणे ॥ ४ ॥
(३५५)
धन्य तयाची जननी । जया वश चक्रपाणी ॥ १ ॥
धन्य तोचि त्रैलोक्यांत । जाला आपण अद्वैत ॥ २ ॥
जाला शून्य भेदभाव । जनीं वनीं रमाधव ॥ ३ ॥
तुका म्हणे अवतार । ऐसा नर तो शंकर ॥ ४ ॥
(३५६)
प्रती देहीं नाम भिन्न । ठेविती ते साभिमान ॥ १ ॥
देहीं देह काय आहे ? । ज्ञानबोध लोपलाहे ॥ २ ॥
न विचारी कोणी कोणा । विसरले रामराणा ॥ ३ ॥
तुका म्हणती देहाला । असो याची लज्जा तुला ॥ ४ ॥
(३५७)
गेलें बाळपण खेळीं । खातां हिंडता सकळीं ॥ १ ॥
तारुण्याचा भर गेला । विष–विषयो भोगिला ॥ २ ॥
वृद्धपण अंगीं आलें । प्राणी हीनदीन जालें ॥ ३ ॥
शत वरुषांची माती । केलों विणें–रघुपती ॥ ४ ॥
तुका म्हणे नारायण । तया अंतरला जाण ॥ ५ ॥
(३५८)
वृद्धपणीं माळ धरी । ज्ञान नाहीं तिळभरी ॥ १ ॥
आधीं बुडविलें सर्व । अंतीं आलें यमपर्व ॥ २ ॥
प्राप्त जाला तृषाकाळ । कूप खणीतो गयाळ ॥ ३ ॥
क्षुधा लागली गव्हारा । तेव्हां पेरीतो बाजरा ॥ ४ ॥
तुका म्हणे माझा हरी । राहे अभाग्यासी दुरी ॥ ५ ॥

(३५९)
ऐसी नको तें संपत्ती । जेणें पावे अधोगती ।। १ ।।
नको आसुरीचा संग । अंतरेल पांडुरंग ।। २ ।।
दैवी संपत्ती असावी । गोडी ईश्वरीं लागावी ।। ३।।
तुका म्हणे साधुसंत । मज बहु आवडत ।। ४ ।।
(३६०)
गुरुविणें पार होणें । न घडेचि मूढजनें ।। १ ।।
यज्ञ तप दान केलें । चारी वेद अभ्यासिलें ।। २ ।।
अधिकचि गुंता जाला । अहंकार विरूढला ।। ३ ।।
भोग मोक्ष तया येती । अंतीं नेती अधोगती ।। ४ ।।
तुका म्हणे तया नरा । हरी न मिळे सोयरा ।। ५ ।।
(३६१)
केला सोयरा श्रीहरी । तया नाहीं जन्मफेरी ।। १ ।।
जाला निर्भय अंतरीं । गुरुदेवदास्य करी ।। २ ।।
आत्मज्ञान पाउनियां । रत जाला हरिपायां ।। ३ ।।
तुका म्हणे जोडियेलें । तेणें धन जें आपुलें ।। ४ ।।
(३६२)
निजधन ठेवी भारी । न पुसती नरनारी ।। १ ।।
नारदादी वडिलानीं । हंडा ठेविला गाडोनी ।। २ ।।
आहे हृदयमंदिरीं । न पाहातां जाये दुरी ।। ३ ।।
जालें ठाउकें जयाला । गुरुकृपें तोचि धाला ।। ४ ।।
तुका म्हणे निवडती । थोडे फार भुललेती ।। ५ ।।
(३६३)
पूर्वदोष आड येती । हरीपायीं नाहीं प्रीति ।। १ ।।
बळें घाली तो अघोरीं । संतगुरुनिंदा करी ।। २ ।।
दासीलागीं वेंची धन । धर्म नाहीं मुष्टिअन्न ।। ३ ।।
तुका म्हणे निरुपायें । कर्म बळिवंत होये ।। ४ ।।

(३६४)
माता अंगिकारी बाळा । त्याचा पुरविते लळा ॥ १ ॥
तेणें बळें अरण्यांत । त्यागें जातां होय घात ॥ २ ॥
तयेपरी हरिविण । पापी नुद्धरती दीन ॥ ३ ॥
तुका म्हणे पराधीन– । जीव हरीचे स्वाधीन ॥ ४ ॥

(३६५)
पराधीनता जाणावी । अहंकृती बुडवावी ॥ १ ॥
तेथें सर्वसत्ता वसे । प्रीति धरितां मीवशे ॥ २ ॥
दोहीं हातीं टाळी वाजे । एके हातें काय साजे ? ॥ ३ ॥
देवभक्त दोहींकडे । प्रीति परस्परें जोडे ॥ ४ ॥
तुका म्हणे जैसा भाव । तैसा आहे रमाधव ॥ ५ ॥

(३६६)
त्राता मेघ चातकाचा । तेवि विठ्ठल दासांचा ॥ १ ॥
घडी पळ सांभाळित । प्रेमळासीं दयावंत ॥ २ ॥
आदि अंतीं पायांपासीं । ठेवी माउली कां जैसी ॥ ३ ॥
तुका म्हणे भात्र पोटीं । तयापासीं जगजेठी ॥ ४ ॥

(३६७)
भ्रमताती सर्व भूतें । आपुलालिये संचितें ॥ १ ॥
क्रियमाण पूर्वफळ । भोग भोगिती बहळ ॥ २ ॥
जो कां योगनिष्ठ होय । तोचि धरी हरीपाय ॥ ३ ॥
जागा होउनी सुटला । जन्ममरणा मुकला ॥ ४ ॥
तुका म्हणे ठेवा जैसा । येतो उपेगासी तैसा ॥ ५ ॥

(३६८)
जन्मवरी कुटुंबासी । पाळियेलें अहर्निशी ॥ १ ॥
झिजउनी स्वयें अंग । सत्य मानियेला संग ॥ २ ॥

कामा नये कोणी अंतीं । देह स्मशानीं जाळिती ॥ ३ ॥
हरीविण व्यर्थ गेला । प्राणी पूर्ण नागवला ॥ ४ ॥
तुका म्हणे अनहित । ज्याचें त्यानें केलें सत्य ॥ ५ ॥

(३६९)

जन्मवरी यातीकेली † । हरिभक्ति आराधिली ॥ १ ॥
जालीं अप्रीत सकळ * । हारपली तळमळ ॥ २ ॥
इहामूत्रत्याग § केला । आत्मरूपीं सुखी जाला ॥ ३ ॥
तुका म्हणे पुण्यवंत– । ध्यानें पावला अनंत ॥ ४ ॥

टीपः– † यातीकेली केली = प्राप्त जातीकर्म हा केली म्हणजें ईश्वरी खेळ समजून खेळला. *सकळ = ज्ञानाची जाणीव – आठवण असणारी अवस्था. § इहामुत्र = इहलोकीं व परलोकीं सुखी रहावें ही देहवासना.

(३७०)

हरीध्यान कर्म तोडी । पडे अमृतानें बेडी ॥ १ ॥
पुण्य क्षीण होतां आले । मृत्युलोकीं ते जन्मले ॥ २ ॥
पुनरपि जन्ममृत्य– । भोग भोंगिती अमित ॥ ३ ॥
तुका म्हणे नारायण– । नामें तुटतें बंधन ॥ ४ ॥

(३७१)

जन्मवरी केलें ध्यान । अंतीं तेचि आठवण ॥ १ ॥
आळी भिंगुरटी जाली । पूर्वदेह विसरली ॥ २ ॥
गुरुभक्तहरीपाय । निशिदिनीं ध्यात जाय ॥ ३ ॥
तुका म्हणे आत्मपद । चित्तीं त्यास दे गोविंद ॥ ४ ॥

(३७२)

अष्टधातु वेगळाली । सोनें आटवीतां गेली ॥ १ ॥
सोनें सोनियांत मिळे । दुजें घातले वितुळे ॥ २ ॥
संत आणि तो अधम । कल्पकोटी * नोहे सम ॥ ३ ॥
शुभ्र हिरा आणि गार । मोलभेद अनिवार ॥ ४ ॥
तुका म्हणे पूर्णयोगी । तोचि मिळे पांडुरंगीं ॥ ५ ॥

* टीपः– अर्थ कल्पकोटी गेल्या तरी तो अधम संतकोटी (जाती) सम नोहे.

(३७३)
आत्मसुख सर्वां सम । परी प्राक्तन विषम ।। १ ।।
ज्ञानस्वरूप होउनी । ठातां भोगिती उन्मनी ।। २ ।।
मीतूंपण विसरलें । निजतत्वीं सुखीं जाले ।। ३ ।।
शेष उरलें प्रारब्ध । सारील ते निजबोध ।। ४ ।।
तुका म्हणे परंपरा । राम करिती सोयरा ।। ५ ।।

(३७४)
सखा सोयरा श्रीराम । जया हाचि धर्मनेम* ।। १ ।।
जनीं वनीं राम डोळां । त्याचे बैसला सांवळा ।। २ ।।
ऐसें अविनाश रूप । हाचि विठ्ठल चिद्रूप ।। ३ ।।
तुका म्हणे डोळेभरी । भक्त पाहाती श्रीहरी ।। ४ ।।

* टीप:– नेमधर्म = नित्य उपासना विधी. धर्मनेम = उपासनेचें लक्षस्थान

(३७५)
तीर्थातीर्थ हरिपाय । नामें तेंचि–रूप होय ।। १ ।।
स्नान तेचि उपरति । भक्ति होय अद्वय ती ।। २ ।।
अप्रियता ते विरक्ति । सर्व ठायीं अनासक्ति ।। ३ ।।
सुख तेचि अकर्तृत्व । आहे जैसें अनादित्व ।। ४ ।।
तुका म्हणे हा सिद्धान्त । वेदराज बोले अंत ।। ५ ।।

(३७६)
ध्येयध्यानध्याता होये । पूजाभेद करिताहे ।। १ ।।
ध्येय देव हा वरिष्ठ । ध्याता आपण कनिष्ठ ।। २ ।।
ध्यान पूजन प्रेमळ । जाली त्रिपुटी सकळ ।। ३ ।।
तुका म्हणे कच्चेपण । नेणें अद्वइत ज्ञान ।। ४ ।।

(३७७)
अद्वइतहरीपाय । गुरुगम्य ज्ञान होय ।। १ ।।
आत्मप्रतिती वांचोनी । पूर्णबोध कैंचा मनीं ? ।। २ ।।

गुरुकृपाअनुभव। एक जालिया सदैव ॥ ३ ॥
तुका म्हणे पूर्वपुण्यें। आत्मप्राप्ती–धन्य होणें ॥ ४ ॥

(३७८)
जया पाहिजे कल्याण। तेणें ध्यावा नारायण ॥ १ ॥
सर्व वासनेचा त्याग। करी शुद्ध अंतरंग ॥ २ ॥
धरी सद्‌गुरुवचन। करी नामसंकीर्तन ॥ ३ ॥
समाधान जोडे येणें। पूर्णसिद्धि तुका म्हणे ॥ ४ ॥

(३७९)
धन्य पुत्र माये पोटीं। निपजला रत्नकोटी ॥ १ ॥
हरीरूप आंगें जाला। ज्ञानस्वरूप शोभला ॥ २ ॥
कोटी ब्रह्मांडाचा धनी। प्रकाशक स्वयं मानी ॥ ३ ॥
तिळभरी अहंकार। नाहीं नये वृत्तीवर ॥ ४ ॥
तुका म्हणे पूर्णपणीं। आपण तो जनीं वनीं ॥ ५ ॥

(३८०)
हा विजयी नारायण। याचें करी जो चिंतन ॥ १ ॥
तया न विसंबे देव। दीनरक्षक माधव ॥ २ ॥
न पाहेचि कुळयाती। भाविकासी धरी हातीं ॥ ३ ॥
तो हा विठ्ठल चिद्घन। तुका म्हणे सनातन ॥ ४ ॥

(३८१)
काग पयःपान नेणें। राजहंस रुची जाणे ॥ १ ॥
सेवा पतीची शिंदळी ?। जाणे पतिव्रता बाळी ॥ २ ॥
भक्त अभक्त हे जाण। भक्ता प्रिय नारायण ॥ ३ ॥
तुका म्हणे तयेपरी। जगीं वर्तती अंतरीं ॥ ४ ॥

(३८२)
वृक्ष उन्मळे छेदितां। घाव मुळासी पडतां ॥ १ ॥
अग्रा कडोनियां नाश। केंवि होय त्या वृक्षास ॥ २ ॥

मुळी किंचित राहिली। वृक्षवृद्धी पुनः जाली ।। ३ ।।
तेंवि मीपणाचें मूळ। ज्ञानें करावें निर्मूळ ।। ४ ।।
तुका म्हणे घ्यावें चित्तीं। निःसंगती शस्त्र हातीं ।। ५ ।।

(३८३)
लाभ हानी मृत्यु तिन्ही। कोणी नाणिती प्रार्थुनी ।। १ ।।
येती आपुलाले वेळे। आदळती तेव्हां कळे ।। २ ।।
नाहीं परिहार यांचा। भोग अचुक दैवाचा ।। ३ ।।
तुका म्हणे हरिहरां। यांचा न चुकेचि फेरा ।। ४ ।।

(३८४)
मायाभोंवरा चुकवी। एक हरीची पदवी ।। १ ।।
हरीविण तरूं जाती। ते तों अधिक बुडती ।। २ ।।
पुण्यवंत कोणी होय। तोचि धरी रामपाय ।। ३ ।।
तुका म्हणे ते तरती। नामरूप जें धरती ।। ४ ।।

(३८५)
नामरूप नाहीं सोपें। मिळे गुरुचिया कृपें ।। १ ।।
गुरुकृपा महाभारी। होय असत्या बोहरी ।। २ ।।
त्याग असत्या कठीण। जगीं न सोडिती जाण ।। ३ ।।
तुका म्हणे विषापरी। आहे गुरुकृपा खरी ।। ४ ।।

## प्रकरण १४ वे

# भुक्तिस्वानंदानुभूती

(३८६)
समर्थासी ठायीं संचलाचि असें। दुर्बळ तो आसें पुढां करी ।। १ ।।
पावलें पदरीं घेईन हे दान। एकांतीं भोजन करूनि धाऊं ।। २ ।।
न लगे पहावी उचिताची वेळ। अयाचितकाळ साधला तो ।। ३ ।।
तुका म्हणे पोट धालिया उपरी। गौरवाउत्तरीं पुजूं देवा ।। ४ ।।

(३८७)
आवडी भोजन प्रकार परवडी। भिन्नाभिन्न गोडी एकरसा ॥ १ ॥
भोगित्यापंगती लाधलों प्रसाद। तिहीं नाहीं भेद राखियेला ॥ २ ॥
पाक सिद्ध स्वयें हस्तविनियोग। आवडीचें भाग सिद्ध केलें ॥ ३ ॥
तुका म्हणे आला *उचिष्ठप्रसाद। तेणें हा आनंद माझ्या जीवा ॥४

* टीप:– उचिष्ठ = उष्ठे, तसेंच उच्च आणि श्रेष्ठ शिष्ट ब्रह्म–पहा अथर्ववेद.

(३८८)
ज्याच्या संगें होतों पडिलों भोवणी। केलें तें धुवोनि शुद्धबुद्ध ॥ १ ॥
आतां एकाएकीं मनासीं विचार। करूं नाहीं भार दुजियाचा ॥ २ ॥
प्रसाद सेवणें आलि उष्टावळी। उचित तें काळीं अयाचित ॥ ३ ॥
तुका म्हणे वर्म सांपडलें हातीं। सांडिली तें खंती चिंता देवा ॥ ४ ॥

(३८९)
ढेंकरें जेवण काय दिसें साचें ?। नाहींतरी काचें कुंथाकुंथी ? ॥ १ ॥
वांयां हेही बोल वांयां तेंही बोल। कोरडेच फोल रुचीविणें ॥ २ ॥
सकळ प्रकार गव्हाचिया परी। होती फकेवरी खाऊं नये ॥ ३ ॥
तुका म्हणे असें हातींच कांकण। तयासी दर्पण विल्हाळक ॥ ४ ॥

(३९०)
ब्रह्मादिक जया लाभासी ठेंगणें। बळिये शरणें आम्ही भले ॥ १ ॥
वासनेच्या त्यागें भोजनाचा लाभ। जाला पद्मनाभ सेवाऋणी ॥ २ ॥
कामधेनुचिया क्षीरा पार नाहीं। इच्छेचिये बाही वरुषावो ॥ ३ ॥
बैसलिये ठायीं लागलें भरतें। त्रिपुटीवरतें भेदी ऐसें ॥ ४ ॥
हरि नाहीं आम्हा विष्णुदासां जगीं। नारायण अंगीं विसांवला ॥५
तुका म्हणे बहु लाठे हें भोजन। नाहीं रिता कोण राहों येत ॥ ६ ॥

(३९१)
अनादि आमुची मिरासी पंढरी। आम्हीं नांदों तीरीं भीवरेच्या ॥१
माझें पूर्वपक्ष रखुमाई माता। पांडुरंग पिता सर्व गोत ॥ २ ॥

बंधुभाई ज्याही मुनी पुंडलीक । चंद्रभागा देख आप्त माझें ॥ ३ ॥
नित्य हरिनाम-अमृतभोजन । सर्वदां कारण नेम आम्हां ॥ ४ ॥
तुका म्हणे ठाव दिला पायांपासीं । जुनाट मिरासी वेद बोले ॥ ५ ॥

(३९२)
बैसोनियां खाऊं जोडी । ओढाओढी चुकोनि ॥ १ ॥
ऐसें केलें नारायणे । बरवें जिणें सुखाचें ॥ २ ॥
घरिच्याघरीं भांडवल । न लगे बोल वेंचावें ॥ ३ ॥
तुका म्हणे आटाआटी । चुकली दाटी सकळ ॥ ४ ॥

(३९३)
नाहीं भ्यालों तरी पाळिलों या ठाया । तुम्हां आळवाया जवळीकें ॥ १
सत्ताबळें आतां मागेन भोजन । केलें तें चिंतन आजिवरी ॥ २ ॥
नवनीतासाठीं खादला हा जीव । थोडयासाठीं कींव कोण करी ? ॥ ३
तुका म्हणे ताक न लगे हे घाटे । पांडुरंगा खोटें चाळवणें ॥ ४ ॥

(३९४)
सारीन तें आतां एकाचि भोजनें । वारीन मागणें वेळोंवेळां ॥ १ ॥
शेवटींच्या घांसें गोड करी माते । अगे कृपावंते पांडुरंगे ॥ २ ॥
वंचूं नये आतां कांहींच प्रकार । धाकल्याचें थोर जाल्यावरी ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां नकों चाळवणें । राहूं नेदी बोणें उरों मागें ॥ ४ ॥

(३९५)
पोट धालें मग न लगें परती । जालिया निश्चिती खेळ गोड ॥ १ ॥
आपुलिया हातें देई वो कवळ । विठ्ठल शीतळ जीवन वरी ॥ २ ॥
घराचा विसर होईल आनंदें । नाचेन मी छंदें प्रेमाचिया ॥ ३ ॥
तुका म्हणे तोंचवरी हें करकर । मग हें उत्तर खंडईल ॥ ४ ॥

(३९६)
शीतळ साउली आमुची माउली । विठाई वोळली प्रेमपान्हा ॥ १ ॥
जाऊनि रिघेन वोसंगा वोरसें । पीइन तें इच्छे धणीवरी ॥ २ ॥

(४०१)

पुढें आतां कैंचा जन्म । ऐसा श्रम वारेसा ? ॥ १ ॥
सर्वथाही फिरों नये । ऐसी सोये लाधल्या ॥ २ ॥
पांडुरंगा ऐसी नाव । तारूं भव असतां ॥ ३ ॥
तुका म्हणे चुकति बापा । पुन्हां खेपा सकळा ॥ ४ ॥

(४०२)

आतां होऊं धरणेकरी । अभ्यंतरी कोंडुनि ॥ १ ॥
केली जीवें संवसाटी । गुजगोष्टी रुचों त्या ॥ २ ॥
निर्धार तो आधीं सार । मग भार सोसणें ॥ ३ ॥
तुका म्हणे खाऊंजेऊं । नेदूं होऊं वेगळा ॥ ४ ॥

(४०३)

उचिताचा हातीं ठेवा । दिला सेवा करितां ॥ १ ॥
भाग्य फळलें जाली भेटी । नेघे तुटी यावरी ॥ २ ॥
दैन्य गेलें हरली चिंता । सदैवता लाधली ॥ ३ ॥
तुका म्हणे वांटा जाला । बोलों बोला देवासी ॥ ४ ॥

(४०४)

ज्यानें आड यावें कांहीं । आतां नाहीं बलाढ्य ॥ १ ॥
मन येथें साह्य जालें । हरिच्या धालें गुणवादीं ॥ २ ॥
चुकुर तो गेला काळ । जालें बळ संगाचें ॥ ३ ॥
तुका म्हणे धरूं सत्ता । होईल आतां करूं तें ॥ ४ ॥

(४०५)

आतां देहीं अवसान । हें जतन तोंवरीं ॥ १ ॥
गाऊं नाचों गदारोळें । जिंकों बळें संसार ॥ २ ॥
जीऊं याचि अभिमानें । सेवाधनें बळकट ॥ ३ ॥
तुका म्हणे न सरों मागें । होऊं लागें आगळे ॥ ४ ॥

(३८७)
आवडी भोजन प्रकार परवडी । भिन्नाभिन्न गोडी एकरसा ॥ १ ॥
भोगित्यापंगती लाधलों प्रसाद । तिहीं नाहीं भेद राखियेला ॥ २ ॥
पाक सिद्ध स्वयें हस्तविनियोग । आवडीचें भाग सिद्ध केलें ॥ ३ ॥
तुका म्हणे आला *उचिष्ठप्रसाद । तेणें हा आनंद माझ्या जीवा ॥४

* **टीप**:– उचिष्ठ = उष्टे, तसेंच उच्च आणि श्रेष्ठ शिष्ट ब्रह्म–पहा अथर्ववेद.

(३८८)
ज्याच्या संगें होतों पडिलों भोवणी । केलें तें धुवोनि शुद्धबुद्ध ॥ १ ॥
आतां एकाएकीं मनासीं विचार । करूं नाहीं भार दुजियाचा ॥ २ ॥
प्रसाद सेवणें आलि उष्टावळी । उचित तें काळीं अयाचित ॥ ३ ॥
तुका म्हणे वर्म सांपडलें हातीं । सांडिली तें खंती चिंता देवा ॥ ४ ॥

(३८९)
ढेंकरें जेवण काय दिसें साचें ?। नाहींतरी काचें कुंथाकुंथी ? ॥ १ ॥
वांयां हेही बोल वांयां तेंही बोल । कोरडेच फोल रुचीविणें ॥ २ ॥
सकळ प्रकार गव्हाचिया परी । होती फकेवरी खाऊं नये ॥ ३ ॥
तुका म्हणे असें हातींच कांकण । तयासी दर्पण विल्हाळक ॥ ४ ॥

(३९०)
ब्रह्मादिक जया लाभासी ठेंगणें । बळिये शरणें आम्ही भले ॥ १ ॥
वासनेच्या त्यागें भोजनाचा लाभ । जाला पद्मनाभ सेवाॠणी ॥ २ ॥
कामधेनुचिया क्षीरा पार नाहीं । इच्छेचिये वाही वरुषावो ॥ ३ ॥
बैसलिये ठायीं लागलें भरतें । त्रिपुटीवरतें भेदी ऐसें ॥ ४ ॥
हरि नाहीं आम्हा विष्णुदासां जगीं । नारायण अंगीं विसांवला ॥५
तुका म्हणे बहु लाठे हें भोजन । नाहीं रिता कोण राहों येत ॥ ६ ॥

(३९१)
अनादि आमुची मिरासी पंढरी । आम्हीं नांदों तीरीं भीवरेच्या ॥१
माझें पूर्वपक्ष रखुमाई माता । पांडुरंग पिता सर्व गोत ॥ २ ॥

बंधुभाई ब्याही मुनी पुंडलीक। चंद्रभागा देख आप्त माझें ॥ ३ ॥
नित्य हरिनाम–अमृतभोजन। सर्वदां कारण नेम आम्हां ॥ ४ ॥
तुका म्हणे ठाव दिला पायांपासीं। जुनाट मिरासी वेद बोले ॥ ५ ॥

(३९२)
बैसोनियां खाऊं जोडी। ओढाओढी चुकोनि ॥ १ ॥
ऐसें केलें नारायणें। बरवें जिणें सुखाचें ॥ २ ॥
घरिच्याघरीं भांडवल। न लगे बोल वेंचावें ॥ ३ ॥
तुका म्हणे आटाआटी। चुकली दाटी सकळ ॥ ४ ॥

(३९३)
नाहीं म्यालों तरी पाळिलों या ठाया। तुम्हां आळवाया जवळीकें ॥ १
सत्ताबळें आतां मागेन भोजन। केलें तें चिंतन आजिवरी ॥ २ ॥
नवनीतासाठीं खादला हा जीव। थोड्यासाठीं कींव कोण करी ? ॥ ३
तुका म्हणे ताक न लगे हे घाटे। पांडुरंगा खोटें चाळवणें ॥ ४ ॥

(३९४)
सारीन तें आतां एकाचि भोजनें। वारीन मागणें वेळोंवेळां ॥ १ ॥
शेवटींच्या घांसें गोड करी माते। अगे कृपावंते पांडुरंगे ॥ २ ॥
वंचूं नये आतां कांहींच प्रकार। धाकल्याचें थोर जाल्यावरी ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां नकों चाळवणें। राहूं नेदी बोणें उरों मागें ॥ ४ ॥

(३९५)
पोट धालें मग न लगें परती। जालिया निश्चिती खेळ गोड ॥ १ ॥
आपुलिया हातें देई वो कवळ। विठ्ठल शीतळ जीवन वरी ॥ २ ॥
घराचा विसर होईल आनंदें। नाचेन मी छंदें प्रेमाचिया ॥ ३ ॥
तुका म्हणे तोंचवरी हें करकर। मग हें उत्तर खंडईल ॥ ४ ॥

(३९६)
शीतळ साउली आमुची माउली। विठाई वोळली प्रेमपान्हा ॥ १ ॥
जाऊनि रिघेन वोसंगा वोरसें। पीइन तें इच्छे धणीवरी ॥ २ ॥

कृपे तनु माझी सांभाळी दुभूनि । अमृतजीवनी लोटलीसे ॥ ३ ॥
आनंदाचा थाव नाहीं माझें चित्तीं । सागर तो किती उपमेसी ? ॥ ४
सैर जाये पडे तियेसी सांकडें । सांभाळीत पुढेंमागें असें ॥ ५ ॥
तुका म्हणे चिंता कैसी ते मी नेणें । लडिवाळ तान्हे विठाईचें ॥ ६ ॥

(३९७)

कोटी अन्न संतर्पण ! । पुरे एकलें कीर्तन ॥ १ ॥
नगरद्वारीं लाविला टिळा । दिली आवतणें सकळां ॥ २ ॥
अठरा याती एके ठायीं । वाढी विठ्ठलरखुमाई ॥ ३ ॥
नलगे खरकटें हात धुणें । अभेद हरीचीं कीर्तनें ॥ ४ ॥
श्रवणद्वारें घेती घांस । सदां सोवळे हरिचे दास ॥ ५ ॥
आपण जेऊनि जेववी लोकां । संतर्पण करी तुका ॥ ६ ॥

(३९८)

मथनींचें धर्माधर्म । सत्यवर्म नवनित ॥ १ ॥
तेंचि तेथें घाटूं नये । आले जाये नासुनि ॥ २ ॥
सांभाळावें वरावर । वर्म दूर न जावें ॥ ३ ॥
तुका म्हणे धाले पोट । कां गा बोटचाटणी ? ॥ ४ ॥

(३९९)

नाम गोड नाम गोड । पुरे कोड सकळ ॥ १ ॥
रसना येरां रसां विटे । घोंटघोटें आवडे हा ॥ २ ॥
आन रसें मरणगांठी । येणें तुटी संसारा ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्हां जाला । नामीं भला आहार ॥ ४ ॥

(४००)

धालेंसुखें ढेंकर येऊं । उमटे जेवूं तोंवरी ॥ १ ॥
क्रीडा करूं निरंजनीं । हरी धणी पुरविता ॥ २ ॥
अवघें खेळों अवघ्यामधीं । डायीं बुद्धि पडों ना ॥ ३ ॥
तुका म्हणे वांचवितां । आम्हां सत्ता–समर्थ ॥ ४ ॥

(४०१)
पुढें आतां कैंचा जन्म । ऐसा श्रम वारेसा ? ॥ १ ॥
सर्वथाही फिरों नये । ऐसी सोये लाधल्या ॥ २ ॥
पांडुरंगा ऐसी नाव । तारूं भव असतां ॥ ३ ॥
तुका म्हणे चुकति बापा । पुन्हां खेपा सकळा ॥ ४ ॥
(४०२)
आतां होऊं धरणेकरी । अभ्यंतरीं कोंडुनि ॥ १ ॥
केली जीवें संवसाटी । गुजगोष्टी रुचों त्या ॥ २ ॥
निर्धार तो आधीं सार । मग भार सोसणें ॥ ३ ॥
तुका म्हणे खाऊंजेऊं । नेदूं होऊं वेगळा ॥ ४ ॥
(४०३)
उचिताचा हातीं ठेवा । दिला सेवा करितां ॥ १ ॥
भाग्य फळलें जाली भेटी । नेघे तुटी यावरी ॥ २ ॥
दैन्य गेलें हरली चिंता । सदैवता लाधली ॥ ३ ॥
तुका म्हणे वांटा जाला । बोलों बोला देवासी ॥ ४ ॥
(४०४)
ज्यानें आड यावें कांहीं । आतां नाहीं बलाढ्य ॥ १ ॥
मन येथें साह्य जालें । हरिच्या धालें गुणवादीं ॥ २ ।
चुकुर तो गेला काळ । जालें बळ संगाचें ॥ ३ ॥
तुका म्हणे धरूं सत्ता । होईल आतां करूं तें ॥ ४ ॥
(४०५)
आतां देहीं अवसान । हें जतन तोंवरीं ॥ १ ॥
गाऊं नाचों गदारोळें । जिंकों बळें संसार ॥ २ ॥
जीऊं याचि अभिमानें । सेवाधनें बळकट ॥ ३ ॥
तुका म्हणे न सरों मागें । होऊं लागें आगळे ॥ ४ ॥

(४०६)

पसरोनि मुखें। कैसें धालों बा हरीखें ? ॥ १ ॥
ब्रह्मादिका दुर्लभ वांटा। आम्हां फावला रानटां ॥ २ ॥
गोड लागे तरि। कृपावंत जाला हरि ॥ ३ ॥
उडे ते थेंबुटें। पाहे अमृतां गोमटें ॥ ४ ॥
गोडाहुनि गोड। जिव्हा नाचे वाटे कोड ॥ ५ ॥
खुणावुनि तुका। दावी वर्म बोलों नकां ॥ ६ ॥

(४०७)

काय उणें आम्हां पांडुरंगा पायीं ?। रिद्धिसिद्धि ठायीं वोळगती ॥१
कोण पाहे सुखा नाशिवंताकडें ?। तृष्णेचें बापुडें नव्हों आम्ही ॥२
स्वर्गसुखें आम्ही केली पावटणी। पापपुण्य दोन्हीं उलंडिली ॥ ३ ॥
तुका म्हणे घरा आणिलें वैकुंठ। वसविली पेंठ वैष्णवांची ॥ ४ ॥

(४०८)

नामामृतप्रेमें जिव्हा ओलावली। मनाची राहिली वृत्ति पायीं ॥ १ ॥
सकळही तेथें वोळलीं मंगळें। वृष्टी केली जळें आनंदाच्या ॥ २ ॥
सकळ इंद्रियें जाली ब्रह्मरूप। ओतलें स्वरूप माजी तया ॥ ३ ॥
तुका म्हणे जेथें वसे भक्तराव। तेथें नांदे देव निस्संदेह ॥ ४ ॥

(४०९)

भाविकां हें वर्म सांपडलें निकें। सेविता कौतुकें धणीवरि ॥ १ ॥
इच्छितील तैसी नाचतील छंदें। वंदिली तीं पदें सकुमारें ॥ २ ॥
विसरलें मुक्ती भक्तिअभिलाषें। वाढत सरसें सुख आलें ॥ ३ ॥
तुका म्हणे नाहीं मागायाची आस। पांडुरंग त्यांस विसंबेना ॥ ४ ॥

(४१०)

भक्तसमागमीं सर्वभावें हरि। सर्व काम करी न सांगतां ॥ १ ॥
सांठवला राहे हृदयसंपुटी। बाहेर धाकुटी मूर्ति उभा ॥ २ ॥
मागण्याची वास पाहे मुखाकडे। चिंतिले रोकडे मनोरथ ॥ ३ ॥
तुका म्हणे जीवभाव देवापायीं। ठेवूनि ते कांहीं न मागती ॥ ४ ॥

(४११)
आम्ही मागों ऐसें नाहीं तुजपासीं । जरी तू भितोसि पांडुरंगा ॥ १ ॥
पाहें विचारूनि तुज आहे ठावें । आम्ही धालों नांवें तुझ्या एका ॥२
ऋद्धिसिद्धि मोक्ष तुझें भांडवल । हें तों आम्हां फोल भक्तीपुढें ॥३
तुका म्हणे आणूं वैकुंठ ते येथ । बैसोनि निश्चिंत सुख भोगूं ॥ ४ ॥

(४१२)
कुमुदिनी काय जाणे परिमळ ? । भ्रमर सकळ भोगीतसे ॥ १ ॥
तैसें तुज ठावें नाहीं तुझें नाम । आम्हीच तें प्रेमसुख जाणों ॥ २ ॥
माते स्तनीं बाळा दुधाची ते गोडी । ज्याची त्यासी जोडी कामा नये ॥३
तुका म्हणे मुक्ताफळ शिंपीं पोटीं । नाहीं त्याची भेटी भोगा तिये ॥४

प्रकरण १५ वें

# विठ्ठलप्रेम – बाळभाव

(४१३)
बाळ मायेविणें क्षणभरी न राहे । न देखतां होये कासावीस ॥ १ ॥
आणिकें उदंड बुझाविती जरी । छंद त्या अंतरीं माऊलीचा ॥ २ ॥
नावडती तया बोल आणिकांचें । देखोनियां नाचें माये दृष्टी ॥ ३ ॥
तुका म्हणे मज विठ्ठल माऊली । आणिकांचें बोलीं चाड नाहीं ॥ ४ ॥

(४१४)
विठ्ठल हे माय । आम्हां सुखा उणें काय ? ॥ १ ॥
घेतां अमृताची धणी । प्रेम वोसंडलें स्तनीं ॥ २ ॥
वैष्णवांच्या मेळीं । क्रीडों आनंदकल्लोळीं ॥ ३ ॥
तुका कृपावंत । ठेवी आम्हांपासीं चित्त ॥ ४ ॥

(४१५)
आमुची तूं होसी कृपाळुमाउली । विठ्ठले साउली अंकितासी ॥ १ ॥
प्रेमपान्हा स्तनीं सदा सर्वकाळ । दृष्टी हे निर्मळ अमृताची ॥ २ ॥

भूकतान्हदुःख वाटों नेदी सीण । अंतरींचा गुण जाणोनियां ॥ ३ ॥
आशा तृष्णा माया चिंता दवडी दुरी । ठाव आम्हां करी खेळावया ॥४
तुका म्हणे लावी संतांचा सांगात । न पवति जेथ कळिकाळ ॥ ५ ॥

(४१६)
आनंदकीर्तन करी कथाघोष । आवडीचा रस प्रेमसुख ॥ १ ॥
मज हा आवडे वैष्णवांचा संग । जेथें नाहीं लाग कळिकाळा ॥ २ ॥
स्वल्पमंत्र वाचे बैसलासे निका । रामकृष्ण–सखा–नारायण ॥ ३ ॥
विचारितां मज दुजें वाटे लाज । उपदेशें काज आन–नाहीं ॥ ४ ॥
तुका म्हणे चित्त रंगलेंसे ठायीं । माझें तुझें पायीं पांडुरंगे ॥ ५ ॥

(४१७)
आतां होई माझे बुद्धीचा जनिता । आवरोनि चित्ता पांडुरंगा ॥ १ ॥
येथोनियां कोठें नवजें बाहेरी । ऐसें मज धरीं सत्ताबळें ॥ २ ॥
अनावर गुण बहुतां जातींचें । न बोलावें वाचे ऐसें करीं ॥ ३ ॥
तुका म्हणे हित कोणियें जातीचें । तुज ठावें साचें मायबापा ॥ ४ ॥

(४१८)
नित्य या मनासी करितों विचार । तों हें अनावर विषयलोभी ॥ १ ॥
आतां मज राखें आपुलिया बळें । न देखें हें जाळें उगवता* ॥ २ ॥
सांपडला गळीं नाहीं त्याची सत्ता । उगळी मागुता घेतला तो ॥३
तुका म्हणे मी तों अज्ञानचि आहें । परी तुझी पाहें वास देवा ॥ ४ ॥

* **टीपः**– जाळेउगवता = जाळ्यांतून काढणारा– अर्थरहस्य– गळाला जो मासा लागतो; त्याला नको म्हणून गळ बाहेर टाकतां येत नाहीं; आणि गळालाही हे जीवघेणें कार्य नको म्हणून त्याला सोडतां येत नाहीं; त्याचा शल्यस्वभाव ते करूं देत नाहीं; तसें मनरूपीं गळ विषयलोभानें जीवाला लागलेला–तूं काढलास तरच निभाव.

(४१९)
दुर्बळाचे हातीं सांपडलें धन । करितां जतन नये त्यासी ॥ १ ॥
तैसी परी मज जाली नारायणा । योगक्षेम जाणां तुम्ही आतां ॥ २ ॥

खातांलेतां नये मिरवितां वरि । राजा दंड करी जना राग ॥ ३ ॥
तुका म्हणे मग तळमळ उरे । देखिलें तें झुरे पाहावया ॥ ४ ॥

अर्थरहस्य– दुर्बळाला त्याच्या दैवानें सांपडलेले धन त्याचे त्याला सुखानें भोगतां येत नाहीं, त्याला राजसत्तेचे भयानें लोकांत वभ्रा होईल म्हणून ते झांकून ठेवावे लागते; आणि त्याचें आडून दडून कां होईना पण केव्हां दर्शन होते हाच छंद लागतो– तसें माझ्या दैवयोगें तूं सांपडलास पण तो मला सरळपणें भोगतां येईनास– त्याला मनसत्ता आणि जनापवाद या दोन्हीमुळें उघड भोगाची चोरी मला झाली आहे. परिणामतः मी दर्शनार्थ झुरतो आहे. वगैरे.

(४२०)
मागें जैसा होता माझे अंगीं भाव । तैसा एक ठाव नाहीं आतां ॥१
यासी ग्वाही माझें मन मजपाशीं । तुटी मुद्दलेंसी दिसे मुळें ॥ २ ॥
पुढिलांचे मना आणि गुणदोष । पूज्य आपणांस करावया ॥ ३ ॥
तुका म्हणे जाली कोंबड्याची परी । पुढेंचि उकरी लाभ नेणें ॥ ४ ॥

(४२१)
किती देवा तुज देऊं परिहार ? । जाणसी अंतर सर्व माझें ॥ १ ॥
आतां माझें मज हातीं देईं हित । करी माझें चित्तसमाधान॥ २ ॥
राग आला तरी कापूं नल्हें[1] मान । बाळा मायेविण कोण दुजें? ॥३
तुका म्हणे ऐसा होईल लौकिक । मागे बाळ भीक समर्थाचें ॥ ४ ॥

टीपः– [1] नल्हे = न लाहे; कापूं नल्हे = कांपणे योग्य नव्हे.

(४२२)
लाज वाटे पुढें तोंड दाखवितां । परि जाऊं आतां कोणापासीं ? ॥१
चुकलिया काम मागतो मुशारा । लाज फजितखोरा नाहीं मज ॥ २ ॥
पाय सोडुनियां फिरतों वासर । स्वामिसेवे चोर होऊनियां ॥ ३ ॥
तुका म्हणे मज पाहिजे दंडिलें । पुढें हें घडलें न पाहिजे ॥ ४ ॥

(४२३)
पुढिलिया सुखें निबद्धता बळे । बहुत वारलें होय दुःख ॥ १ ॥
हें तों वर्म असे माउलीचें हातीं । हाणी मारी प्रीती हितासाठीं ॥२

खेळतां विसरे भूक तान्ह घर । धरूनियां कर आणी बळें ॥ ३ ॥
तुका म्हणे पाळी तोंडीचिया घांसें । उदार सर्वस्वें सर्वकाळ ॥ ४ ॥

(४२४)

आतां गुणदोष काय विचारिसी ?। मी तों आहे रासी पातकांची ॥१
पतितपावना सवेंसमागमें । आपुलिया धर्में चालवीजे ॥ २ ॥
घनघाये भेटी लोखंडपरिसा । तरी अनारिसा न पालटे ॥ ३ ॥
तुका म्हणे माती कोण पुसे फुका ?। कस्तुरिच्या तुका समागमें ॥४

(४२५)

भांडवल आम्हां आळी करावी हे । आपुल्या तूं मोहें धांव घेसी ॥ १ ॥
मायें मोकलिल्या कोठें जावें बाळें ?। आपुलिया बळें न वजे तें ॥ २ ॥
रुसोनियां पळे सांडुनियां ताट । मागें पाहे वाट यावें ऐसी ॥ ३ ॥
तुका म्हणे आळी करुनियां निकी। देसील भातुकीं बुझाऊनि ॥ ४ ॥

(४२६)

पढिये तें आम्ही तुजपें मागावें । जीवींचें सांगावें हितगुज ॥ १ ॥
पाळसील लळे दानें वो वत्सले । कृपाळे विठ्ठले–जननिये ॥ २ ॥
जीवभाव तुझ्या ठेवियेला पायीं । तूंचि सर्वांठायीं एक आम्हां ॥ ३ ॥
दुजियाचा संग लागों नेदूं वारा । नाहीं जात घरा आणिकांच्या ॥४
सर्वसत्ता एकी आहे तुजपासीं । ठावें आहे देसी मागेन तें ॥ ५ ॥
म्हणऊनि पुढें मांडियेली आळी । थुंकोनियां चोळी डोळे तुका ॥ ६ ॥

(४२७)

कोण पर्वकाळ पहासील तीथ ?। होतें माझें चित्त कासावीस ॥ १ ॥
पाठवीं भातुकें–प्रेम झडकरी । नको राखों उरी पांडुरंगा ॥ २ ॥
न धरावा कोप मजवरी कांहीं । अवगुणी अन्यायी म्हणोनियां ॥ ३ ॥
काय रडविसी नेणतिया पोरां । जाणतिया थोरांचिया परी? ॥ ४ ॥
काय उभी कर ठेवुनियां कटीं । बुझावीं धाकुटीं लडिवाळें? ॥ ५ ॥
तुका म्हणे आतां पदरासी पिळा । घालीन निराळा नव्हे मग ॥ ६ ॥

(४२८)
कां हो देवा कांहीं न बोलाचि गोष्टी ?। कां मज हिपुटी करीतसा ? ॥१
कंठीं प्राण पाहें वचनाची आस । तों दिसे उदास धरिलें ऐसें॥ २ ॥
कां या काळे बुंथी घेतलीसे खोळ। कां नये विटाळ होऊं माझा?॥३
लाज वाटे तुझा म्हणवितां देखा। न पुससी फुका तुका म्हणे ॥ ४ ॥
(४२९)
तुज जाण–तान्हें नाहीं पांडुरंगा। कां जी मज सांगा उपेक्षिलें? ॥१
तुज ठावें होतें पातकी मी खरा। आधींच कां थारा दिला पायीं? ॥२
आंख तो पडिला हरीचा मी दास। भेद पंगतीस करूं नये ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्ही जिंतिलें तें खरें। आतां उणेंपुरें तुझें अंगीं॥ ४ ॥
(४३०)
मायबापापुढें लेंकराची आळी। आणीक हे पाळी कोण ळळे?॥ १ ॥
सांभाळा जी माझी विषमें अनंता। जवळी असतां अव्हेर कां?॥ २ ॥
आगिकांची सत्ता चाले आम्हांवरी। तुमची ते थोरी काय मग?॥ ३ ॥
तुका म्हणे आलों दुरोनि जवळी। आतां टाळाटाळी करूं नये ॥ ४ ॥
(४३१)
तुजविण मज कोण वो सोयरें। आणीक दुसरें पांडुरंगे ? ॥ १ ॥
लागलीसे आस पाहे तुझी वास। रात्री वो दिवस लेखी बोटीं॥ २ ॥
येई वो धांवोनि विठ्ठले जननी। तृषार्त विजनीं व्याकुळलों ॥ ३ ॥
न लगेचि गोड मज कामधंदा। तुका म्हणे सदा हेंचि ध्यान॥ ४ ॥
(४३२)
भक्तप्रतिपाळे दीना तूं वत्सले। कृपाळे विठ्ठले होसी माय ॥ १ ॥
पडिला विसर माझा काय गुणें ?। कपाळ हें उणें काय करूं ॥ २ ॥
तुका म्हणे माझें जाळूनि संचित। करी वो उचित भेटी देईं॥ ३ ॥
(४३३)
उचित तें काय जाणावें दुर्बळें ?। जाणिवेचें काळें तोंड देवा ॥ १ ॥
देतो हाका कोणी नाइकती द्वारीं। ओस कोणी घरीं नाहीं ऐसें ॥२

आलिया अतिता शद्बसमाधान। करितां वचन काय वेंचे ?॥ ३ ॥
तुका म्हणे तुम्हां साजे हे श्रीहरी। आम्ही निलजिरीं नव्हों ऐसीं ॥४
(४३४)
आळी करावी ते कळते बाळका। बुझवावें हें कां नेणां तुम्ही ?॥ १
निवाड तों असे येथें पायांपाशीं। तुमच्या आम्हांविशीं एकेठायीं॥ २ ॥
आणीक तों आम्ही न देखों–सें जालें। जाणावें शिणलें–भागलें–सें ॥३
तुका म्हणे तुम्हां लागतें सांगावें। अंतरींचें ठाऊें काय नाहीं ?॥ ४ ॥
(४३५)
तांतडीनें मज धीरचि न कळे। पाळावे हे लळे लवलाहे ॥ १ ॥
नका कांहीं पाहों सावकाश देवा। करा एक हेवा आतां माझा ॥२
वोरसाचा यावा सांभाळावा प्रीत। नाहीं साहों येत आंगें सदा ॥३
तुका म्हणे मज नकां गोवूं खेळा। भोजनाची वेळा राखा आतां ॥४
(४३६)
बहुता जातींचा केला अंगीकार। पावविली पार सर्वोत्तमें ॥ १ ॥
सरलाचि नाहीं कोणां कोण्या वेंचें। अक्षोभ्य ठायींचें ठायीं आहे ॥२
लागतचि नाहीं घेतां अंतपार। वसवी अंतर अणुचेंही ॥ ३ ॥
तुका म्हणे केला होय *ठाके–ऐसा। पुरवावी इच्छा धरिली ते ॥ ४ ॥

**टीपः–** *ठाके–ऐसा = इच्छुकाच्या मनाजोगा.

(४३७)
आतां नये बोलों अव्हेराची मात। बाळावरी चित्त असों दे वो ॥ १ ॥
तुज कां सांगणें–लागे हा प्रकार ?। परी हें उत्तर आवडीचें ॥ २ ॥
न वंची वो कांहीं एकही प्रकार। आपणां अंतर नकों मज ॥ ३ ॥
तुका म्हणे मोह राखावा *सतंत। नकों पाहूं अंत पांडुरंगा ॥ ४ ॥

टीपः– सतंत = सतत; सूत्रबद्ध; अंतिम सत्यापर्यंत; स्वतत्र (स्ववश असा जुना अर्थ)

(४३८)
आडलिया जना होसी साहाकारी। आंधळिया–करीं काठी तूंचि ॥ १ ॥
गांजिले पीडिले आडलें संसारीं। त्यांचा तूं कैवारी नारायणा ॥ २ ॥

प्रल्हादासी महा–संकटीं रक्षिलें। तुम्ही आपंगिलें नानापरी ।। ३ ।।
आपुलेंचि अंग तुवां वोडविलें। त्याचें निवारिलें महादुःख ।। ४ ।।
तुका म्हणे तुझें कृपे पार नाहीं। माझे विठाबाई–जननीये ।। ५ ।।

(४३९)
पुरली धांव कडिये घेई। पुढें पायीं न चालवीं ।। १ ।।
अंगसंगे जिवलगे। पांडुरंगे कृपाळे ।। २ ।।
अवघी निवारावी भूक। अवघे दुःख जन्माचें ।। ३ ।।
तुका म्हणे बोलवेना। लावीं स्तना ईश्वरे ।। ४ ।।

(४४०)
जें जें मना वाटे गोड। तें तें कोड पुरवी ।। १ ।।
आतां तूंचि बाह्यात्कारीं। अवघ्यापरी जालीसी ।। २ ।।
नाहीं सायासाचें काम। घेतां नाम आवडी ।। ३ ।।
तुका म्हणे सर्वसंगे। पांडुरंगे दयाळे ।। ४ ।।

(४४१)
जेथें माझी दृष्टी जाय। तेथें पाय भावीन ।। १ ।।
असेन या समाधानें। पूजा मनें करीन ।। २ ।।
अवघा अवघिये देशीं। सुखरासीसंपन्न ।। ३ ।।
तुका म्हणे बंधन ही। ऐसें नाहीं तें करूं ।। ४ ।।

(४४२)
तान्हेल्याची चिंता। अष्टौप्रहर वाहे माता ।। १ ।।
ऐसें करि वो माझें आई। ठाव देऊनि राखें पायीं ।। २ ।।
काढितां तळमळी। जळा वेगळी मासोळी ।। ३ ।।
तुका म्हणे कुडी। जेवी प्राणाची आवडी ।। ४ ।।

(४४३)
आणीक म्यां कोणा यावें काकुलती ?। कोण कामा येती अंतकाळीं ? ।।१
तू वो माझी सखी होसी पांडुरंगे। लवकरी ये गे वाट पाहें ।। २ ।।

कायावाचामनें हेंचि काम करी। पाउलें गोजिरी चिंतीतसें ॥ ३ ॥
तुका म्हणे माझी पुरवीं हे आस। घालीं ब्रह्मरस भोजन हें ॥ ४ ॥

(४४४)

धाडी वो भातुकें। रंजविल्याचें कौतुकें ॥ १ ॥
मायलेंकरांत भिन्न। नाहीं उत्तराचा सीण ॥ २ ॥
करोनि नवल। *याञ्छें बोलिलों ते बोल ॥ ३ ॥
तुका म्हणे माते। पांडुरंगे कृपावंते ॥ ४ ॥

**टीप**:– *याञ्छें बोलिलों = तूं बोलावेस या इच्छेने मी इच्छाकथन केले; ते बोल बोले–

(४४५)

ऐसा चित्तगोवा*। केला न पाहिजे देवा ॥ १ ॥
बहु आली दूरवरी। ओढत हे भरोवरी ॥ २ ॥
आम्हांसी न कळे। तुम्ही झाकूं नये डोळे ॥ ३ ॥
तुका म्हणे संगें। असों एकएकां–अंगें ॥ ४ ॥

**टीप**:– *चित्तगोवा = चित्तव्यस्त करणारा चिंतेचा विषय.

(४४६)

आवडी कां ठेवूं* ?। संगें बैसोनियां जेवूं ॥ १ ॥
मागें नको ठेवूं उरी। माझी आण तुजवरी ॥ २ ॥
देखिले प्रकार। याञ्च्छे पाहेन साचार ॥ ३ ॥
तुका म्हणे बाळीं। केली चाहाडी सकळीं ॥ ४ ॥

**टीप**:– *कां ठेवूं = अतृप्त कां राखूं–३ चा अर्थ इच्छेनें इच्छिलें ते इच्छित प्रकार प्रत्यक्ष साकार–साचार झालेले–कृतीत उतरलेले पाहेन.

(४४७)

नव्हेसी तूं लांसी। मायां आणिकां त्या ऐसी ॥ १ ॥
जे हे वांयां जाती बोल। होती निर्फळचि फोल ॥ २ ॥
नव्हेसी दुबळी। काय नाहीं तें जवळी ? ॥ ३ ॥
तुका म्हणे खोटी। कांहीं नव्हेसी करंटी ॥ ४ ॥

(४४८)
आम्हां बोल लावा । तुम्हां अनुचित देवा ॥ १ ॥
ऐसा सांगा कां व्यालेती ? । काय नाहीं तुम्हां हातीं ? ॥ २ ॥
आतां धरा दुरी । वांयां दवडा या थोरी ॥ ३ ॥
तुका म्हणे ठायीं । ऐसें विचारावें कांहीं ॥ ४ ॥

(४४९)
लाडें भाकितों करुणा । तूं रे उदाराचा राणा ॥ १ ॥
करिसी आमुचा सांभाळ । तूं रे माउली स्नेहाळ ॥ २ ॥
नाहीं चिंता रे आम्हांसी । तूंचि भार चालविसी ॥ ३ ॥
आम्ही जालों उदासीन । तूंचि करिसी जतन ॥ ४ ॥
अन्न नाहीं जीवनास । तूंचि पुरविसी घास ॥ ५ ॥
तुका म्हणे भलतेसवें । जातां मागेंमागें धांवें ॥ ६ ॥

(४५०)
आम्हां हें सकळ । तुझ्या चरणांचें बळ ॥ १ ॥
करूं अमृताचें पान । दुजें नेणों कांहीं आन ॥ २ ॥
भोगतां जो भोग । सुखदुःख पीडा रोग ॥ ३ ॥
तुका म्हणे हेवा । तुझें पायीं माझा देवा ॥ ४ ॥

(४५१)
स्वामिसेवा गोड । माते बाळकाचें कोड ॥ १ ॥
जें जें मागावें भातुकें । तें तें पुरवी कौतुकें ।
खेळविलें कोडें । हर्षें बोले कीं बोबडें ॥ ३ ॥
तुका म्हणे लाड । तेथें पुरे माझें कोड ॥ ४ ॥

(४५२)
न कळे महिमा वेदां पडे मौन । पांगुळलें मन–पवन ही ॥ १ ॥
काय म्यां वानावें तुझ्या थोरपणा ? । सहस्रवदना वर्णवेना ॥ २ ॥
चंद्रसूर्य तुझ्या वागिजती तेजें । कोणीकडें माझें कोड तेथें ? ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्ही बाळ तूं माउली । कृपेची साउली करी देवा ॥ ४ ।

(४५३)
थोरपण वानी चारी मुखें वेद। माझी हे अबद्ध वाचा किती ? ॥ १ ॥
कीर्ति वर्णी ब्रह्मा गणेश शारदा। मज मतिमंदा कोण पाड ? ॥ २ ॥
सहस्रवदनाचें न सरेचि तोंड। तेथें मी हा मूढ काय गाऊं ? ॥ ३ ॥
स्तुती करोनियां ध्यानस्थ शंकर। ऋषी थोर थोर वर्णवेना ॥ ४ ॥
तुका म्हणे तान्हे वरी करी सत्ता। सर्व साहे पिता बोल त्याचें ॥५

(४५४)
तुझी कीर्ति सांगों तुजपुढें जरी। ब्रह्मांडींही हरी माईना ते ॥ १ ॥
मेरूची लेखणी सागराची शाई। कागद हे मही न पुरेचि ॥ २ ॥
अपार अनंत आपंगिलें भक्त। माझेंचि संचित वोडवेना ॥ ३ ॥
तुका म्हणे तुम्हां बोल नाही देवा। पामरें म्यां सेवा केली नाही ॥४

(४५५)
गाऊं नेणें परी कांहीं मी गाईन। शरण जाईन पांडुरंगा ॥ १ ॥
ब्रह्मांडनायक त्याचा मी अंकित। काय यमदूत करिती काळ? ॥ २ ॥
वेश्या ज्याच्या नामें तारिली गणिका। अजामिळ देखा पापरासी ॥३
चरणींच्या रजें अहिल्या तारिली। रूपवंत केली कुब्जा क्षणें ॥ ४ ॥
पृथिवी तारिली पाताळासी जातां। तुका म्हणे आतां आम्ही किती?॥५

(४५६)
बोलिलिया गुणीं नाहीं पाविजेत। देवा नाहीं होत हित तेथें ॥ १ ॥
कवतुक तुझें नवल यावरि। घेसील तें शिरीं काय नव्हे ? ॥ २ ॥
नाहीं मिळों येत संचिताच्या मता। पुराणीं पहातां अघटित ॥ ३ ॥
तुका म्हणे पायीं निरूपिला भावो। न्याल तैसा न्या वो सिद्धी देवा ॥४

(४५७)
आवडेल तैसें तुज आळवीन। वाटे समाधान जीवा तैसें ॥ १ ॥
नाहीं येथें कांहीं लौकिकाची चाड। तुजविण गोड देवराया ॥ २ ॥

पुरवीं मनोरथ अंतरींचें आर्त । धायेवरी गीत गाईं तुझें ।। ३ ।।
तुका म्हणे लेंकी आळवी माहेरा । गाऊं या संसारा तुज तैसें ।। ४ ।।

(४५८)
पाहें मजकडें भरोनियां दृष्टी । बहुत हिंपुटी जालों मातें ।। १ ।।
करावेंसें वाटे जीवा स्तनपान । नव्हे हें वचन शृंगारिक ।। २ ।।
सत्यासाठीं माझी शद्ब विवंचना । जोडिल्या वचनाचि ते नव्हे ।।३
तुका म्हणे माझी कळवळ्याची कींव । भागलोंसे जीवकर्तव्यता ।।४

(४५९)
तुज म्हणतील कृपेचा सागर । मा कां केला धीर पांडुरंगा ? ।। १ ।।
अझुनि कां नये तुज माझी दया ? । काय देवराया पाहातोसि ? ।।२
आळवी पाडस–ऐसा कुरंगिणी । पीडिलों या वनीं तानभुकें ।। ३ ।।
प्रेमरसपान्हा पाजी माझे आई । धांवें वो विठाई वोरसोनि ।। ४ ।।
तुका म्हणे माझें कोण हरिल दुःख । तुजविण एक पांडुरंगा ? ।। ५ ।।

(४६०)
बाळामुखीं घाली घांस । माता जेववी तयास ।। १ ।।
घाली विष कीं अमृत ? । निष्कपट तें जेवित ।। २ ।।
तयेपरी माझी वाणी । वदविसी चक्रपाणी ।। ३ ।।
अर्थस्वार्थ तुजकडे । मज नको हें सांकडें ।। ४ ।।
तुका म्हणे हांसतील । ऐसें न वदवी बोल ।। ५ ।।

(४६१)
तुजवरी तीक्ष्ण बाण । शब्द–सोडिले म्यां जाण ।। १ ।।
काय करूं नारायणा ? । मज यातना सोसेना ।। २ ।।
क्षमा करी दयावंते । पांगुरंगे माझे माते ।। ३ ।।
जळो जळो माझी वाचा । नको संग पापिणीचा ।। ४ ।।
तुका म्हणे प्रायश्चित्त । तुझें नाम दे त्वरित ।। ५ ।।

(४६२)

शोभिवंत दिसे माता । बाळ उदरीं जन्मतां ॥ १ ॥
नाहीं वांजठीस मान । बाळामुळें धन्यपण ॥ २ ॥
तेंवि भक्त तुझें बाळ । येणें दिससी सफळ ॥ ३ ॥
तुका म्हणे देहा शोभा । अवयवें या श्रीरंगा ॥ ४ ॥

(४६३)

प्रीति करी सत्ता । बाळा भीति मातापिता ॥ १ ॥
काय चाले त्याशीं बळ । आळी करितां कोल्हाळ ? ॥ २ ॥
पदरीं घाली मिठी । नेदी हालों मागें लोटी ॥ ३ ॥
बोले मना आले । तुका साहिला विठ्ठलें ॥ ४ ॥

(४६४)

सोडिला संसार । माया तयावरि फार ॥ १ ॥
धांवे त्याचें मागेंमागें । साहे सुखदुःख आंगें ॥ २ ॥
यानें घ्यावें नाम तिसी । करणे त्याचें काम ॥ ३ ॥
तुका म्हणे भोळी । माय कृपेची कोंवळी ॥ ४ ॥

(४६५)

पायांपासीं चित्त । तेणें भेटी अखंडित ॥ १ ॥
ऐसें खेळों भलते ठायीं । प्रेमसूत्रदोरी पायीं ॥ २ ॥
केलेंसे जतन । मुळीं काय ते वचन ॥ ३ ॥
विचारावें मना । तुका म्हणे सर्वजाणा ॥ ४ ॥

(४६६)

तुजपासीं मन । माझी तुज भूकतान ॥ १ ॥
जिव्हार तें एकेठायीं । दुजे बोलायाचें कांई ? ॥ २ ॥
माझिया कौतुकें । उभा पहासी भातुकें ॥ ३ ॥
तुका म्हणे साचें । तेथें मागावें कईचें ? ॥ ४ ॥

(४६७)
तुम्हां आम्हां सरी । आतां कैंच्या मागों परी ? ॥ १ ॥
स्वामिसेवा अळंकार । नाहीं आवडिये पार ॥ २ ॥
खुंटलिया वाचा । मग आनंद हा कैंचा ? ॥ ३ ॥
तुका म्हणे कोडें । आम्ही नाचों तुजपुढें ॥ ४ ॥

(४६८)
जाणतें लेंकरूं । माता लागे दूर धरूं ॥ १ ॥
तैसें नको कृपावंते । पांडुरंगे माझे माते ॥ २ ॥
नाहीं मुक्ताफळा । भेटी मागुती त्या जळा ॥ ३ ॥
तुका म्हणे लोणी । ताक सांडी निवडूनि ॥ ४ ॥

*प्रकरण १६ वें*

# एकविधभाव

(४६९)
आमुच्या हें आलें भागा । जिव्हार गा जगाचें ॥ १ ॥
धरूनियां ठेलों जीवें । दृढभावें बळकट ॥ २ ॥
आणुनियां केला रूपा । उभा सोपा जवळी ॥ ३ ॥
तुका म्हणे अंकिन्नला । खालीं आला वचनें ॥ ४ ॥

(४७०)
पदोपदीं दिलें अंग । जाला संग कारण ॥ १ ॥
रुंधवुनि ठेलों ठाव । जग वाव सकळ ॥ २ ॥
पुढें चाली मनलाहो । वाढे देहो संतोष ॥ ३ ॥
तुका म्हणे क्षरभागीं । जालों जगीं व्यापक ॥ ४ ॥

(४७१)
निवडुनि नवनीत । भोगिजेत संचित ॥ १ ॥
आतां पुढें भाव सार । जीवें थार पहावी ॥ २ ॥

पारख्याचें पडलें हातीं । चांचपती आंधळीं ॥ ३ ॥
तुका म्हणे सेवन घडे । त्यासी जोडे लाभ हा ॥ ४ ॥

(४७२)

इच्छिती तयांसी व्हावें जी अरूप । आम्हांसी स्वरूपस्थितीचाड ॥१
आतां नव्हे माझा भाव अनारिसा । पाउलांनीं इच्छा गोंवियेली ॥२
लेंकरासी कोठें जाणत्याचें परी । करूं येते दूरी धरावयां ? ॥ ३ ॥
लागली न सुटे नामाची आवडी । माझी भावजोडी भंगू नको ॥ ४ ॥
वेसी आढेवेढे मुक्तिअभिलाषें । चाळवी त्या पिसें ब्रह्मज्ञानी ॥ ५ ॥
तुका म्हणे माझा कोठें भक्तिरस ? । पाडावयां ओस चाळविसी ॥६

(४७३)

आम्हां भाविकांची जाती । एवविध जी श्रीपति ॥ अलंकारयुक्ति । सरों तेथें शकेना ॥ १ ॥ जाणें माउली त्या खुणा । क्षोभ उपजों नेदी मना ॥ शांतवुनि स्तना । लाविसील कृपाळे ॥२॥ तुज अवघें होऊं येतें । मज वांटों नये चित्तें ॥ उपासनेपरतें । नयो कांहीं आवडीं ॥ ३ ॥ करूं रूपाची कल्पना । मुखीं नामउच्चारणा ॥ तुका म्हणे जना । जळा स्थळा देखतां ॥४ ॥

(४७४)

काळ सारावा चिंतनें । एकांतेसीं गंगास्नानें ॥ देवाचें पूजनें । प्रदक्षणें तुळसीच्या ॥ १ ॥ युक्त आहारविहार । नेम इंद्रियासीं सार ॥ नसावी बासर । निद्रा बहुभाषण ॥ ३ ॥ परमार्थमहाधन । जोडी देवाचें चरण ॥ व्हावया जतन । हे उपाय लाभाचें ॥ ३ ॥ देह समर्पिजे देवा । भार कांहींच न घ्यावा ॥ होइल आघवा । तुका म्हणे आनंद ॥ ४ ॥

(४७५)

माझी भक्ती बळी । एकविधभावबळीं ॥ १ ॥
मी कां पडेन निराळा । ऐसा सांडोनि सोहळा ? ॥ २ ॥

आतां अनारिसा । येथें न होये सहसा ॥ ३ ॥
तुका म्हणे पाये । पुढें उभा विठो ठाये ॥ ४ ॥

(४७६)

गोपीचंदनलेपनें । मुद्रा लेणें वैष्णवी ॥ १ ॥
अलंकारीं मिरविणें । ही भूषणें स्वामीचीं ॥ २ ॥
विकिलों या सेवें जीवें । एक्याभावें देवासी ॥ ३ ॥
तुका म्हणे शूर जालों । बाह्य आलों संसारा ॥ ४ ॥

(४७७)

जैसे तैसे आतां । मज प्रमाण अनंता ॥ १ ॥
पायां पडणें तें न संडीं । पोटीं तेंचि वरी तोंडी ॥ २ ॥
एका भावें चाड । आदि तैसें अंतीं गोड ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्हां । नाहीं टळणेंचि नेमा ॥ ४ ॥

(४७८)

येथें आड कांहीं न साहे आणिक । प्रमाण तें एक हेंचि जालें ॥ १ ॥
गाऊं नाचूं टाळी वाऊं गीतछंदें । डोलवूं विनोदें अंग तेणें ॥ २ ॥
मथुनियां सार काढिलें बाहेरी । उपाधि ते येरी निवडिली ॥ ३ ॥
तुका म्हणे जगा लाविली शिराणी । सेवितां हे धणी थोर सुख ॥ ४ ॥

(४७९)

आम्हां एकविधा पुण्य सर्वकाळीं । चरणकमळीं स्वामीचिया ॥ १ ॥
चित्ताचें राहिलें संकल्पचळण । करुनि प्रमाण आज्ञा असों ॥ २ ॥
दुजियापासून परतलें मन । केलें घ्यावें दान होईल तें ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां पुरला नवस । एकाविण सोस सकळही ॥ ४ ॥

(४८०)

उपासासेवटीं अन्नासवें भेटी । तैसी माझी मिठी पडो पायीं ॥ १ ॥
पुरवी वासना साच सर्वजाणा । आम्हां नारायणा-अंकिताची॥ २ ॥

बहुदिसां माते पुत्रासवें भेटी । तैसा दाटो पोटीं उभडु हा ॥ ३ ॥
तुका म्हणे धन कृपणा सोइरें । यापरी दुसरें नहो आतां ॥ ४ ॥

(४८१)

नाहीं वागवीत जाणिवेचें ओझें । स्वामिसेवेकाजें निर्धारु हा ॥ १ ॥
आज्ञा ते प्रमाण हा मनोनिर्धार । येणें फिटे भार निश्चयेंसी ॥ २ ॥
आळी करूं आम्ही एकविधचित्तें । तैसें होऊं येतें मायबापा ॥ ३ ॥
तुका म्हणे माझी ये जातींचीं सेवा । घातलासें देवा भार तुम्हां ॥४

(४८२)

रणीं जातां शूर न पाहे माघारें । ऐसिया निर्धारें राखें आतां ॥ १ ॥
संवसारा हातीं अंतरलों दुरी । आतां कृपा करी नारायणा ॥ २ ॥
'वागविता तुझ्या नामाचें हत्यार' । हाचि बडिवार मिरवितों ॥ ३ ॥
तुका म्हणे मज फिरतां माघारें । तेथें उणेंपुरें तुम्ही जाणा ॥ ४ ॥

(४८३)

एकविध आम्ही न धरूं पालट । न संडू हे वाट सांपडली ॥ १ ॥
म्हणवूनि केला पाहिजे सांभाळ । माझें बुद्धिबळ पाय तुझें ॥ २ ॥
बहुत बोलतां न कळे प्रकार । अंतरा अंतर साक्ष असे ॥ ३ ॥
तुका म्हणे अगा जीवींच्या जीवना । तूंचि नारायणा साक्षी माझा ॥४

(४८४)

माझिया जीवासी हेंचि पैं विश्रांति । तुझे पाय चित्तीं पांडुरंगा ॥ १ ॥
भांडवल गांठी आलें सपुरतें । समाधान चित्ते मानियेलें ॥ २ ॥
उदंडउच्चारु घातला पसरु । रूपावरी भरू आवडीचा ॥ ३ ॥
तुका म्हणे मज भक्तिची आवडी । अभेदीं तांतडी नाहीं तेणे ॥ ४ ॥

(४८५)

जन्ममरणाची विसरलो चिंता । तूं माझा अनंता मायबाप ॥ १ ॥
होतील ते डोळां पाहेन प्रकार । भय भवभार निरसलीं ॥ २ ॥

लिगाडाचें मूळ होतीं पंचभूतें । त्यांचें त्यांपुरतें विभागिलें ॥ ३ ॥
तुका म्हणे जाला प्रपंच पारिखा । जिवासी तूं सखा पांडुरंगा ॥ ४ ॥

(४८६)
लौकिकापुरती नव्हे माझी सेवा । अनन्य केशवा दास तुझा ॥ १ ॥
म्हणऊनि करीं पायांसवें आळी । आणीक वेगळी नेणें परी ॥ २ ॥
एकविध आम्ही स्वामिसेवेसाठीं । वरी तोचि पोटीं एकभाव ॥ ३ ॥
तुका म्हणे करीं सांगितलें काम । तुम्हां धर्माधर्म ठावे देवा ॥ ४ ॥

(४८७)
खेळों मनासवें जीवींच्या संवादें । कौतुकविनोदें निरंजनीं ॥ १ ॥
पचीं पडिलें तें रुचे वेळोवेळां । होतसे डोहोळा आवडीचा ॥ २ ॥
एकांताचें सुख जडलें जिव्हारीं । वीट परिचारीं बरा आला ॥ ३ ॥
जगाऐसी बुद्धि नव्हे आतां कदा । लंपट गोविंदा-पायीं जालों ॥ ४ ॥
आणीक ते चिंता नलगे करावी । नित्य नित्यनवी आवडी हे ॥ ५ ॥
तुका म्हणे धडा* राहिलो पडोन । पांडुरंगीं मन विसांवलें ॥ ६ ॥

*टीप:– धडा पडोन = शरीरें निचेष्ठ होत्साता, आणि धडा पढोन = अभ्यासयोगें करून; असे द्विविध अर्थ.

(४८८)
आणीक दुसरें मज नाहीं आतां । नेमिलें या चित्तां-पासुनियां ॥ १ ॥
पांडुरंग मनीं पांडुरंग ध्यानीं । स्वप्नींजागरणीं पांडुरंग ॥ २ ॥
पडिलें वळण इंद्रियां सकळां । भाव तो निराळा नाहीं आतां ॥ ३ ॥
तुका म्हणे नेत्रीं केली ओळखण । तटस्थ त्या ध्याना विटेवरी ॥ ४ ॥

(४८९)
सुखाची वसति जाली माझें जीवीं । तुमच्या गोसावी-कृपादानें ॥ १ ॥
रूप वेळोवेळां आठवीं अंतरीं । बैसोनि जिव्हारीं राहिलें तें ॥ २ ॥
विसांवलें मन विटलें प्रपंचा । गोडावली वाचा येणें रसें ॥ ३ ॥
तुका म्हणे कांहीं नाठवेसें केलें । दूसरें विठ्ठलें मज आतां ॥ ४ ॥

(४९०)
गुणांचें आवडी वाचेचा पसरु। पडिला विसरू इतरांचा ॥ १ ॥
आदिमध्यअंत–नाहीं–अवसान। जीवनीं जीवन मीनलेनि ॥ २ ॥
रामकृष्णनाममाळा हे साजिरी। ओंविली गोजिरी कंठाजोगी ॥ ३ ॥
तुका म्हणे तनु जालीसे शीतळ। अवघीं सकळब्रह्मानंदें ॥ ४ ॥
(४९१)
भेटीची आवडी उताविळ मन। लागलेसें ध्यान जीवीं जीवा ॥ १ ॥
आतां आवडीचा पुरवी सोहळा। येऊनी गोपाळा क्षेम देई ॥ २ ॥
नेत्र उन्मिलीत राहिलें तटस्थ। गंगा–अश्रुपात वहावली ॥ ३ ॥
तुका म्हणे तुम्ही करा साचपणा। मुळींच्या वचना आपुलिया ॥ ४ ॥
(४९२)
अभयदान मज देई गा उदारा। कृपेच्या सागरा पांडुरंगा ॥ १ ॥
देहभाव तुझ्या ठेवियेला पायीं। आणीक मी कांहीं नेणें दुजें ॥ २ ॥
सेवाभक्तिभाव नेणें मी पतित। आतां माझें हित तुझ्या पायीं ॥ ३ ॥
अवघा निरूपिला तुज देहभाव। आतां मज पाव पांडुरंगा ॥ ४ ॥
तुका म्हणे तुझें नाम दीनानाथ। तें मज उचित करीं आतां ॥ ५ ॥
(४९३)
लागों तुझें सोयीं ऐसे करी कांहीं। माझे विठाबाई जननिये ॥ १ ॥
पतितपावन म्हणविसी जरी। अव्हेरु न करी तरी माझा ॥ २ ॥
नाहीं तरी ब्रीद टाकी सांडुनियां। न धरिसी माया जरी माझी ॥३
बोलियेला बोल करावा साचारें। तरि लोकीं बरें होईल तें ॥ ४ ॥
करावें सोयेर लोकलाजेभेणें। वचनासी उणें येवों नये ॥ ५ ॥
माझेंविसीं ऐसें व्हावें म्हणे तुका। होसील तूं सखा जीवलग ॥ ६ ॥
(४९४)
येउनीजाउनी पाहें तुजकडे। पडिलें सांकडें नारायणा ॥ १ ॥
आणीक कोणाचा मज नाहीं थार। तुजवरि भार जीवेंभावें ॥ २ ॥

निष्ठुर अथवा होईं तूं कृपाळ । तुज सर्वकाळ विसरेंना ॥ ३ ॥
आपुलें वचन राहे सांभाळून । तुम्हां आम्हां जाण पडिपाडु ॥ ४ ॥
ज्याच्या वचनासी अंतर पडेल । बोल तो येईल तयाकडे ॥ ५ ॥
तुम्हां आम्हां तैसें न व्हो म्हणे तुका । होसील तूं सखा जीवलग ॥६

(४९५)

तूं माझा सोयरा–सज्जन–सांगाति । तुजमज प्रीति चालों सदा ॥ १ ॥
तूं माझा जिव्हाळा जीवींचा जिवलग । होसी अंतरंग अंतरींचा ॥ २ ॥
गणगोत्रमित्र तूं माझें जीवन । अनन्यशरण तुझें पांयीं ॥ ३ ॥
तुका म्हणे सर्वभावें तुझा दास । आवडे अभ्यास सदा तुझा ॥ ४ ॥

(४९६)

न करीं पठण घोषअक्षरांचा । विठ्ठल आमुचा बीजमंत्र ॥ १ ॥
सर्वकाळ नाम–चिंतन मानसीं । –समाधि मनासि समाधान– ॥ २ ॥
न करीं भ्रमण न रिघें कपाटीं । जाये जेथ दाटी वैष्णवांचि ॥ ३ ॥
आनु नेणें कांहीं नवजें तपासि । नाचें दिंडीपासीं जागरणीं ॥ ४ ॥
उपवासव्रत न करीं पारणें । रामकृष्ण म्हणे नारायण ॥ ५ ॥
आणिकांची सेवा–स्तुती वानूं नेणें । नेणें तुका म्हणे दुजें कांहीं ॥ ६ ॥

(४९७)

आणिकांचीं स्तुती आम्हां ब्रह्महत्त्या । एकावांचुनि त्या पांडुरंगा ॥१
आम्हां विष्णुदासां एकविधभाव । न म्हणों या देव आणिकांसी ॥२
शतखंड माझी होईल रसना । जरी या वचना पालटेन ॥ ३ ॥
तुका म्हणे मज आणिकासंकल्पें । अवघींच पापें घडतील ॥ ४ ॥

(४९८)

पतिव्रता नेणें आणिकांची स्तुती । सर्वभावें पति ध्यानींमनीं ॥ १ ॥
तैसें माझें मन एकविध जालें । नावडे विठ्ठलेंविण दुजें ॥ २ ॥
सूर्यविकासिनी नेघे चंद्रकळा । गाये ते कोकिळा वसंतेंसी ॥ ३ ॥
तुका म्हणे बाळ मातेपुढें नाचे । बोल आणिकांचें नावडती ॥ ४ ॥

(४९९)
पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण। आम्हां नारायण तैशापरी ।। १ ।।
एकविधभावें अनुसरतांपरि। आतां नाहीं उरी आणिकांसी ।। २ ।।
लोभ्या सर्वभावें आवडतें धन। आम्हां नारायण तैशापरी ।। ३ ।।
तुका म्हणे जालें एकविधमन। विठ्ठलावांचून नेणें दुजें ।। ४ ।।

(५००)
न पूजीं या देवां ने घे त्यांची सेवा। न मनीं केशवाविण दुजें ।। १ ।।
काय उणें जालें मज तयापायीं। तें मी मागों भाई कवणापें ? ।। २ ।।
आणिकांची कीर्ति नाइकें न बोलें। चाड या विठ्ठलेंविण नाहीं ।। ३ ।।
न पाहें लोचनीं श्रीमुखावांचुनि। न वजे सांडूनि पंढरिये ।। ४ ।।
नाहीं कांहीं आस मुक्तिचें सायास। न भें संसारास येतांजातां ।। ५ ।।
तुका म्हणे कांहीं हवें ऐसें जीवा। नाहीं या केशवाविण दुजें ।। ६ ।।

(५०१)
तैसे नव्हों आम्ही विठ्ठलाचें दास। यावें आणिकांस काकुळती ।। १ ।।
स्वामिचिया सत्ता ठेंगणें सकळ। आला कळिकाळ हाताखालीं ।। २ ।।
अंकिताचा असे अभिमान देवा। समर्पुनि हेवा असों पायीं ।। ३ ।।
तुका म्हणे आम्हां इच्छेचें खेळणें। कोड नारायणें पुरविलें ।। ४ ।।

(५०२)
न लाहिजे जपें न लाहिजे तपें। आम्हांसी हें सोपें गीतीं गातां ।।१
करितांही ध्यान न ये जो धारणा। तो नाचे कीर्तनामाजी हरि ।।२
नाहीं नामरूप जयासी आकार। तोचि कटी कर उभा विटे ।। ३ ।।
अनंत ब्रह्मांडें जयाचिया पोटीं। तो आम्हां संपुष्टीं भक्तिभावें ।। ४ ।।
तुका म्हणे वर्म पाळें लडिवाळें। जी होतीं निर्मळें अंतर्बाह्य ।। ५ ।।

(५०३)
बाळ काय जाणे जीवनउपाये ?। मायबाप वाहे सर्व चिंता ।। १ ।।
आइतें भोजन खेळणें अंतरीं। अंकिताचे शिरीं भार नाहीं ।। २ ।।

आपुलें शरीर रक्षितां न कळे । सांभाळूनि लळे पाळी माय ॥ ३ ॥
तुका म्हणे माझा विठ्ठल जनिता । आमुची ते सत्ता तयावरी ॥ ४ ॥

(५०४)

काय करितील केली नित्यपापें । वसे नाम ज्यापें विठोबाचें ? ॥ १ ॥
तृणीं हुताशन लागलिया रासी । जळतील तैसी क्षणमात्रें ॥ २ ॥
विष्णुमूर्तिपाद पाहतां नयन । तेथें कर्म कोण राहूं शके ? ॥ ३ ॥
तुका म्हणे नाम जाळी महादोष । जेथें होय घोष कीर्तनाचा ॥ ४ ॥

(५०५)

विश्वासिया नाहीं लागत सायास । अनायासें रस अंगा येतो ॥ १ ॥
लेंकुराचें हातें घास मागे माता । वोरसोनि चित्ता सुख पावे ॥ २ ॥
गौरव त्यामानीं आरुषवचनीं । भूषवोनि वाणी मिरवावी ॥ ३ ॥
तुका म्हणे आहे सकळ हा साक्षी । विश्वासकैंपक्षी पांडुरंग ॥ ४ ॥

(५०६)

वैभवाचें धनी श्रीशरणागत । सत्यभावें चित्त अर्पिलें तें ॥ १ ॥
नेदी उरों देव आपणावेंगळें । भावाचिया बळें ठायीं ठाव ॥ २ ॥
जाणोनि नेणोनि अंगा आली दशा । मग होय इच्छा आपणचि ॥ ३ ॥
तुका म्हणे बरें धाकुट्याचें जिणें । माता स्तनपानें वाढवितें ॥ ४ ॥

(५०७)

संतोषे माऊली आरुषवचनीं । वोरसोनि स्तनीं लावी बाळा ॥ १ ॥
तैसें प्रेमळाचें अवघेंचि गोड । पुरवितो कोड पांडुरंग ॥ २ ॥
सेवा करी साहे निष्ठुर–उत्तरें । त्याचें वाहे बरें तेंचि मनीं ॥ ३ ॥
तुका म्हणे खेळे इच्छावशखेळ । चिंता ते सकळ कांहीं नेणें ॥ ४ ॥

(५०८)

माउलीची चाली लेकराचे ओढी । तयालागीं काढी प्राण प्रीतीं ॥ १
ऐसी बळिवंत आवडी जी देवा । संतमहानुभवाप्रमाणित ॥ २ ॥

मोहें मोहियेलें सर्वकाळ चित्त । -विसरूं तो घेत नाहीं क्षण ।। ३ ।।
तुका म्हणे दिला प्रेमाचा वोरस । सांभाळिलें दास आपुलें तें ।। ४ ।।

(५०८)
कवतुकवाणी बोलतसें लाडें । बोबडे वांकडें आर्षमुखें ।। १ ।।
दुजेपणभाव नाहीं ते आशंका । जननी बाळकामध्यें भेद ।। २ ।।
सलगी करुनि जवळी पाचारुं । धांवोनियां करूं अंगसंग ।। ३ ।।
धरूनि पालव मागतों भातुकें । आवडीचें निकें प्रेमसुख ।। ४ ।।
तुका म्हणे तुज आमुचीच गोडी । ऐसी हे आवडी कळों आली ।। ५ ।।

(५१०)
न कळे जी भक्ति काय करूं सेवा ?। संकोचोनि देवा राहिलोंसे ।। १
जोडोनियां कर राहिलों निवांत । पायांपासी चित्त ठेवुनियां ।। २ ।।
दिशाभुली करी स्थळीं प्रदक्षणा । भ्रमें नारायणा कष्टविलें ।। ३ ।।
तुका म्हणे जालों आज्ञेचा पालक । जीवनासी एक ठाव केला ।। ४ ।।

(५११)
एकविधवृत्ति न राहे अंतरीं । स्मरणींच हरी विस्मृति व्हे ।। १ ।।
कैसें हे नवल वाटे अनुभवें । मज माझ्या जीवें साक्षित्वेंसी ? ।। २ ।।
न राहे निश्चळ जागवितां मन । किती क्षणक्षण सावरावें ? ।। ३ ।।
तुका म्हणे बहु केलें वेवसाव । तेणे रंगें जीव रंगलासे ।। ४ ।।

(५१२)
आतां सोडवणी न या नारायणा । तरी मी वांचेना काळाहातीं ।। १ ।।
ऐसें सांगोनियां जालों उतराई । आणीक ते कांई माझें हातीं ? ।।२
केलियाचें माप नये सेवटासी । करितील नासी अंतराय ।। ३ ।।
तुका म्हणे भय वाटतसें जीवा । धांवणिया धांवा लवकरी ।। ४ ।।

(५१३)
माझा मायबाप तूंचि वित्तगोत । तूंचि माझा हितकर्ता देवा ।। १ ।।
तूंचि माझा देव तूंचि माझा जीव । तूंचि माझा भाव पांडुरंगा ।।२

तूं माझा आचार तूं माझा विचार । तूंचि सर्वभार चालविता ।। ३ ।।
सर्वभावें मज तूं होसी प्रमाण । वाहूं जरी आण तेही तुझी ।। ४ ।।
तुका म्हणे तुज विकिलों स्वभाव । कळे तो उपाव करी आतां ।। ५ ।।

(५१४)

देव आतां आम्हीं केला असे ऋणी । आणिका वांचूनि काय गुंता ।। १
एकाचें आर्जव करूं एकनिष्ठ । आनांचा बोभाट कामा नये ।। २ ।।
बहुतांचें आर्जव केल्या खटपट । नाहीं हा शेवट शुद्ध होत ।। ३ ।।
पुरता विचार आणोनी मानसीं । अंतरलों सर्वांसि पई देखा ।। ४ ।।
तुका म्हणे देवाचरणीं असों भाव । तेथें माझा जीव संतोषे हा ।। ५ ।।

(५१५)

भेदाभेदताळा न घडे घालितां । आठवा रे आतां नारायणा ।। १ ।।
येणें एकें केलें अवघें होय सांग । अच्युताचा संग नामछंदें ।। २ ।।
भोंवरे खळाळ चोर वाटा घेती । पावले मारिती सिवेपाशीं ।। ३ ।।
तुका म्हणे येथें भावेंविण पार । न पविजे सार हेंचि आहे ।। ४ ।।

(५१६)

कामिनीसी जैसा आवडे भ्रतार । इच्छीत चकोर चंद्र जैसा ।। १ ।।
तैसी हे आवडी विठ्ठलाचें पायीं । लागलिया नाहीं गर्भवास ।। २ ।।
दुष्काळें पीडिल्या आवडे भोजन । आणिक जीवन तृषाक्रांता ।। ३ ।।
कामातुरा नाहीं भयलज्जा मनीं । आवडे कामिनी सर्वभावें ।। ४ ।।
तुका म्हणे तैसी राहिली आवडी । पांडुरंग थडी पाववील ।। ५ ।।

(५१७)

सेवा ते आवडी उच्चारावें नाम । भेदाभेदकाम निवारूनि ।। १ ।।
न लगे हालावें चालावें बाहेरी । अवघेंचि घरीं बैसलिया ।। २ ।।
देवाचींच नामें देवाचिये शिरीं । सर्व अलंकारीं समर्पावीं ।। ३ ।।
तुका म्हणे देव भावेंचि संतोषी । वसे नामापाशीं आपुलिया ।। ४ ।।

*प्रकरण १७ वे*

# मनोबोध

(५१८)
आम्ही विठ्ठलाचें दास जालों आतां । न चले हे सत्ता आणिकांची ।।१
नावरे तयासी ऐसें नाहीं दुजें । करितां श्रीराजें काय नव्हे ?।। २ ।।
कोठें तुज ठाव घ्यावयासी धांवा ? । मना तूं विसावा घेई आतां ।।३
इंद्रियांच्या वोढी मोडिल्या व्यापार । ज्या अंगें साचार चाली तुज ।।४
तुका म्हणे आम्ही जिकोनियां काळ । बैसलों निश्चळ होऊनियां ।।५

(५१९)
देवाच्रियें पायीं देई मना बुडी । नकों धांवू वोढी इंद्रियांचे ।। १ ।।
सर्वसुख तेथें होय एकवेळे । न सरे ते काळें कल्पांतिही ।। २ ।।
जाणेंयेणें खुंटे धांव येरझार । न लगे डोंगर उसंतणें ।। ३ ।।
सांगणें तें तुज इतुलेंचि आतां । मानी धनकांता विषतुल्य ।। ४ ।।
तुका म्हणे तुझा होईल उपकार । उतरी पैलपार भवसिंधु ।। ५ ।।

(५२०)
जळों ते जाणीव जळों ते शाहाणीव । राहों माझा भाव विठ्ठलापें ।।१
जळों तो आचार जळों तो विचार । राहे मना स्थिर हरिपायीं ।।२
जळों हा लौकिक जळों दंभमान । लागों जीवा ध्यान विठ्ठलाचें ।।३
जळों हें शरीर जळो हा संबंध । राहो परमानंद माझ्या पोटीं ।।४
तुका म्हणे तेथें अवघेंचि होय । धरी मना सोय विठोबाची ।। ५ ।।

(५२१)
नकों नकों मना गुंतूं मायाजाळीं । काळ हा जवळी ग्रासावया ।। १ ।।
काळाची या उडी पडेल बा जेव्हां । सोडविना तेव्हां कोणी एक ।।२
सोडविना बंधु जनकें बहिणी । शेजेची कामिनी दूर राहे ।। ३ ।।
सोडविना राजा देशींचा चौधरी । आणिकें सोयरीं भलीं भलीं ।। ४ ।।
तुका म्हणे तेथें सोडविना कोणी । एका चक्रपाणी वांचुनियां ।। ५ ।।

(५२२)
फजितखोरा मना किती तुज सांगो ?। नको कोणां लागों मागेंमागें ।।१
स्नेहवादें दु:ख जडलें हें आंगीं। निष्ठुर हो जगीं परमसुखा ।। २ ।।
निंदास्तुती कोणी करो दया माया। न धरीं चाड या सुखदु:खीं ।।३
योगिराज कां रे साहाती बैसोनि ।एकिये आसनीं ? याचिगुणें ।।४
तुका म्हणे मना पाहे विचारून । होईं रे कठिण वज्राऐसा ।। ५ ।।

(५२३)
करीं हेंचि काम । मना जपे राम राम ।। १ ।।
नकों धावूं भोगभानीं । पुढें संसारजाचणी ।। २ ।।
लागो हाचि छंद । मना गोविंद गोविंद ।। ३ ।।
तुका म्हणे मना । मग भीक द्यावी दीना ।। ४ ।।

(५२४)
नको घालूं झांसा । मना उपाधिवोळसा ।। १ ।।
जें जें वाहावे संकल्प । पुण्य तरी तेंचि पाप ।। २ ।।
उपजतां भेव। होतो कासावीस जीव ।। ३ ।।
तुका म्हणे पाहे । होये निवांत ते साहे ।। ४ ।।

(५२५)
प्रारब्धेंचि जोडे धन । प्रारब्धेंचि वाढे मान ।। १ ।।
सोस करिसी कासया ? । भज मना पंढरीराया ।। २ ।।
प्रारब्धेंचि होय सुख। प्रारब्धेंचि पीडादु:ख ।। ३ ।।
प्रारब्धेंचि भरे पोट । तुका करीना बोभाट ।। ४ ।।

*गायरूपकांतून देव दातृत्व*

(५२६)
आम्हां घरीं गाय एकी दुभताहे । पान्हा न समाये त्रिभुवनीं ।। १ ।।
वर्णे ते सांवळी नामियें श्रीधरा। चरे वसुंधरा अवघी भुवनें ।। २ ।।
त्रास नाहीं माये भलत्यासवें जाये। कुर्वाळी तो लाहे भावभरणा ।।३

चहूं धारीं क्षीर वोळली अमूप । सनकादि बाप धाले मनीं ॥ ४ ॥
तुका म्हणे माझी भूक तेथें काय । जोगाविते माय तिन्ही लोकां ॥५

(२२७)

आवडीचे दान देतो नारायण । बाह्या उभारोन राहिलासे ॥ १ ॥
जें जयासी रुचे तें करी समोर । सर्वस्वें उदार मायबाप ॥ २ ॥
डायीं पडिलिया* तेंचि लागें खावें । ठायीचेंचि § घ्यावें विचारूनि ॥३
बीज पेरूनियां तेंचि घ्यावें फळ । डोरलीसी† केळ कैंचें लागे ? ॥ ४
तरी मना आम्ही जें जें इच्छा करूं । तें तें कल्पतरू पुरवी हा ॥५
तुका म्हणे देवा कांहीं बोल नाहीं । तुझा तूंचि पाहीं शत्रुसखा ॥६

टीपः– *ठायीं पडिलिया = स्वस्थानीं रमशील तर. डायीं पडिलिया = अहं कर्तृत्वाच्या हट्टांस पेटशील तर. § ठायीचेंचि = स्वस्थानाप्रत नेणारें– पारमार्थिक हिततत्व. † डोरली = दोडका. पांचवा चरण हा प्रसिद्ध गाथांत नाहीं. तो चौगुले संग्रहातून घेतला आहे. त्यांत ३ रा व ६ वा नाहींत. त्याऐवजी हा तुका म्हणे आम्ही... असा आहे. येथें समाविष्ट करण्याचा हेतू हाच कीं– देव हा संसार आणि परमार्थ दोन्ही चालवतो–पण मानवाच्या निवडीप्रमाणें–हें त्याचें उभयसाक्षी वैशिष्ठ्य होय.

(५२८)

न करीं तळमळ राहें रे निश्चळ । पाळील कृपाळ स्वामी माझा ॥१
अविनाशसुख देईल निर्वाणी । चुकवील खाणी–गर्भवास ॥ २ ॥
आणिकही जीवां होईल उद्धार । तेही उपकार घडती कोटि ॥ ३ ॥
ऐहिकीं परत्रीं होसील सरता । वाचें उच्चारितां रामनाम ॥ ४ ॥
तुका म्हणे सांडीं संसाराचा छंद । तेणें परमानंद पावसील ॥ ५ ॥

(५२९)

अधीरया मना ऐके एक मात । तूं कां रे दुश्चित निरंतर ? ॥ १ ॥
हेंचि चिंता काय खावें म्हणऊनि ? । भले तुजहूनि पक्षिराज ॥ २ ॥
पाहा तो चातक नेघे भूमिजळा । वरुषे जिव्हाळा मेघ तया ॥ ३ ॥

अनुक्रम ........ दि: ........



अजगरू पडे गुहेचें भीतरी। त्यासी काय हरी अव्हेरित ? ॥ ४ ॥
तुका म्हणे पाळी विश्वा विश्वंभर। करी निरंतर ध्यान त्याचें ॥५

टीप:– वरच्या पाठांतील शेवटचे दोन चरण चौगुले संग्रहावरून घेतले आहेत. प्रसिद्ध गाथांत त्या जागीं पुढचे चरण आहेत.

सकळयातीमध्यें ठक हा सोनार। त्याघरीं व्यापार झारियाचा ॥४
तुका म्हणे जळीं वनीं जीव एक। तयापाशीं लेख काय नसे ? ॥ ५ ॥

(५३०)

त्रैलोक्य पाळितां उबगला नाहीं। आमुचें त्या कांई ओझें असे ? ॥१
पाषाणाचें पोटीं बैसका दर्दुरा। तया मुखीं चारा कोण घाली ? ॥२
पक्षीअजगरीं न कीजे संचित। तयांसि अनंत प्रतिपाळी ॥ ३ ॥
तुका म्हणे तया भार घातलिया। उपेक्षीना दया–सिंधु माझा ॥ ४ ॥

(५३१)

नित्य उठोनियां खावयाची चिंता। आपुल्या स्वहिता नाठवीसी ॥१
जननीचें पोटीं जन्मलासी जेव्हां। चिंता तुझी तेव्हां केली तेणें ॥ २ ॥
चातका लागूनि केलें मेघजल। उदास करील तुज केवी ? ॥ ३ ॥
पक्षी वनचरें प्राणी भूमीवरि। तयांलागी हरि उपेक्षीना ॥ ४ ॥
तुका म्हणे भाव धरुनियां चित्तीं। राहिल्या श्रीपति उपेक्षीना ॥ ५ ॥

(५३२)

बैसोनि निश्चळ करी त्याचें ध्यान। देईल तो अन्नवस्त्र दाता ॥ १ ॥
काय आम्हां करणें अधिक सांचुनी ?। देव जाला ऋणी पुरविता ॥२
दयाळु मायाळु जाणे कळवळा। शरणागतलळा पाळों जाणे ॥ ३ ॥
सांगणें–मागणें न लगे तयासी। जाणे इच्छा तैसी पुरवी तो ॥ ४ ॥
तुका म्हणे लेईं अलंकार अंगीं। विठ्ठल हा जगीं तूंचि होसी ॥ ५ ॥

(५३३)

जरी तुज न ये मधूर उत्तर। दिधला सुस्वर नाहीं दैवें ॥ १ ॥
नाहीं तयाविण भुकेला विठ्ठल। येई तैसा बोल रामकृष्ण ॥ २ ॥

देवापासी मागें आवडती भक्ति । विश्वासेंसी प्रीतिभावबळें ॥ ३ ॥
तुका म्हणे मना सांगतो विचार । धरावा निर्धार भक्तिमार्गीं ॥ ४ ॥

(५३४)
कृष्णरामनाम मांडाव्या पां ओळी । तेणें होय होळी पापा धुणी ॥ १ ॥
ऐसा मना छंद लावी रे अभ्यासी । जया नाहीं नासी ब्रह्मरसा ॥ २ ॥
जोडी तरी ऐसी करावी न सरे । पुढें आस नुरे मागुताली ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें धरी कांही मनीं । यातायाती खाणी चुकतील ॥ ४ ॥

(५३५)
न करी रे मना कांहींच कल्पना । चिंतीं पां चरणां विठोबाच्या ॥१
येथें सुखाचिया रासी अमूपही । पुढें ठाव नाहीं कल्पनेसी ॥ २ ॥
सुखाचें ओतिलें साजिरें श्रीमुख । शोकमोहदु:खघात नासे ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें होईल विसांवा । खुंटतील धावा पुढिला या ॥ ४ ॥

(५३६)
हरिनामवल्ली पावली विस्तार । फळपुष्पभार हेलावली ॥ १ ॥
येथें माझ्या मना होईं पक्षिराज । साधावया काज आवडीचें ॥ २ ॥
मुळींची या बीजें दाखविली गोडी । लाहो करी जोडी जालि याची ॥३
तुका म्हणे क्षण वायां जातां काळ । गोडी ते रसाळ अंतरेल ॥ ४ ॥

(५३७)
घेसी तरी घेई संतांची हे भेटी । आणिक त्या गोष्टी नको मना ॥१
सर्वभावें त्यांचें देव भांडवल । आणीक ते बोल न बोलती ॥ २ ॥
करिसी तो करी संतांचा सांगात । आणीक ते मात नको मना ॥३
बैससील तरी बैसे संतांमधीं । आणीक ते बुद्धि नको मना ॥ ४ ॥
जासी तरी जाई संतांचिया गांवा । होईल विसांवा तेथें मना ॥ ५ ॥
तुका म्हणे संत सुखाचें सागर । मना निरंतर धणी घेई ॥ ६ ॥

(५३८)
सांवळे सुंदर पाहे दृष्टीभरी । ऐसें कांही करी मना माझ्या ॥ १ ॥
मना तुज ठाव दिला त्याचे पायीं । राहे विठाबाईसवें सदा ॥ २ ॥

मना नको धरूं आणिकांचा संग । नाहीं पांडुरंग जया मनीं ।। ३ ।।
वरपंग भाव नको म्हणे तुका । करीं प्राणसखा नारायण ।। ४ ।।

(५३९)

विषयाचें सुख नको नको मना । पहा त्या रावणा काय जालें ? ।।१
इंद्रा पडली भगें चंद्र जाला काळा । म्हणोनी कंटाळा विषयांचा ।।२
मोहिनीच्या संगें भस्मासूर मेला । वालीप्राण गेला रामबाणें ।। २ ।।
येवढ्यासाठी तुका येतो काकुलती । नको यातायाती–गर्भवास ।। ४ ।।

(५४०)

विषयाचें सुख येथें वाटे गोड । पुढें अवघड यमदंड ।। १ ।।
मारिती तोडिती पीडिती निष्ठुर । यमाचें किंकर बहुसाल ।। २ ।।
असिपत्रे घाय खावया इंगळ । तळतील ज्वाळतैलपाकी ।। ३ ।।
तप्तभूमीवरि लोळविती पाही । अग्निस्तंभ बाही कवळविती ।। ४ ।।
म्हणऊनि तुका येतों काकुलती । पुरे यातायाती गर्भवास ।। ५ ।।

(५४१)

विषयाचें सुख नकों धरूं मना । होतील यातना नानापरी ।। १ ।।
तांब्याची ते भूमी बहु तापविती । वरी लोळविती प्राणियासी ।। २ ।।
जळतिया खांबा तुज भेटविती । यमलोकीं म्हणती घेई सुख ।। ३ ।।
तुका म्हणे दुःख विषयांकारणें । विठ्ठलचरणें दृढ धरी ।। ४ ।।

(५४२)

आतां नको कोठें जाऊं माझ्या मना । पाळी समाधाना आपुलिया ।।१
सोडी दुष्टबुद्धि राहे मना स्थिर । हाच भाव थोर तुझ्या हातीं ।।२
आतां कासाविस कां रे होसी मना । भवाब्धि तरवेना मज पाण्या ।।३
तुका म्हणे मना करी माझें हित । राहे अखंडित हरीपायीं ।। ४ ।।

(५४३)

आतां तरी मना लागों तुज छंद । आठवी गोविंद हेंचि बरें ।। १ ।।
धंदा करोनियां मेळविसी पैसा । कुटुंबासी कैसा पोशितोसी ? ।। २ ।।

काय सुखाविसी ऐसिया मुखासी ?। पुढे तुझी कैसी गती होय? ।। ३ ।।
तुका म्हणे नको चोरांची संगती । येतों काकुळती मना तुज ।। ४ ।।

(५४४)

मायारूपें ऐसें मोहिलेंसे जन । भोगिती पतन नानाकर्मे ।। १ ।।
काय याची प्रीती करितां आदर ? । दुरावितां दूर तेंचि भले ।। २ ।।
नाना छंद अंगीं बैसती विकार । छळियेले फार तपोनिधी ।। ३ ।।
तुका म्हणे ऐसें शिकविनों तुज । आतां धरी लाज मना पुढें ।। ४ ।।

*प्रकरण १८ वे*

## निष्ठाविचार-गुच्छ-१

(५४५)

लेकरा आईति पित्याची जतन । होये निजधन सर्वजोडी ।। १ ।।
त्यापरि आमुचा जालासें सांभाळ । देखिलाचि काळ नाहीं आड ।।२
भुकेचें सन्निध वसे स्तनपान । उपायाची भिन्न चिंता नाहीं ।। ३ ।।
आळवुनि तुका उभा पैलथडी । घातली या उडी पांडुरंगें ।। ४ ।।

(५४६)

आम्हां हें कौतुक जगा द्यावी नीत । करावें फजित चुकती ते ।। १ ।।
कासयाचा बाध एकाच्या निरोपें? । काय व्हावें कोपें जगाचिया? ।।२
अविद्येचा येथें कोठें परिश्रम । रामकृष्णनाम ऐसे वाण ? ।। ३ ।।
तुका म्हणे येथें खऱ्याचा विकरा । न सरती येरा खोट्यापरी ।। ४ ।।

(५४७)

शुद्धचर्या हेंचि संतांचें पूजन । लागतचि धन नाहीं वित्त ।। १ ।।
सगुणाचें सोई सगुण विश्रांति । आपणचि येती चोजवीत ।। २ ।।
कीर्तनींच वोळे कृपेचा वोरस । निरूपणें वास संन्निधता ।। ३ ।।
तुका म्हणे वर्म सांगतो सवंग । मना लावा लाग स्वहिताचा ।। ४ ।।

(५४८)

अवगुण कोणी नाहीं प्रतिष्ठिलें । मागें होत आले शिष्टाचार ।। १ ।।
'दुर्बळ' या नांवें पिटावा डांगोरा । हा तों नव्हे बरा सत्यवाद।। २ ।।
मद्य आणि मधु एकरासी नांवें । तरी कां सेववें समत्वेंचि ? ।। ३ ।।
तुका म्हणे माझा उच्छिष्टप्रसाद । निवडी अभेद वृष्टीन्यायें ।। ४ ।।

टीपः– संत निंदक त्यानां दुर्बळादी दुषणानीं दूषवून त्यांच्या बोधाची उपेक्षा करतात–दुसऱ्याचें श्रेष्ठत्व स्थापित करण्यांसाठीं तुलनेच्या भरीस पडतांत – अशा भेदव्यसनी श्रोत्यानी उगा विक्षेप करावा, तो पुढच्या अभंगांत मांडला आहे. यांत माझी वाणी आणि शृंगारीक हरिदासांची वाणी दोन्ही जरी शिष्टाचार-पोषक असल्या तरी माझी मध् आहे ती मदिरा आहे; हें ध्यानीं ठेवा; मी अभेदबुद्धीनें बोलतो; इतर भेदबुद्धीनें बोलतांत, हें प्रतिपादन आहे.

(५४९)

नावडे तरि कां येतील हे भांड ? । घेउनियां तोंड–काळें येथे ? ।।१
नासोनियां जाय रस या संगती । खळाचे पंगती नारायणा ।। २ ।।
तोंडावाटे नर्क काढी अमंगळ । मिष्टान्ना विटाळ करी सुणें ।। ३ ।।
तुका म्हणे नाहीं संतांची मर्यादा । निंद्य तोचि निंदा शिंदळीचा ।।४

(५५०)

जीवींचें जाणावें यानांव आवडी । हेंकड तें ओढी अमंगळ ।। १ ।।
चित्ताच्या संकोचें कांहींच न घडे । अतिशय वेडेचार तेचि ।। २ ।।
काळाविण कांहीं रुचों नाहीं येत । करूनि संकेत ठेवियेला ।। ३ ।।
तुका म्हणे कळे वचनचांचणी । काय बोलवूनि वेळोवेळां? ।। ४ ।।

(५५१)

कृष्णांजनें जालें सोज्वळ लोचन । तेणें दिलें वाण निवडोनि ।। १ ।।
निरोपाच्या मापें केली बडबड । त्याचा तेणें गोड नारायणें ।। २ ।।
भाग्यवंतांघरीं करितां विश्वासें । कार्य त्यासरिसें होईजे तें ।। ३ ।।
तुका म्हणे पोट भरे बरेवोजा । निजठाव निजा निजस्थानीं ।। ४ ।।

(५५२)
भांडवी माऊली कवतुकें बाळा। आपण सकळांसाक्षित्वेसी ॥ १ ॥
माझी माझी म्हणे एकएकां मारी। हेतू नाहीं दुरी उभयतां ॥ २ ॥
'तुझें थोडें भातें' 'माझें बहु फार'। छंद–करकर–वाद मिथ्या ॥ ३ ॥
तुका म्हणे एके ठायीं आहे वर्म। हीच होय श्रमनिवारिती ॥ ४ ॥
(५५३)
जननी हे जाणे बाळकांचें वर्म। सुखदुःखधर्म जें जें कांहीं ॥ १ ॥
आंधळिया जेणें दिधला आधार। तयाचा विचार तोचि जाणे ॥ २ ॥
शरणागता जेणें घातलें पाठींशीं। तो जाणें तेविशीं राखों तया ॥३
कासे लागतया काय तें सायास ?। पोहोणारा त्यांस पार लावी ॥४
तुका म्हणे जीव विठ्ठलाचे हातीं। दिला त्याची गति तोचि जाणे ॥५
(५५४)
नये वांटूं मन विधिनिषेधांसी। स्मरावा मानसीं पांडुरंग ॥ १ ॥
खादलिया अन्ना मासी बोलों नये। अवघेंचि जाये एका घांसें ॥ २ ॥
जोडी होते परी ते बहु कठिण। करितां जतन सांभाळावें ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें न मना विषाद। निंबेविण व्याध तुटों नव्हे ॥ ४ ॥
(५५५)
नये होऊं देऊं भावीं अभावना। यांचिनांव जाणा बहुदोष ॥ १ ॥
मेघवृष्टी येथें होते अनिवार। जिव्हाळ्या उखरलाभ नाड ॥ २ ॥
उत्तमविभागी कनिष्ठाची इच्छा। कल्पतरू तैसा फळे त्यासी ॥ ३ ॥
तुका म्हणे जिणें बहु थोडें आहे। आपुलिया पाहें पुढें बरें ॥ ४ ॥
(५५६)
जुंझाचिया गोष्टी ऐकतांचि सुख। करणीचें दुःख थोर आहे ॥ १ ॥
तैसी हरिभक्ती शूरांची ये फळीं। निवडे तो बळी विरळा एक ॥ २ ॥
पिंड पोसिलिया विषयांचे पाईक। वैकुंठनायक तेथें नाहीं ॥ ३ ॥
तुका म्हणे व्हावें देहासी उदार। रुक्मादेवीवर जोडावया ॥ ४ ॥

शूरांची ये फळीं आणि शूरांचिये फळी (भाग) असा श्लेष.

(५५७)

मधुरा उत्तरासवें नाहीं चाड । अंतरंगीं वाड भाव असो ।। १ ।।
प्राणावेगळा न करी नारायण । मग नसो ज्ञान मूर्ख वरा ।। २ ।।
जनंनिंदा होय तो वरा विचार । थोरिवेचा भार कामा नये ।। ३ ।।
तुका म्हणे चित्तीं भाव निष्ठावंत । दयाक्षमाशांत सर्वभूतीं ।। ४ ।।

(५५८)

भक्तीचें तें वर्म जयाचिये हातीं । तया घरीं शांती क्षमा दया ।। १ ।।
अष्ट महासिद्धि वोळगती द्वारीं । नव जाती दुरी दवडितां ।। २ ।।
तेथें दुष्ट गुण न मिळे निःशेष । चैतन्याचा वास जयामाजी ।। ३ ।।
संतुष्ट हें चित्त सदा सर्वकाळ । तुटली हळहळ त्रिगुणाची ।। ४ ।।
तुका म्हणे येथें काय तो संदेह ?। आपुला गौरव आंगें करी ।। ५ ।।

(५५९)

भोळे भक्त भाव धरिती मानसीं । त्यासी हृषीकेशी जवळीच ।।१।।
भाव नाहीं मनीं अभाविक सदा । त्याचिया मी खेदा काय सांगों ?।।२
गणिकेसारिखी नामें उद्धरिली । सज्ञानें पडिलीं खटाटोपीं ।। ३ ।।
तुका म्हणे माझी काय शुद्धयाती? * । थोर केली ख्याती हरिनामें ।।४।।

* टीपः– शुद्धयाती = निर्मळ व्यक्तिमत्व हा एक वैयक्तिक अर्थ–सत्वनिष्ठ वर्णाश्रमी ब्राह्मण हा दुसरा अर्थ; तिसरा अर्थ शुद्ध म्हणजें मराठ्यांतील शहाण्णव कुळ्या स्वतःला म्हणवतांत ती –व्यावहारिकदृष्ट्या मी शुद्ध हें जाति नाम मिरविलें, पण शुद्ध म्हणवल्यानें शुद्धत्व आले कां ? असा म्हणण्याचा आशय. हा त्रिविध श्लेष समजावा– म्हणून प्रश्नचिन्ह.

(५६०)

भक्ति–भावें करी बैसोनि निश्चित । नको गोवूं चित्त प्रपंचासी ।। १ ।।
एक दृढ धरीं पंढरीचा राव । पुढिल उपाव सुचे मग ।। २ ।।
नको करूं कांहीं देवतापूजन । जपतपध्यान तेंही नको ।। ३ ।।
मानिसील झणीं आपुलीक कांहीं । येरझार पाहीं तुका म्हणे ।। ४ ।।

## प्रकरण १९ वे

# साधनविवेक

(५६१)

कर्मधर्म नव्हति सांग । उण्याआंग पतन ॥ १ ॥
भलत्या काळीं नामावळी । भावबळीं सुलभ ॥ २ ॥
प्राय:श्चित्तें पडती पायां । गाती तयां वैष्णवां ॥ ३ ॥
तुका म्हणे नुपजे दोष । करा घोष आनंदें ॥ ४ ॥

(५६२)

कंई वाहावें जीवन । कंई पलंगीं शयन ॥ १ ॥
जैसी जैसी वेळ पडे । तैसें तैसें होणें घडे ॥ २ ॥
कंई भोज्य नानापरी । कंई कोरडचा भाकरी ॥ ३ ॥
कंई बैसावें वहनीं । कंई पायीं अनवाणि ॥ ४ ॥
कंई उत्तम प्रावर्ण । कंई वसनें तीं जीर्णे ॥ ५ ॥
कंई सकळ संपत्ती । कंई भोगणें विपत्ति ॥ ६ ॥
कंई सज्जनासी संग । कंई दुर्जनासी योग ॥ ७ ॥
तुका म्हणे सत्य जाण । सुखदु:ख तें समान ॥ ८ ॥

(५६३)

कोणाचा संसार? कोणाची संपत्ति?। पहातां तों हातीं कांहीं नये ॥१
काय ते करावें सचोनि संपत्ति। मुखीं नाम चिंती विठोबासी ॥ २ ॥
नाम तेंचि सार नाम तेंचि सार। जपति शंकर सर्वकाळ ॥ ३ ॥
सर्वत्रां सुखाचें सार ते पंढरी। तुका निरंतरी सेवितसें ॥ ४ ॥

(५६४)

दावी जडिबुटी जारणमारणें । नागवें हिंडणें काय काज ? ॥ १ ॥
दावी उग्र तप केलें उपवास । फिरतां हें देश काय काज ?॥ २ ॥
तुका म्हणे नव्हे उदंड उपाये । धरीं आधीं पाये संतांचें ते ॥ ३ ॥

(५६५)
खाटिका प्रमाण करिसी व्यापार । आशा निरंतर धरूनियां ॥ १ ॥
धरूनियां आशा धन मेळविसी । अंतीं नरकासी जाणें सत्य ॥ २ ॥
सत्य जाती जन जाली पोटपाळे । तुका म्हणे लोळे विष्टेमाजी ॥ ३ ॥
(५६६)
यज्ञादिक कर्म करूनि ब्राह्मण । दंभआचरण दावी लोकां ॥ १ ॥
लोकांसी दाविती "मीच कर्मनिष्ठ"। अभिमान स्पष्ट वेद बोले ॥२
बोलिलें जें वेद जाणा ऋषीश्वर । नकों येरझार जाणेयेणें ॥ ३ ॥
जाणेयेणें आधी दुराशा त्यजावी । नकों गोवागोवी तुका म्हणे ॥ ४ ॥
(५६७)
योगतप यांचिनांवें । त्यक्त व्हावें अभिमान ॥ १ ॥
करणें तें हेंचि करा । सत्य वरा व्यापार ॥ २ ॥
तरी खंडे येरझार । निघे भार देहाचा ॥ ३ ॥
तुका म्हणे मानामान । हें बंधन नसावें ॥ ४ ॥
(५६८)
अक्षरांचा श्रम केला । फळा आला तेधवां ॥ १ ॥
अवघियांचा तळ धरी । जीवा उरी नुरवुनी ॥ २ ॥
फळलें तें लवे भारें। पीक खरें ते आलें ॥ ३ ॥
तुका म्हणे हाचि देव- । पुढें भाव सारावा ॥ ४ ॥
(५६९)
केवळ तें प्रायश्चित्त । केलें चित्तमुंडण ॥ १ ॥
अहंकारानांवें दोष । तेणें ओस पाडिलें ॥ २ ॥
अनुतापें स्नानविधी । तेणें बुद्धि क्षाळिली ॥ ३ ॥
जीवभाना पडतां चुका । तेथें तुका विनटे ॥ ४ ॥
(५७०)
शहाणपणीं वेद मुका । तो गोपिकाताकटां ॥ १ ॥
कैसें येथें ? कैसें तेथें ? । शहाणे ते जाणती ॥ २ ॥

(५५२)
भांडवी माऊली कवतुकें बाळा। आपण सकळांसाक्षित्वेसी ॥ १ ॥
माझी माझी म्हणे एकएकां मारी। हेतू नाहीं दुरी उभयतां ॥ २ ॥
'तुझें थोडें भातें' 'माझें बहु फार'। छंद—करकर—वाद मिथ्या ॥ ३ ॥
तुका म्हणे एके ठायीं आहे वर्म। हीच होय श्रमनिवारिती ॥ ४ ॥
(५५३)
जननी हे जाणे बाळकांचें वर्म। सुखदु:खधर्म जें जें कांहीं ॥ १ ॥
आंधळिया जेणें दिधला आधार। तयाचा विचार तोचि जाणे ॥ २ ॥
शरणागता जेणें घातलें पाठींशीं। तो जाणें तेविशीं राखों तया ॥३
कासे लागतया काय तें सायास ?। पोहोणारा त्यांस पार लावी ॥४
तुका म्हणे जीव विठ्ठलाचे हातीं। दिला त्याची गति तोचि जाणे ॥५
(५५४)
नये वांटूं मन विधिनिषेधांसी। स्मरावा मानसीं पांडुरंग ॥ १ ॥
खादलिया अन्ना मासी बोलों नये। अवघेंचि जाये एका घांसें ॥ २ ॥
जोडी होते परी ते बहु कठिण। करितां जतन सांभाळावें ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें न मना विषाद। निंबेविण व्याध तुटों नव्हे ॥ ४ ॥
(५५५)
नये होऊं देऊं भावीं अभावना। यांचिनांव जाणा बहुदोष ॥ १ ॥
मेघवृष्टी येथें होते अनिवार। जिव्हाळचा उखरलाभ नाड ॥ २ ॥
उत्तमविभागी कनिष्ठाची इच्छा। कल्पतरू तैसा फळे त्यासी ॥ ३ ॥
तुका म्हणे जिणें बहु थोडें आहे। आपुलिया पाहें पुढें बरें ॥ ४ ॥
(५५६)
जुंझाचिया गोष्टी ऐकतांचि सुख। करणीचें दु:ख थोर आहे ॥ १ ॥
तैसी हरिभक्ती शूरांची ये फळीं। निवडे तो बळी विरळा एक ॥ २ ॥
पिंड पोसिलिया विषयांचे पाईक। वैकुंठनायक तेथें नाहीं ॥ ३ ॥
तुका म्हणे व्हावें देहासी उदार। रुक्मादेवीवर जोडावया ॥ ४ ॥

शूरांची ये फळीं आणि शूरांचिये फळी (भाग) असा श्लेष.

(५५७)

मधुरा उत्तरासवें नाहीं चाड । अंतरंगीं वाड भाव असो ॥ १ ॥
प्राणावेगळा न करी नारायण । मग नसो ज्ञान मूर्ख वरा ॥ २ ॥
जननिंदा होय तो बरा विचार । थोरिवेचा भार कामा नये ॥ ३ ॥
तुका म्हणे चित्तीं भाव निष्ठावंत । दयाक्षमाशांत सर्वांभूतीं ॥ ४ ॥

(५५८)

भक्तीचें तें वर्म जयाचिये हातीं । तया घरीं शांती क्षमा दया ॥ १ ॥
अष्ट महासिद्धि वोळगती द्वारीं । नव जाती दुरी दवडितां ॥ २ ॥
तेथें दुष्ट गुण न मिळे निःशेष । चैतन्याचा वास जयामाजी ॥ ३ ॥
संतुष्ट हें चित्त सदा सर्वकाळ । तुटली हळहळ त्रिगुणाची ॥ ४ ॥
तुका म्हणे येथें काय तो संदेह ?। आपुला गौरव आंगें करी ॥ ५ ॥

(५५९)

भोळे भक्त भाव धरिती मानसीं । त्यासी हृषीकेशी जवळीच ॥१॥
भाव नाहीं मनीं अभाविक सदा । त्याचिया मी खेदा काय सांगों ?॥२
गणिकेसारिखी नामें उद्धरिली । सज्ञानें पडिलीं खटाटोपीं ॥ ३ ॥
तुका म्हणे माझी काय शुद्धयाती? * । थोर केली ख्याती हरिनामें ॥४॥

* टीपः– शुद्धयाती = निर्मळ व्यक्तिमत्व हा एक वैयक्तिक अर्थ–सत्वनिष्ठ वर्णाश्रमी ब्राह्मण हा दुसरा अर्थ; तिसरा अर्थ शुद्ध म्हणजें मराठ्यांतील शहाण्णव कुळचा स्वतःला म्हणवतांत ती – व्यावहारिकदृष्टचा मी शुद्ध हें जाति नाम मिरविलें, पण शुद्ध म्हणवल्यानें शुद्धत्व आले कां ? असा म्हणण्याचा आशय. हा त्रिविध श्लेष समजावा– म्हणून प्रश्नचिन्ह.

(५६०)

भक्ति–भावें करी बैसोनि निश्चित । नको गोवूं चित्त प्रपंचासी ॥ १ ॥
एक दृढ धरीं पंढरीचा राव । पुढिल उपाव सुचे मग ॥ २ ॥
नको करूं कांहीं देवतापूजन । जपतपध्यान तेंही नको ॥ ३ ॥
मानिसील झणीं आपुलीक कांहीं । येरझार पाहीं तुका म्हणे ॥ ४ ॥

प्रकरण १९ वे

# साधनविवेक

(५६१)

कर्मधर्म नव्हति सांग । उण्याआंग पतन ।। १ ।।
भलत्या काळीं नामावळी । भावबळीं सुलभ ।। २ ।।
प्राय:श्चित्तें पडती पायां । गाती तयां वैष्णवां ।। ३ ।।
तुका म्हणे नुपजे दोष । करा घोष आनंदें ।। ४ ।।

(५६२)

कंई वाहावें जीवन । कंई पलंगीं शयन ।। १ ।।
जैसी जैसी वेळ पडे । तैसें तैसें होणें घडे ।। २ ।।
कंई भोज्य नानापरी । कंई कोरड्या भाकरी ।। ३ ।।
कंई बैसावें वहनीं । कंई पायीं अनवाणि ।। ४ ।।
कंई उत्तम प्रावर्ण । कंई वसनें ती जीर्णे ।। ५ ।।
कंई सकळ संपत्ती । कंई भोगणें विपत्ति ।। ६ ।।
कंई सज्जनासी संग । कंई दुर्जनासी योग ।। ७ ।।
तुका म्हणे सत्य जाण । सुखदु:ख तें समान ।। ८ ।।

(५६३)

कोणाचा संसार? कोणाची संपत्ति?। पहातां तों हातीं कांहीं नयें ।।१
काय ते करावें सचोनि संपत्ति। मुखीं नाम चिंती विठोबासी ।। २ ।।
नाम तेंचि सार नाम तेंचि सार। जपति शंकर सर्वकाळ ।। ३ ।।
सर्वत्रां सुखाचें सार ते पंढरी । तुका निरंतरी सेवितसें ।। ४ ।।

(५६४)

दावी जडिबुटी जारणमारणें । नागवें हिंडणें काय काज ? ।। १ ।।
दावी उग्र तप केलें उपवास । फिरतां हें देश काय काज ?।। २ ।।
तुका म्हणे नव्हे उदंड उपाये । धरीं आधीं पाये संतांचें ते ।। ३ ।।

(५६५)
खाटिका प्रमाण करिसी व्यापार । आशा निरंतर धरूनियां ॥ १ ॥
धरूनियां आशा धन मेळविसी । अंतीं नरकासी जाणें सत्य ॥ २ ॥
सत्य जाती जन जाली पोटपाळे । तुका म्हणे लोळे विष्टेमाजी ॥ ३ ॥
(५६६)
यज्ञादिक कर्म करूनि ब्राह्मण । दंभआचरण दावी लोकां ॥ १ ॥
लोकांसी दाविती "मीच कर्मनिष्ठ" । अभिमान स्पष्ट वेद बोले ॥२
बोलिलें जें वेद जाणा ऋषीश्वर । नकों येरझार जाणेयेणें ॥ ३ ॥
जाणेयेणें आधी दुराशा त्यजावी । नकों गोवागोवी तुका म्हणे ॥ ४ ॥
(५६७)
योगतप यांचिनांवें । त्यक्त व्हावें अभिमान ॥ १ ॥
करणें तें हेंचि करा । सत्य वरा व्यापार ॥ २ ॥
तरी खंडे येरझार । निघे भार देहाचा ॥ ३ ॥
तुका म्हणे मानामान । हें वंधन नसावें ॥ ४ ॥
(५६८)
अक्षरांचा श्रम केला । फळा आला तेधवां ॥ १ ॥
अवघियांचा तळ धरी । जीवा उरी नुरवुनी ॥ २ ॥
फळलें तें लवे भारें । पीक खरें ते आलें ॥ ३ ॥
तुका म्हणे हाचि देव– । पुढें भाव सारावा ॥ ४ ॥
(५६९)
केवळ तें प्रायश्चित्त । केलें चित्तमुंडण ॥ १ ॥
अहंकारानांवें दोष । तेणें ओस पाडिलें ॥ २ ॥
अनुतापें स्नानविधी । तेणें बुद्धि क्षाळिली ॥ ३ ॥
जीवभाना पडतां चुका । तेथें तुका विनटे ॥ ४ ॥
(५७०)
शहाणपणीं वेद मुका । तो गोपिकाताकटां ॥ १ ॥
कैसें येथें ? कैसें तेथें ? । शहाणे ते जाणती ॥ २ ॥

यज्ञमुखीं खोडी काढी। कोण गोडी बोरांची ? ॥ ३ ॥
तुका म्हणे भावाविण। अवघा सिण केला तो ॥ ४ ॥

(५७१)

अभिमानी तोंडकाळा। दावी बळा अंधार ॥ १ ॥
लाभ दवडी हातोंहातीं। तोंडीं माती पाडोनि ॥ २ ॥
लागलीसें पाठीं लाज। जालें काजनाशक ॥ ३ ॥
तुका म्हणे कुश्चळमनीं। विटंबणीं पाडवी ॥ ४ ॥

(५७२)

करूनियां शुद्धमन। नारायण स्मरावा ॥ १ ॥
तेंच हा तरिजें सिंधु। भवबंधु तोडुनि ॥ २ ॥
येथें सरे शुद्ध साचे। अंतरींचें बीज तें ॥ ३ ॥
तुका म्हणे लवणकळी। पडतां जळीं ते होय ॥ ४ ॥

(५७३)

ऐसें कां न करा कांहीं। नास नाहीं पुढें ज्या ? ॥ १ ॥
विश्वंभरा शरणागत। भूतजात वंदुनि ॥ २ ॥
श्रुतिचें कां नेघा फळ। सारमूळ जाणोनि ? ॥ ३ ॥
तुका म्हणें पुढें कांहीं। वाट नाहीं यावरी ॥ ४ ॥

(५७४)

फुकाचें तें लुटा सार। व्हा अमर सदैव ॥ १ ॥
नाहीं गर्भवास पुढती। डोंगर जळती दोषांचें ॥ २ ॥
भावें उदंडचि ध्यावें। नाम गावें आवडी ॥ ३ ॥
तुका म्हणे वरिच्यावरी। देशावरीं न सिणिजें ॥ ४ ॥

(५७५)

उमटती गुणचिन्हें। घेतांगुणें आवडी ॥ १ ॥
पोटींचें तें ओठीं ठाये। चित्त साहे म्हणोनि ॥ २ ॥

डोहोळ्याची भूक गर्भा । ताटीं प्रभा बिंबली ॥ ३ ॥
तुका म्हणे मनें ध्यावें । तेंचि व्हावें वाटतें ॥ ४ ॥

(५७६)

साधन ते थोडे आहे । चित्त–साह्ये जालिया ॥ १ ॥
हर्षामर्ष नुरतां अंगीं । पांडुरंगीं सरता तो ॥ २ ॥
अवघ्या साधनाचें सार । न लगे फार शोधावें ॥ ३ ॥
तुका म्हणे लटिके साहे । सांडीं देहे–अभिमान ॥ ४ ॥

(५७७)

काय करिती काशीगंगा । नसतां चांगा भीतरीं ? ॥ १ ॥
अधणींचा हरळ तैसा । नये रसा–पाकासी ॥ २ ॥
काय करिती टिळेमाळा । भाव स्थळा नाहीं ज्या ? ॥ ३ ॥
तुका म्हणे प्रेमेंविण । केला सिण आघवा ॥ ४ ॥

(५७८)

सावित्रीची विटंबणा । रांडपणा करी ते ॥ १ ॥
काय जाळावें तें नांव ? । अवघें वाव असें तें ॥ २ ॥
कुबेर नांवे मोळी वाहे । कैसी पाहे फजिती ॥ ३ ॥
तुका म्हणे गुणदोखे । उगी मूर्खें फुंदती ॥ ४ ॥

(५७९)

बाळ बापा म्हणतां काका । तरी तो कां अपराध ? ॥ १ ॥
जैसातैसा भाव गोड । पुरवी कोड विठ्ठल ॥ २ ॥
साखरेसी म्हणतां धोंडा । ती कां तोंडा न रुचे ? ॥ ३ ॥
तुका म्हणे आर्ष बोल । नव्हे बोल आहाच ॥ ४ ॥

(५८०)

आम्हां आवडे नाम घेतां । तो ही पिता संतोषे ॥ १ ॥
उभयतां एकचित्त । तरी प्रीत वाढली ॥ २ ॥

आम्ही शोभों निकटवासें। अनारिसें न दिसों ॥ ३ ।
तुका म्हणे पांडुरंगें। अवघ्या अंगें निवालों ॥ ४ ॥

(५८१)

कोण आतां कळिकाळा। येऊं जवळा देईल ? ॥ १ ।
सत्ता ज्याची त्रिभुवनीं। चक्रपाणी कोंवसा ॥ २ ॥
लाड पाळे भार वाहे। उभा आहे कुडावा ॥ ३ ॥
तुका म्हणे घटिकादिस। न निमिष विसंभे ॥ ४ ॥

(५८२)

साधनाचें कष्ट मोठे। भये वाटे थोर हें ॥ १ ॥
मुखें गावें भात्रें गीत। सर्व हित बैसल्या ॥ २ ॥
दासां नव्हे कर्मदान। तनमन निश्चळ ॥ ३ ॥
तुका म्हणे आत्मनिष्ठा। भागे चेष्टा मनाची ॥ ४ ॥

(५८३)

अनुसरते अमर जाले। अंतरले संसारा ॥ १ ॥
न देखती गर्भवास। कधीं दास विष्णुचें ॥ २ ॥
विसंभेना माता बाळा। तैसा ळळापाळिता ॥ ३ ॥
त्रिभुवनीं ज्याची सत्ता। तो रक्षिता तुकासी ॥ ४ ॥

(५८४)

मथनीचें नवनीत। सर्वहितकारक ॥ १ ॥
दंडवत दंडापरी। मागें उरी नुरोनि ॥ २ ॥
वचनाचा पसरू कांई ?। त्वरा डोईपाशींची ॥ ३ ॥
तुका म्हणे जगजेठी। लावी कंठीं उचलुनि ॥ ४ ॥

(५८५)

लागलिया मुख स्तनां। घाली पान्हा माऊली ॥ १ ॥
उभयतां आवडीलाडें। कोड कोडें पुरते ॥ २ ॥

मेळवितां अंगें अंग। प्रेमरंग वाढतो ॥ ३ ॥
तुका म्हणे जडभारी। अवघें शिरीं जननिये ॥ ४ ॥

(५८६)

नामसंकीर्तन साधन हें सोपें। जळतील पापें जन्मांतरें ॥ १ ॥
ठायींच बैसोनि करा एकचित्त। आवडी अनंत आळवावा ॥ २ ॥
न लगे सायासें जावें वनांतरा। सुखें येतो घरा नारायण ॥ ३ ॥
रामकृष्णहरीविठ्ठलकेशवा। मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥ ४ ॥
याविणें असत आणिक साधन। वाहातसें आण विठोबाची ॥ ५ ॥
तुका म्हणे सोपें आहे सर्वांहुनी। शहाणा तो धणी घेता येथें ॥ ६ ॥

(५८७)

हरि हरि तुम्ही म्हणा रे सकळ। तेणे मायाजाळ तुटेल हें ॥ १ ॥
येर कर्मधर्म करिती त्रिकाळीं। मोघ! कोण बळीं होती सांग? ॥२
न पढावें वेद नव्हे शास्त्रबोध। नामाचें प्रबंध पाठ करा ॥ ३ ॥
नव्हे अनुष्ठान नव्हे ब्रह्मज्ञान। करावी सोपान हरिकथा ॥ ४ ॥
न साधवे योग नांगवे वैराग्य। नामेंचि ते योग्य भक्ति साधे ॥ ५ ॥
तुका म्हणे गुज सांगितलें संतीं। याविण विश्रांति आन नाहीं ॥ ६ ॥

(५८८)

न करवें जप न करवें तप। कलिमाजी लोप साधनांचा ॥ १ ॥
योगयागयज्ञकर्मधर्मनेम–। वैराग्याचा श्रम बहुविध ॥ २ ॥
प्राणायाम सिद्ध नव्हे मनोजय। आणिक उपाय साधनाचें ॥ ३ ॥
नव्हे अनुष्ठान नव्हे ब्रह्मज्ञान। आणिक साधन अष्टांगादी ॥ ४ ॥
तुका म्हणे येरीं श्रमचि सर्वथा। रामकृष्णकथा तारी जना ॥ ५ ॥

(५८९)

नामाविण नाहीं साधन आणिक। भवाब्धितारक हेंचि एक ॥ १ ॥
उत्तमाउत्तम सर्वांही वरिष्ठ। नाम श्रेष्ठाश्रेष्ठ तिहीं लोकीं ॥ २ ॥

शिवभवानीचें आवडीचें स्तोत्र । गुह्य बीजमंत्र एकांतींचा ।। ३ ।।
तुका म्हणे तेथें इतरांचा पाड । कोण आहे वाड तयाहुनी ? ।। ४ ।।
(५९०)
नामा ऐसें थोर साधन पैं नाहीं । विचारितां मही दोषनाशा ।। १ ।।
उत्तम चांगलें सर्वांमाजी थोर । सांगती शंकर गिरिजेसी ।। २ ।।
रामकृष्णहरिविष्णुवासुदेव– । वामनकेशवनारायण– ।। ३ ।।
गोविंदनामाचें निखळ प्रबंध । तेणें आत्मबोध होय जीवा ।। ४ ।।
तुका म्हणे ऐसा निर्धार जयासी । तेथें हृषीकेशी वस्ती राहे ।। ५ ।।
(५९१)
नामाचिया बळें कैवल्यसाधन । अवघेंचि निधान हातां चढे ।। १ ।।
जाणोनि हें वर्म भक्तभागवत । राहिलें निवांत प्रेमबोधें ।। २ ।।
उघडसमाधि हरिकथासोहळा । नरनारीबाळा सानथोरां ।। ३ ।।
कोण जपतप वाहे हें काबाड । म्हणती अवघड यारे नाचों ।। ४ ।।
छंदें वाती टाळी गाती नामावळी । जयजयकारबळीं होळी दोषां ।।५
येणें ब्रह्मानंदें दुमदुमिलें जग । सुलभ हा मार्ग सांपडला ।। ६ ।।
तुका म्हणे हरिभक्तिचा उल्हास । आणवील त्रास यमदूतां ।। ७ ।।
(५९२)
दही–दूध–ताक पशूचें पाळण । त्यामध्यें कारण घृतसार ।। १ ।।
हेंचि वर्म आम्हां भाविकांचें हातीं । म्हणवुनि चित्तीं धरिला राम ।।२
लोहकफगारा अग्नीचिया काजें । येऱ्हवी ते ओझें कोण वाहे? ।। ३ ।।
तुका म्हणे खोरी पाहारा जतन । तोंवरीच धन हातां आलें ।। ४ ।।
(५९३)
आसक्ति विरक्ति काय कळे आम्हां? । जाणों एका नामा विठोबाच्या ।। १
नाचों प्रेमसुखें वैष्णवांचें मेळीं । कथे टाळघोळीं आनंदेसी ।। २ ।।
शांति क्षमा दया तें मी कांहीं नेणें । गोविंदकीर्तनें–वांचुनियां ।। ३ ।।
कासया एकांत सेवूं माजी-वना ? । आनंद तो जना-माजी असें ।।४

कासया उदास असों देहावरी । अमृतसागरीं बुडोनियां ? ॥ ५ ॥
तुका म्हणे मज आहे भरंवसा । विठ्ठल सरिसा आम्हां असे ॥ ६ ॥
(५९४)
खरें भांडवल सांचविलें गांठीं । जेणें नये तुटी उदिमासी ॥ १ ॥
सवंगाचें केणे सांपडलें घरीं । भरूनि वैखरी माप चाले ॥ २ ॥
घेतां देतां लाभ होतसे सकळां । सदैवा दुर्बळा भावतैसा ॥ ३ ॥
फडा आलिया कें न वजे मिरास । जरी कांहीं त्यास न कळतां ॥ ४ ॥
तुका म्हणे येणें जालिसें निश्चिती । आणिक न चित्तीं धरूं दुजें ॥५

*प्रकरण २० वे*

# वारीकर विचार

(५९५)
घरीं आराध्य दैवत । पंढरीनाथ जयाच्या ॥ १ ॥
शुद्ध यातिफुळें दोन्हीं । नाम वर्णी पवाडे ॥ २ ॥
वारकरी कोणी जाती । त्या संगतीं घडे हें ॥ ३ ॥
तुका म्हणे विठ्ठलाचि । मूर्ती साची त्यापासीं ॥ ४ ॥
(५९६)
कांहीं दुजें व्रत नेणें । वारी जाणे पंढरी ॥ १ ॥
मग उरलें तया पाहे । दुजें काये साधन ? ॥ २ ॥
सर्व नेम तयापासी । येती दास्यींसाधनें ॥ ३ ॥
तुका म्हणे सत्यमात । नाहीं व्रत दुसरें ॥ ४ ॥
(५९७)
व्रत एकादशी करी । नेम वारी जयासी ॥ १ ॥
जन्म ऐसा घडों देवा । त्या सदैवा वंशासी ॥ २ ॥
ज्याचें ध्यानीं केशीराज । सर्वबीज त्यापासीं ॥ ३ ॥
तुका म्हणे पूर्वठेवा । तरी दैवा लाभे हें ॥ ४ ॥

(५९८)
सुख आलें तया घरीं । जाणें तरी विरळा ॥ १ ॥
नेमव्रतें वारी करी । तया हरी नुपेक्षी ॥ २ ॥
सर्व देव करी धंदा । वसे सदा त्यापासी ॥ ३ ॥
तुका म्हणे थोरपुण्यें । घडे येणें पंढरी ॥ ४ ॥

(५९९)
हाचि नेमाहुनी नेम । ऐका प्रेम सांगतों ॥ १ ॥
व्रतसारएकादशी । वारी ज्यासी पंढरी ॥ २ ॥
त्याची योगक्षेमचिंता । लागे आतां अनंता ॥ ३ ॥
तुका म्हणे हा तों करी । सेवा खरी देवाची ॥ ४ ॥

(६००)
पंढरिचा वारीनेम । त्याचा श्रम वारला ॥ १ ॥
हाचि असावा निश्चय । अंतराय नसावा ॥ २ ॥
हेचि घडो उपासना । नारायणा कृपा तैं ॥ ३ ॥
तुका म्हणे देवदेवा । पावे सेवा हे एक ॥ ४ ॥

(६०१)
नेमें वारकरी होय । बापमाय विठ्ठल ॥ १ ॥
नेघे संसारीचा काम । पुरुषोत्तमसहाय्यें ॥ २ ॥
पुराणोक्त वेदमात । नेमव्रत करा हें ॥ ३ ॥
तुका म्हणे पदरींची । नव्हे साची मात हें ॥ ४ ॥

(६०२)
पंढरीचा वार–करी* । ध्यान धरी विठ्ठल ॥ १ ॥
काम न करीं संसारीं । साह्य करी गोविंद ॥ २ ॥
उपदेश पुराणींचें । व्रत साचें करा हें ॥ ३ ॥
तुका म्हणे पदरींची । नव्हे तेचि मात हें ॥ ४ ॥

* टीपः–व : = इश्वर; त्याची आर = इच्छा करणारा; वार = शस्त्रधाव – लक्ष्यार्थ सारासार विचार कडसणी करणारा.

(६०३)
आणी मना सांगे जना। सर्व खुणा धुंडोनि ॥ १ ॥
भक्तां रक्षी निरंतर। पंढरपूरनिवासी ॥ २ ॥
अनुसरत्या लाभ असें। दुजें नसे* जयापें ॥ ३ ॥
तुका म्हणे देखें पाय। मग काय उरे त्या ? ॥ ४ ॥

टीपः– *नसें–नशें (नासे) हा दुसरा अर्थ.

(६०४)
नित्य मनीं जया सोस। पंढरीस वारीचा ॥ १ ॥
त्याचा भार देवां सिरीं। कृपा करी विठ्ठल ॥ २ ॥
नामीं निजध्यास मनीं। धन्य प्राणी तो एक ॥ ३ ॥
तुकसुकृताचि ठेवी। वारी व्हावी पंढरीं ॥ ४ ॥

(६०५)
मार्गीं जातां वारकरी। करिती हरि–स्मरण ॥ १ ॥
सर्वसुख तेथें वसे। नांदतसे परब्रह्म ॥ २ ॥
नामघोषें जें कीर्तन। कथाश्रवण देवाचें ॥ ३ ॥
तुका म्हणे समागमीं। माझा स्वामी तें ठायीं ॥ ४ ॥

(६०६)
हातें वायें प्रेमटाळी। नामावळी हरिची ॥ १ ॥
दुजा ऐसा आहे कोण। नारायणकोंवसा ॥ २ ॥
वारी गमे ही सुखाची। पंढरिची जयासी ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्ही त्याची। खेप साचि धरिली ॥ ४ ॥

(६०७)
वारकरी पंढरिसी। एकादशीजातिया ॥ १ ॥
कायाक्लेंशें येतां वाटे। हरी भेटें मार्गीं त्या ॥ २ ॥
किती सांगों मागें जालें। आंगें केलें दास्यत्व ? ॥ ३ ॥
तुका म्हणे दासां हरी। क्षणभरी नुपेक्षी ॥ ४ ॥

(५९८)
सुख आलें तया घरीं । जाणें तरी विरळा ॥ १ ॥
नेमव्रतें वारी करी । तया हरी नुपेक्षी ॥ २ ॥
सर्व देव करी धंदा । वसे सदा त्यापासी ॥ ३ ॥
तुका म्हणे थोरपुण्यें । घडे येणें पंढरी ॥ ४ ॥
(५९९)
हाचि नेमाहुनी नेम । ऐका प्रेम सांगतों ॥ १ ॥
व्रतसारएकादशी । वारी ज्यासी पंढरी ॥ २ ॥
त्याची योगक्षेमचिंता । लागे आतां अनंता ॥ ३ ॥
तुका म्हणे हा तों करी । सेवा खरी देवाची ॥ ४ ॥
(६००)
पंढरिचा वारीनेम । त्याचा श्रम वारला ॥ १ ॥
हाचि असावा निश्चय । अंतराय नसावा ॥ २ ॥
हेचि घडो उपासना । नारायणा कृपा तैं ॥ ३ ॥
तुका म्हणे देवदेवा । पावे सेवा हे एक ॥ ४ ॥
(६०१)
नेमें वारकरी होय । बापमाय विठ्ठल ॥ १ ॥
नेवे संसारीचा काम । पुरुषोत्तमसहाय्यें ॥ २ ॥
पुराणोक्त वेदमात । नेमव्रत करा हें ॥ ३ ॥
तुका म्हणे पदरींची । नव्हे साची मात हें ॥ ४ ॥
(६०२)
पंढरीचा वार-करी* । ध्यान धरी विठ्ठल ॥ १ ॥
काम न करीं संसारीं । साह्य करी गोविंद ॥ २ ॥
उपदेश पुराणींचें । व्रत साचें करा हें ॥ ३ ॥
तुका म्हणे पदरींची । नव्हे तेचि मात हें ॥ ४ ॥

* टीपः–व : = इश्वर; त्याची आर = इच्छा करणारा; वार = शस्त्रघाव – लक्ष्यार्थ सारासार विचार कडसणी करणारा.

(६०३)

आणी मना सांगे जना । सर्व खुणा धुंडोनि ।। १ ।।
भक्तां रक्षी निरंतर । पंढरपूरनिवासी ।। २ ।।
अनुसरत्या लाभ असें । दुजें नसे* जयापें ।। ३ ।।
तुका म्हणे देखें पाय । मग काय उरे त्या ? ।। ४ ।।

टीपः- *नसें-नशें (नासे) हा दुसरा अर्थ.

(६०४)

नित्य मनीं जया सोस । पंढरीस वारीचा ।। १ ।।
त्याचा भार देवां सिरीं । कृपा करी विठ्ठल ।। २ ।।
नामीं निजध्यास मनीं । धन्य प्राणी तो एक ।। ३ ।।
तुकसुकृताचि ठेवी । वारी व्हावी पंढरीं ।। ४ ।।

(६०५)

मार्गी जातां वारकरी । करिती हरि-स्मरण ।। १ ।।
सर्वसुख तेथें वसे । नांदतसे परब्रह्म ।। २ ।।
नामघोषें जें कीर्तन । कथाश्रवण देवाचें ।। ३ ।।
तुका म्हणे समागमीं । माझा स्वामी तें ठायीं ।। ४ ।।

(६०६)

हातें वायें प्रेमटाळी । नामावळी हरिची ।। १ ।।
दुजा ऐसा आहे कोण । नारायणकोंवसा ।। २ ।।
वारी गमे ही सुखाची । पंढरिची जयासी ।। ३ ।।
तुका म्हणे आम्ही त्याची । खेप साचि धरिली ।। ४ ।।

(६०७)

वारकरी पंढरिसी । एकादशीजातिया ।। १ ।।
कायाक्लेशें येतां वाटे । हरी भेटें मार्गी त्या ।। २ ।।
किती सांगों मागें जालें । आंगें केलें दास्यत्व ? ।। ३ ।।
तुका म्हणे दासां हरी । क्षणभरी नुपेक्षी ।। ४ ।।

(६०८)
जो कां पंढरिसी आला। तोचि भला वैष्णव ।। १ ।।
त्याची वंदू पायधुळी । चर्चू भाळीं प्रीतिनें ।। २ ।।
हरिनामीं ज्यासी प्रीति। आवडति जीवासी ।। ३ ।।
ज्यासी नाहीं दुजा भाव। जाला देव देहींच ।। ४ ।।
तुका म्हणे देव–भक्त । मूर्तीमंत एक तो ।। ५ ।।
(६०९)
पंढरीचे वारकरी । अधिकारी मोक्षाचें ।। १ ।।
पुंडलिका दिला वर । करुणाकरविठ्ठलें ।। २ ।।
मूढ पापीं जैसेतैसे। उतरी कांसे लावूनि* ।। ३ ।।
तुका म्हणे खरें जालें। एका बोलें संताच्या ।। ४ ।।

टीपः– *देव आणि भक्त हे दोघे मोक्षदायक असा दुहेरी अर्थ जाणावा.

(६१०)
वारकरी जाला कोणी। कुळें दोन्ही उद्धरी ।। १ ।।
तयासंगें मूढजन। होती जाण पावन ।। २ ।।
मेरूसम पुण्यराशी। वस्ती ज्यासी राहिल्या ।। ३ ।।
तुका म्हणे नाम साचें। घ्या फुकाचें वाचेसी ।। ४ ।।
(६११)
आवडीनें धरिली नांवें। प्रिय भावें चिंतन।। १ ।।
वेडा जाला वेडा जाला। लांचावला भक्तीसी ।। २ ।।
निचाड हा चाड धरी। मागें करीं तुळसी ।। ३ ।।
धरिल्या न करी बळ। तुका कळ पायींची ।। ४ ।।
(६१२)
वारकरी वारीबळा। कळिकाळावरिष्ठ ।। १ ।।
कोण पाहे तयाकडें ? । बळें गाढें ते एक ।। २ ।।
तुळसीमाळाविभूषणें । गोपीचंदनें रेखिलें ।। ३ ।।
टिळेमाळानामांकित। वर्णी नित तुका जे ।। ४ ।।

(६१३)

घेऊनियां चक्रगदा। हाचि धंदा करी तो ॥ १ ॥
भक्तां राखे पायांपासीं । दुर्जनासी संहारी ॥ २ ॥
अव्यक्त तें आकारलें। रूपा आलें गुणवंत ॥ ३ ॥
तुका म्हणे पुरवी इच्छा। केल्या तैशा विठ्ठल ॥ ४ ॥

(६१४)

हरिदासां सोपे वर्म। सर्व धर्म पाऊलें ॥ १ ॥
सरे येणें आटाआटी । नाहीं तुटी लाभासी ॥ २ ॥
वाहाविता देव खांदीं । वैष्णवमांदी क्रीडेसी ॥ ३ ॥
तुका म्हणे समाधान। सदा मन समत्वें ॥ ४ ॥

(६१५)

भूतांचिये नांदे जीवीं। तो गोसावी सकळां ॥ १ ॥
क्षणक्षणां जागा ठायीं। दृढ पायीं विश्वास ॥ २ ॥
दावुनियां सोंग दुजें । अंतर बीजें वसविलें ॥ ३ ॥
तुका म्हणे जाणा धर्म । धरा वर्म चिंतन ॥ ४ ॥

(६१६)

इच्छावें तें जवळी आलें। काय बोलें कारण ? ॥ १ ॥
नामरूपीं पडिली मिठी। अवघ्या गोष्टी सरल्या ॥ २ ॥
मुकियाचें परी जीवीं। साकर जेवीं खादली ॥ ३ ॥
तुका म्हणे काय बोलें ?। आतां भलें मौन्यचि ॥ ४ ॥

(६१७)

जाय जाय तूं पंढरी। होय होय वारकरी ॥ १ ॥
सांडोनियां वाळवंट। काय इच्छिसी वैकुंठ ? ॥ २ ॥
खांद्या पताकांचे भार। तुळसीमाळ आणि अबीर ॥ ३ ॥
साधुसंतांच्या दाटणी। तुका जाय लोटांगणीं ॥ ४ ॥

(६१८)
पंढरीचा वारकरी। खेपा वैकुंठबंदरीं ॥ १ ॥
तया नाहीं आन पेणें। सदा वैकुंठीं रहाणें ॥ २ ॥
आलागेला केल्या यात्रा। कुळा उद्धरी सर्वत्रा ॥ ३ ॥
तुका म्हणे यासी नाहीं। संदेह तो कल्पांतीही ॥ ४ ॥
(६१९)
पंढरीची वारी जयाचियें कुळीं। त्याची ब्रीदावळी वेद वानी ॥ १ ॥
सर्वस्व सांडोनि पंढरीस गेला। हरी तो कबीला उद्धरतो ॥ २ ॥
बाप आजे मामे वैकुंठासी जाती। बहिणबंधुचुलती मोक्ष पाती ॥३
विमानीं बैसती पूर्वज सकळें। बेताळीस कुळें उद्धरती ॥ ४ ॥
तुका म्हणे केला पंढरीस वास। वैकुंठ मिरास त्याच्या बाची ॥५॥
(६२०)
पंढरीची वारी जयांचिये घरीं। पायधुळी शिरीं वंदू त्यांची ॥ १ ॥
दासांचा मी दास पोसणा डिंगर। आतां बहु फार काय बोलों? ॥२
जातीचें मी हीन न कळे भजन। म्हणोनि चरण इच्छितसें ॥ ३ ॥
तुका म्हणे मज म्हणावें आपुलें। बहुतां तारिलें संतजनीं ॥ ४ ॥
(६२१)
संपत्ति साधन हेंचि मज धन। सकळ चरण विठोबाचें ॥ १ ॥
शीतळ हा पंथ माहेराची वाट। जवळीची नीट सुखरूप ॥ २ ॥
वैष्णवांचा संग रामनामगाणें। मंडितभूषणें अलंकार ॥ ३ ॥
भवनदी आड नव्हतीसी जाली। कोरडेच चाली जावें पायीं ॥ ४ ॥
मायबापे दोघें पाहातील वाट। धरूनियां कट करीं उभी ॥ ५ ॥
तुका म्हणे केव्हां देखेन कळस। पळाली आळसनिद्राभूक ॥ ६ ॥
(६२२)
होईन भिकारी। पंढरीचा वारकरी ॥ १ ॥
हाचि माझा नेमधर्म। गाये मुखीं तुझें नाम ॥ २ ॥

माझी उपासना । लागे संतांच्या चरणा ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा । हेचि माझी भोळी सेवा ॥ ४ ॥

(६२३)

हेचि मज आस । जन्मोजन्मीं तुझा दास ॥ १ ॥
पंढरीचा वारकरी । वारी चुकों नेदी हरी ॥ २ ॥
प्रेमाचा कल्लोळ । संतसंगीं सर्वकाळ ॥ ३ ॥
चंद्रभागे स्नान । तुका मागे हेंचि दान ॥ ४ ॥

(६२४)

पंढरीची नेमवारी । नेदी हरी चुकों हें ॥ १ ॥
देई ईशसमागम । रंगीं प्रेम सर्वांगा ॥ २ ॥
भीमास्नान प्रदक्षणा । आलिंगना संतांसीं ॥ ३ ॥
तुका म्हणे गरुडपारीं । कथा करीं स्वानंदें ॥ ४ ॥

(६२५)

वारी पंढरीची ज्यास । तया कैंचा गर्भवास ॥ १ ॥
नेघे साधनांची जोडी । राहे विठ्ठलीं आवडी ॥ २ ॥
अभिमान देशधडी । जाय अहंकार घडी ॥ ३ ॥
तुका म्हणे कटीकर । दिला पुंडलिका वर ॥ ४ ॥

*प्रकरण २१ वे*

# भक्तिमार्ग प्रोत्साहन

(६२६)

अंतकाळींचें जीवन । विष्णु-विठ्ठल हें धन ॥ १ ॥
करूं जतन ते जीवें । शुद्धभावें करुनि ॥ २ ॥
वर्दळ हें येणें सारूं । बरवा करूं उदीम ॥ ३ ॥
तुका म्हणे हृत्संपुटीं । करुनि पेटी साठवूं ॥ ४ ॥

(६२७)
करणें तें हेंचि करा। कां अघोरा जातसां ? ॥ १ ॥
जिये नारायणीं मान्य। शुद्ध पुण्य तें एक ॥ २ ॥
शरणागता देव राखे। येरा वाखे विघ्नांचें ॥ ३ ॥
तुका म्हणें लीन व्हावें। कळे भावें वर्म हें ॥ ४ ॥
(६२८)
डोळ्यामाजी जैसा कणु। जरी अणु न साहे ॥ १ ॥
तैसें शुद्ध राखा हित। नकां चित्त बाटवूं ॥ २ ॥
आपुल्याचा कळवळा। नये बाळा आणिकां ॥ ३ ॥
तुका म्हणे बीज मुडां। जैसें चाडा पिकाच्या ॥ ४ ॥
(६२९)
करी ऐसा थांव अथावी। चित्त लावी चरणापें ॥ १ ॥
मग माझा मायबाप। घेईल ताप हरूनि ॥ २ ॥
बहुतांच्या मतें गोवा। होऊं जीवा नेदावा ॥ ३ ॥
तुका म्हणे करुणाबोलें। धीर विठ्ठलें निघेना ॥ ४ ॥
(६३०)
देह नव्हें मीं हें सरे। उरला उरे विठ्ठल ॥ १ ॥
म्हणऊनि लाहो करा। काळ सारा चिंतनें ॥ २ ॥
पाळणाची नाहीं चिंता। ठाव रिता देहाचा ॥ ३ ॥
तुका म्हणे जीवासाठीं। देव पोटीं पडेल ॥ ४ ॥
(६३१)
विठ्ठल विठ्ठल येणें छंदें। ब्रह्मानंदें गर्जावें ॥ १ ॥
वातां टाळ हातें टाळी। होय होळी विघ्नांची ॥ २ ॥
आदिमध्यअवसानीं। विठ्ठल मनीं स्मरावा ॥ ३ ॥
तुका म्हणे विठ्ठलवाणी। वदा कानीं आइका ॥ ४ ॥

(६३२)
एकएकां साह्य करूं। अवघें धरूं सुपंथ ॥ १ ॥
कोण जाणे कैसी परी। पुढें उरी ठेवितां ? ॥ २ ॥
अवघें धन्य होऊं आतां। स्मरविता–स्मरणें ॥ ३ ॥
तुका म्हणे अवघी जोडी। ते आवडी चरणांची ॥ ४ ॥

(६३३)
कोण येथें रिता गेला ? । जो तो आला या ठाया ॥ १ ।
तांतडी ते करा आतां। याची चिंता तयासी ॥ २ ॥
नांवासाठीं घेई भार। न लगे फार व्युत्पत्ति ॥ ३ ॥
तुका म्हणे न लगे जावें। कोठें देवें–विहीन ॥ ४ ॥

(६३४)
पुराणींचा इतिहास। गोड रस सेवितां ॥ १ ॥
नव्हती आहाच हें बोल। मोकळे फोल कवित्व ॥ २ ॥
भावें घ्या रे भावें घ्या रे। एकदां जा रे पंढरी ॥ ३ ॥
तुका म्हणे घटापटा। नलगे वाटा शोधाव्या ॥ ४ ॥

(६३५)
भाग्यें आला नरदेहा। तों हा पाहा विठ्ठल ॥ १ ॥
पापपुण्य करिल झाडा। जाईल पीडा जन्माची ॥ २ ॥
घ्यावी हातीं टाळदिंडी। गावें तोंडीं गुणवाद ॥ ३ ॥
तुका म्हणे घटापटा। नलगे वाटा शोधाव्या ॥ ४ ॥

(६३६)
अन्य ऐसें कोठें सांगा। पांडुरंगा सारिखें ? ॥ १ ॥
दैवत या भूमंडळी। आले कळी उद्धारा ॥ २ ॥
ऐसी हरे गिरिजेप्रती। गुह्यस्थिती बोलिली ॥ ३ ॥
तुका म्हणे तीर्थक्षेत्रा। या सर्वत्रां दैवत ॥ ४ ॥

(६३७)
कोठें कांहीं कोठें कांहीं । शोध ठायीं–परत्वें ।। १ ।।
पंढरिये पांडुरंगीं । पाप अंगीं राहेना ।। २ ।।
केलें अन्यत्रींचें नासे । येथें असें अक्षय ।। ३ ।।
तुका म्हणे तीर्थक्षेत्र । सर्वअत्रदैवत ।। ४ ।।
(६३८)
धरितां पंढरीची वाट । असंकट मुक्तिचें ।। १ ।।
वंदु येती देवपदें । त्या आनंदें उत्साह ।। २ ।।
नृत्यछंदें संतरज । लाभ सहज चालतां ।। ३ ।।
तुका म्हणे गरुडटके* । वैष्णव निके असंभ्रमें ।। ४ ।।

* टीपः– गरुडटका = पताका; गरुड ज्या सेवेस टकला (चिकटून राहिला) ती सेवा.

(६३९)
इनामाची भरली पेठ । मार्ग दाट वाहाती ।। १ ।।
अवघेचि येती वाण । जें शकूनलाभाचें ।। २ ।।
अडचणी त्या केल्या दुरी । देण्यां उरीं घेण्याच्या ।। ३ ।।
तुका म्हणे जोडी जाली । ते आपुली आपणां ।। ४ ।।
(६४०)
अवघें जेणें पाप नासे* । ते हें असे पंढरीं ।। १ ।।
गात जा गा गात जागा । प्रेम मागा विठ्ठला ।। २ ।।
अवघी सुखाचीच राशी । पुंडलिकासी वोळली ।। ३ ।।
तुका म्हणे जवळी आलें । उभें ठेलें विटेपें ।। ४ ।।

* टीपः– पापनाशक पंढरी सांप्रदाय; पंढरी क्षेत्र; पंढरीतील दैवत असा अर्थ.

(६४१)
चाल केलासी मोकळा । बोल विठ्ठल सांवळा ।। १ ।।
मग पाप नाहीं ऐसें । नाम घेतां न जळेसे ।। २ ।।
पंचपातकांच्या कोडी । जळती न लगतां घडी ।। ३ ।।
तुका म्हणे कळिकाळा । रीघ नाहीं पुढें ज्वाळा– ।। ४ ।।

प्रकरण २२ वे

# भाग्यवंत विचार

(६४२)
भाग्यवंता हेंचि जोडी । परवडी स्मरण ।। १ ।।
एक विठ्ठलाचें नाम । जीवा नेम जाय तों ।। २ ।।
शिरीं पडतां आघात । ध्यान चित्त सोडीना ।। ३ ।।
तुका म्हणे ऐसे मती । तूं श्रीपती रक्षिता ।। ४ ।।

(६४३)
भाग्यवंते या परवडी । करिती जोडी जन्माची ।। १ ।।
आपुलाल्या लाहोभावें । जें ज्या व्हावें तें आहे ।। २ ।।
इच्छाभोजनाचा दाता । न लगे चिंता करावी ।। ३ ।।
तुका म्हणे आल्या थाऱ्या । वस्तु बऱ्या मोलाच्या ।। ४ ।।

(६४४)
उत्तमांत हे उत्तम । उगा नाम आळवी ।। १ ।।
उगा रहा उगा रहा । उभा पहा राहोनि ।। २ ।।
उपमा नाहीं आले–सुखा । उरों दुःखा नेदी हें ।। ३ ।।
तुका म्हणे श्रेष्ठलोक । तेंचि एक करिती ।। ४ ।।

(६४५)
भाग्यवंता करणें चिंता । नाहीं आतां काशाची ।। १ ।।
देव तया प्रतिपाळी । लडिवाळी म्हणोनि ।। २ ।।
अनुभव दृढ चित्ता । राहे होतां ते करी ।। ३ ।।
तुका म्हणे सार विवेक । हा तारक विठ्ठल ।। ४ ।।

(६४६)
भाग्यवंता ऐशी जोडी । परवडी संतांची ।। १ ।।
धन घरीं पांडुरंग । जें अभंग सरेना ।। २ ।।

जनाविरहित लाभ । टांचें नभ संचया ॥ ३ ॥
तुका म्हणे विष्णुदासा । नाहीं आशा दुसरी ॥ ४ ॥
(६४७)
भक्तिभाग्य प्रेमसुख । नेणे दुःख दुसरें* ॥ १ ॥
अनिष्ट न हरिपायीं । ठेवी डोयी चरणीं ॥ २ ॥
याजमध्यें सर्वकाळ । हें मंगळ संसारीं ॥ ३ ॥
तुका म्हणे भावबळ । नाहीं काळां† चिंतनीं ॥ ४ ॥

टीपः– *दुसरे = वेगळे; द्वैतबुद्धीचे; द्विस्वभावी (चांगले वाईट असें बुद्धीभेदक)
†काळ = वेळ; प्राणहर्ता यम.

(६४८)
भाग्यवंत म्हणों तया । शरण गेलें पंढरिराया ॥ १ ॥
तरले तरले भरंवसा । नाम धारकांचा ठसा ॥ २ ॥
भुक्ति मुक्तिसी ते स्थळ । भोळ्या भाविकां निर्मळ ॥ ३ ॥
ऐसें गाईलें पुराणीं । तुका म्हणे वेदवाणी ॥ ४ ॥
(६४९)
भाग्यवंत एक तोचि । "हरि तूंचि निश्चित" ॥ १ ॥
सत्य जाण सत्य जाण । नारायणनिर्धारें ॥ २ ॥
नर होसी अर्जुनासी । घोडी धुसी रणांत ॥ ३ ॥
तुका म्हणे मागेंपुढें । करीं दृढें वागवी ॥ ४ ॥
(६५०)
भाग्यवंत तोचि एक । नाम वदे ज्याचें मुख ॥ १ ॥
येर मनूं धोंड्याऐसें । लोळे गूखडीस तैसें ॥ २ ॥
शांति–विरक्ति–विहीन । श्रेष्ठ श्रेष्ठांचें वचन ॥ ३ ॥
तुका म्हणे एक देख । करी आळस तो मूर्ख ॥ ४ ॥
(६५१)
भाग्यालागीं लाचावलें । देवधर्म ते राहिलें ॥ १ ॥
कथें जातां आळसें मन । प्रपंचाचें मोठें ज्ञान ॥ २ ॥

अखंड ज्या प्रीतिजाया । नेणें भजनाच्या ठाया ॥ ३ ॥
कथाकीर्तन धनाचें । सर्वकाळ विषयीं नाचे ॥ ४ ॥
तुका म्हणे पंढरिराया । ऐसें जन्मविलें वांयां ॥ ५ ॥

(६५२)

जाणे भक्तीचा जिव्हाळा । तोचि दैवाचा पुतळा ॥ १ ॥
आन नये माझ्या मना । हो कां पंडित वा शहाणा ॥ २ ॥
नामीं रूपीं लीनचित्त । त्याचा दास मी अंकित ॥ ३ ॥
भक्ति जाणे नवविध– । तुका म्हणे तोचि शुद्ध ॥ ४ ॥

(६५३)

भाग्यवंत आम्ही विष्णुदास जगीं । अभंग प्रसंगीं धैर्यवंत ॥ १ ॥
नाहीं ते पुरवीत आणुनि जवळी । येऊनि माऊली गीतसुखें ॥ २ ॥
प्रीति अंगीं असे सदा सर्वकाळ । वोळली सकळ सुखें ठायीं ॥ ३ ॥
आपुल्या स्वभावें जेथें जैसे असों । तैसें तेथें दिसों साजिरेंचि ॥ ४ ॥
वासनेचा कंद उपडिला मूळ । दुरितें सकळ निवारिली ॥ ५ ॥
तुका म्हणे भक्तजनांची माऊली । करील साउली आम्हां दासां ॥६

(६५४)

भाग्यें ऐसी जाली जोडी । नये घडी विसंभो ॥ १ ॥
विठेवरी समचरण । संतीं खूण बाणली ॥ २ ॥
अवघें आतां काम सारूं । हाचि करूं कैवाड ॥ ३ ॥
तुका म्हणे खंडूं खेपा । पुढें पापापुण्याच्या ॥ ४ ॥

(६५५)

आम्ही भाग्याचें भाग्याचें । हातीं तांबे भोपळ्याचें ॥ १ ॥
लोकां घरीं गाईम्हैसी । आम्हां घरीं उंदिरघुसी ॥ २ ॥
लोकां घरीं तांबे थाळे । आम्हां घरीं परळ काळे ॥ ३ ॥
लोकां घरीं हत्तीघोडे । आम्हां अघोडीचे जोडे ॥ ४ ॥
तुका म्हणे आम्ही सुडके । आम्हां देखोन काळ धाके ॥ ५ ॥

(६५६)

देव सखा आतां केलें नव्हे कांई ?। येणें सकळही सोयरींच ॥ १ ॥
भाग्यवंत जालों गोते सपुरतीं । आतां पुण्या प्रीती पार नाहीं ॥२
पहातां दिसती भरलिया दिशा । ठसावला ठसा लोकत्रयीं ॥ ३ ॥
अविनाश जोडी शाम्हां भाग्यवंतां । आली हातां सत्ताचिंतनानें ॥४
पायांवरी डोई ठेवाया अरोथा । जाली द्यावी सत्ता क्षेम ऐसी ॥५
तुका म्हणे जीव पावला विसांवा । म्हणवितां देवा तुमचींसीं ॥ ६ ॥

*प्रकरण २३ वे*

## अनुभव विचार

(६५७)

अनुभवें आलें अंगा । तें या जगा देतसें ॥ १ ॥
नव्हती हाततुके बोल । मूळ ओल अंतरीं ॥ २ ॥
उतरुनि दिलें कसीं । शुद्धरसीं सरत्या ॥ ३ ॥
तुका म्हणे दुसरें नाहीं । ऐसी ग्वाही गोहिली ॥ ४ ॥

(६५८)

अनुभवें वदे वाणी । अंतरध्यानीं आपुलें ॥ १ ॥
कैंची चिका दूधचवी । जरी दावी पांढरें ? ॥ २ ॥
जाती ऐसा दावी रंग । बहू जग यानांव ॥ ३ ॥
तुका म्हणे खद्योत तें । ढुंगा मनतें भास्कर ॥ ४ ॥

(६५९)

ज्याचा ऐसा अनुभव । विश्व देव सत्यत्वें ॥ १ ॥
देव तयाजवळी असे । पाप नासे दर्शनें ॥ २ ॥
कामक्रोधा नाहीं चाली । भूतीं जाली समता ॥ ३ ॥
तुका म्हणे भेदाभेद । गेलें वाद खंडोनि ॥ ४ ॥

(६६०)
ऐसा ज्याचा अनुभव । विश्व सत्यत्वेंचि देव ॥ १ ॥
देव तयाजवळीं असें । पाहातां दर्शनींच दिसें ॥ २ ॥
कामक्रोध नसे चित्ता । भूतीं जाहाली समता ॥ ३ ॥
तुका म्हणे भेदाभेद । गेला समुळीं विवाद ॥ ४ ॥

टीप:– वरच्याचाच भिन्नवृत्ती पाठ आढळा आहे.

(६६१)
माझा पाहा अनुभव । केला देव आपुला ॥ १ ॥
बोलविलें तेंचि द्यावें । उत्तर व्हावें–ते काळीं ॥ २ ॥
सोडिलिया जगनिंद । तैं गोविंद म्हणेरा ॥ ३ ॥
तुका म्हणे धीर केला । तेणें याला गोंविलें ॥ ४ ॥

(६६२)
हारपोनि गेली निशी । निद्रा कैसी न देखें ॥ १ ॥
नारायणीं वसलें घर । निरंतर आनंद ॥ २ ॥
अवघा रुंधविला ठाव । नेलें वाव मीमाझें ॥ ३ ॥
तुका म्हणे एकेठायीं । नसोनिहीं अभिन्न ॥ ४ ॥

(६६३)
ज्याचें ऐसें भावीं मन । त्यां दर्शन इच्छेचें ॥ १ ॥
पुरवूं जाणें मनींची खूण । समाधान करोनि ॥ २ ॥
आपणातें प्रगट करी । छाया वरी कृपेची ॥ ३ ॥
तुका म्हणे करी दान । नामें मन उन्मन ॥ ४ ॥

(६६४)
अंगें अनुभव मज । चरणरज संतांचें ॥ १ ॥
सुखी जालों या सेवनें । दुःख नेणें यावरी ॥ २ ॥
निर्माल्याचें तुळसीदळ । चरणजळ विष्णुचें ॥ ३ ॥
तुका म्हणे भाव सार । करूनि फार मिश्रित ॥ ४ ॥

(६६५)
बोल नव्हती हें उसणें । रंजवणे आहाच ॥ १ ॥
अनुभवतां बरें वरी । नाहीं उरीं वेगळे ॥ २ ॥
पाहिजे तें आलें रुची । काचाकुची काशाची ? ॥ ३ ॥
तुका म्हणे लाजे आड । त्याची चाड तो नासी ॥ ४ ॥

(६६६)
ज्याचा सखा हरी । त्यासी विश्व कृपा करी ॥ १ ॥
ऐसा असोनि अनुभव । कांसावीस होती जीव ॥ २ ॥
हरीचें चिंतन । करी त्या न बाधे विघ्न ॥ ३ ॥
तुका म्हणे हरी । प्रल्हादासी यत्नें तारी ॥ ४ ॥

(६६७)
बहु बरें एकाएकीं । संगचुकी करावी ॥ १ ॥
ऐसें बरें जालें ठावें । अनुभवें आपुल्या ॥ २ ॥
सांगावें तें काम मना । सलगी जना नसावी ॥ ३ ॥
तुका म्हणे निर्घे अंगीं । दुजें संगीं नातळे ॥ ४ ॥

(६६८)
आन नका करूं चेष्टा । व्हाल कष्टा वरपडे ॥ १ ॥
सुखें करा हरिकथा । जें सर्वथा तारील ॥ २ ॥
अनाथाचा नाथ देव । अनुभव सत्य हा ॥ ३ ॥
तुका म्हणे भावें तरति । धरा चित्तीं सुकळ ॥ ४ ॥

(६६९)
हा गा माझा अनुभव । भक्तिभावभाग्याचा ॥ १ ॥
केला ऋणी नारायण । नव्हे क्षण वेगळा ॥ २ ॥
घालोनियां भार माथां । अवघी चिंता वारली ॥ ३ ॥
तुका म्हणे जीवेंसांटी । नाम कंठीं धरोनि ॥ ४ ॥

(६७०)

अनुभव ऐसा । मज लागला सरिसा ।। १ ।।
पाठीं बैसलीं सेजारीं । नव्हे शांत कोणे परी ? ।। २ ।।
कोठें नव जावें । कांहीं घालावया ठावें ।। ३ ।।
तुका म्हणे कोटि । दुःखाच्याच तयापोटी ।। ४ ।।

(६७१)

अनुभव आम्ही अवघाचि साधिला । तरि स्थिरावला मनु ठायीं ।।१
पिटुनियां मुसे आला अलंकार । दग्ध तें असार होउनियां ।। २ ।।
एकचि उरलें कायावाचामना । आनंद भुवनात्रयीमाजी ।। ३ ।।
तुका म्हणे आम्ही जिंकिला संसार । होऊनि किंकर विठोबाचें ।।४

(६७२)

ऐसिया संपत्ती आम्हां संवसारी । भोगाचिया परि काय सांगों ।।१
काम तो कामना भोगीतसे देवा । आलिंगनहेवा चरण चुंबीं ।। २ ।।
शांतीच्या संयोगें निरसला ताप । दुसरें तें पाप-भेदबुद्धि ।। ३ ।।
तुका म्हणे पाहें तिकडे सारिखें । आपुलें पारिखें निरसलें ।। ४ ।।

(६७३)

राम राज्य राम प्रजालोकपाळ । एकचि सकळ दुजें नाहीं ।। १ ।।
मंगळावांचूनि उमटेना वाणी । अखंडचि खाणी एकरासी ।। २ ।।
मोडलें हें स्वामी ठावाठाव सेवा । वाढवावा हेवा कोणा अंगें? ।।३
तुका म्हणे अवघें दुमदुमिलें देवें । उरलें तें गावें हेंचि आतां ।। ४ ।।

(६७४)

निवडोनि वाण काढिलें निराळे । प्रमाण डोहळे यावरि ते ।। १ ।।
जयाचा विभाग तयासीच फळे । देखणें निराळें कौतुकासी ।। २ ।।
शूर तो ओळखे घायडायहात । येरां होय मात सांगायासी ।। ३ ।।
तुका म्हणे माझी केळवती वाणी । केला निजस्थानीं जाणवसा ।।४

(६७५)

याजसाठीं केला होता अट्टाहास । सेवटीचा दिस गोड व्हावा ।। १ ।।
आतां निश्चितीनें पावलों विसांवा । खुंटल्या त्या धांवा तृष्णेचिया ।।२
कवतुक वाटे जालिया वेंचाचें । नांव मंगळाचें तेणे गुणें ।। ३ ।।
तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आतां दिसों चारीं खेळीमेळी ।।४

(६७६)

भक्तिचिया पोटीं चिद्रत्नाची खाणी । ब्रह्मींची ठेवणी सर्ववस्तु ।।१
माउलीसी मागें बाळकाचें हारीं* । एकसूत्रदोरीं ओढतसों ।। २ ।।
जेथील जें मागों तें आहे समोर । नाहीं-सें उत्तर येत नाहीं ।। ३ ।।
सेवेचिये सत्ते धनीच सेवक । आपुलें तें एक न वंचिता ।। ४ ।।
आदिअंता ठाव नाहीं मध्यभाग । भोंवतीचें मग उच्चासन ।। ५ ।।
भावारूढ तुका जाला एकाएकीं । देवच लौकिकीं अवघा केला ।।६

टीपः- *हारीं = प्रमाणें

(६७७)

सांगतां दुर्लभ ज्ञानाचिया गोष्टी । अनुभव पोटीं कैंचा घडे ? ।। १ ।।
भजनाचें सोई जगा परिहार । नेणत्या सादर चित्त कथे ।। २ ।।
नाइकवे कानीं साधनउपाय । ऐकतो ते गाय हर्षे गीत ।। ३ ।।
नव्हे आरागूक जावयासी वना । वेध कामीमना कीर्तनाचा ।। ४ ।।
काळाच्या साधना कोणा अंगीं बळ । चिंतनामंगळ अर्हनिशी ? ।।५
तुका म्हणे आम्ही खेळों भातुकलें । विभागासी मुलें भोळीं येथें ।।६

(६७८)

जाणपण बरें देवाचिये शिरीं । आम्ही ऐसीं बरीं नेणतींच ।। १ ।।
देखणियांपुढें रुचे कवतुक । उभयतां सुख वाढतसे ।। २ ।।
आशंकेची बाधा नाहीं लडिवाळां । चित्त वरि-खेळा समबुद्धि ।। ३ ।।
तुका म्हणे दिशा मोकळ्या सकळा । अवकाशीं खेळा ठाव जाला ।।४

(६७९)

वचनाचें मोडों† दावावें प्रकार। काय ते साचार कौतुकाचे ॥ १ ॥
जातां घरा मागें उरों नेणें खंती। मिळाली बहुती फांकलिया ॥ २ ॥
उदयींच अस्त–उदयो साधिला। कल्पनेचा केला जागेपणें ॥ ३ ॥
जाणवुनि तुका हांडोरियां* पोरां। सावध इतरां करूनियां ॥ ४ ॥

टीपः– †मोड = विविध भाव; *हांडोरी = अज्ञान, अडाणी.

(६८०)

अनुभवाचें रस देऊं आर्तभूतां। सोडूं *चोजवितापुढें पोथी ॥ १ ॥
देवाचा प्रसाद रत्नाच्या ओवणी§। शोभतील गुणीं आपुलिया ॥२
आधीं भाव सार शुद्ध ते भूमिका। बीज आणि पिका चिंता नाहीं ॥३
तुका म्हणे ज्याचें नाम गुणवंत। तें नाहीं लागत पसरावें ॥ ४ ॥

टीपः– § रत्नांच्या ओवणी = अभंगरूपी शद्वरत्नमाळा. *चोजविता = रसिक.

(६८१)

अनुभवाविणे सोंग संपादणें। नव्हे तें करणें स्वहिताचें ॥ १ ॥
तैसा भुलों नकों बाहिरल्या रंगें। हित तेंचि वेगें करोनि घे ॥ २ ॥
बहुरूपी रूपें नटे नारायण। सोंग संपादून जैसातैसा ॥ ३ ॥
पाषाणासी नांव ठेवियेलें देव। आन तारी भाव नेणें तैसा ॥ ४ ॥
कनकार्क* वल्ली म्हणोनि सेवितां। परि ते सुहिता न मिळती ॥५
तुका म्हणे ज्याचा भाव तारी त्यांस। अहंभावी नास तोचि पावे ॥६

टीपः– *कनकार्क = धोतऱ्याचा रस

(६८२)

ब्रह्मज्ञान क्षेत्रीं नव्हे वर्धमान। नाहीं पूर्णपण जंववरी ॥ १ ॥
पिकल्या वृक्षासी पक्षी स्वयें येती। तेवी ब्रह्मस्थितीप्राप्ता होये ॥२
अनुभवा आलें तेणें ब्रह्मज्ञान। विठेवरी ध्यान तेंचि जाण ॥ ३ ॥
अभिमान तेथें कधीं आणूं नये। तुका म्हणे गाये नामघोष ॥ ४ ॥

(६८३)

अनुभवा येतां विठ्ठल सांवळा। हरती सकळा आधिव्याधी ॥ १ ॥
विरोनियां जाती देहादिक भाव। अंतरीं माधव कृपा करी ॥ २ ॥
समदृष्टीज्ञान प्रकाशिता हर। परेहुनी पर सुख दावी ॥ ३ ॥
तुका म्हणे गुरु–कृपेचें हें फळ। येतो घननीळ प्रत्ययासी ॥ ४ ॥

(६८४)

जाणावी ती कृपा हरीची जाहली। चिंतनीं लागली मनबुद्धी ॥ १ ॥
अनुभव होतां वासना विराली। वृत्ती मुरडली उफराटी ॥ २ ॥
नामरूपसंतसेवन आवडे। कीर्तनपवाडे–हरिगुण ॥ ३ ॥
तुका म्हणे हरीकृपेची लक्षणें। दिलीं नारायणें प्रेमळासी ॥ ४ ॥

(६८५)

मथुनि असार। ताक फेडितां उपकार ॥ १ ॥
बरवी सायासाची जोडी। ठावी अनुभविया गोडी ॥ २ ॥
पाक आणि रुची। तेथें यत्नाविण कैंची ? ॥ ३ ॥
वाढितो पंगती। तुका आवडीसंगती ॥ ४ ॥

(६८६)

सत्यत्वेंसीं घेणें भक्तीअनुभव। स्वामीचा गौरव इच्छितसें ॥ १ ॥
मग तें अवीट न भंगे साचार। पावलें विस्तार फिरों नेणे ॥ २ ॥
वाणी वदे त्याचा कोणांसीं विश्वास ?। अभय भक्तांस सत्य तंई ॥३
तुका म्हणे आम्ही करितो तांतडी। पायीं जाली जोडी शुद्ध व्हावी ॥४

(६८७)

अनुभवावांचुनी। काय सांगसी कहाणी ? ॥ १ ॥
नाहीं ठावा पंढरिराव। तों हें अवघेंचि वाव ॥ २ ॥
मानी तुझें कोण ?। हें तो कोरडे ब्रह्मज्ञान ॥ ३ ॥
तुका म्हणे ठेवा। जाणपण एकीसवा ॥ ४ ॥

(६८८)
बोलाचा गौरव। नव्हे; माझा अनुभव ।। १ ।।
माझी विठ्ठलमाऊली। नव्हे आणिकें पांगिली ।। २ ।।
व्याली वाढविलें। निजपदीं निजविलें ।। ३ ।।
दाटली वोरसें। त्रिभुवनीं ब्रह्मरसें ।। ४ ।।
विष्णु जोडी कर। माथा वंदी रज हर ।। ५ ।।
तुका म्हणे बळ। तोडरीं हा कळिकाळ ।। ६ ।।

*प्रकरण २४ वे*

# जनोपदेश प्रोत्साहन

(६८९)
पैल दिसतें श्रीमुख। तहान हारपली भुक ।। १ ।।
पाहा पाहा डोळेभरी। मूर्ति सांवळी गोजिरी ।। २ ।।
रविशशी ज्याच्या कळा। तो हा मदनाचा पुतळा ।। ३ ।।
तुका म्हणे वर्णूं काय ?। घेतो अलाय बलाय ।। ४ ।।

(६९०)
पाहा पाहा डोळेभरी। विठ्ठलरखुमाई गोजिरी ।। १ ।।
तो हा उभा विटेवरी। कर ठेऊनी कटावरी ।। २ ।।
समीप ज्या गरुडपारीं। दुमदुमती नामभेरी ।। ३ ।।
उभा गरुड सामोरी। हनुमंत त्या शेजारी ।। ४ ।।
तुका म्हणे भीमातीरीं। नांदे माझा सखा हरी ।। ५ ।।

(६९१)
आवडीची धणी देतो नारायण। बाह्या उभारोन राहिलासें ।। १ ।।
जें जयासी रुचें तें करी समोर। सर्वस्वें उदार पांडुरंग ।। २ ।।
हातीं जोडलिया ऐसा चिंतामणी। आतां आम्हां वानी कैंची आहे ?।।३
तुका म्हणे आम्ही जें जें इच्छा करूं। पुरवी कल्पतरु पांडुरंग ।।४

(६९२)

विठेवरी मूर्त आला भीमातीरी। लाडका जो हरी यशोदेचा ॥ १ ॥
गोकुळांत यानें चोरी केली फार। म्हणोनि समोर उभा केला ॥ २ ॥
विटेवरी उभा कटेवरी हात। लज्जेनें पहात लोकांकडें ॥ ३ ॥
तुका म्हणे चोर धरिला पुंडलिकें। चला रे कौतुकें पहावया ॥ ४ ॥

(६९३)

कां रे नाठविसी कृपाळु देवासी ?। पोसितो जगासी एकला जो ॥१
काय तेणें तुझी नाहीं केली चिंता ?। राहे त्या अनंता आठवूनि ॥२
बाळा दूध–कोण करितें–उत्पत्ती ?। वाढवी श्रीपति स्वयें दोन्ही ॥३
तरुवरां फूट उष्णकाळमासीं। जीवन तयांसी कोण घाली ? ॥ ४ ॥
तुका म्हणे ज्याचें नाम विश्वाधार* । त्याचें निरंतर ध्यान करीं ॥५

**टीप:–** *विश्वाधार हे विश्वंभर प्रमाणेंच एक प्रभुनाम–येथें हे घेण्याची कारणें तीन. एक देव हा विश्वाचा आधार. दुसरें जगाची उत्पत्ति ज्या पंचतन्मात्रांतून झाली; त्यांत शब्द ही प्रथम तन्मात्रा. ती गर्जना स्वयं प्रभूची. तिसरे कारण साधकाच्या इतर सर्व साधनानां प्रभुनामाची अपेक्षा आहे – हा संतबोध.

(६९४)

आतां पंढरिसी जाऊं। रुक्मिणीच्या वरा पाहूं ॥ १ ॥
म्हणजें नाहीं येणेंजाणें। ऐसें केलें विठ्ठलानें ॥ २ ॥
तरी सार्थक जन्माचें। पद घ्यावें त्या हरीचें ॥ ३ ॥
तुका म्हणें नाम सार। सिंधु उतरले पार ॥ ४ ॥

(६९५)

चला पंढरिसी जाऊं। आनंदानें गीत गाऊं ॥ १ ॥
टाळवीणा खांद्यावरी। भेटी घेऊं परोपरी ॥ २ ॥
साधुसंत भेटतील। तेणें उद्धार होईल ॥ ३ ॥
करूं भीवरेसी स्नान। अबिराचें उधळण ॥ ४ ॥
प्रेमरंगीं नाम गाउं। तुका परमानंदीं राहुं ॥ ५ ॥

(६९६)

जया पासोनि सकळे । मही आणि ही मंडळें ॥ १ ॥
तो हा पंढरीचा राणा । न ये श्रुती–अनुमाना ॥ २ ॥
विवादती जयासाठीं । विठ्ठल जो जगजेठी ॥ ३ ॥
तुका म्हणे तो अकळ । आहे व्यापक सकळ ॥ ४ ॥

(६९७)

पंढरीसारिखें स्थळ नाहीं कोठें । उभाउभी भेटे पांडुरंग ॥ १ ॥
वाराणसी गया पाहिली द्वारका । परी न ये तुका पंढरीच्या ॥ २ ॥
पंढरिसी नाहीं कोणां अभिमान । पायां पडे जन एकमेकां ॥ ३ ॥
तुका म्हणे जाये एकदां पंढरी । तयाचिये घरीं यम न ये ॥ ४ ॥

(६९८)

लागलें बंदरी । तारूं चंद्रभागे तिरीं ॥ १ ॥
लुटा लुटा संतजन । रासी अमूप हें धन ॥ २ ॥
न लगे कांहीं बळ । धांव घाला रे सकळ ॥ ३ ॥
तुका जवळी माल । भार चालवी विठ्ठल ॥ ४ ॥

(६९९)

गर्जतां पवाडे । कळिकाळ पायां पडे ॥ १ ॥
तो हा पंढरीचा राणा । पुसा सहा चौ अठराजणा ॥ २ ॥
चिंतितां जयासी । भुक्ति मुक्ति होती दासी ॥ ३ ॥
वैकुंठासीं जावें । तुका म्हणे ज्याच्या नांवें ॥ ४ ॥

(७००)

सुख पातां जवापाडें । दुःख पर्वता एवढे ॥ १ ॥
धरी धरी आठवण । मानी संतांचें वचन ॥ २ ॥
नेलें रात्रीनें तें अर्धे । बाळपणें जराव्याधें ॥ ३ ॥
तुका म्हणे विसरपडा । घाणा जुंतीजसी पुढां ॥ ४ ॥

(७०१)
सदानंद हा अपार । वेद श्रुती नेणे पार ।। १ ।।
नेणे शिवब्रह्मादिक । नेणे शेष तो जल्पक ।। २ ।।
नेणतां ती पूर्व–पर । रूपीं विरती, हें सार ।। ३ ।।
तुका म्हणे पूर्णपणीं । सदानंद जनींवनीं ।। ४ ।।
(७०२)
रूपा नाहीं दुजा जोडा । पहा अनंत ब्रह्मांडा ।। १ ।।
रूपा सोसवेना दुजें । जया भिन्नभाव ओझें ।। २ ।।
द्रष्टा–दृश्य–या वेगळें । रूप आहे तें सांवळें ।। ३ ।।
तुका म्हणे जनींवनीं । डोळां दिसे चक्रपाणी ।। ४ ।।

## *भावभक्तियोग*

(७०३)
योगमार्ग धरूं नका । कष्ट उरतील जे कां ।। १ ।।
बोलियेले भगवंत । गीताध्याय दहाव्यांत ।। २ ।।
राजमार्ग नामरूप । येणें पाविजे चिद्रूप ।। ३ ।।
तुका म्हणे सार भाग । भोळ्या अबळा हा चांग ।। ४ ।।
(७०४)
नका जाऊं दूर–पंथा । श्रम कासयासी वृथा ? ।। १ ।।
मनीं आठवा विठ्ठल । येर साधनें तीं फोल ।। २ ।।
संतसंगें नामरूप । हेंचि सगुण* निष्पाप ।। ३ ।।
तुका म्हणे नेणों किती । येणें भव तरलेती ? ।। ४ ।।

टीपः– *सगुण = कामीं येणारें–उपयुक्त

(७०५)
पहा धुंडोनि सकळ । विठो सारिखा दयाळ ? ।। १ ।।
भुक्तिमुक्ति दरुशनें । देतों अनाथाकारणें ।। २ ।।
भावें घाली उडी स्वयें । बाळा पाशीं जेवीं माये ।। ३ ।।
तुका म्हणे भाव धरी । तया संनिध श्रीहरी ।। ४ ।।

(७०६)
भावाविण सर्व कांहीं । केलें व्यर्थ जाण पाही ॥ १ ॥
भावें कुंटिणी तारीली । भावें तुळसी वंदिली ॥ २ ॥
भावें बिभीषणराजा । जाला प्रिय अधोक्षजा ॥ ३ ॥
तुका म्हणे भाव सखा । करा अभाव पारिखा ॥ ४ ॥
(७०७)
वाहावलें थोर थोर । प्रतिसृष्टी करणार ॥ १ ॥
विश्वामित्र महामुनी । नये वशिष्टा तुळणीं ॥ २ ॥
अभावानें नेणों किती । नाडियलें त्रिजगतीं ॥ ३ ॥
तुका म्हणे भाव थोर । भावें भेटे रघुवीर ॥ ४ ॥
(७०८)
सावधान समयासी । निद्रा नसावी तयासी ॥ १ ॥
नरदेहीं सावधान । आहे जोंवरी हा प्राण ॥ २ ॥
येथें लागलिया निद्रा । न पवेंचि रामचंद्रा ॥ ३ ॥
तुका म्हणे गुरु करा । शोधा आपुल्या अंतरा ॥ ४ ॥
(७०९)
भक्ति करिती सकळ । न जाणती घननीळ ॥ १ ॥
पारखुनी घ्यावा हिरा । भ्रमें प्राप्त होती गारा ॥ २ ॥
व्हावें अनन्य शरण । गुरुलागीं तनधन ॥ ३ ॥
तुका म्हणे हित करा । नका फिरूं दारोदारा ॥ ४ ॥
(७१०)
सुख नाहीं फिरण्यांत । मनीं आठवा अनंत ॥ १ ॥
दया उपजेल तया । भक्ति प्रेम लावी पायां ॥ २ ॥
दयावंत माझा हरी । उद्धरीत नरनारी ॥ ३ ॥
कांहीं नलगेचि देणें । हरी तुष्टतो भावानें ॥ ४ ॥
तुका म्हणे निजबीज । गुरु भाव हा आत्मज ॥ ५ ॥

(७११)
मुळीं देहचि लटिका । आचरण सुद्धां जें कां ।। १ ।।
मृगजळीं कोण धाले ? । कैंचें उदक तें प्याले ? ।। २ ।।
बूद्धिबळीं कोण मेला ?। कोण राजपदीं आला ? ।। ३ ।।
सर्व असार सोडावें । गुरुपायीं लीन व्हावें ।। ४ ।।
तुका म्हणे सार भाग । आठवावा पांडुरंग ।। ५ ।।

(७१२)
सुखी संसारीं असावें । चित्त परब्रह्मीं ठेवावें ।। १ ।।
पहा न्याय कमळिणीचा । सोस न करी जिवनाचा ।। २ ।।
ताकामध्यें लोणी राहे । त्यासी मेळणी न होये ।। ३ ।।
तुका म्हणे त्याच परी । सुखी असावें संसारीं ।। ४ ।।

(७१३)
कासयासी दूर जावें ?। निज हृदयीं शोधावें ।। १ ।।
भावबळ धरूनियां । मनीं सांठवा देवा या ।। २ ।।
देव आहे दयावंत । माझा लक्ष्मीचा कांत ।। ३ ।।
तुका म्हणे शिकवण । आन नाहीं हरी जाण ।। ४ ।।

(७१४)
ऐसा भाव चित्तीं धरी । जेणें भावें जोडे हरी ।। १ ।।
नको लौकिकांचें काम । धरी अंतरींचें प्रेम ।। २ ।।
सांडी दांभिकाची भक्ति । धरी संतांची संगती ।। ३ ।।
तुका म्हणे वर्म हेंच । काम सार्थक्याचें साच ।। ४ ।।

(७१५)
संतचरणीं ठेवा भाव । आपेंआप भेटे देव ।। १ ।।
म्हणुनी संतांसी भेटावें । त्यांचें पायीं लीन व्हावें ।। २ ।।
देव संतांपाशीं आहे । तुर्तातुर्त सांगूं काय ? ।। ३ ।।
तुका केशवभजनीं । भेटे जनार्दन जनीं ।। ४ ।।

## नामचिंतन

(७१६)
सर्व सोडुनियां द्यावें । एक विठ्ठलनाम घ्यावें ॥ १ ॥
मागें घेतलें जयांनीं । त्यांची पुरली शिराणी ॥ २ ॥
अझुनि तरी कां रे घ्याना ?। ध्यानीं मनीं विठ्ठल नाणा? ॥ ३ ॥
एका संवत्सरा आंत । तुका म्हणे भेटी देत ॥ ४ ॥

(७१७)
ऐसी जोडी करा नाम कंठीं धरा । जेणें चुके फेरा चौऱ्यांशीचा ॥१
नाशिवंत आटी प्रियापुत्रधन। बीज ज्याचें हीन सीण फळ ॥ २ ॥
नाव थड करा सहस्रनामाची । जेणें भवाब्धीची थडी पावा ॥ ३ ॥
तुका म्हणे काळा हाणा तोंडावरी । भाते भरा हरिनामबाणीं ॥ ४ ॥

(७१८)
हित तें हें करा नाम कंठीं राहे । नाठविती देहेभाव देहीं ॥ १ ॥
हाचि एक धर्म निजबीजवर्म । हेंचि जाळी कर्म केलें दोष ॥ २ ॥
चित्त राहे पायीं रूप वैसें डोळां । अंतरीं कळवळा आवडीचा ॥ ३ ॥
अखंड न खंडे अभंग न भंगे । तुका म्हणे गंगे सिंधुमेळीं ॥ ४ ॥

## भक्तमार्गदर्शन

(७१९)
करोनि सत्संग राहे तूं निर्मळ। लागों नेदी मळ ममतेचा ॥ १ ॥
या नांव अद्वैत खरें ब्रह्मज्ञान । अनुभवावांचोन बोलूं नको ॥ २ ॥
इंद्रियांचा जयो वासनेचा क्षयो । संकल्प हा नयो कदा मना ॥ ३ ॥
तुका म्हणे नयो जाणीव अंतरीं । ऐसा यत्न करी हितालागीं ॥ ४ ॥

(७२०)
भोंपळीच्या वेला आलासे भोंपळा । तोचि तारूं झाला जगामाजि ॥१
वेदासी ते फळ आलें नामतारूं । उतरी पैलपारू भवसिंधु ॥ २ ॥

वेदवेत्ते ऐसें हेंचि बोलियेले । तुम्हातेंही भले नाम घेतां ॥ ३ ॥
तुका म्हणे वेल गुंडाळुनी अंगा । कोण तरला सांगा जगामाजि ?॥४

(७२१)

इंद्रियांचा जयो आवरूनि मनें । निर्विषाकारणें ध्यावें येथें ॥ १ ॥
उपासपारणें अक्षराची आटी । सत्कर्मा शेवटीं असे फळ ॥ २ ॥
तुका म्हणे फळ आहे मुळापाशीं । शरण देवासी जातां भले ॥ ३ ॥

(७२२)

देहसंपत्तीचा सांडा अभिमान । मन करा लीन कृष्णरूपीं ॥ १ ॥
आसनीं शयनीं चिंतावा गोविंद । तेणें तुटे कंद भवाब्धिचा ॥ २ ॥
परदाराधन भूतांचें पीडण । सोडुनी भजन त्याचें करा ॥ ३ ॥
सर्वभूतीं करा संतांची संगती । नाहीं पुनरावृत्ती तुका म्हणे ॥ ४ ॥

(७२३)

वासनेचा त्याग करोनि सर्वथा । भावें त्या अनंता शरण रिघा ॥ १ ॥
कृपेचा सागर नुपेक्षी निर्वाणीं । चुकवील खाणी गर्भवास–॥ २ ॥
भक्तांचा पालक अनाथा कैवारी । ब्रीद चराचरीं तुका म्हणे ॥ ३ ॥

(७२४)

लिपो नये दोषा–लिगाडीं संसारा । लावावें श्रीधरापायीं ध्यान ॥१
लिहिलें कपाळीं सरे ते संचित । लीन–पायीं चित्त संतांचिया ॥ २ ॥
लपोनियां किती दिस राहों शके ?। लिगटला हांके–काळ जीव ॥३
तुका म्हणे जाली बोलायाची सीमा । न सांपडे तुम्हांहातीं ऐसें ॥४

(७२५)

अवघेंचि लाभ बैसलिया घरा । येती भाव धरा एकेठायीं ॥ १ ॥
शेळ्यामेंढ्यागाई सर्व घेती म्हैसी । कामधेनु तैसी नव्हे कांहीं ॥ २ ॥
तुका म्हणे सुखें पाविजें अनंता । वर्म हें जाणतां सुलभचि ॥ ३ ॥

(७२६)

"चला चला जाऊं विठोबाच्या गांवा"। म्हणुनियां धांवा घेई वेगीं ॥१
चंद्रभागे स्नान क्षेत्रप्रदक्षणा। हृदयीं नारायणा आठवावें ॥ २ ॥
"जन्मजन्मांतरीं आठवण करी"। म्हणोनी पंढरी पाहे पाहे ॥ ३ ॥
तुका म्हणे येणें करी रे स्वहित। पाडुरंगीं चित्त लावीं आतां ॥ ४ ॥

(७२७)

सर्वकाळ करी संतांचीच सेवा। तेणें होय जीवा सुखप्राप्ती ॥ १ ॥
अन्न आच्छादन आहे तैसें आहे। सर्वभूतीं पाहे समदृष्टी ॥ २ ॥
तुका म्हणे गाई वत्सावरी ध्यान। तैसा नारायण होय तुम्हां ॥ ३ ॥

(७२८)

बहुतांच्या भाग्यें लागलें जहाज। आतां येथें काज लवलाहो ॥ १ ॥
अलभ्य ते आलें द्वारावरी फुका। आतां येथें चुका न पाहिजे ॥ २ ॥
तुका म्हणे जिव्हाश्रवणांच्या द्वारें। माप भरा खरें सिगेवरी ॥ ३ ॥

(७२९)

न पवेचि केल्या ध्यान जपतपे। कथागीतीं आपेंआप उभा ॥ १ ॥
नकोचि कराया ध्यान-या धारणा। तो हरी स्मरणा ऐकतसे ॥ २ ॥
जयासी आकार रूप नाहीं रेखा। कीर्तनीं हा देखा नाचतसे ॥ ३ ॥
अनंत अपार नाहीं ज्या आकार। तो उभा साकार भक्तांपुढें ॥ ४ ॥
ब्रह्मांडाच्या कोटी जयाचिये पोटीं। पाहे कृपादृष्टी दासांकडे ॥ ५ ॥
तुका म्हणे पाहे आहे तया ठावें। जिहीं एक्या भावें जोडियला ॥६

(७३०)

हरि हरि तुम्हीं म्हणा रे सकळ। तेणें मायाजाळ तुटेल हे ॥ १ ॥
आना-नका कांहीं गाबाळाचें भरी। पडों तेथें थोरी नागवण ॥ २ ॥
वाहा तुळसीदळ भावें जोडा हात। म्हणा "मी पतित तारी आता" ॥३
तुका म्हणे हरि कृपेचा सागर। नामासाठीं पार पाववील ॥ ४ ॥

(७३१)
अबोलणे बोलों येईल उगलें। नामें या विठ्ठलें एकाचिया ॥ १ ॥
न कळे तें कळों येईल उगलें। नामें या विठ्ठलें-एकाचिया ॥ २ ॥
न दिसे तें दिसों येईल उगलें। नामें या विठ्ठलें-एकाचिया ॥ ३ ॥
न भेटे तें भेटों येईल उगलें। नामें या विठ्ठलें-एकाचिया ॥ ४ ॥
अलभ्य तो लाभ होईल अपार। नाम निरंतर घेतां वाचे ॥ ५ ॥
तुका म्हणे जीव आसक्त स्वभावें। तरतील नांवें विठोबाच्या ॥ ६ ॥
(७३२)
युक्ताहार नल्हे आणिक साधनें। स्वल्प नारायणें दाखविलें ॥ १ ॥
कलियुगामाजी करावें कीर्तन। तेणें नारायण देई भेटी ॥ २ ॥
न लगे सांडावा लौकीकवेव्हार। घ्यावें वनांतर भस्मदंड ॥ ३ ॥
नाम गाये तया उरलें साधन। ऐसें तों वचन बोलूं नये ॥ ४ ॥
तुका म्हणे मज आणिक उपाव। दिसती ते वाव नामाविण ॥ ५ ॥
(७३३)
संकल्पविकल्पा द्यावी तिळांजुळी। सुखें वनमाळी आठवावा ॥ १ ॥
आणीक कोणाचा न करा विचार। असावा निर्धार सुखरूपीं ॥ २ ॥
मानसीं विकल्प उठतील नाना। भाकावी करुणा जीवें भावें ॥ ३ ॥
तुका म्हणे पडे शुद्धरूपीं मिठी। मग पाठीपोटीं आत्माराम ॥ ४ ॥
(७३४)
उताविळा लाहो करा। जोडा सारा धणीच्या ॥ १ ॥
उगे नकां आतां राहूं। उद्या पाहूं म्हणोनि ॥ २ ॥
वांयां जाऊं नेदा घडी। मोहवेडीं गुंतोनि ॥ ३ ॥
उमस घेऊं नेदी काळ। उताविळ वेळेसी ॥ ४ ॥
उरो नेदा कांहीं शंका। म्हणे तुका येविशीं ॥ ५ ॥
(७३५)
उगा रहा उगा रहा। उभा पहा राहोनी ॥ १ ॥
नाहीं उपमा या सुखा। उरों दुःखा नेदी हें ॥ २ ॥

उत्तमांत हें उत्तम । उगें नाम आळवी ॥ ३ ॥
अन्नोदक–सांटी धंदा । त्रास नेदा उचित ॥ ४ ॥
तुका म्हणे श्रेष्ठलोक । हेंचि एक करिती ॥ ५ ॥

*प्रकरण २५ वे*

# जनोपदेश जागृती

(७३६)

कां रे अंगीं भरला ताठा ? । चोज करिसी नेतां वाटा ? ॥ १ ॥ कां रे न भजसी हरी ?। तुज कोण अंगीकारी ? ॥ होइल यमपुरी । यमदंडयातना ॥ २ ॥ तोंडा पडिली खिळणी ? । जिव्हा पिटिती वोढूनि ॥ ३ ॥ कां न करिसी लागवेग ? । काय करिसी तेथें मग ? ॥ ४ ॥ कां हे पडली जनलाज ? । कोण सोडवील तुज ? ॥ ५ ॥ लाज धरी म्हणे तुका। नको वांयां जाऊं फुका ॥ ६ ॥

(७३७)

ज्यावें हीनपणें । कासयाच्या प्रयोजनें ? ॥ १ ॥
जरी प्रारब्धीं संसार । करी हिम्मतीची थार ॥ २ ॥
होणार ते कांहीं । येथें अवकळा नाहीं ॥ ३ ॥
तुका म्हणे देवें । कृपा केलिया बरवें ॥ ४ ॥

(७३८)

किती ऐसें रांडवडे । व्हाल घालोनि बापुडे ? ॥ संसाराचे भिडे । कासावीस जालेती ॥ १ ॥ माझ्या स्वामी शरण रिघा । कृपाळुवा पांडुरंगा ॥ ठेवी अंगसंगा । विश्वासिया जवळी ॥ २ ॥ कांहीं न मागतां भलें । होय तेंचि काम केलें ॥ नसावें आथिलें । कांहीं एका संकल्पें ॥ ३ ॥ तुका म्हणे दृढ भाव । पाववील ठायाठाव ॥ एकविध जीव । ठेविलिया सेवेसी ॥ ४ ॥

(७३९)
न धरा देहाचा अभिमान कोणी । येणें केली हानी म्हणोनियां ।। १ ।।
चंदनाचा शूळ सोनियाची बेडी । सुख नेदी घडी प्राण नाशी ।। २ ।।
माय ते सर्पिण बाप जरी वोका । काय संगीं सुखा बाळ पवे ? ।। ३ ।।
तुका म्हणे नरकीं घाली अभिमान । जरी होय ज्ञानगर्वताठा ।। ४ ।।
(७४०)
द्रव्याचिया कोटी । सवें नये रे लंगोटी ।। १ ।।
अंतीं बोळवणेसाठीं । पांडुरंग धरा कंठीं ।। २ ।।
लोभाची लोभिकें । त्यांचें सन्निधान फिकें ।। ३ ।।
तुका म्हणे हितें । जागा नकां पडों रितें ।। ४ ।।
(७४१)
वृद्धपणीं आली जरा । देह कांपे थरथरा ।। १ ।।
आयुष्य गेलें हें कळोन । स्मरा रुक्मिणीरमण ।। २ ।।
दांत दाढा पडिल्या ओस । भेटे हनुवटी नाकांस ।। ३ ।।
हातपाय राहिलें कान । नेत्रा पाझर हाले मान ।। ४ ।।
अंगकांति परतली । चिरगुटा ऐसी जाली ।। ५ ।।
आड पडे जिव्हा लोटे । शब्द नये मुखा वाटे ।। ६ ।।
तुका म्हणे आतां तरी । स्मरा वेगीं हरीहरी ।। ७ ।।

टीपः– बहुजन समाजांत कीर्तनरंगांत श्री गुह्यइंद्रियांचा उठल्या सुटल्या उल्लेख करतील हे संभवत नाहीं; म्हणून एक चरण गाळला आहे.

(७४२)
वृद्धपणीं न पुसे कोणी । विटंबणी देहाची ।। १ ।।
नवद्वारां मोकळिक । पडिलें टक इंद्रियां ।। २ ।।
दांत दाढा गळे थुंका । लागे नाका हनुवटी ।। ३ ।।
शब्द नये मुखावाटा । पोरें चेष्टा करिती ।। ४ ।।
तुका म्हणे हिता तरी । स्मरे हरी वेगेंसी ।। ५ ।।

टीपः– या पूर्वीची टीप पहा, दुसऱ्या चरणांत त्यासाठीं शोध.

(७४३)

किती पाहासी दर्पणीं ? । अंतीं जाशील सर्पणीं ॥ १ ॥
न्यहाल्या पलंग सुषुप्ती । अंतीं गोवऱ्या सांगाती ॥ २ ॥
कानीं कुडक्या हातीं मुदी । अंतीं यम घेईल शुद्धी ॥ ३ ॥
तुका म्हणे हेंचि खरें । अंतीं हरिनाम सोईरे ॥ ४ ॥

(७४४)

पायां लावुनियां दोरी । भृंग बांधिला लेंकुरीं ॥ १ ॥
तैसा पावसी बंधन । मग सोडवील कोण ? ॥ २ ॥
गळां बांधोनियां दोरी । नर हिंडवी वानरी ॥ ३ ॥
तुका म्हणे कैसा पाहे । रीस धांपा देत आहे ? ॥ ४ ॥

(७४५)

मायबापें सांभाळिती । लोभाकारणें पाळिती ॥ १ ॥
तैसा नव्हे देवराव । याचा कृपाळु स्वभाव ॥ २ ॥
मनासारिखें न होतां । मारी बाळकासी माता ॥ ३ ॥
तुका म्हणे सांगू किती ? । बाप लेंकासी मारिती ॥ ४ ॥

(७४६)

धन मेळवूनि कोटी । सवें नये रे लंगोटी ॥ १ ॥
पानें खाशील उदंड । अंतीं जासी सुकल्यातोंड ॥ २ ॥
पलंग न्याहाल्या सुषुप्ती । अंतीं गोवऱ्या सांगाती ॥ ३ ॥
तुका म्हणे एक राम । विसरतां भवश्रम ॥ ४ ॥

(७४७)

प्राण जाई देहांतुन । पुत्र पुसे कोठें धन ? ॥ १ ॥
त्याची खुंटलिसे वाणी । धन पुसे तो छळुनी ॥ २ ॥
कोणा उधार दिलासी । वेगीं सांग आम्हांपासी ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसे जन । धनासाठीं देती प्राण ॥ ४ ॥

(७४८)
कोणी नाहीं रे कोणाचें । अवघें सुखसंपत्तीचें ॥ १ ॥
जैसा वसतो बाजार । तैसा देहाचा विचार ॥ २ ॥
क्षण आहे क्षण नाहीं । काळ प्राण नेतो घाई ॥ ३ ॥
तुका म्हणे सावध असा । प्रभुनामीं सदा वसा ॥ ४ ॥

(७४९)
प्राणी गुंतला संसारीं । तया घडेना पंढरी ॥ १ ॥
ऐशा खटाटोपें भारी । पडे चौऱ्यांशीचें फेरीं ॥ २ ॥
जन्म ऐसाचि पैं गेला । दिन नेमिलेला आला ॥ ३ ॥
तुका म्हणे आतां त्याला । दिला काळाचे हवाला ॥ ४ ॥

(७५०)
नाहीं देहाचा भरंवसा । काय जाणसी मानसा ? ॥ १ ॥
पुष्टकांती अंगावरी । जाली चिर्गुटाचें परी ॥ २ ॥
डोळे कोरीव चांगलें । पाहातां पाहातां सरक्या जालें ॥ ३ ॥
तुका म्हणे गा शेवटी । तुज पुढें मसणवटी ॥ ४ ॥

(७५१)
काय कामा आलें । कन्यापुत्रधनमाले ? ॥ १ ॥
सेखीं न राहाति कोणी । एका श्रीरामावांचुनि ॥ २ ॥
चित्रकथान्यायें । आम्हीं देखिलें अपाये ॥ ३ ॥
तुका म्हणे कळ । शांती नेणती ते खळ ॥ ४ ॥

(७५२)
शांतिविण नांहीं सुख । येर अवघेंचि दुःख ॥ १ ॥
म्हणोनियां शांती धरा । पैल उतराल तीरा ॥ २ ॥
खवळलें कामक्रोधीं । अंगीं भरल्या आधिव्याधी ॥ ३ ॥
तुका म्हणे भव ताप । जाती मग आपेंआप ॥ ४ ॥

(७५३)

वेद शास्त्रे जयासाठीं । त्याचें नाम धरी कंठीं ।। १ ।।
अन्य न करीं साधनें । कष्टसी कां वांयांविणें ? ।। २ ।।
अठरा पुराणांचे पोटीं । नामाविणें नाहीं गोष्टी ।। ३ ।।
गीता जेणें उपदेशिली । ते हे चिंतावी माउली ।। ४ ।।
तुका म्हणे सार धरीं । वाचे नाम ते उच्चारी ।। ५ ।।

(७५४)

घोषे–जयजयकार । जळती दोषांचे डोंगर ।। १ ।।
वीर विठ्ठलाचे गाढे । कळिकाळ पायां पडे ।। २ ।।
दया क्षमा शांति । बाण अभंग हे हातीं ।। ३ ।।
तुका म्हणे गळी । एकतेचि* भूमंडळीं ।। ४ ।।

टीप:– *एकतेचि येथें एक तेचि आणि एकतेचि (एकनिष्ठेचे ऐक्यबुद्धीचे सर्वात्मकतेचे अद्वैत निरंहतेचे)– असे विविध श्लेष संभवतांत.

(७५५)

जन्मीं हित नाहीं केलें । मुद्दल त्वां गमाविलें ।। १ ।।
कां न फिरसी माघारा । अझुनि तरी फजितखोरा ? ।। २ ।।
केली गांठोळीची नासी । पुढें भीकचि मागसी ।। ३ ।।
तुका म्हणे हितठाया । जाईं आपुल्या आलिया ।। ४ ।।

(७५६)

अवघी मिथ्या आटी । राम नाहीं तंव कंठीं ।। १ ।।
सावधान सावधान । उगवी संकल्पी हें मन ।। २ ।।
सांडिलें तें मांडे । उरला आग्रहोचि दंडे ।। ३ ।।
तुका म्हणे भागा । आले चिंतीं पांडुरंगा ।। ४ ।।

## प्रकरण २६ वे

# अद्वैत विचार-तारतम्य

# ब्रह्मज्ञानाचें कोठार-१

विषय रहस्य = जीवैव ब्रह्मं ना पर: म्हणजे प्राणिमात्र ईश्वरस्वरूपी आहे. पण केव्हां ? तो शुद्धबुद्धी होईल तेव्हां. तोंवर तो जीवच. जसें वेडा हा माणूसच पण वेडामुळें बद्ध-परतंत्र-नाममात्र-तसाच जीव जोंवर मनी किंवा जीवबुद्धीचा आहे; तोंवर तो खरा देव म्हणजें मुक्त-स्वतंत्र-सामर्थ्यसंपन्न नव्हे. सारांश द्वैतबुद्धी जोंवर सरली नाही, तोंवर अद्वैतवादाच्या आधारें अद्वैत विचारांच्या आहारी जाऊन द्वैत भूमिकेतील भक्ति आदि यत्न सोडूं नयेत. जसें आपणही माणूसच आहोंत अशा काल्पनिक भरंवशाने वेड्याने वेडउपचार टाकूं नयेत—ते खरोखर वेडाबरोबर सरतील तेव्हां आपोआपच सरतील; तोंवर त्यानें आपल्या बिघडलेल्या बुद्धीची आठवण ठेऊन जपलें पाहिजे—तसाच हा द्वैत विचार जपलाच पाहिजें. तत्व आणि व्यवहार यांतले भेदरहस्य ओळखावें.

(७५७) द्वैत-अद्वैत ऐक्य (तत्व)

मीचि मज व्यालों । पोटा आपुलिया आलों ।। १ ।।
आतां पुरलें नवस । गेली निरसोनी आस ।। २ ।।
जालों बरा बळी । गेलों मरोनि ते काळीं ।। ३ ।।
दोहींकडे पाहे । तुका आहे तैसा आहे ।। ४ ।।

(७५८) द्वैत-अद्वैत-भेद (व्यवहार)

जग जरी अवघें देव । मुख्य उपदेशाची ठेव ।। १ ।।
आधीं आपणयां नासी । तरि उतरसी कसीं ।। २ ।।
ब्रह्मज्ञानाचें कोठार । तें हें निश्चयउत्तर ।। ३ ।।
तुका म्हणे ते उन्मनी । नास कारया कारणीं ।। ४ ।।

(७५९) हा भेदविचार सर्वस्पर्शी

नाहीं येथें वाणी । सर्वघर्णी घ्यावी धणी ।। १ ।।
जालें दर्पणींचें अंग । ज्याचा त्यासी दावी रंग ।। २ ।।
एका भावें आंत । पिका-पिकला अनंत ।। ३ ।।
तुका खळे दाणीं । करीं वैसोनी वांटणी ।। ४ ।।

(७६०) **द्वैत-अद्वैत भूमिका विचाराहं**

ठेविलें जतन । करूनियां निजधन ॥ १ ॥
जथापासाव उत्पत्ति । बीज धरिलें हें हातीं ॥ २ ॥
निवडिलें भूस । सार आइनजिन्नस ॥ ३ ॥
तुका–नारायण– । भाग संचिताचें गुण ॥ ४ ॥

टीपः– देवभक्त भूमिका या न पालटणाऱ्या समजूनच साधकानें चालावें–करूं नये नवेजुने । सांभाळावें ज्याचें त्यानें– असा हा विचार. या मागची भूमिका ही कीं:– अद्वैतप्रेमानें अद्वैतबुद्धी करून तूं तरशील; पण हा तुझ्या एकटया व्यक्तिचा विचार तूं केलास. परंतु तूं ज्या अद्वैताचा अंश म्हणून त्याशीं एकरूप होऊं जातोस; त्याचेच जग हे विशाल स्वरूप आहे. त्याचे आणि तुझेंही ऐक्यच आहे; मग त्याचा विचार केल्याशिवाय तूं कसा उद्धरून जाऊं म्हणतोस ? ते शास्त्रीय कसें ? ते अशास्त्रिय होय. कारण बिघडलेल्या तुपांतल्या एकाद्या कणीनें आपल्या पुरतां विचार करून पांढरा रंग गोल रूप कलंकाचें विकार–अमूक कण्यानां भारभूत झालेली अमकी कणी हे व्यक्तिमत्व टाकूं म्हणून ते तिनें टाकले; ती पाघळून पातळ निर्विकारी झाली; म्हणून ती तूप या अद्वैत कक्षेतून बाहेर जात नाहीं, तिचा संपर्क म्हणजे साऱ्या कण्या जेव्हां तशाच पातळ होऊन शुद्ध तूप होतील, तेव्हांच खरोखर विकार भेद सरतो. सारांश व्यक्तिपेक्षां समाज श्रेष्ठ होय हे जाणून, त्याच्या हिताला प्राधान्य देऊन, भक्तानें पुनःपुनः जन्न घेण्यांस कचरूं नये, उलट तो इच्छावा असाच वेदाचा अर्थ होय

(७६१) **अद्वैतबुद्धीत धन्यता नाहीं**

बीजीं पाहे फळ । विध न करितां कळ ॥ १ ॥
तया म्हणावें तें वेडें । कैसें तुटेल सांकडे ? ॥ २ ॥
दावितया–वाट । वेठी धरूं पाहे चाट ॥ ३ ॥
पुढिल्या उपाया । तुका म्हणे राखे काया ॥ ४ ॥

विवेक विचार = सृष्टी ज्या शक्तिनें घडवली; तिचें सृष्टीमुळें दोन अनुमानसिद्ध भाग होतात. मूळचा गुप्त व सृष्टीमुळें दुसरा–दृश्य. पहिला अव्यक्त निर्गुणी तर दुसरा व्यक्त गुणी. यालांच वेदान्ती अनुक्रमें बीजभाव आणि अंकुरभाव ( किंवा फळ भाव ) म्हणतांत. स्पष्ट कल्पना द्यावयाची झाली; तर असें म्हणतां येईल की– हातांत असलेली बी ही पुढच्या विस्ताराची आणि वार्षिक पुनरुत्पादनाची जरी जननी आहे; तरी ती तशी केव्हां ठरते? जेव्हां रुजते आणि ते पुढचें कार्य करूं लागते तेव्हां. भूमीत पेरली

गेल्यानंतर–अंकुर भावांत ती जागृत झाल्यानतर–ती बी आहे हे ध्यानीं येते. पण एकदा बी चा अंकूर झाला कीं त्या अंकुरापासून पुढच्या वार्षिक फळांतील कच्च्या बियापर्यंतच्या साऱ्या विस्तारापैकीं कोणालाही 'मी बीच आहे' असें म्हणतां येत नाहीं. तो स्वतःला बीच समजूं म्हणेल तर ते चुकीचें आहे, कारण तो अंकुर भावातला एक ( बीज भाव पुनः निर्मिण्यासाठीं–पुनः नव्या बिया करण्यासाठीं निर्मिलेला ) सहेतुक अंश आहे. त्यानें आपला अंकुर भावानें वाट्यांस आलेला लाकूड–पान फूल वगैरे स्वभावच आपला समजून तोच जपावा–बीपण मिरविण्याचा खटाटोप करूं नये, बी व्हावे आणि मग ते मिरवावे. त्यांचप्रमाणें जीवरूपी ज्या चैतन्यशक्तिनें अकुररूपें जागृत होऊन पुढचा सारा प्रपंच निर्मिला ती शक्ति एकवार जागी झाल्यानंतर प्रपच कार्यं अर्धेच टाकून ती माघारी फिरत नाहीं. आपले इच्छित कार्य पूण करून ती पुनः पक्व बीज कोपांत उतरेल तेव्हाच ती पूर्ववत् सुप्त अचल स्वरूपांत येतें. तसेंच जीवमात्र जरी ईश्वरस्वरुपी असला तरी तो प्रपंचार्य जागृत चैतन्यानें भरला असल्यामुळें : मधल्या प्रपंचवाहक काळांत किंवा मधल्या अवस्थेत आपला उगम आणि अंत (परिणती) बीजभावीच आहे : या कल्पनेनें वळेच तिकडें धांव घेण्याचा अट्टाहास करूं नये. निसर्ग नियमानीं जशी झाडाची पूर्ण वाढ होवून पुनः बीज भाव निर्मिला जातो; तसेंच साधकानेंही आपली साधना शेवटपर्यंत चालवून पुनः शेवटीं बीज भावांत येण्याची इच्छा करावी पण यावेळीं ध्यानांत हे ठेवावें कीं अंकुर भावांतून पुनः बीजभाव निर्मिण्याचें कार्य नियंता करतो; वृक्ष नव्हे. तसेंच मला पुनः बीजभावांत नेणारा तोच आहे. आणि महत्वाचें हें कीं पुनः नवी बी तयार व्हावयाला असा काळ यावा लागतो कीं तेव्हां झाडाच्या प्रत्येक डहाळीफळांत नव बीज निर्मितिचें वातावरण खेळते, तेव्हां एक एक बी होते हे जाणून साधकानें जाणलें पाहिजे कीं " बा ! रे तुला बी व्हावयाचें आहे नां ! मग साऱ्या झाडाला फळे फुले धरून बियांची पिढी निर्माण होईल अशा वातावरणाची वाट तूं पहा. " विश्वच बीजभावी करण्याचा यत्न कर. तर तुझ्या इच्छा तृप्त होतील. व्यावहारिक सृष्टीत हे वातावरण निर्मिण्याचें कार्य जीव करत नाहीं; पण आध्यात्मिक सृष्टीत तो ते करतो–कारण जीव त्यासाठींच भक्त झाला आहे.

बीजांकुर भावें वेदानां देव–भक्तद्वयी वेगळी कशी व कां मानावी याचेंच वरील प्रमाणें समर्थन करावयाचें आहे. येथें नुसत्या आदि–अंताचा म्हणजें बीजभावाचाच विचार करून, वेदवाक्यांवर बोट ठेवून, स्वतःलाच कोणी देव समजेल किंवा तो देवच होऊन जाण्यांत धन्यता मानील. तर सर्वच देव–मग भजा कोणाला ? कशासाठीं ? असले भलतेच वाग्वाद माजतील. तेव्हां आपण अंकुरभावी जीव आहोत ; किंवा विश्वातल्या या यंत्रणेचे, निमित्तमात्र कां होईना, आज सूत्रधार मनुष्य आहोत–आपणांस साऱ्या जगाचा गाडा असाच शेवटपर्यंत सुरळीत चालवावयाचा आहे या विचारानें बहुजन हिताय बहुजन सुखाय देवभक्तद्वयीनिष्ठ भक्तसांप्रदाय पाळावा, असाच वेदांचा निष्कर्ष

तत्वमसि वगैरे महावाक्यें ओळखीसाठी आहेत-जाणिवेची आहेत-तूं आजच तसा आहेस किंवा तूं आजच तसा हो; असा प्रेरणात्मक भाव त्यांत पाहूं म्हणशील; तर विश्वाच्या अंकुर भावाकडे तुजकडून डोळेझांक होईल. सारांश जीव अद्वैत असला तरी जोंवर द्वैतबुद्धी जग आहे; तोंवर साधकानें तद्हितार्थ अद्वैतयोग्य झाला तरी द्वैतीच रहावे अद्वैत होण्याची त्वरा करूं नये.

(७६२) **वेदांचा अद्वैत विचार तत्वनिष्ठेनें शब्दप्रमाण मानूनही घेऊं नये; किंवा विविध शब्दच्छलें करून त्यांतून कुतर्कांचें अपकर्षही काढूं नयेत.**

मातेची जो स्तनें फाडी। तया जोडी कोणती ? ॥ १ ॥
वेदां निंदी तो चांडाळ। भ्रष्ट खळ सुतकी ॥ २ ॥
हातें आगी लावी घरा। कोठें थारा वस्ती त्या ? ॥ ३ ॥
तुका म्हणे वेद्य वर्म। येरा भ्रम नाचवी ॥ ४ ॥

(७६३) **पोकळ तत्वनिष्ठा घातक**

वंदायापुरते। कोण *ब्राह्मण निरुते ? ॥ १ ॥
ऐसें सांगा मजपाशीं। संतां निरविनों विशीं ॥ २ ॥
असा जी प्रवीण। ग्रंथकळीं शुद्धहीन ॥ ३ ॥
तुका म्हणे लोपें। घडती सत्याचिया पापें ॥ ४ ॥

**टीपः**– *निरुता ब्राह्मण म्हणजे वेदप्रतिपाद्य ब्रह्माचा अनुभव घेतलेला ब्रह्मज्ञानी ॥३॥ चा अन्वय ग्रंथकळीं (कलेविषयीं) शुद्धहीनप्रवीण असा.

(७६४) **ब्रह्म शब्दसिद्ध नव्हे भजनसाध्य होय; आणि भजन अखंड चालावें.**

आम्ही आळीकरें। प्रेमसुखाची लेंकुरें ॥ १ ॥
पायीं गोविली वासना। तुच्छ केलें ब्रह्मज्ञाना ॥ २ ॥
येतां पाहें मुळा। वाटें पंढरीच्या डोळां ॥ ३ ॥
तुका म्हणे स्थळें। मग पाहेन सकळें ॥ ४ ॥

(७६५) **नरदेह भजनानंद भोगार्थ-शाब्दज्ञानव्ययार्थ नव्हे**

वेद अनंत बोलिला। अर्थ इतुका साधिला ॥ १ ॥
विठोबासी शरण जावें। निजनिष्ठे नाम घ्यावें ॥ २ ॥

शास्त्रीं सकळां विचार। अंतीं इतुळा निर्धार ॥ ३ ॥
अठरापुराणीं सिद्धान्त। तुका म्हणे हाचि होत ॥ ४ ॥

(७६६) **भजनआस्था धन्यताकारक**

धन्य शुद्धजाती। धरी त्वरें उपरती ॥ १ ॥
आइकिलें त्याचा कानीं। होय परिपाक मनीं ॥ २ ॥
कळवळा पोटीं। सावधान हितासाठीं ॥ ३ ॥
तुका म्हणे भाव। त्याचा तोचि जाणा देव ॥ ४ ॥

(७६७) **भजन हेंच जीवन (द्वैत) ध्येय**

जीवित्व तें किती ?। हेंचि धरितां बरें चित्तीं ॥ १ ॥
संतसुमनउत्तरें। मृदुरसाळमधुरें ॥ २ ॥
विसांवतां कानीं। परिपाक घडे मनीं ॥ ३ ॥
तुका म्हणे जोडी। होय जतन रोकडी ॥ ४ ॥

(७६८) **धैर्यानें ध्येय गांठावें–भजन सहनशीलतेनें अखंड करावें**

अभिमानचिन्ह शांति। महत्व घेती सकळ ॥ १ ॥
कळोनिही नेघे वर्म। तरि श्रम पावे तो ॥ २ ॥
सर्वसत्ता धरितां धीर। धैर्यवीर आगळा ॥ ३ ॥
तुका म्हणे तीख तीखें। मृदु सुखें आवडी ॥ ४ ॥

(७६९) **भजनानंदार्थ आजची लीनता उद्याच्या उत्कर्षाची**

भोजन तें पा शांतीचें। उंच–निचें उसाळी ॥ १ ॥
जैसी कारंज्याची कळा। तो जिव्हाळा स्वहिता ॥ २ ॥
कल्पना ते देवाविण। नसों भिन्न इतरीं ॥ ३ ॥
तुका म्हणे पावें भूतीं। ते निश्चिती मापली ॥ ४ ॥

**टीप:**– पा = मिळवा; निचें = नम्रतेनें; उंचउसाळी = उत्कर्ष, निश्चिती मापली = निश्चितमनानें भजन केलें तर त्या भजन मापामुळे (आवर्तनानें) शांती या भूतमात्रांत राहूनच भूतमात्रांच्या सेवेनेंच मिळते – लीनता व सहनशीलता–धैर्य मात्र अवश्य हवीत. त्यानेंच स्वहित साधते.

(७७०) प्रपंच–परमार्थ (भजनानंद) विवेक–लोकसंग्रहार्थ

पोटापुरतें काम। परि अगत्य तो राम ॥ १ ॥
कारण तें हेंचि करीं। चित्तीं पांडुरंग धरीं ॥ २ ॥
प्रारब्धींचा हेवा। जोडी देवाची ते सेवा ॥ ३ ॥
तुका म्हणे बळ। बुद्धी वेंचूनि सकळ ॥ ४ ॥

(७७१) नरदेह परमार्थ विवेकार्थ

बहुताजन्माअंतीं। जोडी लाधली हे हातीं ॥ १ ॥
नरदेहा ऐसा ठाव। धरीं पांडुरंगीं भाव ॥ २ ॥
बहु केला फेरा। येथें सांपडला थारा ॥ ३ ॥
तुका म्हणे जाणे। ऐसे शाहाणा लाहाणे ॥ ४ ॥

(७७२) हा विवेक आर्तभूतानां बोध्य होय– (तर्कटांशी वाद्य नव्हे)

आर्तभूतें प्रति–। योजा उत्तरें त्या शक्ति ॥ १ ॥
फळ आणि समाधान। तेथें उत्तमकारण ॥ २ ॥
अल्पें तो संतोषी। स्थळीं सांपडे उद्देशीं ॥ ३ ॥
सहजसंगम। तुका म्हणे तो उत्तम ॥ ४ ॥

(७७३) तर्कटवादी चित्तमळ दुःखद—तो धर्म नव्हे.

मळाचिया मुळें। दुःखें वाढती सकळें ॥ १ ॥
ऐसा योगियांचा धर्म ?। नव्हे; वाढवावा श्रम ॥ २ ॥
न कळे आवडी। कोण आहे कैसी घडी ॥ ३ ॥
तुका म्हणे थीते। दुःख पाववावें चित्तें ॥ ४ ॥

साधकानें भजनानंद भोग घ्यावा; पण सहज. तेथें आग्रह वा वाद नको

(७७४) तेच आचार्य–सभाग्य–लक्षण.

भाग्यवंतां हेंचि काम। मापी नाम वैखरी ॥ १ ॥
आनंदाची पुष्टि अंगीं। श्रोते संगीं उद्धरती ॥ २ ॥
पिकविता खाये किती ?। पैं पंगती सुकाळ ॥ ३ ॥
तुका करी प्रणिपात। दंडवत आचार्या ॥ ४ ॥

(७७५) हे सभाग्यलक्षण हेकडानां पचत नाहीं म्हणून खचूं नये.

लटीकें तें रुचे । साच कोणांही न पचे ॥ १ ॥
ऐसा माजल्याचा गुण । भोगें कळों येई सीण ॥ २ ॥
वाढवी ममता । नाहीं वरपडा दुर्वाता ॥ ३ ॥
न मनीं हेकड । तुकाउपदेश माकड ॥ ४ ॥

(७७६) सृष्टी अशी भिन्नस्वभावी कां ?

कौतुकाची सृष्टी । केली कौतुकेंचि कष्टी ॥ १ ॥
मांडे तरी भला खेळ । फांके फांकिल्या कोल्हाळ ॥ २ ॥
जाणतियासाठीं । भय सामावलें पोटीं ॥ ३ ॥
तुका म्हणे चेता । होणें तूंच ते आइता ॥ ४ ॥

विषय रहस्य – अद्वैतवाद्यांवर द्वैतवाद्यांचा आणि विशेषत: अभारतीय निष्ठावंतांचा आक्षेप हा कीं जीव हा ईश्वरस्वरूपी नाहीं. तो ईश्वरअंश असता तर असा दुष्टदुष्ट दुर्वर्तनी वगैरे कां होता ? यावर श्री नाटकाचा दृष्टान्त देतात. रंगमच हे खोटयाच खेळाचें अंगण. पण नटानें सहज चेष्टेनें जरी अभिनयतंत्रात चूक केली तर सारा खेळ मोडतो–मारामारी होते. उदा. आवेशाच्या भरांत नटव्या राजानें हातांतल्या लाकडी तरवारीचा जोराचा रट्टा दिल्यामुळें दुसरा नट भडकला किंवा बेशुद्ध झाला कीं मारामारी, पंचनामा, पंचाईत, शासन इत्यादी विघाड आणि त्याचें दुष्परिणाम होतात. हा दोष कोणाचा ? नाटयतंत्राचा नव्हे–नटाच्या दुष्ट चुकीचा हा परिणाम तसेंच जगरूपी रंगभूमीवर भोग्य भोक्ता भोग या त्रयीत किंवा जीव आणि जीवन यांत परमात्माच भरला असला तरी भोक्त्या जीवांची भोग भोगण्याची हातोटी चुकल्यामुळें पापपुण्यादी कष्ट वाढलें. जसें दारू हा पदार्थ औषधार्थ आहे; ती योग्य त्या व्याधीच्या उपचारामध्यें जर प्रमाणांत घेतली तर ती दोषहारक होते–पण उगाच प्रमाणाबाहेर पिऊ लागताच ती हानीकारक व्यसन होते. सारांश विषय चांगले वाईट नाहीत; किंवा भोक्ते जीवही तसें नव्हेत; हा जो चांगला वाईट प्रकार दिसतो तो सेवनाचें प्रमाण चुकल्याचा परिणाम आहे. त्या दोषांचा धनी प्रमाण चुकवणारा जीव आहे; जगनियंता शिव या कष्टांचा जनिता नव्हे. जगांत दिसणारा हा भेद, हा जीवांच्या भिन्नबुद्धीचा प्रकोप आहे.

(७७७) जीवांची भिन्नबुद्धी भवकारक

भोवंडीसरिसें । अवघें भोंवतचि दिसे ॥ १ ॥
ठायीं राहिल्या निश्चळ । आहे अचळीं अचळ ॥ २ ॥

हांकेचा कपाटीं । तेथें आणीक नाद उठी ॥ ३ ॥
अभ्र धांवे शशी । तुका म्हणे दुसरें भासीं ॥ ४ ॥

टीपः– शशी पुढें न धांवें हें अध्याहृत समजावें.

(७७८) देवनिष्ठ स्थिरबुद्धी भवनिवारक

गरगाहातीं सुटली काया । विचारें या निश्चय– ॥ १ ॥
नासोनियां गेली खंती । भोगों स्थिती–सहज ॥ २ ॥
न देखेंसें जालें श्रम । आलें वर्म हातां हें ॥ ३ ॥
तुका म्हणे कैंची कींव ? । कोठें जीव निराळा ? ॥ ४ ॥

(७७९) भजनविषयीं संकल्पविकल्पशून्य आस्था म्हणजेंच स्थिरबुद्धीयोग

अवघी मिथ्या आटी । राम नाहीं तंव कंठीं ॥ १ ॥
सावधान सावधान । उगवी संकल्पीं हें मन ॥ २ ॥
सांडिलें तें मांडे । उरला आग्रहचि दंडे ॥ ३ ॥
तुका आलें भागा* । देउनि चिंती पांडुरंगा ॥ ४ ॥

टीपः– *तुका आलें भागा = सफल होत आलेली साधना ही सुद्धां कृष्णार्पण करून तूं केवळ हरिचिंतन कर; त्यातच तुझाही खरा उद्धार आहे; त्यानेंच लोकसंग्रह चालेल; व परोपकारही घडेल–हा श्लेषार्थ.

(७८०) निस्संदेह ज्ञातव्य— हरिप्रेम श्रेष्ठ

कांहीं जांणों नये पांडुरंगाविण । पाविजेल सीण संदेहानें ॥ १ ॥
भलतिया नावें आळविला पिता । तरि तो जाणता कळवळा ॥ २ ॥
अळंकारगीतीं गौरवितां वाणी । सर्वंगात्रा धणी हरिकथा ॥ ३ ॥
तुका म्हणे उपजे वेल्हाळआवडी । करावा तो घडीघडी लाहो ॥ ४ ॥

(७८१) हे ज्ञातव्य एकमेवाद्वितिय सार

भ्रमणा पाउलें वेचिलीं तीं वाव । प्रवेशातें ठाव एक द्वार ॥ १ ॥
सार तीं पाउलें विठोबाचीं जीवीं । झणीं विसंभावीं क्षणभरि ॥ २ ॥
सुलभ हें केलें सकळां जीवन । फुंकावेंचि कान न लगेसें ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें सकळही कोड । पुरे मूळ–गोड–विस्तारानें ॥ ४ ॥

(७८२) **जीवसर्वस्व हरिभजन**

ज्या ज्या आम्हांपासीं होतील आसक्ति। तिहीं हा श्रीपती अलंकारूं।। १
अवघा पायापासीं दिला जीवभाव। जन्ममरणाठाव पुसियला ।। २ ।।
"ज्याचें त्यासी देणें' घातला संकल्प। बंधनाचें पाप चुकविलें।। ३ ।।
तुका म्हणे येथें उरला विठ्ठल। खाये बोले बोल गाये नाचे ।। ४ ।।

(७८३) **भजनलीन मनाची अवस्था**

बोलावा विठ्ठल पाहावा विठ्ठल। करावा विठ्ठल जीवभाव।। १ ।।
येणें सोसें मन जालें हांवभरी। परती माघारी घेत नाहीं ।। २ ।।
बंधनापासूनि उकलली गांठी। देतां आली मिठी सावकाश ।। ३ ।।
तुका म्हणे देह भरला विठ्ठलें। कामक्रोधें केलें घर रितें ।। ४ ।।

(७८४) **अशा भाविक मनाच्या साधकाला साधनांची अडचण नाहीं**

साधनांच्या कळा आकार आ-कृती । कारण नवनीतीं मथनाचें ।।१।।
पक्षियासी नाहीं मार्गी आडताळा। अंतरिक्षीं फळा-सीचि पावें ।।२।।
भक्तीची जोडी ते उखती व साठीं। उणेंपुरेंतुटी तेथें नाहीं ।।३।।
तुका म्हणे आलें सांचत सांचणी। आजि जाली धणी एकसरें ।।४।।

**टीप** = आकृती = कृती पूर्ण होऊन हवा तो आकार ( अपेक्षित ध्येय ) निर्माण होईतोंवरच साधनें आणि त्यांच्या वापराचें ज्ञान यांची आवश्यकता आहे. जसें लोण्यासाठीं मंथन (कृती व साधनें) हवें. पण आयते लोणी मिळाले तर मंथनाचा अडथळा आहे कां ? आडताळा = अडथळा, ताळा = ताळा = इच्छित मेळ, त्यांत व्यत्यय आणणारा अडथळा म्ह. आडताळा. उखिता; योग्य; पात्र. उखती = एकवट; उकती वस्तु म्हणजे मोजमाप न करतां एकदम मोल देऊन घ्यावयाची समग्र वस्तु.

(७८५) **प्रपंच इतरानां साधनाशिवाय अनिवार्य दुःखद पण भक्ताला मात्र तो प्रेमधणी सुखदायक**

रूपनांव माया बोलावया ठाव। भागा आले भाव तयावरि ।। १ ।।
शीव वाटे परी न खंडे पृथिवी। शाहाणे ते जीवीं समजती।। २ ।।

पोटा आले तिच्या लोळे मांड्यावरि । पारखी न करी खंतीं चित्तीं ॥३॥
तुका म्हणे भक्तिसाठीं हरिहर । अरुपीचें क्षरविभाग हें ॥ ४ ॥

अर्थ— रूपनांव म्हणजें या जगांतलें दृश्य जीवन—प्राणिमात्र. ही सारी माया म्हणजें (सिनेमासारखें) खोटेंच दृश्च आहे. पण हे कर्त्यानें कां केले ? ( सिनेमा कां झाला? ) बोलावया ठाव म्हणजें आधार व्हावा किंवा बोलके पात्र आपल्या डीळचांपुढें यावें; आणि त्यानें आपल्या वाणीनें कर्त्यापुढें कोड कौतुक करून त्याचें मनरंजन करावें म्हणून. देवानें अशाप्रकारें जग निर्मिले म्हणूनच त्यांतलें देवभक्त—सुष्टदुष्ट—जडजीव वगैरे भाव निर्माण झालें. (जसे माणसानें सिनेमा केला म्हणून स्टंट ट्रॅजेडी कॉमेडी सोशल जंगलपट बालपट वगैरे प्रकार झालें; तसे. ) अशाप्रकारें अध्यात्म शास्त्राच्या आधारें जगाचें ज्ञान झाले असतां जग हे ईश्वरस्वरूप आहे असें वाटतें; आणि पटते, पण त्याप्रमाणें अनुभव मात्र घेतां येत नाहीं—तेथें स्वभाव आड येतो. उदा. भला मोठा हत्ती पाहिला तरी मुलानां त्याचें भय वाटत नाहीं : आनंद होऊन ती त्यामागेंही जातात; पण नुसतें सापसाप ही आरोळी उठली कीं साऱ्या मुलांची पांगापांग होते. कां? साप हा मानवांचा मारक आहे; ही कल्पना त्यानां भीतीं घालून पांगापांग करते. मग एखादा धीट येतो आणि एखाद्या काठीच्या रट्ट्यानें किंवा टाचेखाली चिरडून त्या किरडाला ठार करतो; त्याला मात्र त्याचें भय वाटत नाहीं. कां? त्याचा धीट स्वभाव. असें नैसर्गिक शत्रुमित्रभाव प्राण्यांत आहेत; त्यावर अध्यात्म तत्व कळल्या बरोबर मात करतां येत नाहीं, त्यासाठीं पहातां क्षणीच भेटणारा प्रत्येक प्राणी आपला क्रूर वैरभाव सांडून साधकाच्या इच्छेप्रमाणें वागेल : असें सामर्थ्य साधकांनें मिळविलें पाहिजे. त्यानें ते सामर्थ्य इशकृपेनें मिळविलें तर त्याच्या भोंवती पूर्वींच्या ऋषीमुनीप्रमाणें गाई-वाघ सर्प—मुंगूस ही एकत्र गुण्यागोविंदानें नांदतील. याला सर्वात्मकपण म्हणतांत. माणसाच्या ठिकाणीं सर्वात्मकपण नाहीं. तो करतो त्या प्रत्येक क्रियेत स्वतःलाच कर्ता समजतो : आणि म्हणून त्या क्रियेच्या पापपुण्याचा तो धनी होऊन त्याचें फल तो भोगतो—परिणामी त्याला सुखदुःख भोगावें लागते. अशा प्रकारें प्राण्याची अहंबुद्धी किंवा अहंकार (मीपण) त्याला सुखदुःखांत घालते—त्याची खंती त्याच्या मागें लागते. ही कटकट कशी चुकेल ? गीता शास्त्र यावर कृष्णार्पण बुद्धीचा उपाय सांगते. कसा?

आईच्या मांडीवरच्या मुलाला खाण्यापिण्याची चिंताही नाहीं; त्याच्या हातून उनाडक्याही होत नाहीत : त्याला मारही बासत नाहीं. पण तेच घराबाहेर फिरूं लागले—व्यापार क्षेत्रांत जाऊं लागले—मुलाचा बाप्या होऊन आईपासून दूर गेले कीं सारा खटाटोप त्यामागें आला. याचप्रमाणें प्राणी प्रपंचाच्या नादांत परमेश्वराला विसरला—स्वतःलाच कर्ता समजूं लागला—स्वतःच्याच बुद्धीनें, बळानें, फलभोगादी इच्छेने, स्वतःपुरतेच कर्मधर्म पाहूं लागला कीं त्याला त्याच्या अहंबुद्धीचे हे विकार भोगावें लागतात. पण कर्ता

करविता श्रीहरी आहे; भर्ता भोक्ताही तोच आहे; मी कोणीच कांहींच नव्हे अशा निरहंबुद्धीचा साधक मात्र या काळजांतून मुक्त आहे. ज्याप्रमाणें स्वार्थी कपटी बुद्धीनें माणसें मारणारा दरोडेखोर फाशी जातो; पण त्याला फाशी देणारा चाकर मात्र निस्स्वार्थी सेवाबुद्धीनें त्याला मारूनही सरकारी आज्ञा प्रमाण म्हणतो म्हणून तो फाशी जात नाहीं–तो कर्म करूनही अकर्ता ठरतो, कारण त्याचा चालक धनी वेगळा. तसाच साधक वागला तर तो निर्भय होत्साता आनंदें जीवन घालवतो. गीता अशा निरहपणें वागणाऱ्यां भक्ताला मद्भक्त आदि विशेषणें देते. तुकाराम महाराज म्हणतांत गुरुशिष्य देवभक्त हरिहर क्षरअक्षर जीवशिव आदि जें पतितपावन स्वरूपी भेद दिसतांत ते क्षरविभाग जाणा. क्षरविभाग या पदात अर्थरहस्य आहे ते, पुढीलप्रमाणें:–

एखादा मनुष्य नेहमीसारखें न वागतां वेडेवांकडे वरळूं लागला तसेंच वागूं लागला कीं त्याची ती बदललेली चर्या पाहून आपण म्हणतो– अरे ! याला वेड लागलें आहे– कालपर्यंत हा शहाणा होता. भिन्न क्रियेमुळें जसा येथें शहाणा-वेडा भेद झाला; तसाच जीव उत्पत्तिचा विचार करतां त्याची सध्याची दशा वेडयासारखीं गणली आहे. वेदान्ती तिला वि: म्हणतात; आणि त्याच्या त्या पूर्वीच्या शिवस्वरूपी निर्मळ अवस्थेला व: म्हणजें ज्ञानमय आत्मा म्हणतांत. वेडामुळें जसा मनुष्य सैरावैरा धांवतो उपद्रव देतो म्हणून त्याला कोंडतात, मारतांत, विविध दुःखे त्याच्या वांटयाला येतांत- तसें वि: च्या विकारानें वेडा झालेल्या जीवाला झालें आहे. आतां वेडयामुळें जसें इतर शहाणे ठरले आणि ते त्याच्या हितासाठीं त्याला मनांत नसतांही त्याच्या वेडलहरीमुळें योग्य तेथें त्याला योग्य ते शासन करूं लागले; तसें व: स्वरूप ईश्वराला वि: विकारी जीवांचें पालनपोषण आणि शासनही करावें लागलें. पण त्या वेडयाला जन्म देणारी शहाणी आई जसे आपण वेडे मूल प्रसवूं या — या कपटबुद्धीनें त्याला जन्म देत नाही; आपल्या– सारखाच तो शहाणा व्हावा ही तिची इच्छा; तसेंच विश्वजनित्या विठ्ठलाला किंवा व: स्वरूपी ईश्वराला जीवाबद्दल वाटते वेड येते आणि जाते; तसेंच त्यांचबरोबर त्याच्या उपचारार्थ गोळा केलेले काठीकांसरेही येतात, जातांत-हाणमारही येते, जाते– त्या साऱ्यांचे मूळ कोण ? वेडविकार. तसाच मूळचा व: असलेला जीव आपल्याच छंदलहरीनें वि: बनला. पण जन्म दात्यानें तो तसा निर्मिला कां ? नाही– तो भक्तिसाठीं निर्मिला.

विचारलहरी माणसानें फोटो काढला. तो अचल होता तोंवर कोणी आनंदानें शिट्टयाही मारीत नव्हते; किंवा त्याला भीतही नव्हते. पण त्याच फोटोची धांवती बोलती फिल्म झाल्यामुळें आतां प्रेक्षकांत आनंदाच्या टाळया शिट्टया आणि दुःखाच्या हळहळी उठनात. कां ? प्रेक्षक ते दृष्य खरें समजतांत म्हणून. पण सिनेमा चालवणाराला तो विकार लटका आहे हे ठाऊक असते; तो आपले यत्र चालवण्याचें काम करतच असतो तसाच हा प्रकार; पण कशामळें ? फोटो धांवते झाल्यामुळे तसेंच मूळचा स्थिर

असा हा जीव विश्वसंचलनार्थ धांवता झाल्यामुळें: असंख्य दृष्ये आणि त्यांच्या असंख्य भोगभान लहरी उठत आहेत–पण सारें खोटें. पण केव्हां ? वेड गेल्यावर–त्या आधीं ? सारें मकाटचानें मानावेत असें.

सर्वसंपन्न ईश्वर बाळाच्या अनन्यभावानें वश होतो–
(७८६) प्रौढाचें ज्ञान तेथें अप्रमाण होय.

लेकराची आळी न पुरवी कैसी ?। काय तयापासीं उणें जालें? ॥ १ ॥
आम्हां लडिवाळां नाहीं तें प्रमाण। कांहीं ब्रह्मज्ञान आत्मस्थिति ।२
वचनावा घेईन अनुभव पदरीं। जें हें जनाचारीं मिरविलें ॥ ३ ॥
तुका म्हणे माझी भोळिवेची आटी। दावीन शेवटीं कौतुक हें ॥ ४ ॥

(७८७) बाळभावांतील अकर्तव्य सत्यप्राप्तीकारक.

योग्याची संपदा त्याग आणि शांति। इहीं लोकीं कीर्तिसोहळामान ॥ १
येरयेरांवरी जयाचें उसिणें। भाग्यस्थळीं देणें झाडावे–सें ॥ २ ॥
केलिया फावला ठायींचा तो लाहो। तृष्णेचा तो काव्हो काव्हवितो ॥ ३
तुका म्हणे लाभ अकर्तव्यानावें। शिवपद जीवें भोगिजेल ॥ ४ ॥

थोडासा अर्थ— योग्याला (साधकाला) आवश्यक अशा त्याग आणि शांतीनें कीर्तिसोहळामान म्हणजे ईश्वरी लीलाविग्रह व महिमान गाईलें तर ते कीर्तन लोकमान्य होते–परमार्थ ठरते. परमार्थाचें ध्येय गाठण्यांस (भक्तिविरहित) त्यागशांती किंवा (त्यागशांतीविरहित) भक्ति ही एकांगी ठरतास. त्यानां एकमेकांचें सहाय्यही हवें; आणि प्रामुख्यानें ज्या ईश्वरानें देह आणि त्यागशांति भक्तिरूपे भाग्योदयकारक संधी दिली त्या ईश्वराला या साऱ्यां गोष्टी अर्पाव्यांत. असें केल्यानें ज्या निरहपणें प्राण्यानें वागून प्राप्तकर्मद्वारे हरिस्मरण करत करत हरिसेवा करावी, या इच्छेने ईश्वरानें प्राणि निर्माण केलें; तो हेतू पूर्ण होईल. परतु हरिसेवेव्यतिरिक्त स्वार्थतृष्णेने प्राणि व्याकुळ होईल तर त्याची ती लालसा त्याचो त्यालाच पीडते. (जसें दुःखांतही सुखसमाधान मानणारा भिकारी सुखी निष्काळजी असतो– याउलट सुखांतही समाधान नसलेला श्रीमंत सारखा पै–पैशासाठी तळमळत असतो–कारण तृष्णा.) मागें दरोडेखोर चाकर दृष्टान्तात सांगितल्याप्रमाणें मनुष्य अकर्तव्य बुद्धीलाभ करून घेईल, तर त्याला (त्याचें) शिवपद भोगावयांस मिळेल. तो नराचा नारायण होईल.

(७८८) बाळभावासाठीं त्यागसंन्यासाचीही अपेक्षा नाहीं

नको सांडूं अन्न नको सेवूं वन। चिंतीं नारायण सर्वभागीं ॥ १ ॥
मातेचिये खांदी बाळ नेणे सीण। भावना त्या भिन्न मुंडे इया ॥ २ ॥

नकों गुंतों भोगीं नकों रातों त्यागीं। लावी सारें अंगीं देवाचिये ।३
तुका म्हणे नकों पुसों वेळोवेळां। नुरला वेगळा–उपदेश ॥ ४ ॥

(७८९) त्याज्य काम्यबुद्धी होय–विषय नव्हे

नव्हे ब्रह्मचर्य बाइलेच्या त्यागें। वैराग्य वाउगें देशत्यागें ॥ १ ॥
कामें वाढे भय वासनेच्या द्वारें। सांडावा तो धीरें आंचवोनि ॥ २ ॥
कांपवूनि हिरी शूरत्वाची मात। केलें वाताहत युक्तबळें ॥ ३ ॥
तुका म्हणे करी जीवेंसी विटाळ। लटिक्याच्या मळस्फितीहातें ॥४

(७९०) त्यागसंन्यासाच्या आग्रहापायीं भक्ति न चुकावी–प्राधान्य भक्तिला आहे.

जातिविजातीची व्हावयासी भेटी। संकल्प तो पोटीं वाहों नये ॥१
होणार तें घडों होणाराच्या गुणें। होय नारायणें निर्मिलें तें ॥ २ ॥
व्याघ्राचिये भुके वधावी ते गाय। यांचिनांव काय पुण्य असे ? ॥३
तुका म्हणे नाहीं विचार परता। खर ज्याची मातापिता खर॥ ४ ॥

टीपः– कांही शब्दांचें संकेतार्थ. व्याघ्र = यत्नवादाचा आग्रह, गाय = सहजस्थिती–जन्मध्येय–भक्ती. यांचिनांव = यामुळें, यापायीं. खर = मूर्ख किंवा चुकलेला साधक. मातापिता = श्रद्धा आणि ध्येय.

(७९१) उपदेश भक्तिकारणापुरता हवा.

( श्रेष्ठ औषधाचें विस्तृत ज्ञान नव्हे; तर कारणापुरते ज्ञान करून तो उपचार करणें: याला प्राधान्य आहे. )

शाहाणियां पुरे एकचि वचन। इशारती खूण तेजियासी ॥ १ ॥
उपदेश असे बहुतकारणीं। घेतला पैं मनीं पाहिजे तो ॥ २ ॥
पाशवेना तरी दुःख घेतें वाव। मग होतो जीव कासावीस ॥ ३ ॥
तुका म्हणे नको राग धरूं झोंडा। नुघडितां पीडा होय डोळे–॥ ४ ॥

(७९२) चित्ताचें व्यसनदमनापेक्षां ते लीन करून भुलविणें बरें.

अभिनवसुख तरि या विचारें। विचारावें बरें संतजनीं ॥ १ ॥
रूपाच्या आठवें दोन्हीही आपण। वियोग तो क्षण होत नाहीं॥ २ ॥

पूजा तरि चित्तें कल्पा तें ब्रह्मांड । आहाच तो खंड–एकदेसी–॥ ३ ॥
तुका म्हणे माझा अनुभव यापरी । डोई पायांवरि ठेवीतसें ॥ ४ ॥

विषयरहस्य:– आपला जीव हा या शरीररूपी बैलगाडीत बसला आहे; त्या गाडीला मन, बुद्धी, चित्त, अहंकार हे चार बैल जोडले आहेत (कठोपनिषद् त्याऐवजी शरीररथाची किंचित् वेगळी कल्पना मांडते– आपणांस येथें रहस्यापुरता–चित्तचतुष्टय विचार पहावयाचा आहे.) पण हे बैल गाडीवानाच्या मनासारखें चालत नाहींत; कांही अवखळ घडोघडी बिथरणारें आहेत आणि त्यामुळें ही गाडी अमरतेच्या शिव–भावाकडें मुळीच जात नाहीं. त्यांतल्या ओढाळ बैलामुळें हळुहळू मरणाच्या कडयाकडेंच ओढली जात आहे. आणि ते तरी सरळपणें आहे कां? नाहीं–बिथरलेल्या बैलामुळें आदळ आपट करीत सुखदु:खाचें हेलकावें खात. हे बैल आवरण्यां करतां गाडीवान सारासार विचाराचें फटकारे मारून पहातो आहे– पण बैल बुजलेले आहेत. ते रट्टेही मानीत नाहींत. गाडीवानालाही खाली उतरून त्यांना शांत करतां येत नाहीं–आतां हे बैल निमूटपणें चालून त्याला कडयाकडें न नेतां वैकुंठाच्या विश्रामधामाकडें कसें नेणार ?

संत मायबाप म्हणतांत = **यासी उपाय तो थोडा । गर्जे विठोचा पवाडा ॥** – नवविधा भक्तिचें आमीष त्या बैलांपुढें कर ! – मग काय होईल ?

चांगल्या हिरव्या चाऱ्याची पेंडी लांबशा काठीच्या टोंकाला लोंबती बांधून; वारंवार बैलाच्या डोळयापुढें धरावी. गवताच्या आशेनें पशू मुकाट झपाटयानें इच्छित दिशेकडें पाऊलें टाकतील–गाडी सहज सरळपणें जाईल.

सारांश=साधकाला स्वत:च्या वेगळेपणाच्या जाणिवेचा त्याग करावयाचा आहे. विश्व हे भोगदायक भव नसून सत्यत्वें भाग्यदायक शिव आहे; या सत्य सिद्धांताचा अनुभव घ्यावयाचा आहे. किंवा मी एक सांसारिक जीव आहे; ही कल्पना मनांतून काढून टाकण्यासाठीं : आपणच स्वत: देव आहोत हा आत्मप्रत्यय आणून द्यावयाचा आहे. यासाठीं त्याला आपल्या मनाची विचार दिशा बदलावयाची आहे; ते स्वार्थतत्परतेतून काढून त्याला परमार्थ परायण करावयाचें आहे–त्याला हरिरंगीं रंगवावयाचें आहे–त्याला सगुण उपासना सहज मुग्ध करणारी; म्हणून सोपी.

(७९२) **देव–भक्त ही अद्वैत अंगें**

नटनाटय तरी केलें याजसाठीं । कवतुकें दृष्टी निववावी ॥ १ ॥
नाहीं तरी काय केलें तेंचि आहे । व्याघ्र आदि गाये लांकडाचें ? ॥२॥
अभेदेंचि असे मांडियेलें खेळा । केल्या दीपकळा–बहु एकीं ॥ ३ ॥
तुका म्हणे रूप नाहीं दर्पणांत । संतोषाची मात दुजियानें ॥ ४ ॥

(७९४) निर्द्वंद्व भक्ताची लक्षणें

उपकारी असे आरोनि उरला। आपुलें तयाला–पर नाहीं ॥ १ ॥
लाभावरी घ्यावें सांपडलें काम। आपुला तो श्रम न विचारी ॥ २ ॥
जीवा ऐसें देखे आणिकां जीवांसी। निखळचि रासी गुणांचीच ॥ ३ ॥
तुका म्हणे देव तयाचा पांगिला। न भंगे संचला धीर सदा ॥ ४ ॥

आरोनि = भक्तिप्रेमाचा अंकुर अंतःकरणांत रुजून–आराईला = देवासाठी उत्सुक झालेला. (ज्ञानेश्वरी पहा). जीवा ऐसे = स्वतःच्या जीवाइतकें प्रिय. निखळ = शुद्ध–ज्यांत खळ म्हणजें च्युति नाहीं असा निर्दोष निश्चळ.

(७९५) भक्ताचा स्वधर्म

निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म। निर्धार हें वर्म चुकों नये ॥ १ ॥
निष्काम निष्चळ विठ्ठलीं विश्वास। पाहों नल्हे वास आणिकांची ॥२
तुका म्हणे ऐसा कोणी उपेक्षिला। नाहीं आयकिला ऐसा कोणीं ॥३

(७९६) भक्ताचें निरहं-कर्म; नाम-प्रेम; संसार अरोचकता मोचक होत

नामाचें चिंतन प्रगट पसारा। असाल तें करा जेथें तेथें ॥ १ ॥
सोडवील माझा स्वामी निश्चयेंसीं। प्रतिज्ञा हे दासीं केली आम्हीं ॥२
गुणदोष नाहीं पाहात कीर्तनीं। प्रेमें चक्रपाणी वश्य होये ॥ ३ ॥
तुका म्हणे कडु वाटतो प्रपंच। रोकडे रोमांच कंठ दाटे ॥ ४ ॥

(७९७) सारांश जाणिवेपेक्षां भाव-भोळीव बरी

कुशळजाणीव वक्ता नव्हे, श्रोता। राहे भाव चित्ता धरूनिया ॥ १ ॥
धन्य तोचि जगीं धन्य तोचि जगीं। ब्रह्म तया अंगीं वसतसे ॥ २ ॥
न धोवो कां तोंड न करों अंघोळी। जपे सदाकाळीं रामनाम ॥ ३ ॥
जपतपध्यान नेणे योगयुक्ती। कृपाळु जो भूतीं दयावंत ॥ ४ ॥
तुका म्हणे होय जाणोनि नेणता। आवडे अनंता जीवाहूनि ॥ ५ ॥

**टीपः**– १ ल्या चरणाचा अर्थ = वक्ता हा खरा चतुर नव्हे. जो श्रोता ते श्रवण करून विश्वास ठेऊन तो बोध आचरतो तो खरा चतुर. कारण दुसऱ्याना उपदेश करण्याच्या भरांत वक्ता त्या बोधाचा भोग स्वतः घेण्याचें विसरूं शकतो—परिणामी बोले तैसा चाले ही प्रक्रिया झाली नाहीं तर व्यर्थ—श्रोता मात्र त्या प्रक्रियचा तात्काळ छंद घेऊन सहज उद्धरून जातो.

निष्कर्ष = वेदांचा अद्वैतवाद हा भक्तिप्रधानच समजावा–तो
(७९८) कोरडा ज्ञानमार्ग गणूं नये.

नाइकावें कानीं तयाचें ते बोल । भक्तीविण फोल ज्ञान सांगे ॥ १ ॥
वाखाणी अद्वैत भक्तिभावेंविण । पावतील सीण श्रोतावक्ता ॥ २ ॥
म्हणउनि ब्रह्म–अहं पाळी पिंडा । नये बोलों भांडा तया–सवें ॥ ३ ॥
वेदबाह्य भांड बोले ते पाखंड । त्याचें काळेतोंड संतांमध्यें ॥ ४ ॥
तुका म्हणे खंडी देवभक्तपण । कनिष्ठ तो जाण श्वपचातें ॥ ५ ॥

(७९९) भक्तिनिंदक अभक्त कटाक्षानें टाळा.

नये पाहों मुख मात्रागमन्याचें । तैसें अभक्ताचें गुरुपुत्रा ॥ १ ॥
म्हणऊनि बरें धरितां एकांत । तेणें नव्हे घात भजनासी ॥ २ ॥
नये होऊं कदा निंदकाची भेटी । जया द्वैत पोटीं चांडाळाच्या ॥ ३ ॥
तुका म्हणे नका बोलों त्यासी गोष्टी । जयाचिये दृष्टी पाप वाढे ॥४

(८००) बहुश्रुततेपायीं भावहीनता धोक्याची

कानीं धरी बोल बहुतांचीं मतें । चाट त्यापरतें कोणी नाहीं ॥ १ ॥
पावेल गौरव बोढाळाचे परी । दंड पाठीवरी यमदूतीं ॥ २ ॥
शब्दज्ञानी एक आपुलाल्या मतीं । वेदांत सांगती भिन्नभावें ॥ ३ ॥
तुका म्हणे एक भाव न धरिती । पडिलीसें माती त्यांचें तोंडीं ॥ ४ ॥

(८०१) या बोधाची अद्वितियता

नव्हे खळवाद मती अपुरता । सत्याचा हा संतउपदेश ॥ १ ॥
साक्षित्वेंसीं मना आणावीं उत्तरें । परिपाकीं खरेंखोटें कळे ॥ २ ॥
नव्हे एकदेशी शब्द हा उखता । ब्रह्मांडापुरता घेई त्यासी ॥ ३ ॥
तुका विनवणी करी जाणतियां । बहुमतें वांयां श्रमों नये ॥ ४ ॥

**टीप:**– या अभंग गुच्छाकडे पहातां; तो एक स्वयंपूर्ण तत्वज्ञान ग्रथित करून सांगावा या विशेष भावनेने श्री बोलले आहेत असें दिसतें; आणि याच विचारानें दुसऱ्या अभंगांत **ब्रह्मज्ञानाचे कोठार । तें हें निश्चय उत्तर ॥** असा श्री त्याचा निर्वाळा देतांत असें दिसते. अशी बोधामृतलहरी; आपण संकलित तत्वज्ञानाचा स्वयंपूर्ण ग्रंथ या वैशिष्ठ्यामुळें "श्रीतुकाराम गीता" नामें प्रमाण मानली तर निश्चितच कल्याणप्रद आणि औचित्यपूर्ण होईल.

### प्रकरण २७ वे

# हरिसंवाद गुच्छ-१

(८०२)

काय ऐसा सांगा । धर्म मज पांडुरंगा ? ॥ १ ॥
तुझें पायीं पावें ऐसा । जेणें उगवें हा फांसा ॥ २ ॥
करीं कृपादान । तैसें बोलवीं वचन ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा । माझें हृदय वसवा ॥ ४ ॥

(८०३)

भला म्हणे जन । परि नाहीं समाधान ॥ १ ॥
माझें तळमळी चित्त । दिसे अंतरलें हित ॥ २ ॥
कृपेचा आधार । नाहीं दंभ जाला फार ॥ ३ ॥
तुका म्हणे कृपे । अंतराय कोण्या पापें ? ॥ ४ ॥

(८०४)

शिकविले बोल । बोलें तैसी नाहीं ओल ॥ १ ॥
आतां संदेहचि नाहीं । वांयां गेलों यासी कांहीं ॥ २ ॥
एकांताचा वास । नाहीं संकल्पाचा नास ॥ ३ ॥
बुद्धि नाहीं स्थिर । तुका म्हणे शब्दा धीर ॥ ४ ॥

(८०५)

उचिताचा दाता । कृपावंता तूं अनंता ॥ १ ॥
कां रे न घालिसी धांव । तुझें उच्चारितां नांव ? ॥ २ ॥
काय बळयुक्ति । नाहीं तुझें अंगीं शक्ति ? ॥ ३ ॥
तूं तों विश्वंभर । वोस माझें कां अंतर ? ॥ ४ ॥
तुका म्हणे धणी । सपुरता कां ये उणी ? ॥ ५ ॥

(८०६)

वाहावतों पुरीं । आतां उचित तें करीं ॥ १ ॥
माझी शक्ति नारायणा । कींव भाकावी करुणा ॥ २ ॥

आम्हां ओढी काळ। तुझें क्षीण झालें बळ ॥ ३ ॥
तुका म्हणे गोडी । जीवा मातेचिया ओढी ॥ ४ ॥

(८०७)

आतां घेईं माझें । भार सकळही ओझें ॥ १ ॥
काय करिसी कैवाड ? । आलों पोटासी दगड ॥ २ ॥
तूंचि डोळेवाती । होईं दीपक सांगातीं ॥ ३ ॥
तुका म्हणे कांईं । विचारा या चाड नाहीं ? ॥ ४ ॥

(८०८)

असोत हें बोल । तूंचि अवघें भांडवल ॥ १ ॥
माझा मायबाप देवा । सोयरा सज्जन केशवा ॥ २ ॥
गाळियेले भेद । सारियेले वादावाद ॥ ३ ॥
तुका म्हणे मधीं । आतां न घडे उपाधि ॥ ४ ॥

(८०९)

कीर्तनकल्लोळ । आतां करीन सर्वकाळ ॥ १ ॥
आतां ये वो माझें आई। देईं भातुकें विठाई ॥ २ ॥
उपायासी नाम । दिलें वाचेबुडीं प्रेम ॥ ३ ॥
बीज आणि फळ । तुका म्हणे हेंचि मूळ ॥ ४ ॥

(८१०)

धनासींच धन । करी आपण जतन ॥ १ ॥
तुज आळवितां गोडी। पांडुरंगा खरी जोडी ॥ २ ॥
जेंविल्याचें खरें। करी उमटे ढेंकरें ॥ ३ ॥
तुका म्हणे धाये। तेथें कोठें उरे हाये ? ॥ ४ ॥

(८११)

आळवीन स्वरें। कैशा मधुरउत्तरें ? ॥ १ ॥
यें वो यें वो पांडुरंगे। प्रेमपान्हा मज दें गे ॥ २ ॥

पसरूनि चोंची । वेंची वचनें करुणेची ॥ ३ ॥
तुका म्हणे आळीं । व्हावें लडिवाळें बळी ॥ ४ ॥

(८१२)

येऊनि संसारीं । मी तों एक जाणें हरी ॥ १ ॥
नेणें आन कांहीं धंदा । नित्य ध्यातसें गोविंदा ॥ २ ॥
कामलोभस्वार्थ । अवघा माझा पंढरिनाथ ॥ ३ ॥
तुका म्हणे एक । धणी विठ्ठलसेवक ॥ ४ ॥

(८१३)

धेनू वनांतरीं । चित्त बाळकापें घरीं ॥ १ ॥
तैसें करीं वो माझें आई । चित्ता ठाव राखें पायीं ॥ २ ॥
काढितां तळमळी । जिवनाबाहेर मासोळी ॥ ३ ॥
तुका म्हणे कुडी । नसों प्राणाची आवडी ॥ ४ ॥

(८१४)

कंटाळलां तरी । आम्हां न सोडणें हरी ॥ १ ॥
जावें कवणिया ठाया । सांगा विनवितों पायां ? ॥ २ ॥
केली जीवें सांटी । आतां सुखें लागों पाठीं ॥ ३ ॥
तुका म्हणे ठाव । हाचि न सोडणें भाव ॥ ४ ॥

(८१५)

जाणसी उचित । पांडुरंगा धर्मनीत ॥ १ ॥
तरि बोलावें म्यां कांई । सरे ऐसें तुझे पायीं ? ॥ २ ॥
पालटती क्षणें । संचितादिक्रियमाणें ॥ ३ ॥
तुका म्हणे सत्ता । होसी सकळ करिता ॥ ४ ॥

(८१६)

आतां पुढें मना । चाली जाली नारायणा ॥ १ ॥
येथें राहिलें राहिलें । कैसें गुंतोनि उगलें ॥ २ ॥

भोवतें भोंवुनि। आलियांची जाली धणी ॥ ३ ॥
तुका म्हणे रंगें। रंगलें तें पांडुरंगे ॥४॥

(८१७)
पतितपावना। दिनानाथा नारायणा ॥ १ ॥
तुझें रूप माझें मनीं। राहो नाम जपों वाणी ॥ २ ॥
ब्रह्मांडनायका। भक्तजनांच्या पाळका ॥ ३ ॥
जीवींचिया जीवा। तुका म्हणे देवदेवा ॥ ४ ॥

(८१८)
अनुभवा आलें। माझें चित्तींचें क्षरलें ॥ १ ॥
असे जवळी अंतरे। फिरे आवडीच्या फेरें ॥ २ ॥
स्वादिलेंचि वाटे। खावें; भेटलेंचि भेटे ॥ ३ ॥
तुका म्हणे उभें। आम्ही राखियेलें लोभें ॥ ४ ॥

(८१९)
कुर्वंडी करीन काया। वरुनिपाया गोजिऱ्या ॥ १ ॥
बैसलें तें रूप डोळां। मना चाळा लावुनी॥ २ ॥
परतें न सरवे दुरि। आवडी पुरी बैसली॥ ३ ॥
तुका म्हणे विसांवलों। येथें धालों धणीवरि ॥ ४ ॥

(८२०)
काय करूं या दैवतें। एकात्रिणें पंढरिनाथें ॥ १ ॥
सरिता मीनली सागरी। आन नांवा कैंची उरी? ॥ २ ॥
भिन्न दीपींचा प्रकाश। सूर्य उगवतां नाश ॥ ३ ॥
तुका पेणें नेणें दुजें। एकाविणें पंढरिराजें ॥ ४ ॥

(८२१)
मुंगिया–मुंगळें। तुझें नटनाटयचाळे ॥ १ ॥
काय नव्हेसी तूं एक?। देखूं कासया पृथक? ॥ २ ॥

जाहाली मर्यादा । कोणां त्रासावें गोविंदा ? ॥ ३ ॥
तुका म्हणे साचा । कोठें जासी हृदयींचा ? ॥ ४ ॥
(८२२)
भेद तुटलेवरी । आम्ही तुमचीच हो हरी ॥ १ ॥
आतां पाळावें कृपाळें । आम्हां लडिवाळांचें लळे ॥ २ ॥
आणिकांची देवा । नाहीं जाणतचि सेवा ॥ ३ ॥
तुका म्हणे हेवा । माझा होतु पायीं देवा ॥ ४ ॥
(८२३)
राहो येंत्रिठायीं । माझा भाव तुझें पायीं ॥ १ ॥
नित्य नामाचें चिंतन । कोठें जाऊं नेदी मन ॥ २ ॥
देईन ये रसीं । आतां बुडी सर्वविशीं ॥ ३ ॥
तुका म्हणे देवा । सांटी करोनियां जीवा ॥ ४ ॥
(८२४)
तुझा शरणागत । जन्मोजन्मींचा अंकित ॥ १ ॥
आनु नेणें कांहीं हेवा । तुजवांचुनि केशवा ॥ २ ॥
करावें कारण । तुझें नामसंकिर्तन ॥ ३ ॥
नामाच्या भूषणें । तुम्हां लेणी तुका म्हणे ॥ ४ ॥
(८२५)
आपण तो असा । समर्थ जी हृषीकेशा ॥ १ ॥
करा करा बुझावणी । काय विलंब वचनीं ? ॥ २ ॥
"हें घे !" ऐसें म्हणा । "उठी वरूनि चरणा !" ॥ ३ ॥
घेऊंनियां सुखें । नाचे तुका–कवतुकें ॥ ४ ॥
(८२६)
द्याल ऐसें दिसें । तुम्ही साचपणें इच्छे ॥ १ ॥
तरी न भंगे निर्धार । केले लोचन सादर ॥ २ ॥
श्रीमुखाची वास । पाहे पुरला नवस ॥ ३ ॥
तुका म्हणे कळे । काय लाभ ? कोण बळें ? ॥ ४ ॥

(८२७)

आमुची विश्रांति । तुझें चरण श्रीपती ।। १ ।।
पुढतोपुढती ते नमेन । घालोनियां लोटांगण ।। २ ।।
हेंचि एक जाणें । कायावाचा आणि मनें ।। ३ ।।
वंद्य जनलोकां । तळिल पायरी जें तुका ।। ४ ।।

(८२८)

करी गा वर्षाव । तृषाक्रान्त जाला जीव ।। १ ।।
पाहे आकाशाची वास । जाणता तूं जगदीश ।। २ ।।
संयोगें विस्तार । वाढी लागे तो अंकुर ।। ३ ।।
तुका म्हणे फळें । चरणांबुजें ती सकळें ।। ४ ।।

(८२९)

प्रेमामृतधार । वाहो देवा हे समोर ।। १ ।।
ऊर्ध्ववहनी हरिकथा । शिरोमणी सर्वतीर्थां ।। २ ।।
जीवाचें जीवन । जाळी दोष संकीर्तन ।। ३ ।।
तुका म्हणे हरि । इच्छा; स्तुती वानूं थोरी ।। ४ ।।

(८३०)

आतां माझ्या मना । घडो इच्छा–उपासना ।। १ ।।
ऐसें करीं पांडुरंगा । प्रेम ओसंडेसें अंगा ।। २ ।।
सर्वकाळ नये । वाचे वीट आड भये ।। ३ ।।
वैष्णवांसंगती । तुका भोजनपंगती ।। ४ ।।

(८३१)

उमटतु वाणी– । वाटे नामाचिया ध्वनी ।। १ ।।
बरवें सेवनप्रकार । घ्यावेंद्यावें या उत्तर ।। २ ।।
सरळ ही मृद । कथा वहवावी ऊर्ध्व ।। ३ ।।
गात जाये तुका । हाचि उपदेश एका ।। ४ ।।

(८३२)

उदार कृपाळु पतितपावना । ब्रीदें नारायणा साच तुझी ।। १ ।।
वर्णिलासि जैसा जाणतानेणता । तैसा तूं अनंता साच होसी ।। २ ।।
दैत्याघरीं काळ भक्ता शाममूर्ती । चतुर्भूज हातीं शंखचक्र ।। ३ ।।
काम इच्छा तया तैसी हो सिराणी । यशोदेचें स्तनीं पान करसी ।।४
होऊनी सकळ कांहींच न होसी । तुका म्हणे यासी वेद ग्वाही ।।५

(८३३)

उदार कृपाळ पतितपावना । ब्रीदें नारायणा जाती वांयां ।। १ ।।
वर्णिलासि श्रुति नेणे तुझा पार । राहे मौनाकार नेति ऐसें ।। २ ।।
तेथें माझा धांवा पावे कोणीकडे । अदृष्ट हें पुढें वोडवलें ।। ३ ।।
कोण ऐसा भक्त लाधला भाग्यासी । आठवण ऐसी द्यावी तुज ? ।।४
तुका म्हणे नको पाहों माझा अंत । जाणोनि हे मात उडी घालीं ।।५

## प्रकरण २८ वे

# शिव महिमा

(८३४)

सुंदर तें रूप पाहीन मी डोळां । भस्म ज्याश्वनिळा शोभताहे ।। १ ।।
गळां बिल्वहार कांसे व्याघ्रांबर । आवडे निरंतर तेंचि रूप ।। २ ।।
नागांची कुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं स्फटिकमणी विराजीत ।।३
माथां जटाभार मध्यें गंगा वाहे । वामांकीं ते पाहे गिरिजादेवी ।।४
संगें भूतमेळा गणपरिवार । नामाचा गजर करिताती ।। ५ ।।
ब्रह्माविष्णु ज्यांचें करितील ध्यान । करिती गायन नारदादी ।।६
तुका म्हणे मज आवडे ते ध्यान । तेणें माझा प्राण निवविला ।।७

(८३५)

शंभू कैलासीचा राजा । तया दंडवत माझा ।। १ ।।
गिरिजा शोभे मांडीवरी । गंगा वागवितो शिरीं ।। २ ।।

अंगीं भस्माची भूषणें । गळां रुद्राक्षाचें लेणें ॥ ३ ॥
व्याघ्रकंठाग्रीं बैसला । तुका म्हणे वंदु त्याला ॥ ४ ॥
(८३६)
तुम्ही विश्वनाथ । दीन रंक मी अनाथ ॥ १ ॥
कृपा कराल ते थोडी । पायां पडिलों बराडी ॥ २ ॥
अल्प मी संतोषी । नाहीं उणें तुम्हापासीं ॥ ३ ॥
तुका म्हणे हेवा । प्रेमभातुकें पाठवा ॥ ४ ॥
(८३७)
विश्वपति विश्वा उद्धार जगाचा । पती पार्वतीचा महादेवो ॥ १ ॥
काषाय ते वस्त्र करीं कमंडल । उत्तम कपाल मिरविसी ॥ २ ॥
भोळ्या महादेवा मंगलकारका । कैलासनायका तुका म्हणे ॥ ३ ॥
(८३८)
शीव शीव शीव शीव । चतुर्वार घेतां नांव ॥ १ ॥
तया चार मुक्ति भुक्ति । फळ पावती विरक्ति ॥ २ ॥
माझा शीव दयावंत । तारियेले असंख्यात ॥ ३ ॥
तुका म्हणे पांडुरंग । शीवविष्णु एक अग ॥ ४ ॥
(८३९)
हरिहरां भेद । नाहीं; करूं नये वाद ॥ १ ॥
एक एकाचें हृदयीं । जोडी सारिखीच ठायीं ॥ २ ॥
भेदकांसी नाड । एक वेलांटीच आड ॥ ३ ॥
सव्य वाम भाग । तुका म्हणे एक अंग ॥ ४ ॥
(८४०)
जास्वंदीचें पुष्प पडिलें अंगणी । घारीनें नयनीं लक्षियेलें ॥ १ ॥
मांस मनोनियां झडप मारिली । घेऊनियां गेली आकाशासी ॥ २ ॥
मांस नोहे पुष्प टाकुनियां दिलें । येऊनी पडिलें शिवाशिरीं ॥ ३ ॥
तेणें सदाशिव संतोषला मनीं । वाहोनि विमानीं घार नेली ॥ ४ ॥
तुका म्हणे चित्तीं याचा भाव धरा । चुकती येरझारा चौऱ्यांशीच्या ॥५

## प्रकरण २९ वे

# रामचरित्र

(८४१)

सुंदर ते ध्यान शोभे सिंहासनीं । वामांगीं नंदिनी जनकाची ।। १ ।।
दक्षिणेसी उभा बंधु तो लक्ष्मण । भरत शत्रुघ्न पार्श्व दोघें ।। २ ।।
सन्मुख तो उभा मारुती बलभीम । मुखें रामनाम नित्य जपे ।। ३ ।।
तुका म्हणे मज श्रीरामाचें ध्यान । करीन कीर्तन विठोबाचें ।। ४ ।।

(८४२)

कमललोचना कमलारमणा । कल्पषभंजना कर्मरूपा ।। १ ।।
कल्याणकारका जीवनतारका । कृतांतमारका कल्पवृक्षा ।। २ ।।
करुणासागरा कौसल्याकुमरा । कर्पूर–सा–गोरा प्राणप्रिया ।। ३ ।।
तुका म्हणे रामा तुजला उपमा । द्यावयासी सीमा वेदां जाली ।। ४ ।।

(८४३)

दयावंत माझा रुक्मिणीरमण । विरोधी रावण उद्धरिला ।। १ ।।
जेणें जेणें केलें अपराध फार । तया रघुवीर मुक्तिदाता ।। २ ।।
विषमता नाहीं दयेचा सागर । ब्रह्मादिकां पार न कळेचि ।। ३ ।।
तोचि महाराज चंद्रभागेतीरीं । उभा विटेवरी विठ्ठल हा ।। ४ ।।
अनंत जन्मींचें सुकृत असेल । तो पाहे विठ्ठल तुका म्हणे ।। ५ ।।

(८४४)

रामा अयोध्येच्या राया । दिनानाथा रे सखया ।। १ ।।
पाप ताप विघ्न हरी । छाया पितांबर करीं ।। २ ।।
भिल्लटीचिया उच्छिष्टा । स्वीकारिसी रे तूं भ्रष्टा ।। ३ ।।
मी तों सलगीचें मूल । तुका म्हणे तूं सखोल ।। ४ ।।

(८४५)

अयोध्येचा राम राजा । तोचि बाप होय माझा ।। १ ।।
ज्याच्या अर्धांगीं शोभली । होय माझी ती माऊली ।। २ ।।

भागीं–दक्षिण ज्या उभा । तो चुलता दिव्यशोभा ॥ ३ ॥
ज्याचा सोन्याचा कांसोटा । तोचि बंधु माझा मोठा ॥ ४ ॥
ऐशा घरांत जन्मलों । तुका म्हणे सुखी झालों ॥ ५ ॥

(८४६)

सीतावल्लभाच्या गुणा । कोण करील गणना ? ॥ १ ॥
शिववरद रावण । ज्याचें ऐश्वर्य संपूर्ण ॥ २ ॥
रावणासी निवटुनि । सीता आणिली सोडुनि ॥ ३ ॥
बिभीषण लंकापती । केला बंधुसम प्रीति ॥ ४ ॥
तुका म्हणे दयावंत । राम दशरथसुत ॥ ५ ॥

(८४७)

रामरूप केली । रामें कौसल्या माउली ॥ राम राहिला मानसीं । ध्यानीं चिंतनीं जयासीं ॥ १ ॥ राम होय त्यासी । संदेह नाहीं भरवसा ॥ २ ॥ अयोध्येचे लोक । राम जाले सकळिक ॥ ३ ॥ स्मरतां जानकी । रामरूप जाली एकी ॥ ४ ॥ रावणेसी लंका । राम जाली स्वयें देखा ॥ ५ ॥

(८४८)

ध्यान जटायु सरिसें । व्याघ्र रिसें मर्कटें ॥ १ ॥
राम चिंतनें सरती । पक्षी संपाती तारिला ॥ २ ॥
वृक्षवल्लीतृणपाषाण । हा चरणमहिमा ॥ ३ ॥
नाम महिमा विशेष । तुकाईस दर्शन ॥ ४ ॥
तुका म्हणे जातां मार्गी । भवरोगी तारीले ॥ ५ ॥

(८४९)

नामें तारिलें वानर । शिळा सागर बांधोनी ॥ १ ॥
रामचरणींचा रज । गौतमभाज उद्धरी ॥ २ ॥
शबरीची वनपूजा । रामराजा तोषला ॥ ३ ॥

खाय भिल्लीणीचीं बोरें। प्रीतिकरें उच्छिष्ट ॥ ४ ॥
तुका म्हणे मृगापाठीं। कबंध दृष्टी उद्धरी ॥ ५ ॥

(८५०)
यातिगुणरूपें काय ती वानरें ?। तयांच्या विचारें वर्ते राम ॥ १ ॥
ब्रह्महत्यारासी पातकी अनेक। तो वंद्य वाल्मिक तिहीं लोकीं ॥ २ ॥
तुका म्हणे नव्हे चोरीचा व्यापार। म्हणा रघुवीर वेळोवेळां ॥ ३ ॥

(८५१)
रामा वनवास ?। जया वश सर्व देश ॥ १ ॥
केलें नामाचें जतन। समर्थ तो नव्हे भिन्न* ॥ २ ॥
वनांतरीं रडे। ऐसे पुराणीं पवाडे ॥ ३ ॥
तुका ऋषिनेम। ऐसा कळोनियां श्रम ॥ ४ ॥

टीप:- *भिन्न = वचनच्युत

(८५२)
नामें तारी ऐसे-जड। उदकावरी जो दगड ॥ १ ॥
तो हा न करीं तें कांई ?। कां रे लीन नव्हां पायीं ॥ २ ॥
शिळा मनुष्यत्वा आली। ज्याचें चरणाचें चाली ॥ ३ ॥
वानरांचे हातीं लंका। घेवविली म्हणे तुका ॥ ४ ॥

(८५३)
राम चालले लंकेसी। अहो सीता आणायासी ॥ १ ॥
पुढें समुद्र देखिला। नळराजा बोलविला ॥ २ ॥
सेतु शिळांचा बांधुनि। पैल गेले उतरूनीं ॥ ३ ॥
अहो तुका म्हणे नळ। भक्त आहे हो प्रेमळ ॥ ४ ॥

(८५४)
स्वप्न सांगे मंदोदरी। लंका वेढिली वानरीं ॥ १ ॥
दूत पातलें रामाचें। थोर बळ हनुमंताचें ॥ २ ॥
कोणी दुर्गासी वेढिती। घेवों म्हणुनि बोलती ॥ ३ ॥
तुका म्हणे स्वामी माझा। सवें अयोध्येचा राजा ॥ ४ ॥

(८५५)

मंदोदरी विनविते । ऐका स्वामी लंकापते ॥ १ ॥
सोडा रामाची सुंदरी । जंव राम आहे दुरी ॥ २ ॥
बिभीषण शरण गेला । मृत्युपासोनि मुकला ॥ ३ ॥
स्वामी ! बंधु जाला शहाणा । देखोनि या दुष्ट चिन्हा ॥ ४ ॥
तुका म्हणे शरण जावें । हित आपुलें साधावें ॥ ५ ॥

(८५६)

पती बोले मंदोदरिसी । ऐक मूर्खे गे परियेसी ॥ १ ॥
बंधु म्हणसी शहाणा । पैं तो महामूर्ख जाणा ॥ २ ॥
होय जरी लंकापती । नाश पावेल कल्पान्ती ॥ ३ ॥
ज्यासी ख्याती साधुयोगी । तो हा येतो भेटीलागीं ॥ ४ ॥
त्याचें हातोनि निभणें । नव्हे चिरंजीव होणें ॥ ५ ॥
तेथ विन्मुख होवोनि । जळो जिणें थोर हानी ॥ ६ ॥
तुका म्हणे खरा भाव । त्यासी भेटी देतो देव ॥ ७ ॥

(८५७)

राम गेलें लंकेवरी । संगें वानरांची स्वारी ॥ १ ॥
नळ नीळ जांबुवंत । मारुती अंजनीचा सुत ॥ २ ॥
प्रथम धाडिला अंगद । केला रावणासीं बोध ॥ ३ ॥
रावण तो गर्वे गेला । तुका म्हणे भस्म झाला ॥ ४ ॥

(८५८)

पैल आला राम रावणासी सांगती । काय निदसुरा निजलासी भूपति? ॥ १ ॥ अवघे लंकेमाजी जालें रामाचें दूत । व्यापिलें सर्वत्र बाह्यभीतरी आंत ॥ २ ॥ अवघे अंगलग तुझे वधिलें वीर । होई शरणागत किंवा युद्धा सादर ॥ ३ ॥ तुका म्हणे एक्याभावें रामेसी भेटी । करुनि घेई आतां भवबंधेसी तुटी ॥ ४ ॥

(८५९)

समरंगणासी आला । रामें रावण देखिला ॥ १ ॥
कैसें भिडतील दोन्ही । नाम स्मरूनियां रणीं ॥ २ ॥
प्रेमसुखाचें संधान । बाणें निवारिती बाण ॥ ३ ॥
तुका–स्वामी रघुनाथ । वर्म जाणोनि ही मात ॥ ४ ॥

(८६०)

केला रावणाचा वध । अवघा तोडिला संबंध ॥ १ ॥
लंकराज्यीं बिभीषणा । केली चिरकाल स्थापना ॥ २ ॥
केली औदार्याची सीमा । काय वर्णूं रघुरामा ? ॥ ३ ॥
तुका म्हणे माझा दाता । रामें सोडविली सीता ॥ ४ ॥

(८६१)

आले अयोध्येसी आनंदें रघुनाथ । जाला जयजयकार आलिंगिला भरत ॥ १ ॥ आनंदले लोक नरनारी परिवार । शंख भेरीतुरें वाद्यांचें गजर ॥ २ ॥ करिती अक्षवाणे ओंवाळिती रघुवीरा । जानकीसहित लक्ष्मण दुसरा ॥ ३ ॥ जालें रामराज्य आनंदली सकळ । तुका म्हणे गाई वत्से नरनारी बाळ ॥ ४ ॥

(८६२)

जालें रामराज्य काय उणें आम्हांसी? । धरणी घरी पीक गाई वोळल्या म्हैसी ॥ १ ॥ राम वेळोवेळां आम्ही गाऊं ओंवियें । दळितां कांडितां जेवितां गे बाइये ॥ २ ॥ स्वप्नीं ही ते दुःख कोणी न देखे डोळां । नामाच्या गजरें भय सुटलें काळा ॥ ३ ॥ तुका म्हणे रामें सुख दिधलें आपुलें । तयां गर्भवासां येणें जाणें खुंटलें ॥ ४ ॥

प्रकरण ३० वे

# रामनाम महिमा

(८६३)
राम औदार्याची रासी । नाम तारक सर्वांसी ॥ १ ॥
म्हणोनियां रामनाम । दृढ धरावें निष्काम ॥ २ ॥
राम कृपेचा सागर । रजें तारी तो वानर ॥ ३ ॥
तुका म्हणे धरिलिया । राम पाववील ठाया ॥ ४ ॥

(८६४)
कांहो रामासी भजाना । भवसिंधु उतराना ? ॥ १ ॥
नामें तारिलें पाषाणा । तो कां तुम्हासी तारिना ? ॥ २ ।
नळ नीळ जांबुवंत । प्रिय भक्त हनुमंत ॥ ३ ॥
अवघें जन नगरवासी । रामें नेलें वैकुंठासी ॥ ४ ॥
तुका म्हणे रामराणा । तारूं वैकुंठीचा जाणा ॥ ५ ॥

(८६५)
काय देतील देणार ? । एक ध्यावा रघुवीर ॥ १ ॥
आज दिलें उद्यां नाहीं । ऐशापाशीं मागों कांई ? ॥ २ ॥
ऐसें मागों रघुवीरें । देतां कल्पन्ती न सरे ॥ ३ ॥
तुका म्हणे बा अनंता । व्हावी तुजवरी सत्ता ॥ ४ ॥

(८६६)
सुख अत्यंत वाटतें । माझा राम मजसांगातें ॥ १ ॥
सर्वांठायीं राम भरला । पाहतां मनोरथ पुरला ॥ २ ॥
तुका म्हणे जिकडे तिकडे । राम चाले मागें पुढें ॥ ३ ॥

(८६७)
राम जीवाचें जीवन । राम दासाचें चिंतन ॥ १॥
भक्तिभावाचा अंकित । पूर्णपणें रघुनाथ ॥ २ ॥

राम दीनाचा दयाळ । राम पतीता कृपाळ ॥ ३ ॥
तुका म्हणे माझा स्वामी । वसे आवडीनें नामीं ॥ ४ ॥

(८६८)

रामचंद्र आराधन । ज्याचें वंशीं तोचि धन्य ॥ १ ॥
रामचंद्र जया मुखीं । तोचि होय सर्वसुखी ॥ २ ॥
रामचंद्र जनीं वनीं । पाहे तोचि महामुनीं ॥ ३ ॥
रामचंद्रीं नाहीं मन । तुका म्हणे तो पाषाण ॥ ४ ॥

(८६९)

रामचंद्रा दयाळुवा । रावणारी सीताधवा ॥ १ ॥
रामचंद्र भक्तसखा । अनाथांचा पाठीराखा ॥ २ ॥
रामचंद्र पांडुरंग । आदिअनादि श्रीरंग ॥ ३ ॥
रामचंद्र जीवप्राण । भक्ता प्रेमळांचा जाण ॥ ४ ॥
रामचंद्र आदिअंतीं । तुका म्हणे सर्वभूतीं ॥ ५ ॥

(८७०)

राम म्हणे ग्रासोग्रासीं । जेविला तो उपवासी ॥ १ ॥
धन्य धन्य तें शरीर । तीर्थव्रतांचें माहेर ॥ २ ॥
राम मुखीं वाटचाली । यज्ञ पाउलापाउलीं ॥ ३ ॥
राम म्हणे करितां धंदा । ध्यानसमाधि त्या सदा ॥ ४ ॥
राम म्हणे भोगीत्यागीं । कर्म न लिपे त्याअंगीं ॥ ५ ॥
ऐसा राम जपे नित्य । तुका म्हणे तोचि मुक्त ॥ ६ ॥

(८७१)

जैसा राम दयावंत । ऐसा नाहीं त्रैलोक्यांत ॥ १ ॥
अपराध कागऋषी । तेणें छळिलें सीतेसी ? ॥ २ ॥
दर्भ हिरवा लागे पाठीं । जाला काग तो हिंपुटी ॥ ३ ॥
आला हरिसी शरण । रामें दिलें वरदान ॥ ४ ॥
तुका म्हणे माझा राम । हरी पतिताचें श्रम ॥ ५ ॥

(८७२)

श्रमहारक श्रीराम । भक्तकामकल्पद्रुम ।। १ ।।
ज्याचें नामें श्रीवाल्मिकी । वंद्य जाला तिहीं लोकीं ।। २ ।।
पूर्ण महिमा नामाचा । अंत न पुरे वेदाचा ।। ३ ।।
तुका म्हणे नाम थोर । वेदशास्त्रांचें जिव्हार ।। ४ ।।

(८७३)

रामनाम ती अक्षरें । कंठीं धरिली शंकरें ।। १ ।।
कैसी तारिती–ही लोकां ? । विष शांत केलें देखा ।। २ ।।
राममंत्रें ती भवानी । चुका पडे गर्भयोनी ।। ३ ।।
जुनाट ते नित्यनवें । तुका धरी जीवेंभावें ।। ४ ।।

(८७४)

रामनामाचें पवाडे । अखंडित–वाचा पढे ।। १ ।।
धन्य तो एक संसारीं । रामनाम जो उच्चारी ।। २ ।।
रामनाम गर्जे वाचा । काळ आज्ञाधारक त्याचा ।। ३ ।।
तुका म्हणे रामनामीं । कृतकृत्य जालों आम्हीं ।। ४ ।।

(८७५)

रामराम बोला वाचे । भय नाहीं त्या यमाचें ।। १ ।।
रामराम घ्या श्रवणीं । पापा होतसे पळणी ।। २ ।।
रामराम ध्यानीं मनीं । होती जिवाची पारणीं ।। ३ ।।
तुका म्हणे रामनाम । त्रैलोक्यांत हें विश्राम ।। ४ ।।

(८७६)

श्रीराम म्हणतां रामचि होईजे । पदवी घेईजे बैसोनियां ।। १ ।।
अखंडित सुख वचनीं या आहे । विश्वासेंसी पाहें अनुभव ।। २ ।।
बहुडली वाचा रामरसाचवी । रुचती त्या केवीं आनरस ? ।। ३ ।।
तुका म्हणे चांगे चाखोनि हें सांगे । अनुभव अंगें घेऊनियां ।। ४ ।।

(८७७)
रामनामीं तरे जाणता–नेणता । हो कां यातिभलता कुळहीन ।। १ ।।
राम म्हणतां कांहीं नलगे सायास । केलें महादोष जळतील ।। २ ।।
राम म्हणे तया जवळी नये भूत । कैंचे यमदूत रामनामीं ? ।। ३ ।।
राम म्हणता तरे भवसिंधुपार । चुके येरझार रामनामें ।। ४ ।।
तुका म्हणे नाम सुखाचें निधान । सेवा सुधापान एक्याभावें ।। ५ ।।

(८७८)
अहिल्या जेणें तारिली रामें । गणिका नेली वैकुंठा नामें ।। १ ।।
रामहरे रघुराजहरे । रामहरे महाराजहरे ।। २ ।।
कंठीं शीतळ तो शूळपाणी । अविनाश ते जाली भवानी ।। ३ ।।
तारकमंत्र श्रवणकाशी । नाम जपतां वाल्मिक ऋषी ।। ४ ।।
बीजमंत्रा या जपुनि नळा । सिंधु तरती प्रतापें शिळा ।। ५ ।।
जप जीवन मुनी सज्जना । तुकयास्वामी रघुनंदना ।। ६ ।।
(वृत्त ५।५ गोविंदु घ्या गे, गोपाळू घ्या गे । तंव तंव हांसती, मथुरेच्या गे ।। )

(८७९)
मी तों अल्पमति हीन । काय वर्णूं तुझें गुण ? ।। तारिलें पाषाण । महिमान नामाचें ।। १ ।। नाम चांगलें चांगलें । माझे कंठीं राहो भलें ।। कपि उद्धरिलें । मुक्त केलें राक्षसां ।। २ ।। द्रोणागिरी कपिहातीं । आणविला सीतापती ।। थोर केली ख्याती । भरतभेटी समयीं ।। ३ ।। शिळा मनुष्यत्वा आली । थोर किर्ती वाखाणिली ।। लंका दहन केली । हनुमंतें काशानें ? ।। ४ ।। राम जानकीजीवन । योगियांचें निजध्यान ।। राजीवलोचन । तुका चरण वंदितो ।। ५ ।।

(८८०)
साही शास्त्रां अतिदुरी । परमात्मा जो श्रीहरी ।। दशरथाचें घरीं । क्रीडा करी श्रीराम ।। १ ।। शिवाचें जो निजध्येय ।

वाल्मीकाचें निजगुह्य ॥ भिल्लटीची खाय । उष्टी फळें राम तो ॥ २ ॥ योगियांचें ध्यानीं मनीं । नातुडेचि जो चिंतनीं ॥ वानरांचे कानीं । गुजगोष्टी सांगे तो ॥ ३ ॥ शिळा चरणें उद्धरी । नामें गणिकेसी तारी ॥ कोळियाचें घरीं । पाहुणा तो श्रीराम ॥ ४ ॥ क्षण एक सुरवरा । नातुडे जो नमस्कारा ॥ रिसा या वानरा । क्षेम दे तो श्रीराम ॥ ५ ॥ राम सांवळा सगुण । राम योगियांचें ध्यान ॥ राजीवलोचन । तुका चरण वंदितो ॥ ६ ॥

(८८१)

आत्माराम सुखधाम । माझें जिवींचा विश्राम ॥ १ ॥
आत्माराम पूर्ण चंद्र । अयोध्येचा जो नरेंद्र ॥ २ ॥
आत्माराम ज्ञानघन । त्रैलोक्याचा निजप्राण ॥ ३ ॥
आत्माराम पांडुरंग । आदि–अनादि श्रीरंग ॥ ४ ॥
तुका म्हणे आत्मारामीं । माझी वृत्ती जडो नामीं ॥ ५ ॥

(८८२)

नामें तारिले पाषाण । पाड इतरांचा कोण ? ॥ १ ॥
शेवटींचें निज बीज । हेंचि एकांतींचें गुज ॥ २ ॥
शिवशक्तिचें हें स्थान । नित्य करिती चिंतन ॥ ३ ॥
तुका म्हणे नामा पुढें । नाहीं सांगाया रोकडें ॥ ४ ॥

(८८३)

राहे दृढभाव । रामनामीं दिला जीव ॥ १ ॥
लक्षी शिवा जिवापरी । ऋणी होय त्याचा हरी ॥ २ ॥
देह राहो जावो । रामनामीं दृढभावो ॥ ३ ॥
लोपे रवि तेजें । तुका म्हणे गेलें दुजें ॥ ४ ॥

(८८४)

राघवाची कथा पतीत पावन । गाती भक्तजन आवडीनें ॥ १ ॥
राघवाचें गुणा न दिसे तुळगा । कैलासीचा राणा लांचावला ॥ २ ॥
देवाचें मंडण भक्तांचे भूपण । धर्मसरक्षण तुका म्हणे ॥ ३ ॥

(८८५)
परिहारा काम । कांहीं म्हणा राम राम ॥ १ ॥
आतां तरी पुढें चिंता । शुद्ध करोनियां हिता ॥ २ ॥
न बोलावें आधीं । धरा वचनाची शुद्धि ॥ ३ ॥
तुका म्हणे वाणी । विष अमृताची खाणी ॥ ४ ॥
(८८६)
ऐसें करा कांही । मिठी पडे रामपायीं ॥ १ ॥
तेणें सरे येरझारा । चुके चौऱ्यांशीचा फेरा ॥ २ ॥
न लगे साधन । जीवा आणिक बंधन ॥ ३ ॥
तुका म्हणे राम । दोन अक्षरांचें काम ॥ ४ ॥
(८८७)
आवडीच्या भावें जपावा श्रीराम । तेणें पुरे काम अंतरीचा ॥ १ ॥
सारांचें हें सार साधनाची रासी । उद्धरिलें दोषी बहु येणें ॥ २ ॥
सोय श्रेष्ठ निकी असें सर्वांहुनी । शंकरें भवानी–हातीं दिली ॥ ३ ॥
ऐसा हा निश्चय केला निगमांत । शोधुनि वेदांत श्रुतीमाजी ॥ ४ ॥
तुका म्हणे धन न वेंचे कवडी । अलभ्य ते जोडी लाभ असे ॥ ५ ॥
(८८८)
रामचंद्र सखा ऐसा धरी भाव । मीपणाचा ठाव पुसीं मना ॥ १ ॥
शरण निरंतर म्हण तूं गोविंदा । वाचें लावी धंदा नारायण ॥ २ ॥
यापरी सोपारे नाहीं रे साधन । वाहातसें आण तुझी मना ॥ ३ ॥
नकों कांहीं करूं आळस अंतरीं । जपे निरंतरी रघुपती ॥ ४ ॥
तुका म्हणे मोठा लाभ नरदेहीं । देहींच विदेही होती नामें ॥ ५ ॥
(८८९)
राम राम म्हणतां जावों माझा प्राण । हेंचि कृपादान देई देवा ॥ १
नको धन मान न वाढो संतान । मुखीं नारायण प्राण जावो ॥ २ ॥
नको विद्या मंत्र आयुष्य फारसें । नाहीं मज पिसें मुक्तिचेंही ॥ ३ ॥
तुका म्हणे दीन काकुलती येतों । तुम्हा विनवितो पांडुरंगा ॥ ४ ॥

(८९०)
जयजय म्हणा राम । हातें टाळी वाचे नाम ॥ १ ॥
आटाआटी नाहीं ज्यांस । मोल न पडे सायास ॥ २ ॥
म्हणे म्हणवी येरां हातीं । यज्ञादिकीं ते ते गति ॥ ३ ॥
भोजनादी करितां कामें । ध्यानसमाधि श्रीरामें ॥ ४ ॥
मंत्र जपा हाचि सार । वर्णा याती जयजयकार ॥ ५ ॥
म्हणतां राम म्हणे तुका । वेळोवेळां चुकों नका ॥ ६ ॥

(८९१)
एक आम्ही गाऊं रामकृष्णनाम । एकाविण काम नेणों दुजें ॥ १ ॥
येउनीयां देहा यातीचा स्वधर्म । जोडीं केली नाम वाचा माप ॥ २ ॥
योग नेणों याग युक्ति नेणों कळा । एक वेळोवेळां नाम गाऊं ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें आल्याचें सार्थक । रामनाम एक साधिलिया ॥ ४ ॥

(८९२)
श्रीराम म्हणतां पाप ताप जाती । पापी उद्धरती रामनामें ॥ १ ॥
रामनाम योगी ध्याती सर्व काळ । वेदांचें जें मूळ रामनाम ॥ २ ॥
रामनाम मंत्र सांगितला कानीं । उफराटे वाणी सदा घोकी ॥ ३ ॥
घोकितां सदा तो मारा मारा शब्द । बोलिला प्रबंध शतकोटी ॥४
शतकोटीमाजी काढियलें सार । भवानी शंकर उपदेशी ॥ ५ ॥
उपदेश लोकां ब्रह्मादिकां जाला । वशिष्ठानें दिला कौसल्येसी ॥६
कौसल्येनें भावें वाहिला उदरीं । तुका म्हणे थोरी काय वानूं ? ॥७

(८९३)
वानूं महिमेसी मज नाहीं वाचा । न वर्णवे साचा पार मज ॥ १ ॥
मज हे प्रचीती तुझिया नामाची । जें सुख विरंची नेणत्रेंची ॥ २ ॥
नेणवेचि पार तुझिया रूपाचा । ज्या परी भावाचा लुब्धक तो ॥३
लुब्धलासे भाव कौसल्येचें देहीं । चिंतिता हृदयीं सर्वकाळ ॥ ४ ॥
तुका म्हणे देव नामापाशीं राहे । न धरा संदेह येथें कांहीं ॥५

(८८५)
परिहारा काम । कांहीं म्हणा राम राम ॥ १ ॥
आतां तरी पुढें चिंता । शुद्ध करोनियां हिता ॥ २ ॥
न बोलावें आधीं । धरा वचनाची शुद्धि ॥ ३ ॥
तुका म्हणे वाणी । विष अमृताची खाणी ॥ ४ ॥
(८८६)
ऐसें करा कांही । मिठी पडे रामपायीं ॥ १ ॥
तेणें सरे येरझारा । चुके चौऱ्यांशीचा फेरा ॥ २ ॥
न लगे साधन । जीवा आणिक बंधन ॥ ३ ॥
तुका म्हणे राम । दोन अक्षरांचें काम ॥ ४ ॥
(८८७)
आवडीच्या भावें जपावा श्रीराम । तेणें पुरे काम अंतरीचा ॥ १ ॥
सारांचें हें सार साधनाची रासी । उद्धरिलें दोषी बहु येणें ॥ २ ॥
सोय श्रेष्ठ निकी असें सर्वांहुनी । शंकरें भवानी–हातीं दिली ॥ ३ ॥
ऐसा हा निश्चय केला निगमांत । शोधुनि वेदांत श्रुतीमाजी ॥ ४ ॥
तुका म्हणे धन न वेंचे कवडी । अलभ्य ते जोडी लाभ असे ॥ ५ ॥
(८८८)
रामचंद्र सखा ऐसा धरी भाव । मीपणाचा ठाव पुसीं मना ॥ १ ॥
शरण निरंतर म्हण तूं गोविंदा । वाचें लावी धंदा नारायण ॥ २ ॥
यापरी सोपारे नाहीं रे साधन । वाहातसें आण तुझी मना ॥ ३ ॥
नकों कांहीं करूं आळस अंतरीं । जपे निरंतरी रघुपती ॥ ४ ॥
तुका म्हणे मोठा लाभ नरदेहीं । देहींच विदेही होती नामें ॥ ५ ॥
(८८९)
राम राम म्हणतां जावों माझा प्राण । हेंचि कृपादान देई देवा ॥१
नको धन मान न वाढो संतान । मुखीं नारायण प्राण जावो ॥ २ ॥
नको विद्या मंत्र आयुष्य फारसें । नाहीं मज पिसें मुक्तिचेंही ॥ ३ ॥
तुका म्हणे दीन काकुलती येतों । तुम्हा विनवितो पांडुरंगा ॥ ४ ॥

(८९०)

जयजय म्हणा राम । हातें टाळी वाचे नाम ॥ १ ॥
आटाआटी नाहीं ज्यांस । मोल न पडे सायास ॥ २ ॥
म्हणे म्हणवी येरां हातीं । यज्ञादिकीं ते ते गति ॥ ३ ॥
भोजनादी करितां कामें । ध्यानसमाधि श्रीरामें ॥ ४ ॥
मंत्र जपा हाचि सार । वर्णा याती जयजयकार ॥ ५ ॥
म्हणतां राम म्हणे तुका । वेळोवेळां चुकों नका ॥ ६ ॥

(८९१)

एक आम्ही गाऊं रामकृष्णनाम । एकाविण काम नेणों दुजें ॥ १ ॥
येउनीयां देहा यातीचा स्वधर्म । जोडीं केली नाम वाचा माप ॥ २ ॥
योग नेणों याग युक्ति नेणों कळा । एक वेळोवेळां नाम गाऊं ॥ ३ ॥
तुका म्हणे येथें आल्याचें सार्थक । रामनाम एक साधिलिया ॥ ४ ॥

(८९२)

श्रीराम म्हणतां पाप ताप जाती । पापी उद्धरती रामनामें ॥ १ ॥
रामनाम योगी ध्याती सर्व काळ । वेदांचें जें मूळ रामनाम ॥ २ ॥
रामनाम मंत्र सांगितला कानीं । उफराटे वाणी सदा घोकी ॥ ३ ॥
घोकितां सदा तो मारा मारा शब्द । बोलिला प्रबंध शतकोटी ॥४
शतकोटीमाजी काढियलें सार । भवानी शंकर उपदेशी ॥ ५ ॥
उपदेश लोकां ब्रह्मादिकां जाला । वशिष्ठानें दिला कौसल्येसी ॥६
कौसल्येनें भावें वाहिला उदरीं । तुका म्हणे थोरी काय वानूं ? ॥७

(८९३)

वानूं महिमेसी मज नाहीं वाचा । न वर्णवे साचा पार मज ॥ १ ॥
मज हे प्रचीती तुझिया नामाची । जें सुख विरंची नेणत्रेंची ॥ २ ॥
नेणवेचि पार तुझिया रूपाचा । ज्या परी भावाचा लुब्धक तो ॥३
लुब्धलासे भाव कौसल्येचें देहीं । चिंतिता हृदयीं सर्वकाळ ॥ ४ ॥
तुका म्हणे देव नामापाशीं राहे । न धरा संदेह येथें कांहीं ॥५

(८९४)
वानूं कीर्ति ऐसी मज कैंची वाचा। वानावया साचा पार तुझा ?॥१
वाणी न पुरे हे जंव भूधराची। मज किंकराची शक्ति काय ? ॥२
वासुकीचा हार वामांगीं भवानी। वर्णितां ती गुणी न सरेची ॥३
वाहियलें कंठीं नीलकंठ जाला। वारिता तो भला प्रेमभाव ॥ ४ ॥
तुका म्हणे नाम वेदाचें मथित। शिवाचें दैवत हेंचि एक ॥ ५ ॥

(८९५)
रामनाम तिहीं लोकीं। वंद्य केलें शिवादिकीं ॥ १ ॥
शिवकंठीं हळाहळ। नामें जालें तें शीतळ ॥ २ ॥
नामें तारिल्या त्या शिळा। रामचंद्रें अवलीळा ॥ ३ ॥
तुका म्हणे नामाविण। न पविजे अधिष्ठान ॥ ४ ॥

(८९६)
सर्व साधनाचें सार। राम एक रघुवीर ॥ १ ॥
नका जाऊं आड वाटे। साधनाचे एक चाटे ॥ २ ॥
सोपी वाट दाखविली। नाहीं असत्य हे बोली ॥ ३ ॥
तुका म्हणे भावबळें। नाम धरिल्यानें फळे ॥ ४ ॥

(८९७)
नामें वाल्मिकी तरला। तिन्ही लोकीं वंद्य झाला ॥ १ ॥
नामें तारिले अपार। नाहीं त्यांचा पारावार ॥ २ ॥
नाम वरिष्ठ सकळां। वंदी वेद श्रुति बळा ॥ ३ ॥
तुका म्हणे नाम थोर। पापी जाले ते अमर ॥ ४ ॥

(८९८)
नाम तुझें नारायणा। फोडी पाषाणासी पान्हा ॥ १ ॥
नाम जपलें वाल्मिकें। पानें फुटले टोणके ॥ २ ॥
अजामीळ पापरासी। नामें नेला वैकुंठासी ॥ ३ ॥
ऐसा नामाचा महिमा। तुका म्हणे जाली सीमा ४

(८९९)
नामें सागरीं त्या शिळा । तारियेल्या त्वां गोपाळा ॥ १ ॥
नामें असंख्यात प्राणी । उद्धरिले त्रिभुवनीं ॥ २ ॥
नाम सत्य साच खरें । बाळां अबलासी बरें ॥ ३ ॥
तुका म्हणे नामप्रेम । मज देई अविश्राम ॥ ४ ॥
(९००)
नाममंत्र आहे सोपा । अविश्राम जाळी पापा ॥ १ ॥
जो कां निश्चय करील । नाम तया उद्धरील ॥ २ ॥
नरनारी कोणी याती । नाम ठेवी एके पंक्ति ॥ ३ ॥
तुका म्हणे या नामानें । कृपा केली विठ्ठलानें ॥ ४ ॥
(९०१)
जगद्गुरु जगत्पते । दयावंते रघुनाथे ॥ १ ॥
मज दाखवी चरण । आघात हे चुकवून ॥ २ ॥
फांसा काढी वासनेचा । दास करीं कायावाचा ॥ ३ ॥
तुका म्हणे दीनबंधु । मज तारी कृपासिंधु ॥ ४ ॥
(९०२)
आतां कळली निश्चिती । तुझी कीर्ति रघुपती ॥ १ ॥
ताकें पोळला एकदां । दूध फुंकील गोविंदा ॥ २ ॥
काय अटकलें होतें । आलों शरण तुम्हातें ॥ ३ ॥
तुका म्हणे भ्रम भारी । होता तुमचा कंसारी ॥ ४ ॥

प्रकरण ३१ वे

# हनुमंत महिमा

(९०३)
रामसभेसी मारुती । धाक पडे लंकापती ॥ १ ॥
कुंभकर्ण इंद्रजित । तेंही थरथरां कांपत ॥ २ ॥

आंगें जाऊनि पाताळा । केली देवीची अवकळा ।। ३ ।।
ऐसा उपकारी सखा । शरण त्यासी म्हणे तुका ।। ४ ।।

(१०४)

मारुतीनें तप केलें । भगवे निशाण लाविलें ।। १ ।।
ऐसा मारुती सत्याचा । पार बांधिला मोत्याचा ।। २ ।।
दोन्ही नद्यांचा तो मेळ । तेथें आहे गंगाजळ ।। ३ ।।
ऐसा मारुती समर्थ । तुका त्यासी शरणागत ।। ४ ।।

टीप:– भगवे निशाण = वैराग्यशील निष्काम सेवाव्रत. मोत्याचा = रामनामरूपीं मोत्यांचा; नामस्मरणाचा, दोन्ही नद्यांचा मेळ = ज्ञान आणि उपासना यांची सांगड म्हणजे भक्ति. गंगाजळ = जीवाला पावन करणारी सत्ता–शक्ति म्हणजें देवाचें अधिष्ठान. समर्थ = सर्व अर्थ सम म्हणजें एकवटून एकदम मिळविणारा–शक्तिशाली.

(१०५)

कपीकुळीं हनुमंत । तया माझें दंडवत ।। १ ।।
जेणें सीताशुद्धी केली । रामसीता भेटविली ।। २ ।।
शिळीं बुजविला सागर । अवघा उतरिला भार ।। ३ ।।
रामरायाच्या सेवका । शरण आलों म्हणे तुका ।। ४ ।।

(१०६)

धन्य अंजनीचा सुत । नांव ज्याचें हनुमंत ।। १ ।।
जेणें सीताशुद्धी केली । रामसीता भेटविली ।। २ ।।
द्रोणागिरी जो आणिला । लक्ष्मुमण वांचविला ।। ३ ।।
ऐसा मारुती उपकारी । तुका लोळे चरणांवरी ।। ४ ।।

(१०७)

शरण हनुमंता । तुम्हां आलों रामदूता ।। १ ।।
काय भक्तिच्या त्या वाटा ? । मज दावाव्या सुभटा ।। २ ।।
शूर आणि धीर । स्वामीकाजीं निरंतर ।। ३ ।।
तुका म्हणे रुद्रा । धन्य अंजनीकुमरा ।। ४ ।।

(९०८)

केली सीताशुद्धि । मुळे–रामायणा आधीं ॥ १ ॥
ऐसा प्रतापी गहन । सुरांअसुरां मोहन ॥ २ ॥
जाऊनी पाताळा । केली देवीची अवकळा ॥ ३ ॥
रामलक्षुमण । आणी नेले जें चोरून ॥ ४ ॥
जोडुनियां कर । उभा सन्मुख समोर ॥ ५ ॥
तुका म्हणे पापें । जाती वायुसुता–जपें ॥ ६ ॥

(९०९)

काळ देशधडी । काम घातला बांदोडी ॥ १ ॥
तया माझें दंडवत । कपीकुळीं हनुमंत ॥ २ ॥
शरीर वज्रसें । कवळी ब्रह्मांड जो पुच्छें ॥ ३ ॥
रामाच्या सेवका । शरण आलों म्हणे तुका ॥ ४ ॥

(९१०)

हनुमंत महाज्ञानी । गेलें लंकेवर चालुनि ॥ १ ॥
अवघीं घेतली धुंडाळीं । पैं न दिसें जनकबाळीं ॥ २ ॥
गेलें अशोकवनासी । तेथें भेटले सीतेसी ॥ ३ ॥
करुनि फराळाचें मिस । केला वनाचा विध्वंस ॥ ४ ॥
तुका म्हणे जंबुमाळी । रगडिला पायांतळीं ॥ ५ ॥

*प्रकरण ३२ वे*

## हरिविजयाचें अभंग–कथानक–१

(९११)

मौन कां धरिलें विश्वाच्या जीवना । उत्तर वचना देई माझ्या ॥१
तूं माझें संचित पूर्वपुण्यधन । तूं माझें प्राचीन पांडुरंगा ॥ २ ॥
तूं माझें सत्कर्म तूं माझा स्वधर्म । तूंचि नित्यनेम नारायणा ॥ ३ ॥

कृपावचनाची वाट पाहातसें । करुणावोरसें बोल कांहीं ॥ ४ ॥
तुका म्हणे प्रेमळाच्या प्रियोत्तमा । बोल सर्वोत्तमा मजसवें ॥ ५ ॥

(९१२)

काय करूं आतां धरूनियां भीड ?। निःशंक हें तोंड वाजविलें ॥ १ ॥
नव्हे जगीं कोणी मुकियाचा जाण । सार्थक लाजोन नव्हे हित ॥१
आलें तें उत्तर बोलें स्वामीसवें । धीटनीट जीवें होऊनियां ॥ ३ ॥
तुका म्हणे मना समर्थासीं गांठी । घालावी हे मिठी थापटूनि ॥४

टीपः– थापटूनि = जागे होऊन–जाणतेपणे.

(९१३)

माझिया तों जीवें घेतला हा सोस । पाहे तुझी वास भेटावयां ॥ १ ॥
मातेविण बाळ न मनी आणिका । सर्वकाळ घोका स्तनपाना ॥ २ ॥
वोसंगा निघाल्यावांचुनि न राहे । त्याचें आर्त माये जाकळिते ॥३
तुका म्हणे माते भक्तांच्या कृपाळा । गिळियेल्या ज्वाळा वनांतरीं ॥४

(९१४)

तें काय पवाडे नाहीं म्यां ऐकिलें । गोपाळ रक्षिलें वनांतरीं ? ॥१
मावेचा वणवा होऊनि राक्षस । लागला वनांस चहूंकडें ॥ २ ॥
गगनासी ज्वाळा लागती तुंबळ । गोधनें गोपाळ वेडावलीं ॥ ३ ॥
तुका म्हणे तेथें पळावया वाट । नाहीं बा निपट ऐसें जालें ॥ ४ ॥

(९१५)

पैल आली जागीं कान्हो काय करावें ? । न कळे तें कैसें आम्हीं वाचों गा जीवें ॥ १ ॥ धांव घालीं हरी या सांपडलों मधीं । वोणव्याचे मधीं कांहीं बुद्धि करावीं ॥ २ ॥ अवचितां ज्वाळा येतां देखिल्या वरी । परतोनि पाहतां दिसें जालीं बोहरी ॥ ३ ॥ सभोंवता फेर रीध नये पळतां । जाणसी तें करी तुका म्हणे अनंता ॥ ४ ॥

(९१६)
धडकला अग्नी आह्मा येती वरी। गोपाळ श्रीहरी विनविती ॥ १ ॥
अरे कृष्णा काय विचार करावा?। आला रे वोणवा जाळों आतां! ॥२
अरे कृष्णा तुझें नाम बळिवंत । होय कृपावंत राखी आतां ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐकें कृष्णा नारायणा । गोपाळें करुणा भाकितली ॥ ४ ॥
(९१७)
अरे कृष्णा ! आम्ही तुझें निजगडी । नवनीत आवडी देत होतों ॥ १ ॥
अरे कृष्णा आतां राखें कैसें तरी । संकटाभीतरीं पडियेलों ॥ २ ॥
वरुषला इंद्र जेव्हां शिळाधारीं । गोवर्धनगिरी उचलिला ॥ ३ ॥
तुका म्हणे तुझें पवाडे सकळ । वर्णिती गोपाळ नारायणा ॥ ४ ॥
(९१८)
अरे कृष्णा तुवां काळिया नाथिला । दाढे रगडिला रिठासुर ॥ १ ॥
अरे कृष्णा तुवां पूतना शोषिली । दुर्बुद्धि कळली अंतरींची ॥ २ ॥
गोपाळ करुणा ऐसी नानापरी । भाकिती श्रीहरी तुजपुढें ॥ ३ ॥
कामधेनु नाम तुझें करुणेची । तुका म्हणे त्यांची आली कृपा ॥ ४ ॥
(९१९)
चहूंकडूनियां येताति कोल्हाळ । सभोंवते ज्वाळ जाळों आले ॥ १ ॥
सकुमार मूर्ति श्रीकृष्ण धाकुटी । घोंगडी आणि काठी खांद्यावरि ॥ २ ॥
लहान लेंकरूं होतें तें सगुण । विक्राळ वदन पसरिलें ॥ ३ ॥
जाभाड तें एक गगना लागलें । एक तें ठेविलें भूमीवरि ॥ ४ ॥
तयेवेळीं अवघें गोपाळही भ्यालें । तुकेंही लपालें भिऊनियां ॥ ५ ॥
(९२०)
भिऊं नकां बोले राहा झांकुनि डोळे । वाचवील देव धाक नाहीं ज्याबळें ॥१॥ जगाचा हा बाप देवांचाही अधिदेव । कळों नेदी माव काय करी करवी ते ॥२॥ पसरूनि मुख विश्वरूप खाय ज्वाळ । साधोनियां संधी अवघे पाहाती गोपाळ ॥३॥ तुका म्हणे आम्ही मागें भ्यालों वांयांविण । कळों आलें आतां या सांगातें नाहीं शिण ॥४॥

(९२१)
श्रीमुख वोणवा गिळीत चालिलें। भ्यासूर वासिलें ओष्ठद्वय॥ १ ॥
विक्राळ त्या दाढा भ्यानें पाहावेना। धाउनी रसना ज्वाळ गिळी ॥२
जिव्हा लांब धांवे गोळा करी ज्वाळ। वासिलें विक्राळ मुखीं घालीं ॥३
तुका म्हणे अवघा वोणवा गिळिला। आनंद जाहाला गोपाळांसी ॥४
(९२२)
गोपाळ भीतीनें कैसें विनविती। विक्राळ श्रीपती होऊं नको ॥ १ ॥
नको रे बा कृष्णा धरूं ऐसें रूप। आम्हां चळकांप सुटलासे ॥ २ ॥
होई बा धाकुटा शाम चतुर्भुज। बैसोनियां गुज सुखें बोलूं॥ ३ ॥
वोणव्याच्या संगें गिळिशील आम्हां। तुका मेघश्यामा पायां लागे ॥४
(९२३)
सांडियेलें रूप विक्राळ भ्यासूर। झालें सकुमार कोडिसें तें ॥ १ ॥
शाम चतुर्भुज मुकुट कुंडलें। सुंदर दंडलें नव बाळ॥ २ ॥
गोपाळ म्हणती कैसें रे बा कृष्णा। रूप नारायणा धरियेलें? ॥ ३ ॥
कैसा वाढलासी विक्राळ जाल्हासी। गटगटा ज्वाळांसी गिळियेलें ॥४
तुका म्हणे भावें पुसती गोपाळ। अनाथवत्सल म्हणोनियां॥ ५ ॥
(९२४)
नेणती तयांसि साचभाव दावी हरी। लाज नाहीं नाचे पांवा वाजवी मोहरी ॥ १ ॥ चला रे चला रे याच्या पायां लागों आतां। राखिलें जळतां महा आगीपासुनि ॥ २ ॥ कैसी रे कान्होबा एवढी गिळियेली आगी। न देखों पोळलें कोठें तुज तोंडा अंगीं ॥३॥ तुका म्हणे तुम्ही कां रे करितां नवल। आमुची शिदोरी खातो त्याचें आलें बळ ॥ ४ ॥
(९२५)
वा रे कृष्णा तुझें मुख कीं कोमळ। कैसें माजी ज्वाळ गिळियेलें? ॥१
वा रे कृष्णा तुझी जिव्हा कीं कोंवळीं। असेल पोळली नारायणा! ॥२
बैसे कृष्णा पाहों माजी मुख वासी। पाहूं दे आम्हांसी भय वाटे ॥३

घोंगडिया खाली घालुनियां तळीं । वरी वनमाळी बैसविती ॥ ४ ॥
तुका म्हणे भावें आकळिला देव । कृपासिंधु राव त्रैलोक्याचा ॥ ५ ॥
(९२६)
एक म्हणती मुख वासी नारायणा । पाहू दे वदना डोळेभरी ॥ १ ॥
वासुनियां मुख पाहाति गोपाळ । भीतरी सकळ व्योमाकार ॥ २ ॥
म्हणती गोपाळ धन्य भाग्य देवा । स्वरूपाचें ठावा केंवी जाणों? ॥ ३ ॥
तुका म्हणे अवघे विठोबा भोंवते । मिळालें नेणते मानथोर ॥ ४ ॥
(९२७)
एक म्हणती कृष्णा वासिलें त्वां मुख । तेव्हां थोर धाक पडिला आम्हां॥१
गिळों लागलासी अग्नीचे कल्लोळा । आम्ही चळचळां कांपतसों ॥२
ज्वाळाबरोबरी गिळशील आम्हां । ऐसें मेघश्यामा भय वाटे ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें भाग्याचें गोपाळ । फुटकें कपाळ आमुचेंचि ॥ ४ ॥
(९२८)
गोपाळांचें कैसें केलें समाधान?। दिलें आलिंगन? निववीलें ॥ १ ॥
"ज्वाळा बरोबरी तुम्हां कां ग्रासीन । अवतार घेऊन तुम्हांसाठीं?"॥२
"निर्गुण निर्भय मी सर्वांनिराळा । प्रकृतिवेगळा गुणातीत" ॥ ३ ॥
चिन्मय चिद्रूप अवघा चिदाकार । तुका म्हणे पार नेणे ब्रह्मा ॥ ४ ॥
(९२९)
'ऐसा मी अपार अनादि अनंत । परि कृपावंत भाविकांचा ॥ १ ॥
दुर्जनां चांडाळीं करीं निर्दाळण । करीं संरक्षण अंकिताचें ॥ २ ॥
भक्त माझें सखे जिवलग सांगाती । सर्वांग त्यांप्रति वोडवीन ॥ ३ ॥
पितांबरछाया करीन त्यांवरी । सदा त्यांचे घरीं-दारीं उभा ॥ ४ ॥
माझें भक्त मज जें सदा रातले । त्याघरीं घेतलें धरणें म्यां " ॥ ५ ॥
कोठें हें वचन ठेविलें ये वेळें? । तुका म्हणे डोळे झांकियेलें ॥ ६ ॥
(९३०)
त्यानीं धणीवरी सग केला हरीसवें । देऊनि आपुलें तोचि देईल तें खावें ॥ १ ॥ न ठेवी आभार सप्रेमाचा भुकेला । बहुदिस

(९२१)
श्रीमुख वोणवा गिळीत चालिलें। भ्यासूर वासिलें ओष्ठद्वय॥ १ ॥
विक्राळ त्या दाढा भ्यानें पाहावेना। धाउनी रसना ज्वाळ गिळी ॥२
जिव्हा लांब धांवे गोळा करी ज्वाळ। वासिलें विक्राळ मुखीं घालीं ॥३
तुका म्हणे अवघा वोणवा गिळिला। आनंद जाहाला गोपाळांसी ॥४
(९२२)
गोपाळ भीतीनें कैसें विनविती। विक्राळ श्रीपती होऊं नको ॥ १ ॥
नको रे बा कृष्णा धरूं ऐसें रूप। आम्हां चळकांप सुटलासे ॥ २ ॥
होई बा धाकुटा शाम चतुर्भुज। बैसोनियां गुज सुखें बोलूं॥ ३ ॥
वोणव्याच्या संगें गिळिशील आम्हां। तुका मेघश्यामा पायां लागे ॥४
(९२३)
सांडियेलें रूप विक्राळ भ्यासूर। झालें सकुमार कोडिसें तें ॥ १ ॥
शाम चतुर्भुज मुकुट कुंडलें। सुंदर दंडलें नव बाळ॥ २ ॥
गोपाळ म्हणती कैसें रे बा कृष्णा। रूप नारायणा धरियेलें? ॥ ३ ॥
कैसा वाढलासी विक्राळ जाल्लासी। गटगटा ज्वाळांसी गिळियेलें ॥४
तुका म्हणे भावें पुसती गोपाळ। अनाथवत्सल म्हणोनियां ॥ ५ ॥
(९२४)
नेणती तयांसि साचभाव दावी हरी। लाज नाहीं नाचे पांवा वाजवी मोहरी ॥ १ ॥ चला रे चला रे याच्या पायां लागों आतां। राखिलें जळतां महा आगीपासुनि ॥ २ ॥ कैसी रे कान्होबा एवढी गिळियेली आगी। न देखों पोळलें कोठें तुज तोंडा अंगीं ॥३॥ तुका म्हणे तुम्ही कां रे करितां नवल। आमुची शिदोरी खातो त्याचें आलें बळ ॥ ४ ॥
(९२५)
वा रे कृष्णा तुझें मुख कीं कोमळ। कैसें माजी ज्वाळ गिळियेलें? ॥१
वा रे कृष्णा तुझी जिव्हा कीं कोंवळीं। असेल पोळली नारायणा! ॥२
बैसे कृष्णा पाहों माजी मुख वासी। पाहूं दे आम्हांसी भय वाटे ॥३

घोंगडिया खाली घालुनियां तळीं । वरी वनमाळी बैसविती ॥ ४ ॥
तुका म्हणे भावें आकळिला देव । कृपासिंधु राव त्रैलोक्याचा ॥ ५ ॥
(९२६)
एक म्हणती मुख वासी नारायणा । पाहूं दे वदना डोळेभरी ॥ १ ॥
वासुनियां मुख पाहाति गोपाळ । भीतरी सकळ व्योमाकार ॥ २ ॥
म्हणती गोपाळ धन्य भाग्य देवा । स्वरूपाचें ठावा केंवी जाणों? ॥ ३ ॥
तुका म्हणे अवघे विठोबा भोंवते । मिळालें नेणते मानथोर ॥ ४ ॥
(९२७)
एक म्हणती कृष्णा वासिलें त्वां मुख । तेव्हां थोर धाक पडिला आम्हां॥ १
गिळों लागलासी अग्नीचे कल्लोळा । आम्ही चळचळां कांपतसों ॥ २
ज्वाळाबरोबरी गिळशील आम्हां । ऐसें मेघश्यामा भय वाटे ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसें भाग्याचें गोपाळ । फुटकें कपाळ आमुचेंचि ॥ ४ ॥
(९२८)
गोपाळांचें कैसें केलें समाधान? । दिलें आलिंगन? निववीलें ॥ १ ॥
"ज्वाळा बरोबरी तुम्हां कां ग्रासीन । अवतार घेऊन तुम्हांसाठीं?"॥ २
"निर्गुण निर्मय मी सर्वांनिराळा । प्रकृतिवेगळा गुणातीत" ॥ ३ ॥
चिन्मय चिद्रूप अवघा चिदाकार । तुका म्हणे पार नेणे ब्रह्मा ॥ ४ ॥
(९२९)
"ऐसा मी अपार अनादि अनंत । परि कृपावंत भाविकांचा ॥ १ ॥
दुर्जनां चांडाळां करीं निर्दाळण । करीं संरक्षण अंकिताचें ॥ २ ॥
भक्त माझें सखे जिवलग सांगाती । सर्वांग त्यांप्रति वोडवीन ॥ ३ ॥
पितांबरछाया करीन त्यांवरी । सदा त्यांचे घरीं-दारीं उभा ॥ ४ ॥
माझें भक्त मज जें सदा रातले । त्याघरीं घेतलें धरणें म्यां" ॥ ५ ॥
कोठें हें वचन ठेविलें ये वेळे? । तुका म्हणे डोळे झांकियेलें ॥ ६ ॥
(९३०)
त्यानीं धणीवरी संग केला हरीसवें । देऊनि आपुलें तोचि देईल तें खावें ॥ १ ॥ न ठेवी आभार सप्रेमाचा भुकेला । ब्रह्मदिक

संग हाचि निर्धार त्याला ॥ २ ॥ कान्होबा तूं जेवीं घांसोघासी म्हणती । आरुष गोपाळें त्याची देवा बहुप्रीती ॥ ३ ॥ तुका म्हणे आतां जाऊं आपुलिया घरा । "तुयें वांचविलों" ऐसें सांगों दातारा ॥ ४ ॥

*प्रकरण ३३ वे*

# प्रल्हाद चरित्र

(१३१)
दीनानाथा तुझीं ब्रिदें चराचरीं । होसील कैवारी अंकिताचा ॥ १ ॥
पुराणीं जे तुझे गर्जती पवाडे । ते आम्हां रोकडे कळों आले ॥ २ ॥
आपुल्या दासांचें न साहासी उणें । उभा त्या कारणे राहिलासी ॥ ३ ॥
चक्रगदा हाती आयुधें अपारें । न्यून तेथें पुरें करूं पावें ॥ ४ ॥
तुका म्हणे तुज भक्तीचें कारण । करावया पूर्ण अवतार ॥ ५ ॥
(१३२)
वर्णी महिमा ऐसी मज नाहीं वाचा । अनुसरलो साचा कायामनें ॥ १ ॥
ठावें तुम्हां काया ठेविली चरणीं । आतां ओवाळुनि काय सांडूं? ॥ २
माझें मज कांहीं न दिसे पाहातां । जें तुज अनंता समर्पावें ॥ ३ ॥
नाहीं भाव ऐसा करी तुझी सेवा । जीव वाहूं देवा तोही तुझा ॥ ४ ॥
तुका म्हणे आतां नाहीं मज थार । तुझें उपकार फेडावया ॥ ५ ॥
(१३३)
भवसागरीचे । निजदासां भय कैंचे ? ॥ १ ॥
पाहे प्रल्हादा संकटीं । कैसा धांवे जगजेठी ॥ २ ॥
बुडवितां जळीं । तेथें रक्षी वनमाळी ॥ ३ ॥
तुका म्हणे आगी । राखे जळत्याप्रसंगीं ॥ ४ ॥
(१३४)
प्रल्हादाकारणें नृसिंह जालासी । त्याचिया बोलासी सत्य केलें ॥ १ ॥
रामकृष्णविष्णु नारायण हरि । गर्जे राजद्वारीं भक्तराज ॥ २ ॥

विठ्ठल माधव मुकुंद केशव। तेणें दैत्यराव भीत मनीं ॥ ३ ॥
तुका म्हणे रूप धरोनि सगुण। भक्ताचें वचन सत्य केलें ॥ ४ ॥
(९३५)
नामाचें सामर्थ्य कां रे दवडिसी ?। कां रे विसरसी पवाडे हे? ॥ १ ॥
खणखणां हाणिती खड्गे प्रल्हादासी। न रूपे आंगासी किंचितही ॥२
रामकृष्ण हरी मारी ऐसी हाक। तेणें पडे धाक बळियासी ॥ ३ ॥
असों द्या सामर्थ्यें ऐसिया कीर्तीची। आवडी तुक्याची भेटी द्यावी ॥४
(९३६)
बोलावूनी पिता पुसे प्रल्हादासी। काय शिकलासी सांग बापा?॥ १ ॥
येरू म्हणे वसे हरिनाम चित्तीं। बहुतची प्रीति त्याची मज ॥ २ ॥
मरो झडो पडो तुटो हें शरीर। वाचे निरंतर हेंचि घोकीं ॥ ३ ॥
राग आला दुष्टा आज्ञा केली दूता। धरा बांधा लाथा मारा यांसीं ॥४
तुका म्हणे दूतीं केली जे यातना। एक नारायणा ठावी असे ॥ ५ ॥
(९३७)
पर्वतावरूनी लोटिला प्रल्हाद। परी तो गोविंद विसरेना ॥ १ ॥
वरूनीयां त्यानीं लोटियल्या धोंडीं। खचविल्या दरडी पर्वताच्या ॥२
पक्षी श्वापदासीं वर्तला प्रलय। म्हणती हायहाय जनलोक ॥ ३ ॥
पाहाती तो उभा जैसा तैसा आहे। चिंतितसे पाये गोविंदाचे ॥ ४ ॥
तुका म्हणे ज्याचें मुखीं नाम आहे। विघ्नाचें तें भये काय तया? ॥५
(९३८)
आणविला हत्ती बहु बळिवंत। मस्त मदोन्मत्त धीट सदा ॥ १ ॥
लोटियला वरी दया नाहीं पोटीं। दूर्जन तो हटीं पडियेला ॥ २ ॥
जवळी येतां हरिनाम गर्जे वाणी। पळतां मेदिनी थोडी जाली॥३
दृष्टी देखियेला गजाचा तो वैरी। तेणें नेत्रा तंद्री लागलीसे ॥ ४ ॥
मारितां अंकुश न फिरे तो मागें। सोडियला वेगें प्राण त्यानें ॥ ५ ॥
तुका म्हणे वसे ज्याचें मुखीं नाम। भवगजभ्रम काय करी ? ॥ ६ ॥

(९३९)

बांधोनी पाषाण बुडविला सागरीं । ठेवियल्या वरी शिळा थोर ॥१
आप नारायण रक्षी निज दासां । लोटोनी सरसा कडे लावी ॥ २ ॥
न बुडेची कांहीं करितां उपाया । रक्षी देव तया मागेपुढें ॥ ३ ॥
तुका म्हणे देव भक्तां साह्यकारी । रक्षी नानापरी संकटीं तो ॥ ४ ॥

(९४०)

पाचारिलें व्याळ लाविलें शरीरीं । अंगा चहूंफेरी वेष्टीयेले ॥ १ ॥
भयानक रूप मुखीं उठे ज्वाळा । सर्वांगासी कळा लावियेल्या ॥ २ ॥
नाम धडफुडा जपे वेळोवेळां । तेणें कळिकाळा कांप सुटे ॥ ३ ॥
दृष्टी विखारांनीं गरुड देखिला । अंनक भेटला भक्षावया ॥ ४ ॥
तुका म्हणे विघ्न थोर वोढवलें । मरण पातलें दुर्जनांसीं ॥ ५ ॥

(९४१)

वाटीभरी वीष दिल्हे प्रल्हादासी । निर्भयमानसीं तुझ्या बळें ॥ १ ॥
"भोक्ता नारायण" करी तो प्राशन । प्रतापें जीवन जालें नामा- ॥२
नामाच्या चिंतनें विषाचें अमृत । जाहालें देखत नारायणा ॥ ३ ॥
तुका म्हणे तुझे ऐसे बडिवार । शिणला फणिवर वर्णूं नेणे ॥ ४ ॥

(९४२)

अग्निकुंडामाजी घातला प्रल्हाद । तरी तो गोविंद विसरेना ॥ १ ॥
पितयासी म्हणे व्यापक श्रीहरी । नांदतो मुरारी सर्वांठायीं ॥ २ ॥
अग्निरूपें माझा सखा नारायण । प्रल्हाद गर्जून हाक मारी ॥ ३ ॥
तुका म्हणे अग्नि जाहाला शीतळ । प्रतापें सबळ विठो तुझ्या ॥ ४ ॥

(९४३)

कोपोनियां पिता पुसे प्रल्हादासी । सांग हृषीकेशी कोठें आहे? ॥ १ ॥
येरू म्हणे काष्टीं पाषाणीं सकळीं । आहे वनमाळी जेथें तेथें ॥ २ ॥
खांबावरी लाथ मारी तो दुर्जन । खांबीं नारायण म्हणतांचि ॥ ३ ॥
तुका म्हणे ऐसा खांब कडाडला । ब्रह्मा दचकला सत्यलोकीं ॥ ४ ॥

(९४४)
डळमळिलें मेरुमांदार अनेग । पाताळीं भुजंग डोई झाडी ॥ १ ॥
लोपले गगनीं सूर्य आणि चंद्र । कांपतसे इंद्र थरथरां ॥ २ ॥
ऐसें रूप उग्र हरीनें धरिलें । दैत्या मारियेले मांडीवरी ॥ ३ ॥
तुका म्हणे भक्तांकारणें श्रीहरी । बहु दुराचारी निर्दाळिले ॥ ४ ॥

*प्रकरण ३४ वें*

## श्वानभाव

(९४५)
तुझें दारींचा कुतरा । नको मोकलूं दातारा ॥ १ ॥
धरणें घेतलें दारांत । आतां नको उठवूं हात ॥ २ ॥
पायीं घातली मुरकुंड । जालों शिरोमणी भांड ॥ ३ ॥
तुका म्हणे जगजीवना । ब्रीद राखीं नारायणा ॥ ४ ॥
(९४६)
सांखळिलों प्रीती गळां । भुंके वेळा जाणोनि ॥ १ ॥
तुमचें मी केशीराजा । सुणें काजा पाळिलें ॥ २ ॥
आलेंगेलें कळे वाटे । कोण नीटे–वाकडी ॥ ३ ॥
तुका म्हणे आली वारी । दुरितें दुरी नातळतां ॥ ४ ॥
(९४७)
पाठीं लागे दवडी दुरी । त्या बाहेरी संसारा ॥ १ ॥
येऊनि दडे तुमच्या पायीं । धांवें जंई छो म्हणा ॥ २ ॥
पारिख्याचा वास पडे । खडबडे उठीते ॥ ३ ॥
तुका म्हणे लावी धाक । नेदी ताक खाऊं त्या ॥ ४ ॥
(९४८)
सुणियाचा हाचि भाव । निजठाव राखावा ॥ १ ॥
दुजियाचा येऊं वारा । वरि घरा नेदावा ॥ २ ॥
केली याची फाडाफाडी । तडातोडी क्षेत्राची ॥ ३ ॥
पातेजत नाहीं लोकां । देव तुकावांचूनि ॥ ४ ॥

(९४९)
मुणियाची आवडी देवा । कांहीं सेवा न घेतां ॥ १ ॥
सिकविलें जवळीं वैसों । जेथें असों तेथेंचि ॥ २ ॥
नेदी दुजें बोलों करूं । गुरुगुरुसहाय्यें ॥ ३ ॥
तुका म्हणे कुर्वाळितां । अंग–सत्ता–संगाची ॥ ४ ॥
(९५०)
सुणियासी मैत्र केलें । त्यासीं बोले ओळखीं ॥ १ ॥
खूण उभा विटेवर । कटीं कर धरिले ॥ २ ॥
जवळुनि नव्हे दुरी । लाड करी कौतुकें ॥ ३ ॥
तुका म्हणे घाली वरी । झूल थोरी मोलाची ॥ ४ ॥
(९५१)
श्वानाचिया परी लोळें तुझ्या द्वारीं । भुंके हरिहरि नाम तुझें ॥ १ ॥
तेणें गुणें राखें स्वधर्म आपुला । ठायींच थेकुला होऊनियां ॥ २ ॥
भुंकीं उठीं बैसें न जायें वेगळा । आडळी गोपाळा पायांपासीं ॥ ३ ॥
तुका म्हणे आम्हां वर्म आहे ठावें । मागेन तें द्यावें प्रेमसुख ॥ ४ ॥
(९५२)
श्वाना दिली सवे । पायांभोंवतें तें भोंवें ॥ १ ॥
तैसी जाली मज परी । वसे निकट सेजारीं ॥ २ ॥
जेवितां जवळीं । येऊनियां पूंस घोळी ॥ ३ ॥
कोपेल तो धनी । तुका म्हणे नेणें मनीं ॥ ४ ॥
(९५३)
सिळें खातां आला वीट । सुणें धीट पायां ये ॥ १ ॥
कान्होबा ते जाणे खूण । घाली ऊन घास त्या ॥ २ ॥
निज ठायींचें त्या द्यावें । लाड भावें पाळावा ॥ ३ ॥
तुका जुनाट मी सुणें । मोहे तेणें परतले ॥ ४ ॥

भाग

(९४९)
मुणियाची आवडी देवा । कांहीं सेवा न घेतां ।। १ ।।
सिकविलें जवळीं बैसों । जेथें असों तेथेंचि ।। २ ।।
नेदी दुजें बोलों करूं । गुरुगुरुसहाय्ये ।। ३ ।।
तुका म्हणे कुर्वाळितां । अंग–सत्ता–संगाची ।। ४ ।।

(९५०)
सुणियासी मैत्र केलें । त्यासीं बोले ओळखीं ।। १ ।।
खूण उभा विटेवर । कटीं कर धरिले ।। २ ।।
जवळुनि नव्हे दुरी । लाड करी कौतुकें ।। ३ ।।
तुका म्हणे घाली वरी । झूल थोरी मोलाची ।। ४ ।।

(९५१)
श्वानाचिया परी लोळें तुझ्या द्वारीं । भुंके हरिहरि नाम तुझें ।। १ ।।
तेणें गुणें राखें स्वधर्म आपुला । ठायींच थेकुला होऊनियां ।। २ ।।
भुंकीं उठीं बैसें न जायें वेगळा । आडळी गोपाळा पायांपासीं ।। ३ ।।
तुका म्हणे आम्हां वर्म आहे ठावें । मागेन तें द्यावें प्रेमसुख ।। ४ ।।

(९५२)
श्वाना दिली सवे । पायांभोंवतें तें भोंवें ।। १ ।।
तैसी जाली मज परी । वसे निकट सेजारीं ।। २ ।।
जेवितां जवळीं । येऊनियां पूंस घोळी ।। ३ ।।
कोपेल तो धनी । तुका म्हणे नेणें मनीं ।। ४ ।।

(९५३)
सिळें खातां आला वीट । सुणें धीट पायां ये ।। १ ।।
कान्होबा ते जाणे खूण । घाली ऊन घास त्या ।। २ ।।
निज ठायींचें त्या द्यावें । लाड भावें पाळावा ।। ३ ।।
तुका जुनाट मी सुणें । मोहे तेणें परतले ।। ४ ।।

भाग १ लोकसंग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 36553 वि:
क्रमांक ... औ. कि.

REFBK-0014829
REFBK-0014829

(९४४)
डळमळिलें मेरुमांदार अनेग । पाताळीं भुजंग डोई झाडी ॥ १ ॥
लोपले गगनीं सूर्य आणि चंद्र । कांपतसे इंद्र थरथरां ॥ २ ॥
ऐसें रूप उग्र हरीनें धरिलें । दैत्या मारियेले मांडीवरी ॥ ३ ॥
तुका म्हणे भक्तांकारणें श्रीहरी । बहु दुराचारी निर्दाळिले ॥ ४ ॥

प्रकरण ३४ वे

# श्वानभाव

(९४५)
तुझें दारींचा कुतरा । नको मोकलूं दातारा ॥ १ ॥
धरणें घेतलें दारांत । आतां नको उठवूं हात ॥ २ ॥
पायीं घातली मुरकुंड । जालों शिरोमणी भांड ॥ ३ ॥
तुका म्हणे जगजीवना । ब्रीद राखीं नारायणा ॥ ४ ॥
(९४६)
सांखळिलों प्रीती गळां । भुंके वेळा जाणोनि ॥ १ ॥
तुमचें मी केशीराजा । सुणें काजा पाळिलें ॥ २ ॥
आलेंगेलें कळे वाटे । कोण नीटे-वाकडी ॥ ३ ॥
तुका म्हणे आली वारी । दूरितें दुरी नातळतां ॥ ४ ॥
(९४७)
पाठीं लागे दवडी दुरी । त्या बाहेरी संसारा ॥ १ ॥
येऊनि दडे तुमच्या पायीं । धांवें जंई छो म्हणा ॥ २ ॥
पारिख्याचा वास पडे । खडबडे उठीते ॥ ३ ॥
तुका म्हणे लावी धाक । नेदी ताक खाऊं त्या ॥ ४ ॥
(९४८)
सुणियाचा हाचि भाव । निजठाव राखावा ॥ १ ॥
दुजियाचा येऊं वारा । वरि घरा नेदावा ॥ २ ॥
केली याची फाडाफाडी । तडातोडी क्षेत्राची ॥ ३ ॥
पातेजत नाहीं लोकां । देव तुकावांचूनि ॥ ४ ॥